# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // तहकुब महासभेच्या बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४४** **दि. २३/१२/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२१/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली महासभा मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी तहकुब केलेली होती. सदर तहकुब महासभेचे आयोजन दि.२३/१२/२०२२ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | सोनवणे सुरेखा सुदाम |
| नेरकर सरीता अनंत | भोईटे लताताई रणजित | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील प्रतिभा सुधीर | महाजन सुनिल सुपडु |
| सोनवणे कांचन विकास | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे मयुर चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास |
| बाविस्कर किशोर रमेश | कापसे प्रतिभा चंद्रकांत | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | देशमुख प्रतिभा गजानन | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील विजय पुंडलिक | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | सोनवणे सुरेश माणिक | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | बारी शोभा दिनकर | देशमुख सुन्नाबी राजु |
| चौधरी चेतना किशोर | शेख हसीनाबी शरिफ | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे मुकुंदा भागवत | भिल पार्वताबाई दामु | पटेल इब्राहिम मुसा |
| भंगाळे विष्णु रामदास | पाटील उषा संतोष | निता मंगलसिंग सोनवणे |
| तायडे ज्योती शरद | कोल्हे सिंधु विजय | सोनवणे विक्रम किसन |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | चव्हाण ज्योती बाळासाहेब | कैलास नारायण सोनवणे |
| सोनवणे धीरज मुरलीधर | मराठे जितेंद्र भगवान | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| काळे दिपमाला मनोज | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | राजेंद्र नारायण मराठे |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील रेखा चुडामण | महेश रतन चौधरी |

सदर सभेस अति.आयुक्त तथा सहा.संचालक, नगररचनाकार श्री.के.पी.बागुल, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त तथा मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त (आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्य बसुन घ्या, दि.२१/१२/२०२२ रोजी झालेल्या तहकुब महासभेच कामकाज आज रोजी नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**श्री.जितेंद्र मराठे :-** उपमहापौरांचा निषेध झालाच पाहिजे. उपमहापौरांचा निषेध झालाच पाहिजे.

(सभागृहात उपस्थित सन्मा.सदस्यांपैकी काही सदस्यांनी अशी घोषणा केली की, “ निषेध झालाच पाहिजे, झालाच पाहिजे.”)

**श्री.जितेंद्र मराठे :-** प्रभु श्रीराम बद्दल अपमानजनक वक्तव्य करणारे उपमहापौरांचा निषेध झालाच पाहिजे.

**मा.महापौर :-** सभा कामकाजाला सुरुवात अजुन चालु झालेली नाही. सुरुवातीला तुम्ही शांतता ठेवा, मला बोलायचे आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** उपमहापौरांनी माफी मागितल्या शिवाय सभेला सुरुवात करु नका.

**मा.महापौर :-** मला बोलायचे आहे. सर्व सन्मा.सदस्यांना मी विनंती करते. कळकळीने सांगते, दोन मिनीटासाठी सगळयांनी आपआपल्या जागेवर २ मिनीट शांत बसुन घ्या. मला बोलु द्या अगोदर.

**नगरसचिव :-** आजच्या महासभा क्र.४४ साठी सभेमध्ये १) सन्मा.सदस्य सनकत चेतन गणेश २) सन्मा.सदस्या चौधरी मंगला संजय ३) भोळे सिमा सुरेश ४) राणे गायत्री इंद्रजित यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**मा.महापौर :-** दि.२१/१२/२०२२ रोजी झालेली महासभा ही गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे ही तहकुब करण्यात आलेली होती. त्या तहकुब सभेच्या कामकाजाला आज आपण सुरुवात करणार आहोत. याठिकाणी आजच्या विषयपत्रिकेवरील विषय हे विकासाच्या दृष्टीकोणाने अत्यंत महत्वाचे आहे. निकडीचे आहे. आणि विशेष म्हणजे आज सकाळी आयुक्त साहेबांशी चर्चा करतांना आयुक्त साहेबांनी सांगितले की, या ठिकाणी मला वारंवार विचारणा होत आहे की, १०० कोटीचा जो निधी जळगांव शहरासाठी व मनपासाठी मंजुर झालेला होता. त्याबाबतच्या प्रस्तावाचे काय ? त्या संदर्भात ४२ कोटीचे मी सांगितले पण बाकीच्या प्रस्तावांची मला वारंवार विचारणा होत आहे. तर आजच्या विषयपत्रिकेवर असा अत्यंत महत्वाचा ५८ कोटीच्या विकास कामांचा अजेंडयावर विषय आहे.  आणि तो ठराव आज मंजुर होणे अत्यंत आवश्यक आहे. मला असे वाटते, जळगांव शहरातील नागरीक आपल्याकडे अत्यंत आशेने बघत आहे. त्यामुळे आजचे कामकाज अतिशय शांततेत चालवा ही नम्रपणे व कळकळीने सगळयांना अगदी विनयशिलपणे मी आपल्याला विनंती करते की, आपण सगळे मला सहकार्य कराल ही मी आपल्याकडुन अपेक्षा व्यक्त करते. सभा कामकाजाच्या व्यतिरीक्त, विषयपत्रिकेवरील विषय व्यतिरीक्त कोणत्याही विषयावर चर्चा होणार नाही.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्यांनी बोलायला सुरुवात केली म्हणुन कोण काय बोलले ते समजले नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** विकास कामांचा विषय आहे ना. आम्हाला सगळयांना गांभिर्य आहे. ठराव करु आम्ही. काही पण खोटे सांगु नका आणि आम्ही पण बेकायदेशीर कामकाज चालु देणार नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** विकास कामांच गांभिर्य आम्हाला पण आहे. उपमहापौरांनी माफी मागावी. तरच सभा पुढे चालु होईल. उपमहापौरांनी माफी मागावी आणि पुढे सभा कामकाजाला सुरुवात करावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बेकायदेशीर कसे काय म्हणता येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** नियमाप्रमाणे कामकाज करा.

**श्री.सुनिल महाजन :-** बेकायदेशीर नाही म्हणता येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** उपमहापौर वरती बसु शकतो का ? नियम आहे तर सांगा मला. नियम नसेल ना. तर उतरवा त्यांना खाली.

**मा.महापौर :-** महानगरपालिकेची सालोसाल  पासुन उपमहापौर हे डायसवरच बसतात. ही आपली परंपरा आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्यांनी बोलायला सुरुवात केली म्हणुन कोण काय बोलले ते समजले नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते डायस वरती बसु शकणार नाही. अशी सुध्दा कायद्यामध्ये तरतुद नाही. अशी तरतुद दाखवावी.

**श्री.कैलास सोनवणे :-**  कायद्यातील तरतुद दाखवा तुम्ही महापौर बसण्याची तरतुद आहे. उपमहापौरांची तरतुद आहे का त्याच्यात दाखवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तेथे उपमहापौर बसु शकणार नाही. अशी तरतुद आहे का कायद्यात.

**श्री.कैलास सोनवणे :-** कामकाज नाही होणार. कामकाज तर आज होणार नाही. चुकीच्या पध्दतीने कामकाज नाही चालणार या ठिकाणी.

**मा.महापौर :-** चुकीच्या पध्दतीने कुठलेही कामकाज सुरु नाही. आप्पा नियम दाखवा की, उपमहापौर वरती बसु शकणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे पहा सुनिलभाऊ, आम्ही थांबलेले होते. आम्ही थांबलेले आहे. आम्ही पण रिस्पॅनसिबल आहे कामांसाठी. कसे धंदे करता ते. त्यांनी शिवाजी महाराजांचे नांव पुढे करुन काय काय फैलवले त्यांनी. शिवाजी महाराजांचा आपण येथे काही हे केलं का ? अपमान केला का ? वास्तविक वाल्मीक ॠषींचा अपमान केला आहे रावणाला श्रेष्ठ म्हणुन रामासमोर, बिलकुल केले आहे. बघा रावणाला श्रेष्ठ म्हणुन तुम्ही महाॠषी वाल्मीकांचा अपमान केला आहे. मला फोन आले, आमच्या समाजाचे १०० जणांचे फोन आले.

**श्री.धीरज सोनवणे :-** मी काय सांगतो आहे, त्यांनी दिलगीरी व्यक्त करावी.

(सन्मा.सदस्य श्री.कैलास सोनवणे, श्री.नितीन लढ्ढा, श्री.धीरज सोनवणे, विरोधी पक्ष नेते. श्री.सुनिल महाजन, व काही इतर सन्मा.सदस्य आपआपसात चर्चा करत होते. पंरतु अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** हा आगाऊपणा का करतो. (अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते समजले नाही.) कामांना अडथळे का आणतो. इतरांचे वार्डातील कामे काम नाही का ? हा कशाला फोन लावतो.

**श्री.जितेंद्र मराठे :-** प्रभु सियारामचंद्र भगवान की (सभागृहात उपस्थित सन्मा.सदस्यांपैकी काही सदस्यांनी अशी घोषणा केली की, " जय.")

**श्री.जितेंद्र मराठे :-** बोलो, प्रभु सियारामचंद्र भगवान की (सभागृहात उपस्थित सन्मा.सदस्यांपैकी काही सदस्यांनी अशी घोषणा केली की, " जय.")

(सन्मा.सदस्य श्री.कैलास सोनवणे, श्री.नितीन लढ्ढा, श्री.धीरज सोनवणे, विरोधी पक्ष नेते. श्री.सुनिल महाजन, व काही इतर सन्मा.सदस्य आपआपसात चर्चा करत होते. पंरतु अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते समजले नाही.)

**मा.महापौर :-** हे बघा, सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, सर्वांनी शांततेत जागेवर बसायचे आहे. आणि तुम्हाला जर विकास कामांचे ठराव मंजुर नसेल तर तुम्ही सभागृहाच्या बाहेर जाऊ शकता.

**श्री.जितेंद्र मराठे :-** पहिले माफी मागायला लावा ना, ठरावाला कोण नाही म्हणत आहे. आपणच निघुन गेले.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विकास कामांना विरोध नाही आमचा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** प्रभु रामांसाठी काय फरक पडतो तुम्हाला माफी मागीतली तर.

**मा.उपमहापौर :-** ऐका, ऐका, माफी मागण्याच्या संदर्भातला विषय नाही. मी चुकीचे बोललो नाही. ऐका तुम्ही सर्व माझे.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**मा.उपमहापौर :-** हाच तुमचा प्रॉब्लेम आहे. ऐका ऐका, ऐका ना तुम्ही ऐकत आहे का ?

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** बोला, बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** कुलभुषण, तुला कामकाज करावयाचे आहे ना. तु दिलगिरी व्यक्त कर. लोकांचे कामे करायचे आहे आपल्याला. तु दिलगिरी व्यक्त कर आपण कामकाज सुरु करु.

**मा.उपमहापौर :-** आपल्याला कामकाज करायचे आहे. काम करायचाच हेतु आहे पण तुम्ही कामकाजच चालु देत नाही ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला बोला,

**मा.उपमहापौर :-** ऐका, मी काय सांगतो आहे. येथे सर्व माध्यमाचे प्रतिनिधी उपस्थित होते. आपण सर्व येथे उपस्थित होते तुम्ही माझे वाक्य पुर्ण होवु दिले नाही. मी असे कुठलीही गोष्ट चुकीचे बोललेलो नाही. मी त्याच्यानंतर माध्यमाच्या प्रत्येक प्रतिनिधीला विचारले की, त्याच्या संदर्भातले काही रेकॉर्डींग आहे का ? ते म्हटले की, त्या गोंधळात काही ऐकु आले नाही.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.धीरज सोनवणे :-** हे पहा याच्यामध्ये कुलभुषणभाऊ तुम्ही काय बोलले आहे.

**मा.उपमहापौर :-** चला ठिक आहे, तुमचे म्हणणे काय आहे? मी व्यासपीठावरुन खाली उतरले पाहिजे का ? ऐका, जर भारतीय जनता पार्टीकडुन खुर्चीच्या राजकारणावरुन  हा सर्व विषय चाललेला असेल. तर तुम्हाला वाटत असेल. तर तुम्हाला आश्चर्य वाटेल, मला खुर्चीचा मोह नाही.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते स्पष्ट ऐकु आले नाही.)

**मा.उपमहापौर :-** मी कुठलेही चुकीचे वाक्य बोललो नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोलले आहे.

**मा.उपमहापौर :-** आता ही मी माझ्या शब्दावरती ठाम आहे. मी चुकीचे वक्तव्य केले नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** खुर्चीचाच लोभ तुम्हाला होता म्हणुन तिकडे गेले, बंडखोर झाले तुम्ही. कोणत्या स्वाभिमानाने खुर्ची घेतली तुम्ही.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.जितेंद्र मराठे :-** माफी मागावी यांनी.

**श्री.धीरज सोनवणे :-** माफी नका मागा पण दिलगिरी तर व्यक्त करा.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते समजले नाही.)

(सन्मा.सदस्य.श्री.नितीन लढ्ढा, श्री.विष्णु भंगाळे, श्री.प्रशांत नाईक, श्री.किशोर बाविस्कर हे मा.महापौर व उपमहापौर यांच्याशी चर्चा करणेसाठी व्यासपीठावर आले.)

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्य सभागृहामध्ये प्रचंड गोंधळ घालत आहे. १० मिनीटासाठी सभा तहकुब करण्यात येत आहे. १० मिनीटात तुम्ही चर्चा करुन घ्या.

(मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांचे निर्देशान्वये सभा १० मिनीटाकरीता तहकुब करण्यात आली. तसेच मा.महापौर व मा.उपमहापौर व्यासपीठ सोडुन सभागृहाच्या बाहेर गेले. तसेच काही उपस्थित सन्मा.सदस्य सभागृहाच्या बाहेर गेले व काही सभागृहातच थांबले)

(१० मिनीटानंतर मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी व मा.उपमहापौर यांचे सभागृहात व्यासपीठावर पुन्हा आगमन झाले व महासभा परत सुरु करण्यात आली.)

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी आपल्या जागेवर बसुन घ्यायचे आहे. सर्व सन्मा.सदस्यांना मी विनंती करते की, आपण आपआपल्या जागेवर बसुन घ्यायचे आहे. काल आपण महापालिकेच्या बाहेर दोन्ही पक्षांनी जोरदार आंदोलने केलीत, आणि मला असे वाटते की, हा विषय आता संपविलेला बरा, कारण विषयपत्रिकेवरील विषय घेणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्याला मी नम्रपणे पुन्हा पुन्हा विनंती करते की, विषयपत्रिकेवरील विषय अतिशय शांततेने आपण सगळयांनी त्याबाबत चर्चा करायची आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** दिलगिरी व्यक्त करायला सांगा, एका मिनीटात मिटींग संपुन जाईल.

**मा.महापौर :-** प्रत्येकाने आपआपल्या जागेवर उभे राहुन चर्चा करायची आहे. कोणीही डायस जवळ येऊन किंवा सभागृहात आपली जागा सोडुन इतरत्र गोंधळ घालायचा नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** डायस वरुन गोंधळ चालेल येथुन चालणार नाही.

**मा.महापौर :-** गोंधळ केल्यास कठोर कार्यवाही केली जाईल.

(पुन्हा सभागृहात गोंधळ सुरु झाला व काही सन्मा.सदस्यांनी कार्यवाही करा असे बोलायला सुरुवात केली.)

**श्री.कैलास सोनवणे :-** करा, करा कार्यवाही, कार्यवाही करा.

**श्री.धीरज सोनवणे :-** कार्यवाही करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रभु श्रीरामांबद्दल वाईट वक्तव्य करायचे आणि आम्हाला वरतुन धमकी द्यायची. मग १० मिनीटासाठी मिटींग तहकुब का केली होती तुम्ही. तुम्ही डिसीजन घ्यायला गेले होते ना तेथे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** विकास कामांचे गांभिर्य तुम्हाला पण आहे आम्हाला पण आहे. प्रभु श्रीरामांचा अवमानजनक वक्तव्य केल्यानंतर उपमहापौरांचे कर्तव्य आहे की, त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी आणि सभा पुन्हा विकास कामांच्या करीता सुरु करु.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई तुम्हाला विंनती करत आहे की, त्यांना दिलगिरी व्यक्त करायला लावा. ते चुकले आहे. त्यांनी मोठया मनाने चुकी कबुल करायला पाहिजे. आम्ही काही गोंधळ घालत नाही. तुम्ही चुकले नाही सुनिलभाऊ, तुमची फक्त एकच चुक झाली आहे की, एका घरामध्ये महापौर आणि विरोधी पक्षनेता आहे. आणि ती तुमची अडचण आहे. तुमचा आवाज दाबला आहे. तुम्ही तर आमच्याकडुन पाहिजे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आप्पा यापुर्वी तुमचा ही आवाज नव्हता.

**श्री.कैलास सोनवणे :-** पैसे गिरीषभाऊंनी दिले या ठिकाणी हे कामे व्हायला नाही पाहिजे का ? आम्हाला वाटत नाही का असे. एक मिनीटात त्याला दिलगिरी व्यक्त करायला काय अडचण आहे. एका मिनीटात दिलगिरी व्यक्त करा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही बोललेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोललेले आहे तुम्ही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही बोललेले आहे. रेकॉर्डींग आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, गेल्या कालच्या महासभेला ज्या वेळेला हा विषय झाला. आम्ही त्या वेळेला पण हेच म्हटले की, उपमहापौरांनी माफी मागावी. सभा पुन्हा सुरु करावी. आम्ही दोन तास येथे तुमची वाट बघितली. शेवटी आम्हाला सांगितले की, सभा आज होणारच नाही. ही सभा आजची स्थगित केलेली आहे. मग विकास कामांचा गांभिर्य तुम्हाला आहे तर तुम्ही त्यांना माफी मागायला सांगा ना. आणि त्यांनी केलेले आहे ना. तुमच्या महापालिकेच्या रेकॉर्डवर आहे ना. व्हिडीओ रेकॉर्डींग मध्ये आहे. तुम्ही ऐका ते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** रेकॉर्डींग मध्ये आहे. स्पष्ट ऐकु येत आहे. चुक केली तर माफी मागायला काय अडचण आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट.

**श्री.अश्विन सोनवणे :-** चुक केली तर माफी मागायला काय प्रॉब्लम आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** तुमचे समर्थन आहे का सगळयांचे, समर्थन आहे का शिवसेनेचे की, प्रभु रामाचे वक्तव्य केलेने, तुमचे समर्थन आहे का ?

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** काही भी, काही भी.

**श्री.सुनिल महाजन :-** शांततेत विषय मोडा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** दोन मिनीट दिलगिरी व्यक्त करायची आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एका मिनीटात मिटींग संपेल. एका मिनीटात, त्यांनी एका मिनीटात दिलगिरी व्यक्त करावी. मिटींग संपुन जाईन डायरेक्ट. सगळे विषय मंजुर आहे. विषय क्र.४ सोडुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा, आप्पा, उपमहापौरांशी चर्चा केली असता त्यांचे असे म्हणणे आहे की, माझ्या तोंडातुन असे वक्तव्य निघालेले नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** रेकॉर्ड बघा ना, रेकॉर्ड बघा भाऊ तुम्ही. आम्ही कच्च्या कानांचे नाही, आम्ही कच्च्या कानांचे नाही, एका तुम्ही एका ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्ही पण होते ना सभागृहात मग ऐकले नाही.

**श्री.सचिन पाटील :-** ऐकलं ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बस मग, तेच म्हणतो आहे आम्ही. तेच म्हणतो आहे आम्ही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आम्ही रितसर आपली मनपाची पावती फाडुन आपल्या सभा कामकाजाची व्हिडीओ रेकॉर्डींगची क्लीप घेतलेली आहे. आणि त्याच्यामध्ये ते स्पष्ट आलेले आहे. ऐवढे असुन ही आम्ही आमच्या मागणीचे आपल्याला सकाळी पत्र दिलेले आहे. त्या पत्रानुसार आमची मागणी जी होती. ती सुध्दा आम्ही मागे घेऊन फक्त त्यांनी माफी मागावी ऐवढीच आमची मागणी आहे. माफी पण मागायची गरज नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** माफी पण मागायची गरज नाही. दिलगिरी व्यक्त करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** जळगांव शहराचा विकास व्हायला पाहिजे. विषयपत्रिकेवरील विषय घेतले गेले पाहिजे. त्यासाठी आम्ही एक पाऊल मागे घ्यायला तयार आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** दिलगिरी व्यक्त करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** माफी पण मागायला नाही म्हणतो आहे, दिलगिरी व्यक्त करायला सांगतो आहे. आणि महापौरांना ऐकु आले नाही का ? सगळयात जवळ तर तेच बसलेले आहे. तुम्हाला तर ऐकु यायला पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सन्मा.महापौर आपल्या सभागृहाच्या कामकाजामध्ये आपल्या शब्दाला खुप महत्व आहे. आम्ही ही तुमचे प्रत्येक शब्द या सभागृहात पाळण्याचे पिठासीन अधिकारी अध्यक्ष म्हणुन या सभागृहात पाळतो. तुमच्या बाजुला बसुन तुमची परवानगी न घेता, रेकॉर्डवर कुठेच नाही की, महापौरांची परवानगी घेऊन बोलले आहे. तुमची परवानगी न घेता असे वक्तव्य जर उपमहापौर करत असतील तर आमची मागणी तिच आहे. आणि महापौरांनी जसा आदेश दिला आम्ही याच ठिकाणी उभे आहे. येथुन हलले सुध्दा नाही. आम्ही तुम्हाला विनंती करतो की, या विषयासंदर्भात मा.महापौरांनी आदेश द्यावा. त्याचे कारण एक मिनीट अप्पा एकच मिनीट, ज्या प्रमाणे आपण आजची सभा सुरु केली. कलम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम हा तहकुबचा अजेंडा आहे. आपल्या सहीने निघालेला आहे. नगरसचिवांच्या सहीने आपण आदेशीत केलेले आहे कलम टाकुन की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' चे प्रकरण-२ महानगरपालिका कामकाज मधील नियम क्र.१ महानगरपालिकेच्या कामकाजाचे नियमन करणे संबंधीत तरतुदी यातील कलम (क) आणि (ग) त्या तरतुदीनुसार व्यासपीठावरुन महासभेचे कामकाज पाहण्याचा अधिकार सभेचे अध्यक्ष यांनाच आहे. हे मी म्हणत नाही. ऐका मला बोलु द्या. याच्या पुर्वीच्या परंपरा असतील प्रथा असतील मान्य आहे. मी त्याच्या खोलात जात नाही. या सभागृहामध्ये स्व.नरेंद्र अण्णा पाटील सन्मा.नगरसेवक यांनी पण अश्याच मुद्दयावरुन आपले सन्मा.उपमहापौर, एक मिनीट मला बोलु द्या सचिनभाऊ, मध्ये बोलायचे नाही. सन्मा.महापौर, सन्मा.महापौर, सन्मा.महापौर मी बोलत आहे. सन्मा.स्व.नरेंद्र अण्णा पाटील यांनी ज्या वेळेस सन्मा.उपमहापौर श्री.रमेशदादा जैन यांना जेव्हा कायद्यातील तरतुद सांगितली होती. त्यावेळेस सन्मा.रमेशदादा जैन एका सेकंदात वरतुन खाली आले होते. याला म्हणता स्पोर्टमॅनशिप, तर आमची एवढी विनंती आहे. आम्ही लेखी दिलेले आहे. जसे नितीन भाऊंनी सांगितले की, तेथे बसावे. अशी कायद्यात तरतुद नाही. पण कायद्याची तरतुद जर आपण वाचली तर ही सभा फक्त अध्यक्ष, सन्मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली ही सभेचे कामकाज चालणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो मान्य आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझे बोलणे पुर्ण होऊ द्या. एक मिनीट नितीनभाऊ, माझे बोलणे पुर्ण होऊ द्या. माझे पुर्ण होऊ द्या. माझे पुर्ण होऊ द्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, सर्व जण बसा, एक जो बोलत आहे. ते उभे रहा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** व्यासपीठावरती सन्मा.महापौर यांनी ती कलम जर वाचली, या सभागृहाला, ज्या वेळेस महापौर रजेवर असतील, अनुपस्थित असतील काही कारणास्तव किंवा वेगवेगळया कारणामुळे जर अनुपस्थित असतील, त्यावेळेस अध्यक्षस्थानी बसलेले उपमहापौर, उपमहापौर नसतील तर स्थायी समिती सभापती, स्थायी समिती सभापती नसतील तर सर्वात जेष्ठ सदस्य जो या सभागृहातला आहे. तो अध्यक्ष स्थानी असेल आणि तो सभा चालवेल. हा मुद्दा लक्षात घ्या. आणि माझी विनंती आहे की, अध्यक्ष ज्या वेळेस या ठिकाणी समोर असतील, अध्यक्षासमोर आम्ही आमचे प्रश्न मांडु शकतो. समोर फक्त अध्यक्ष राहतील. त्याच्या व्यतिरिक्त सन्मा.अध्यक्ष जर म्हणतील की, आयुक्तांनी खाली बसावे, आयुक्तांना खाली बसावे लागेल. नगरसचिवांना सांगितले तर नगरसचिवांना खाली बसाव लागेल. माझी विनंती आहे अध्यक्षांना की, आपण या संदर्भात आदेश देऊन उपमहापौरांना खाली बसवावे आणि त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी. ही सभागृहाची तरतुद आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** खाली पण नका बसवा, फक्त दिलगिरी व्यक्त करावी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** दिलगिरी व्यक्त करावी ही आमची मागणी आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपण आताच बोलले की, सभा कामकाज नियमाप्रमाणे चालेल ही मी तुमच्याकडुन नियमांचे आणि कायद्याचे पालन करण्याची अपेक्षा करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** काही मोठा विषय नाही. तुम्ही काही छोटे होऊन जाणार नाही. तुम्ही रामाबद्दल जर दिलगिरी व्यक्त केली तर. छोटे होऊन जाणार आहे का तुम्ही मला सांगा,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आताच सभागृहात उपमहापौरांनी सांगितले होते की, मला खुर्चीचा मोह नाही. त्यांनी कृतीने हे सिध्द करावे. खुर्चीचा मोह नाही त्यांनी सिध्द करुन द्यावे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** दिलगिरी व्यक्त करुन घ्या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** दिलगिरी व्यक्त झालीच पाहिजे.

**श्री.सचिन पाटील :-** येथे विशालजी त्रिपाठी यांनी त्यांची भुमिका मांडलेलीच आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** रिकामी चर्चा काही करु नका, दिलगिरी व्यक्त करा आणि विषय संपवा. पुढची मिटींग एका मिनीटात संपणार आहे.

**श्री.सचिन पाटील :-** तुम्ही भरपुर बोलले आप्पा साहेब, आम्हालाही बोलु द्या थोडुसे.

**श्री.कैलास सोनवणे :-** जळगांव शहराचे कामे कोणाला होऊ द्यायचे नाही मला सांगा.

**श्री.सचिन पाटील :-** याच्या पुर्वी सभागृहामध्ये जे जे महापौर, ज्या वेळेस भारतीय जनता पार्टीचे महापौर होते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सन्मा.सचिनभाऊ उपमहापौरांनी दिलगिरी व्यक्त करावी. अशी भाषेमध्ये आमचे एकही उपमहापौर बोललेले नाही.

**श्री.सचिन पाटील :-** तर आता ही जी तरतुद विशालभाऊंनी वाचली की, उपमहापौर खाली बसतील याचे उत्तर मला महापौरांकडुन मिळावे महापौर महोदया, कारण यापुर्वीच्या इतिहासामध्ये या महानगरपालिकेच्या महापौरांसोबत, आयुक्तांसोबत उपमहापौर बसलेले आहे. आता आणि वारंवार अश्याच पध्दतीने उपमहापौरांबद्दल.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो सचिन पाटील सर यापुर्वी उपमहापौरांनी असे रिकामे धंदे नाही केलेले आहे.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** रमेशदादा सुध्दा खाली आले होते.

**श्री.सचिन पाटील :-** ते बहुजन समाजाचे आहे म्हणुन असे करणार आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** आले आले, जातीवादावर आहे, जे गांडु लोकं असतात ना ते जातीवादाचा सहारा घेतात. जे गांडु असतात, जे गांडु असतात.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अहो सचिनभाऊ, आम्ही पण मराठा आहे.तुम्ही समाजाबद्दल बोलु नका, बंडखोर होऊन निघुन गेलेले आहे तुम्ही.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**मा.महापौर :-** खाली बसा सर्वांनी, खाली बसा, गोंधळाची परिस्थिती निर्माण करु नका.

**श्री.सचिन पाटील :-** मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळावे महापौर महोदया.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी कृपया करुन खाली बसावे. खाली बसा सगळयांनी.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.जितेंद्र मराठे :-** हे कोण होते हे कोण होते. हे पण समाजाचेच होते ना.

**श्री.मयुर कापसे :-** आम्हाला शिकवु नका.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक मिनीट उपमहापौर बोलत आहे, एक मिनीट उपमहापौरांना बोलु द्या. बोलु द्या.

**मा.महापौर :-** एक एक बोला.

**मा.उपमहापौर :-** शांतता ठेवा, हे सभागृह आहे. हे विकास कामांचे आणि धोरण ठरविण्याचे स्थळ आहे. ऐका जरा, ऐका जरा ५ मिनीट तुम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** डायसवर बसुन दादागिरी करु नका. दादागिरी करु नका ही पध्दत नाही.

**मा.उपमहापौर :-** अरे ऐका हो तुम्ही

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**मा.उपमहापौर :-** उपमहापौरांना बोलु देत नाही. तर ही आता दादागिरी तुम्ही करत आहे की, आम्ही करत आहोत.

**मा.महापौर :-** बस बसुन घ्या आता, कृपया करुन बसुन घ्या. शांततेत आपल्याला मिटींग सुरु करायची आहे की, पुन्हा तहकुब करायची आहे. सुरु करायची आहे ना आपल्याला. मग नितीनभाऊंना बोलु तर द्या. ते ही आपले जेष्ठ सदस्य आहे त्यांना ही त्यांचे विचार मांडु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई सभा शांततेत चालवायची आहे म्हणुन डायसच्या बाहेर एक पाऊल पण नाही पडला आमचा.

**मा.महापौर :-** मला माहित आहे आप्पा साहेब, जे मी आदेश देते त्याचे पालन तुम्ही १००% करणार. कारण तुम्ही पण जेष्ठ सदस्य आहात.

**श्री.कैलास सोनवणे :-** पण एका मिनिटात दिलगिरी व्यक्त केल्यानंतर ते काही छोटे होऊन जाणार आहे का ? त्यांचे पद निघुन जाणार आहे का ?

**मा.उपमहापौर :-** दिलगिरी नाही, मी नतमस्तक झालो असतो, जर चुक केली असती तर.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अजुन ही चुक मान्य करत नाही सभागृहात.

**मा.महापौर :-** जितेंद्र भाऊ दोन मिनिट शांतता ठेवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया,

**श्री.कैलास सोनवणे :-** काही ही बोला दिलगिरी व्यक्त करावी लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा साहेब मी काय म्हणतो, आपल्या सभागृहातले कामकाज जे आहे. या शहराच्या विकासाच्या बाबतीत धोरण ठरविण्याच्या संदर्भातली भुमिका या सभागृहाची आहे. परंतु मी काय म्हणतो तुमचा जो काही वाद आहे. तुमचे जे काही आक्षेप आहे किंवा तुमचे जे काही उपमहापौरांवरती आरोप आहे. त्याच्या संदर्भात आपण भुमिका जाहिर रस्त्यावरती घेतली. आंदोलन केले, निषेध ही केले. माझे म्हणणे

ऐवढेच आहे. या सभेचा कामकाज या शहराच्या विकासाचे धोरण ठरविण्याच्या संदर्भात ज्या भुमिका आहे. ते मला वाटते येथे मान्य व्हायला पाहिजे.

**श्री.धीरज सोनवणे :-** याच सभागृहात बोलले आहे ना भाऊ, याच सभागृहात बोलले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या सभागृहातली जी प्राथमिकता आहे. रिजर्वेशन असेल, जे काही ऑब्जेक्शन असेल, त्याच्या संदर्भातली भुमिका आम्ही हे म्हणत नाही की, तुम्ही अवास्तव या भुमिकेचा गवगवा करत आहे. अश्यातला भाग नाही. त्यांना जर कधी वाटत असेल त्यांच्या कडुन चुक झाली असेल. ते दिलगिरी व्यक्त करतील, जाहिर माफी मागतील, तो त्यांच्या मनाचा निर्णय आहे. परंतु या सगळया गोष्टींसाठी या सभागृहाचा ओहापोह करणे, आज आपण बघतो आप्पा, जळगांव शहराची परिस्थिती जरी आपल्याला वाटत असेल आपण नगरसेवक आहे. तरी जळगांव शहरातील नागरीक आपल्या कामकाजाबद्दल मुळीच समाधानी नाही. आणि निवडणुकीला आता ५ - ६ च महिने बाकी आहे. निवडणुकीला सर्वच सदस्यांना सामोरे जायचे आहे. सामोरे जाण्याचा हा एक विषय वेगळा आहे. शेवटी हा नागरीकांचा प्रश्न आहे त्यांना कोणाला निवडुन द्यायचे आहे कोणाला नाही. परंतु ज्या हे शहरातील जनतेने आपल्यावर जो ऐक विश्वास टाकलेला आहे. मग ते विरोधी पक्षात असतील, सत्ताधारी असतील.जे कोणी असतील. त्यांच्यावरती ही सामुहिकतेने टाकलेली ही जबाबदारी आहे. आणि आज मोठया अपेक्षेने जळगांव शहरातील नागरीक आपल्याकडे पाहत असतात की, कुठेतरी ही आज विकास कामांना सुरुवात झालेली आहे. पुढे सन्मा.नेते जे आहे. गिरीषभाऊ असतील, राजुमामा असतील, गुलाबभाऊ असतील. हे अजुन जळगांव शहराला निधी देण्याच्या दृष्टीकोणातुन प्रयत्न करत आहे. आणि अश्या पध्दतीने आपण या सभागृहात एक दुसऱ्याची उडीदुडी काढुन विकास कामांना जर खोळंबा आणत बसु. तर मला वाटते या शहराची जनता आपल्याला माफ करणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** खोळंबा कोण आणत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे बघा तुमची मागणी रास्त आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्हाला सांगितले गेले की, ते दिलगिरी व्यक्त करत आहे. म्हणुन आम्ही गुपचुप बसले होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा, तुमची मागणी जर मला ही पटली तर सभागृहाच्या बाहेर याचे समर्थन करायला मी ही तुमच्या सोबत उभा राहील. आजच्या सभेचे कामकाज थांबविणे हे संयुक्तीक वाटत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ मी एक विषय सांगतो तुम्हाला कालचा परवाच्या महासभेचा की, जेव्हा हे वक्तव्य झाले. सन्मा.माजी महापौर सौ.सिमाताई भोळे, जेव्हा हे राम रावणाचा विषय निघाला, ढसा ढसा येथे रडल्या हो. त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या. आमच्या भावना दुखावल्या गेल्या. आमचे पण काही तरी श्रध्दा स्थळ आहे. खरंच रडल्या तुम्ही. विचारा तुम्ही, या महिला सदस्यांना विचारा, इतक्या भावना दुखावल्या गेल्या आणि तुम्ही दिलगिरी व्यक्त करत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी, जळगांव शहराचे नागरीक ढसा ढसा रोज रडत आहे हे विकास कामांसाठी.

**श्री.कैलास सोनवणे :-** रिस्पॅन्सीबल कोण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा मी काय म्हणतो, आपले जे काही भांडण आहे ना उपमहापौरांच्या विरोधात ते आपण चालु ठेवु.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुमचे समर्थन आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु या सभागृहाच्या बाहेर चालु ठेवु.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुमचे समर्थन आहे का ? तुमचे समर्थन आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** समर्थनाचा विषय नाही. ज्या वेळेला माझी खात्री पटेल की, उपमहापौरांनी चुकीच वक्तव्य केले, तुमच्या सोबत निषेधाला मी पण राहील.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ एक मिनीट भाऊ, भाऊ एकच मिनीट, हा विषय सभागृहाच्या बाहेर झाला असता ना तर येथे विषयच आला नसता. हा विषय सभागृहात झालेला नसता ना तर तिकडेच मिटवला असता, हा विषय सभागृहात झालेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा राजुभाऊ, विधानसभेच्या सभागृहात ही अनेक विषय होतात. आपल्या भावना आपण व्यक्त केल्या मान्य आहे.परंतु अश्या पध्दतीने सभागृहाचा कामकाज हे थांबवुन ठेवणे, सभागृहाच्या कामकाजात अडथळा निर्माण नाही करायला पाहिजे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** विकास कामांना आम्ही कुठे नाही म्हणत आहोत.

**श्री.कैलास सोनवणे :-** एका मिनीटात विषय मंजुर होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परवाच्या दिवशी सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर गिरीषभाऊंचा फोन आला. त्यांना ही मी हे बोललो की, परवा मिटींग ठेवलेली आहे. परवाच्या मिटींगमध्ये सगळे रस्त्यांचे विषय मान्य होतील. शेवटी त्यांना ही चिंता आहे विकासाची. कारण काय आहे. आपण या परिस्थितीमधुन सगळेच जण जातो आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ ज्या वेळेला आपल्याकडे फोन आला, आम्हाला सांगितले गेले की, उपमहापौर दिलगिरी व्यक्त करणार आहे. सभा सुरळीत सुरु होईल. असे गिरीषभाऊंना सांगितले गेले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ तो त्यांचा व्यक्तीगत विषय आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** निषेधाचा ठराव मांडा ना. कोण बाजुने आहे, कोण विरोधात आहे समजेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा काही ऐकणार नाही. आम्ही निषेधाचा ठराव मांडतो,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कोण बाजुने आहे आणि कोण विरोधात आहे, मतदान घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्ही त्यांनी केलेल्या वक्तव्याचा जाहिर निषेध करतो आणि संपवतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ठराव मंजुर करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठराव तुम्हाला मंजुर करावा लागेल, आणि मग चालु द्या तुम्ही तुमचे कामकाज. आम्ही त्यांनी काढलेल्या प्रभु श्रीरामाबद्दल जे वक्तव्य काढले आहे, आम्ही त्यांचा या ठिकाणी निषेध करतो.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्या अनुषंगाने शहरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत जी चर्चा सुरु झ ालेली आहे. त्याचा सुध्दा मी जाहिर निषेध करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** काही लोकं कमकुवत पडले की, जातीचा आधार, महापुरुषांचा आधार, काही आदर्श घ्या त्या लोकांचा. शिवाजी महाराज कोणाच्या बापाचे नव्हते, ते संपुर्ण महाराष्ट्राचे होते, संपुर्ण देशाचे होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जितुला ठराव मांडु द्या, विषय संपवायचा आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपल्या परवाच्या गेल्या महासभेमध्ये विकास कामांच्या गांभिर्याचे दृष्टीकोणातुन महासभा आयोजित केलेली होती.

**श्री.कैलास सोनवणे :-** जास्त लांबु नका शॉर्ट मध्ये घ्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक मिनीट एक मिनीट आप्पा, भाऊ आम्ही एकच दिवस बोलतो, आम्ही नेहमी बोलत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठराव मांडा, ते जाऊ द्या ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** परवाच्या महासभेत जेव्हा मयुर कापसेंनी काही रेकॉर्डीगच्या संदर्भात उघड केला, त्याच्यावर उपमहापौरांनी प्रतिउत्तर म्हणुन रामायणाचे उदाहरण देण्याचा प्रयत्न केला, त्यांनी या ऑन रेकॉर्ड व्हिडीओमध्ये महापालिकेच्या व्हिडीओ कॅमेऱ्यामध्ये रेकॉर्ड आहे. त्यांनी म्हटलं की, प्रभु श्रीरामापेक्षा रावण श्रेष्ठ आणि शक्तीशाली आहे. असे वक्तव्य त्यांनी केल्यावर भारतीय जनता पार्टीच्या सगळया नगरसेवकांनी या ठिकाणी त्यांचा निषेध केला, आणि त्या वेळा त्यांनी माफी मागावी दिलगिरी व्यक्त करावी या अनुषंगाने आम्ही थांबलो, दोन तास आम्ही येथे महापौरांची वाट बघितली, विकास कामांच्या गांभिर्याने महासभा सुरु

होईल. असा कुठलाही प्रकार सुरु झाला नाही. तत्पुर्वी कालचे आंदोलन असेल, कालच्या आंदोलनामध्ये उपमहापौरांनी एक नविन विषय बाहेर आणला की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विरोध पिंप्राळयामधुन केला जातो आहे. येथे सभा कुठेच सुरु झालेली नव्हती. सभेत विषय कुठेच सुरु झालेले नव्हते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला कोणीच विरोध केलेला नव्हता. मग उगाचच आपली चुक लपविणेसाठी आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा उल्लेख करुन म्हणजे विषय पलटवण्याचा प्रयत्न आपण या ठिकाणी करतात. अश्या कालच्या या धोरणामुळे भारतीय जनता पार्टीच्या सगळे नगरसेवकांनी, ज्यांना ज्यांना महापुरुषांचा आदर आहे त्या सगळयांनी, या ठिकाणी कुलभुषण पाटीलांनी उपमहापौरांनी दिलगिरी व्यक्त करावी. हाच एक आमचा या मागचा हेतु होता. पण त्यांची या ठिकाणी दिलगिरी व्यक्त करण्याची मानसिकता नाही. भारतीय जनता पार्टी या ठिकाणी त्यांचा निषेधाचा ठराव या ठिकाणी मांडतो. त्या ठरावासाठी ज्यांचे ज्यांचे या ठिकाणी समर्थन असेल ठरावाच्या संदर्भात त्यांनी हात वर करुन सांगावा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** सदर जितेंद्रभाऊ मराठे यांनी मांडलेल्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.मयुर कापसे :-** सदर जितेंद्रभाऊ मराठे यांनी मांडलेल्या ठरावाला आमचे सुध्दा अनुमोदन आहे.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**मा.महापौर :-** आप्पा साहेब, विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करायची का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** हो करा, पण हा ठराव घेवुन घ्या तुम्ही.

**श्री.धीरज सोनवणे :-** हा ठराव वाचुन मंजुर करुन घ्या. नंतर विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** बहुमतांने मंजुर आहे ताई आता दोन नाही चार पाऊले मागे आले आता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे आप्पा ते ठराव कायदेशीर होणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो नको हो. हो नको हो.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हो नको हो. हो नको हो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दिलगिरी व्यक्त करायला लावा. मग दिलगिरी व्यक्त करायला लावा परत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कायद्यातील परिस्थिती..

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याची काही अंमलबजावणी करायची नाही. निषेध केला म्हणुन त्यांना काळा लावा गोरा लावा, असे काही करायचे नाही आपल्याला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे सुनिल गोराणे, नगरसचिवांना पडलेला प्रश्न आहे. त्याचेच उत्तर देतो आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही कशाला उत्तर देता, बसा ना खाली, जाऊ द्या ना. बसा बसा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई. सभेचे कामकाज सुरु करा.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ठरावाचा विषय करा पहिले, ठराव मंजुर करा.

**नगरसचिव :-** ठरावाचे काय करायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पहिला विषय सुरु करा.

**मा.महापौर :-** आप्पांनी थांबायला सांगितले आहे, तुम्ही विषय सुरु करा. विषयपत्रिकेवरील विषय क्र.१ ला सुरुवात करण्यात यावी. नगरसचिव साहेब आपण आदेशाचे पालन करावे, विषयपत्रिकेवरील पहिल्या विषयाला सुरुवात करण्यात यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, हा विषय संपला, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** हो विषय तर वाचु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही, मागील विषय पेंडींग आहे. ७ वा वेतन आयोगाचा,

**मा.महापौर :-** या ठिकाणी मांडलेला ७ व्या वेतन आयोगाचा विषय खरंच कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. हा विषय झाल्यानंतर आपण विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करु.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, आणखी एक विषय आहे. गिरगावकरांनी आता मी बोलला तर परत विरोधाचे वाद होईल, महापौर आणि उपमहापौरांच्या विरोधात स्टेटमेंट दिलेले आहे. त्यांना अधिकार नाही, त्यांच्या विरोधात शिस्तभंगाची कार्यवाहीचे काय झाले. मी मागच्या मिटींगला बोललो होतो.

**मा.महापौर :-** वानखेडे साहेबांनी उत्तर द्यावे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** ७ व्या वेतन आयोग संदर्भामध्ये नगरविकास विभागाने आपल्याला आदेश दिलेले होते.

**मा.महापौर :-** बाकीच्यांनी शांतता ठेवा, बाकीच्यांनी शांतता ठेवायची आहे. साहेब बोलत आहे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** ७ व्या वेतन आयोग संदर्भामध्ये आपण महापालिकेच्या ९४८ कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लावलेला आहे. आपल्या महापालिकेत १९९१ व १९९७-९८ मध्ये जे विशेष लेखापरिक्षण झालेले होते. त्याच्यामध्ये ११८७ कर्मचाऱ्यांवर लेखापरिक्षणामध्ये मुद्दे उपस्थित केलेले होते. त्याच्यामध्ये अनुपालनची जी कार्यवाही आहे. त्याचे उत्तर शासनाला सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर त्याच्यापैकी काही वेगवेगळे आक्षेप लेखापरिक्षणामध्ये नोंदविले गेले होते. त्याच्या संदर्भामध्ये मागच्या मिटींगमध्ये सविस्तर ती चर्चा झालेली आहे. आपल्या त्या यादी मध्ये ११८७ कर्मचाऱ्यांपैकी जे ३४९ कर्मचारी, जवळपास ३५० कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये की, लेखापरिक्षणामध्ये जनरल आक्षेप नोंदविलेले आहे. मात्र परटीक्युलर ज्याच्या नावासमोर आक्षेप नोंदविलेले नाही. जनरल आक्षेपामध्ये ते मोडतात. त्याच्या अनुषंगाने प्रशासनाची तपासणी कार्यवाही सुरु आहे. त्याच्या अनुषंगाने नविन आयुक्त महोदय आलेले आहे. त्यांच्याशी सुध्दा चर्चा केलेली आहे. त्याच्या अनुषंगाने जो काही सकारात्मक निर्णय आहे. ते प्रकरण तपासुन आम्ही घेणार आहोत.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते जे ३५२ काही तरी कर्मचारी आहे ना त्यांना तुम्ही आज लावु शकतात, मी पुर्वी पण हेच बोललेलो होतो. पण तुम्ही विलंब करतच आहे आणि डिसीजन घेतला जात नाही. तुम्ही आम्हाला टाईम बॉंड द्या. किती वेळेत करणार, किती दिवसात करणार. त्यानंतर या ठिकाणी पदोन्नती व नियम डावलणारे जे आहेत. त्याच्या संदर्भात शासनाकडे जो पाठपुरावा करणार आहे, किती दिवसात होईल. या दोन गोष्टींचे मला उत्तर द्या.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** शासनाकडे जो पाठपुरावा होईल त्या बद्दल प्रशासनाने उत्तर तयार केलेले आहे. परंतु संबंधीत जे काही कर्मचारी आहे. त्यांच्या बद्दल जो आक्षेप नोंदविलेले आहे. त्याच्या अनुषंगाने प्रशासनाकडे जी कागदपत्र जी उपलब्ध आहे. ती प्लस आम्ही ज्या संबंधीत कर्मचारी आणि कर्मचारी युनियन यांच्याशी संपर्क प्रशासनाने साधुन यांच्याकडुन जवळ जवळ त्यांच्याकडुन सगळी माहिती तयार करुन घेतलेली आहे. प्राप्त झालेली माहिती आणि प्रशासनाकडे उपलब्ध असलेली माहिती याची कागदपत्रांची तपासणी करुन आणि मी स्वत: नगरविकास विभागामध्ये गेलो होतो. त्याच्या संदर्भामध्ये त्या त्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन त्यांना काय काय माहिती अपेक्षित आहे. त्याच्या अनुषंगाने आपल्याला तपशीलवार थोडी माहिती द्यायची आहे.त्याचे काम हे ८-१५ दिवसामध्ये करुन १५ दिवसानंतरचा सविस्तर अहवाल नगरविकास विभागाला पाठविण्यात येणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे झाले ज्यांचे ज्यांचे प्रॉब्लम आहे ते.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** यस.

**श्री.कैलास सोनवणे :-** ३५२ चा टाईम बॉंड द्या मला.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** ३५२ ची जी बाब आहे ही प्रशासकीय बाब आहे. संपुर्ण प्रकरण हे तपासले जाईल. त्याच्यामुळे आज किंवा उद्या तसे ते टाईम बॉंड सांगता येणार नाही.

मात्र ३५२ चे प्रकरणे तपासण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याच्या बद्दल जे नुतन आयुक्त साहेब आलेले आहे. त्यांच्याशी चर्चा झालेली आहे. तशी नस्ती सादर करुन या बद्दलचा निर्णय प्रशासन घेणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब ते सगळे रेडी आहे. तुम्ही आज पण चर्चा करुन आजही करु शकतात.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** नविन आयुक्त साहेब आले की, आम्ही त्याच्यावरती चर्चा करुन डिसिजन घेऊ.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढच्या मिटींगपर्यंत व्हायला पाहिजे. पुढच्या मिटींग पर्यंत हा विषय राखुन ठेवु नका. गिरगावकर साहेबांबद्दल मी दोन वेळा पत्र दिलेले आहे तुमच्या आयुक्त कार्यालयाला. त्यांनी महापौर आणि उपमहापौर, जे काही वक्तव्य केले होते त्यांच्या बद्दल, तो अधिकार असतो महापौरांचा ते बोलु शकतात. परंतु कोणताही अधिकारी त्याचा खुलासा पेपर वाल्यांना बोलवुन किंवा पत्रकारांना बोलवुन देऊ शकत नाही. त्यांनी एक वेळा नाही असे तीन वेळा केलेले आहे. त्या संदर्भात शिस्तभंगाची कार्यवाहीचे ते काय आणि कुठपर्यंत आलेले आहे ते मला सांगा.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** याच्या संदर्भात मी नुतन आयुक्त महोदय यांच्याशी चर्चा करुन पुढील प्रशासकीय योग्य ती कार्यवाही करण्याच्या संदर्भात कार्यवाही करु.

**मा.उपमहापौर :-** मा.महापौर महोदया याच्या संदर्भात मला २ मिनीट बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला.

**मा.उपमहापौर :-** मला प्रशासनाकडुन या प्रश्नांचे उत्तर पाहिजे की, आपण कुठल्याही सन्मा.सदस्यांनी, महापौरांनी, उपमहापौरांनी शासन स्तरावरुन आलेल्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात कार्यवाहीचा प्रस्ताव दिलेला असेल किंवा सुचना दिलेली असेल. तर तो किती दिवसात शासन दरबारी गेला पाहिजे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्य लेखाधिकारी :-** त्याच्यावर तात्काळ कार्यवाही होऊन कार्यवाही झाली पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** मग त्याच्या बद्दल मागच्या महासभेपासुन ते आजतागायत मी दोन पत्र दिले. सन्मा.सदस्य श्री.कैलास सोनवणेंनी पत्र दिले. महापौरताईंनी पत्र दिले. अजुन त्यांच्यावरती कार्यवाही संदर्भातला प्रस्ताव शासन दरबारी का पाठविला नाही. आम्ही ते मुद्दया सहीत दिलेला आहे. त्यांनी कर्तव्यात केलेला कसुर, शिस्तभंग जे काही आहे आम्ही तुम्हाला डॉक्युमेंटसहीत सादर केलेले आहे. तरी देखील तो प्रस्ताव कार्यवाहीसाठी शासन दरबारी का नाही पाठविला.

**श्री.कैलास सोनवणे :-** हक्कभंग पण घ्या त्याच्यात, नसेल तर टाकुन घ्या, जरी हक्कभंगात येत नसले तर शिस्तभंगात येतो ते.

**मा.उपमहापौर :-** हक्कभंग ही आपला महासभेचा विषय आहे किंवा कर्तव्यात दिरंगाई, शिस्तीचे पालन न करणे, वरीष्ठ अधिकाऱ्यांचे न ऐकणे, ७२(क) नुसार पण आयुक्त त्यांच्यावर कार्यवाही करु शकता ना. असे महानगरपालिका अधिनियमामध्ये विविध असे मुद्दे आहे. ज्याच्याने आपण कार्यवाही करु शकतो मग का केलेली नाही तुम्ही कोणतीच कार्यवाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** वानखेडे साहेब तुम्ही आयुक्तांशी चर्चा करुन त्यांना हे सांगा आणि आमची विनंती ही सांगा. **मा.महापौर :-** प्रशासनाने शासनाकडे या संदर्भात लवकरात लवकर शिस्तभंगाचा प्रस्ताव पाठवावा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई मला एक मिनीट बोलायचे आहे. असे आम्ही अर्ज केलेले आहे. अश्या पदांच्या संदर्भातली चौकशी करणे कामी आम्ही आयुक्तांकडे महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी यांचे विरोधात चौकशी करणे कामी अर्जफाटे मंत्रालयपर्यंत केलेले आहे. त्याच्यावर सुध्दा का कार्यवाही झाली नाही. याचे उत्तर सुध्दा आम्हाला सांगावे.

**मा.महापौर :-** ज्या ज्या बाबतीत आपल्याला शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबत पत्र दिले असतील किंवा कार्यवाही करणे संदर्भात किंवा सांगितले असतील तर आपण लवकरात लवकर तर आपण त्याच्यावर कार्यवाही करावी. चला विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव विषय क्रं. १ :-** दि.०७/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या व दि.२१/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त मान्य करण्यात यावे. परंतु दि.२१/१०/२०२२ रोजी ज्या महासभेचे आयोजन करण्यात आलेले होते. ते अत्यंत तातडीने एका प्रकारची पाणी पुरवठयाची अमृत योजना २.० च्या डी.पी.आर. च्या संदर्भातली भुमिका आपल्या दालनामध्ये सन्मा.आमदार राजुमामा भोळे आणि या महानगरपालिकेचे सन्मा.लोकप्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने ३१ ऑक्टोंबर पर्यंत डी.पी.आर. हा राज्य शासनाला सादर करणेच्या संदर्भातील भुमिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीकोणातुन आणि महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला काम सोपविण्याच्या संदर्भातुन या दि.२१/१०/२०२२ च्या महासभेचे आयोजन करण्यात आलेले होते. दि.२१/१०/२०२२ च्या महासभेमध्ये या सभागृहात त्या विषयावरती प्रचंड चर्चा झाली, ४.०० वाजेपर्यंत आपल्या मिटींगचे कामकाज चालले. आणि त्यामध्ये अंतिमत: कोणत्याही गोष्टीची कायदेशीर किंवा तांत्रिक बाब उपस्थित होवु नये म्हणुन अमृत २.० चा कामाचा जो कार्यादेश निसर्ग कन्सल्टन्सी, नाशिक यांना देण्यात आलेला होता.आणि त्यांच्या कार्यादेशाची मुदत ही त्यावेळेस सुध्दा होती. आणि मुदतीत त्यानी कार्यादेश सादर केलेला नव्हता, त्या अनुषंगाने आपण दि.३१/१०/२०२२ पर्यंत तो डी.पी.आर. राज्य शासनाला सादर करु शकणार नव्हतो. म्हणुन त्यांचे काम रद्द करुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला काम देण्याच्या संदर्भात चर्चा या सभागृहात झाली होती. आणि सगळयात शेवटी तो विषय त्यावेळेला तहकुब करण्यात आला होता. परंतु तहकुब करत असतांना त्या संदर्भातला निर्णय घेतला गेलेला नव्हता. निसर्ग कन्सल्टन्सीचा जो कार्यादेश आहे. तो तात्काळ रद्द करण्यात यावा. आणि त्याचा कार्यादेश तात्काळ रद्द करुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण राज्य शासनाने जे दर ठरवुन दिलेले होते. १६ कन्सल्टन्टसाठी त्या दरामध्ये महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने काम करण्याच्या संदर्भातली भुमिका मान्य केली तर त्याच्याकडे ते काम सोपविण्यात यावे. आज मला सांगा त्या गोष्टीला बरोबर २ महिन्याचा कालावधी झाला. ज्या विषयासाठी मिटींग तातडीने दिवाळीच्या दिवसांची सुरुवात झालेली होती. २४ तारखेला दिवाळी होती आणि २१ तारखेला वसुबारस होती. आणि त्या दिवशी तातडीने मिटींग बोलविली होती. म्हणजे त्यावेळेला मिटींगचे इतकेच गांभिर्य होते. परंतु गेल्या दोन महिन्यामध्ये त्या संदर्भात त्या निसर्ग कन्सल्टन्सीचा कार्यादेश रद्द होण्यासंदर्भात प्रशासनाने काय भुमिका घेतली. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण जे राज्य शासनाने १६ कन्सलटंन्टला ठरवुन दिलेले दर आहे. त्याच्या संदर्भात जो पत्र व्यवहार केलेला आहे. त्याच्या अनुषंगाने शासनाकडुन आलेला, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडुन आलेला पत्र व्यवहार पाहिला. तर त्यांनी सुध्दा कन्सलटंन्टसाठी वेगळे दर ठरवुन दिलेले होते. परंतु महानगरपालिकेचे काम जर महाराष्ट्र जिवन प्राधिकरण जर करणेस तयार असेल. तर ३% मक्तेच्या दरात काम करणेच्या संदर्भातला एक पत्र व्यवहार काल माझ्या निदर्शनात आला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ३% ने किती पैसे होता ते सांगा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे आप्पा, ते डी.पी.आर.वर पण अवलंबुन आहे. परंतु समजा एक साधारणता २०० ते २५० कोटीचा डी.पी.आर. तयार करणेची शक्यता आहे फक्त पाणी पुरवण्याचा.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे ६ कोटीच्या वरती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ६ कोटीच्या वरती.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि ते किती मध्ये देणार आहे सगळ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांनी काय केलेले आहे, राज्य शासनाने, ज्या १६ कन्सल्टन्टची महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने निवड केलेली आहे. आणि त्यांना मर्यादा घालुन दिलेल्या आहे की, त्या कन्सल्टन्टनी या दरात

काम करायला पाहिजे. त्यांची २०० कोटी किंवा २०० कोटीच्या वर जाणारा डी.पी.आर. याला जास्तीत जास्त ३ कोटी ५० लाख रुपयांची तरतुद केलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सरळ सरळ ३ कोटी आपले जास्त आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि ३ कोटी ५० लाखाची तरतुद केल्यानंतर आता काल जो पत्र व्यवहार झालेला आहे. जो महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडुनच आलेला आहे. तर त्या पत्रामध्ये काय म्हटले आहे की, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण डी.पी.आर. तयार करुन देईल. परंतु त्याचे चार्जेस ३% प्रमाणे महानगरपालिकेकडुन आकारले जातील. म्हणजे ही विसंगती अशी आहे की, कन्सल्टन्टला नेमतांना हे दर ठरवुन दिलेले आहे. आणि महानगरपालिकेला दर आकारतांना त्याच्यापेक्षा जास्त दरांची आकारणी करायची. नेमकी याच्या संदर्भातली परिस्थिती अवगत होणे गरजेचे आहे. आणि २ महिन्याचा कालावधी उलटल्यानंतर ही निसर्ग कन्सल्टन्ट यांचा कार्यादेश अद्यापपावेतो का रद्द करण्यात आलेला नाही. याच्या बद्दल समर्पक माहिती आपण उपलब्ध करुन द्यावी.

**मा.महापौर :-** बोरोले साहेब आले आहे का ? निसर्ग कन्सल्टन्सीला काम करणे संदर्भात काही पत्र प्राप्त झालेले आहे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** अमृत २.० बाबत आयुक्त साहेबांनी निसर्ग वाल्यांना चौकशीला बोलविले, त्याच्या अनुषंगाने त्यांनी एम.जी.पी.च्या जी.आर.नुसार त्या दरात काम करणेस तयार आहे का ? आणि किती मध्ये काम करणेस तयार आहे, या बाबत विचारणा केली. ते काम करणेस तयार नसल्यामुळे काम रद्द करण्याची कार्यवाही प्रस्तावीत झालेली आहे.

**मा.महापौर :-** त्यांनी असे लेखी दिलेले आहे का की मी काम करणार नाही.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** त्यांनी लेखी दिलेले आहे की, मी काम करु शकणार नाही. आणि आयुक्त साहेबांकडे सहीसाठी मंजुरीसाठी ठेवलेले आहे. परंतु आयुक्त साहेब विधानसभेच्या अधिवेशनात असल्यामुळे ते पत्र अद्याप देण्यात आलेले नाही . त्यानंतर एम.जी.पी.चे ही पत्र आलेले आहे आपल्याला की, ३% दराने ते काम करणेस तयार आहे. परंतु शासनाचे जी.आर.नुसार कमी दरात करणेबाबत १६ एजन्सीजला रेट दिलेले आहे. त्या दरामध्ये काम करणेबाबत एम.जी.पी.ला पत्र देण्यात आलेला आहे. या संदर्भामध्ये फाईनल प्रस्ताव महासभेपुढे ठेवणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, दोन महिन्यापुर्वी ज्या वेळेला मिटींग बोलविण्यात आलेली होती. त्या वेळेला या मिटींगचे पत्र या सभागृहापुढे असे ठेवले गेले होते की, ३१ ऑक्टोबर पर्यंत तो डी.पी.आर. नाही केला तर तो निधी परत जाईन. परिस्थिती वेगळी होती त्या बद्दल ही वाद नाही. परंतु त्यामध्ये दि.२१/१०/२०२२ चा निर्णय झाल्यानंतर ही दोन महिन्यांचा कालावधी झाला, दोन महिन्यांमध्ये सुध्दा आपण अजुन त्या निकषावर आलो नाही की, डी.पी.आर. कोणी तयार करायचा. म्हणजे किती निष्काळजीपणा सुरु आहे. जेथे आपण म्हणतो की, तो महत्वकांशी प्रकल्प होता, निधी परत जाणार होता. त्या वेळेला इतकी घाई होती की, डोळे बंद करुन आपण एम.जी.पी.ला काम देण्याच्या तयारीत होतो. परंतु कायदेशीर निसर्ग वाल्याची अडचण निर्माण होऊ नये. म्हणुन आपण चर्चेद्वारे ही भुमिका घेतली, परंतु ती भुमिका घेतल्यानंतर सुध्दा दोन महिन्यापर्यंत प्रशासनामध्ये आजपर्यंत ती कार्यवाहीस सुध्दा निसर्गवाल्याचा कार्यादेश रद्द करण्यात आलेला नाही. आणि एम.जी.पी, जे गिरगावकर साहेब या सभागृहात सांगत होते की, निसर्गचे काम रद्द करुन एम.जी.पी.ला दिले तर ३ कोटी ५० लाख रुपयामध्ये एम.जी.पी.आपल्याला काम करुन देईल. त्यांचे आपल्या मिनीटस मध्ये आहे. मागच्या महासभेच्या इतिवृत्तामध्ये तशी नोंद आहे की, गिरगावकर साहेबांनी येथे मान्य केले होते की, निसर्गला काम दिले. तर साधारणता आपल्याला ८-९ कोटी रुपये द्यावे लागतील. आणि तेच काम एम.जी.पी.कडुन केले तर ३ कोटी ५० लाख मध्ये होईल. परंतु आता जे एम.जी.पी.चे पत्र आहे कालचे

त्याच्यामध्ये ते म्हणता की, ३% दराने आम्ही काम करु. म्हणजे ते पुर्ण ७-८ कोटीचा भुर्दंड पडणार आहे महापालिकेवरती. तर नेमकी विसंगती काय ?

**मा.महापौर :-** त्यासाठी आयुक्त साहेबांनी काही तरी पत्र तयार केलेले आहे की, शासनाने दिलेल्या दराप्रमाणेच तुम्हाला करावा लागेल. एम.जी.पी.ला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण एम.जी.पी. शेवट पर्यंत.

**मा.महापौर :-** हो त्यांनी पत्र दिलेले आहे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** हो त्यामध्ये पत्रात तसे दिलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो पण मोघमच आहे ते पत्र. म्हणजे गिरगावकर साहेब जे सांगत होते ते खोटे सांगत होते की, शासनाने कन्सलटंन्ट जे निर्धारीत केलेले आहे. त्या दरामध्ये टेन्टेटीव्ह आपल्याला काम करुन देईल. पण ती परिस्थिती पत्रात कुठेच दिसत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पत्रामध्ये तशी परिस्थिती नाही. पत्रामध्ये सगळं मोघम आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मोघम आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मोघम आहे आणि हे सगळच फार चुकीचे चाललेले आहे. खरंतर कोण बनेंगा आयुक्त ही जी सद्याची आपली परिस्थिती आहे. याचा प्रशासन सगळा गैरफायदा घेतो आहे. प्रशासनावर पकडच नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई कोण बनेंगा आयुक्त हे तर जाऊ द्या परंतु दोन आयुक्त असुन सुध्दा फायदा एकाचाही नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** काहीच नाही. नुकसानच होत आहे ना आपले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** खंरतर ताई काय झालेले आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ आज तिसरे आयुक्त बसले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे जे आयुक्त बसलेले आहेत ना. ते म्हणजे काळजीवाहु आहे. बिल्डींग प्लॅनवर ही सह्या करत नाही. कार्यादेशही देत नाही कामाचे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** म्हणजे आता मला सांगा महापौर ताई, प्रशासनाने हे स्पष्ट करावे की, अप्रशासकीय निर्णय कोणते आणि प्रशासकीय निर्णय कोणते. म्हणजे प्रत्येक गोष्ट प्रशासन काय करतो आहे. महासभेसमोर फेकतो आहे. महासभेला निर्णय घेऊ द्या, महासभेला निर्णय घेऊ द्या. अरे प्रशासन म्हणुन तुमचे काही काम आहे की नाही. प्रशासकीय ड्युटी म्हणुन प्रशासन कामे करणार आहे की नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** खरच मोठी शोकांतिका आहे ही.

**मा.महापौर :-** अमृत २.० चा ठराव करणे गरजेचे आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये तो महासभेपुढे आला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण त्याचे स्पष्टीकरण ही पाहिजे आपल्याला की, कुठल्या दरामध्ये हे काम करणार आहे.

**मा.महापौर :-** नाही त्या संदर्भात आपल्याला सर्व पक्षीय मिटींग करावी लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि नसेल तर पॅनलवर १६ कन्सल्टन्ट आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ शेवटी हेच होणार आहे. एम.जी.पी.ला जर दिले तर एम.जी.पी त्या कन्सल्टन्टकडुन करुन घेणार आहे. पण आपण ८ जुलैच्या महासभेत ठराव केलेला होता. ईमिजेटली काम मार्गी लावा. त्याचे प्रशासनाने काहीच केले नाही. हे भिजत घोंगड आहे तर भिजत घोंगडच आहे आणि सगळयांचा त्रास कोणाला होत आहे. तुम्हाला आम्हालाच होत आहे. प्रशासनाचे काहीच बिघडत नाही याच्यामध्ये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे आज मला सांगा की, परंतु प्रशासन दोन दोन महिने त्या विषयावर निर्णय सुध्दा घेत नाही. ज्या पध्दतीने हा ठराव करतांना अडचणीत पडलेले आहे. तसाच घनकचरा प्रकल्पाचा विषय सुध्दा

त्याच पध्दतीने अडचणीत पडलेला आहे. मला सांगा, जवळपास ३ वर्षाचा कालावधी झाला, निर्णय होऊन पडलेला आहे. तिथले त्या भागातील सगळे नागरीक रोज त्या धुराच्या त्रासामुळे जिव देण्यासारखे झालेले आहे. आणि त्याच्यावर सुध्दा कुठलाच निर्णय होत नाही. त्याच पध्दतीने एल.ई.डी.लाईटचा प्रकल्प ताई तसाच आहे. आज एल.ई.डी.लाईटच्या संदर्भातला सदरहु ई.एस.एल. कंपनी म्हणते की, पुर्वी मी ७ वर्षाच्या मेन्टेनन्सचा कॉन्ट्रॅक्ट केलेला होता. परंतु २५००-३००० पथदिवे तुम्हाला नव्याने लागणार आहे. त्यांना मी ५ वर्षाचाच मेनटेनन्सचा ही देईल. सर्व्हीस देईल. त्यावर ही काही होत नाही. मला सांगा या शहराच्या रस्त्यांचा विषय मार्गी लागत नाही. पाणी पुरवठयाचा विषय मार्गी लागत नाही, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा विषय मार्गी लागत नाही. पथदिव्यांचा विषय मार्गी लागत नाही. आरोग्यासाठी असलेले ताई दोन जे.सी.बी. मी साधारणता तीन महिन्यापासुन स्वत: व्यक्तीश: पाठपुरावा करत आहे. दोन जे.सी.बी. बंद पडलेले आहे. तिन महिन्यापासुन गावातल्या छोटया छोटया समस्यांसाठी जे.सी.बी. मिळत नाही. एक जे.सी.बी.असतो कधी पाणी पुरवठा वापरतो, कधी बांधकाम वापरतो, कधी आरोग्य वापरतो, का बंद पडलेले आहे कारण कंपनी म्हणते की, मला ॲडव्हान्स मिळाल्याशिवाय मी त्या जे.सी.बींचा मेनटेनन्सचे काम करणार नाही. महानगरपालिकेच्या नियमात तरतुद आहे की, ॲडव्हान्स पैसे देऊ नये.संबंधीत खातेप्रमुखांना सांगितले की, तुम्ही तुमच्या नावावर ॲडव्हान्स घ्या आणि त्याच्यातुन तुम्ही त्याचे बिल अदायगी करा. त्याचा निवाडा होत नाही. गेल्या तीन महिन्यापासुन तो जे.सी.बी.चा विषय पण तसाच आहे की, ते ॲडव्हान्स घ्यावे कोणी आणि त्याच्या बिलाची अदायगी करावे कोणी. म्हणजे चालले काय आहे. प्रशासन आहे की नाही. या शहरामध्ये हीच आज परिस्थिती झालेली आहे. तुम्ही अतिक्रमणच्या बाबतीत परिस्थिती बघाल, जळगांव शहरात एक ही मार्ग असा नाही. ज्याच्यावर अतिक्रमण नाही. म्हणजे आता मागची आठ दिवसापुर्वीची गोष्ट आहे. गिरीषभाऊ सुरेशदादांची तब्येत पाहायला बंगल्यावरती आले होते शिवाजी नगरला. तेथुन निघाल्यानंतर आमचे एक मित्र त्यांच्यासोबत होते गाडीत, टॉवर चौकात वाहतुकीच्या कोंडी मध्ये त्यांची गाडी १५ मिनीट गाडी अटकुन पडली अतिक्रमणामुळे, त्यांनी तिथुनच फोन लावला, गायकवाड मॅडमांना ही लावला, एस.पी. साहेबांनाही लावला, ते म्हणजे ही काय परिस्थिती आहे या शहराची. इतपर्यंतची परिस्थिती अतिक्रमणची सुध्दा हातापायाने गेलेली आहे. म्हणजे प्रशासनाचे एक ही काम असे दिसत नाही की, जे मनापासुन आपण ऑप्रीशीएट करु, अभिनंदन करु की, खरंच आमचे प्रशासन कुठेतरी चांगले काम करत आहे. ही परिस्थिती खुप लवकर सुधरविणे गरजेचे आहे. शेवटी बघा काय असतं. सामान्य नागरीकाचा पाहण्याचा दृष्टीकोण या लोकप्रतिनिधींकडे असतो. असे याच्यातले फटके हे लोकप्रतिनिधींनाच बसतात. तर या संदर्भात काय परिस्थिती आहे तो खुलासा करायला पाहिजे. बऱ्याच वेळी दोन गोष्टी असतात. मक्तेदार म्हणतो मला पेमेंट मिळत नाही. महानगरपालिका म्हणते की, मक्तेदार व्यवस्थीत काम करत नाही. याच्या संदर्भातला आर्बीट्रेशन म्हणजे मक्तेदाराचे काम रद्द ही करायचे असेल, तर त्याच्या साठी आर्बीट्रेशनची नेमणुक करुन ते काम रद्द करणे गरजेचे आहे. आर्बीट्रेशनच्या नेमणुकी संदर्भात यापुर्वी महानगरपालिकेने ठराव केलेला होता. याच्या संदर्भात मक्तेदाराचे काम समाधानकारक नसेल, तर मी म्हणतो त्याच्या संदर्भात ही प्रशासनाने तातडीने कायद्याचा अभ्यास करुन ते काम करणेबाबतचा सुध्दा विचार करायला पाहिजे. शेवटी शहराच्या आरोग्याचा प्रश्न ही गंभिर होत चालला नाही. म्हणजे एच ॲण्ड ऐव्हरी प्रश्न गंभिर होत चाललेले आहे. एक ही विषय असा नाही जो समाधानकारक आहे. म्हणजे लाईटांपासुन ते पाण्यापर्यंत सगळीकडे परिस्थिती दुखदाई आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, जसे आरोग्य वरती आता नितीनभाऊंनी सांगितले,ती सर्व जळगांव शहराची परिस्थिती आहे. या अनुषंगाने मी आपले लक्ष वेधु ईच्छितो की, मागील महासभेमध्ये आरोग्य वरती जी चालणारे दोन जे.सी.बी.आहे, त्या परिसरातील नागरीक या धुराने कंटाळलेले आहे. त्यावरती ते जे.सी.बी. चालतात. दोन जे.सी.बी.वरती आजपर्यंत काय कार्यवाही झाली. कारण की, मागच्या महासभेत सांगण्यात आले होते की, दोघी जे.सी.बी. दोन दिवसानंतर चालु होणार आहे. तर या बाबतीत सभागृहाला विनंती करतो महापौर महोदया आपल्या माध्यमातुन की, याच्या वरती आजपर्यंत काय कार्यवाही झाली.

**मा.महापौर :-** उदय पाटील साहेब बोला.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** मी नुकताच आरोग्य विभागाचा चार्ज घेतलेला आहे. आणि त्यामध्ये दोन जे.सी.बी.जे बंद होते की, त्या जे.सी.बी.चा ॲडव्हान्स कोणी करावा. तर मागील आठवडयामध्ये तो ॲडव्हान्स आपण घेतला आहे वाहन विभागाने आणि त्या जे.सी.बी.करीता कंपनीला पेमेंट आपण अदा केलेले आहे. तर नक्कीच पार्ट पेमेंट अदा केलेले असल्याने ते जे.सी.बी. आता चालु होतील.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कधी ? महापौर महोदया, मी आपल्याला विचारु इच्छितो की, मागील हप्त्यात जर दिला आहे तर दोन महिन्यापुर्वी आपली महासभा कधी झाली. तेव्हा पासुन त्याला आपण पेमेंट अदा करण्याचे सांगितले होते की, सभागृहाला व आपल्याला सांगु ईच्छितो की, जरी तुम्ही म्हटले, अजुनही तो जे.सी.बी.बंद असुन कमी काळात चालु होऊ शकत नाही. आजही ज्याला आपण ॲडव्हान्स दिला. तो ॲडव्हान्स घेतल्यानंतर सुध्दा त्याने काल परवा सुध्दा एका जे.सी.बी.च्या दुरुस्तीचे मॅन्युवली काही तरी बदल करुन एका जे.सी.बी.च साहित्य आणले, ते सुध्दा लागत नाही. ते सुध्दा जॉईंट होत नाही. तो परत चालला गेला, सोमवारी येणार आहे. आणि सोमवारीपण तो काय म्हणत आहे की, मी एक जे.सी.बी.चालु करु शकेल. मग आपण ॲडव्हान्स किती जे.सी.बी.चा दिला होता आणि किती लाख रुपये काढले होते त्याचा आकडा द्या मला.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** मला जितकी माहिती आहे मी देतो. कारण त्यांचे असे म्हणणे होते, मला आधी ॲडव्हान्स द्या तरच मी जे.सी.बी.ला हात लावेल. आणि २-३ महिने यांनी काही ॲडव्हान्स दिला नाही. ॲडव्हान्स कोणी घ्यावा हा मोठा प्रश्न होता. मी चार्ज घेतल्यानंतर मी डिबेटींग केली. आणि त्याच्यामध्ये बदल केला. मुलेप साहेब पण म्हटले,

**श्री.विष्णु भंगाळे :-** माझे म्हणणे एकच आहे. त्याला ५-५० हजार रुपये दिले, काल परवा जो आला होता, त्यानी एका जे.सी.बी.चीच जबाबदारी घेतलेली आहे. काल परवा आला होता. जे.सी.बी.वाला त्यांनी एकाचीही जबाबदारी घेतली का ? त्याने एकाचा पार्ट आणि तो लागला नाही म्हणुन तो परत चालला गेला, ही माहिती आपल्याकडे आहे का ?

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** नाही.

**मा.महापौर :-** साहेब, जे.सी.बी. कधी चालु होईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** म्हणजे मा.महापौर महोदया, महापौर महोदया, मी आपले सर्व सभागृहाचे पुन्हा लक्ष वेधु ईच्छितो की, आपल्याला माहिती सभागृहाला चुकीची मिळत आहे. आज जे.सी.बी.च्या माध्यमातुन जी आवश्यकता आहे. त्या परिसरातील नागरीकांचे फोन वेळोवेळी येत असतात. आणि त्या माध्यमातुन तो कचरा डम करायला तेथे तो कामात पडतो, परंतु आजच्या जे.सी.बी.ची परिस्थिती अशी आहे की, या जे.सी.बी.ला दिलेला जो निधी होता. किंवा त्याच्या माध्यमातुन आपण म्हणतो, इंडियन जुगाड, त्या टाईप काही तरी त्याचे जमावुन केलेला आहेत. तरी ही काल परवा ते आले होते. तरी देखील ते झाले नाही. आणि तो ज्यांनी सांगितले की, मी सोमवारी येईल आता. तो सोमवारी आल्यावर एकाच मशीनचा सामान आणेल. अस अक्षरश: सांगुन गेलेला आहे. असे नाही की, तो फक्त गेला आहे. अक्षरश: तेथे जे असतील. त्यांना सांगुन गेला आहे की, येत असतांना एकच जे.सी.बी.चा सामान आणेल. ते एक जे.सी.बी.चालु होईल त्याच्या नंतरचा विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** गांभिर्याने घ्या थोडे,

**श्री.विष्णु भंगाळे :-** गांभिर्याने घ्या, किती दिवसापासुन जे.सी.बी.बंद आहे. तीन चार महिने झाले जे.सी.बी. बंद आहे.

**मा.महापौर :-** साहेब त्यांच्या मागे लागुन ते करुन घ्या. कारण पहिलेच आपल्याकडे वाहन संख्या खुप कमी आहे. वाहनांची खुप निकड आहे. पुढच्या आठ दिवसात जे.सी.बी.सुरु झाले पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मागच्या तीन महिन्यापुर्वी आपण तुमच्या लेटरहेडवर बुकलेटची मागणी केली होती. अजुन पर्यंत ती मागणी आलेली नाही. नाला स्केलेटरचे सौ.भारतीताई महापौर असतांना केले होते ठराव ती अजुन ही आले नाही. महापालिका फंडातुन का घेत नाही.

**मा.महापौर :-** आज नेमके संबंधीत अधिकारी नसल्यामुळे येथे भरपुर प्रश्न निर्माण होत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** वाहन विभागाची अशी परिस्थिती आहे, ते प्रस्तावच पाठवत नाही. वाहन विभागाकडे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढचा विषय घ्या. इतिवृत्त मान्य करण्यात यावे.

**मा.महापौर :-** इतिवृत्त मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.०७/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या व दि.२१/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. २ :-** जळगांव शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या हद्दितील मिळकतींचे मालमत्ताकराचे फेरमुल्यांकनाचे व वार्षीक देखभाल दुरुस्ती कामी सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात रक्कम रु.२,१४,१७,००३/- मात्रची सुधारीत वाढीव तरतुद करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मे.स्थापत्य कंन्सलटन्टस प्रा.लि.अमरावती यांना जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील मिळकतींचे (इमारती व जमिनी) जी.आय.एस.प्रणालीव्दारे मालमत्ताकराचे फेरमुल्यांकनाचे काम दिलेले होते. सदर काम कंपनीने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पुर्ण करुन दिलेले आहे. त्याचे खालील प्रमाणे तपशिलवार धावते देयक सादर करण्यात आले आहे.

| बिलाचा तपशिल | रक्कम रु. |
|---|---|
| संपुर्ण फेरमुल्यांकनाचे काम सन २०२१-२२ मध्ये पुर्ण झाले असल्याने यापुर्वी एकुण देयकाच्या ९९ टक्के रक्कम अदा केलेली असून उर्वरित १% रक्कम प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मधील एकुण ११८४९४ मिळकतीचे रु.५५५/- मात्रचे दराचे १% रक्कम | ६५७६४१.०० |
| इंडस्ट्रियल बांधीव मिळकती प्रभाग समिती क्र.०३ साठी एकुण ११३४ मिळकती बाबत सदर कंपनीशी केलेल्या करारनाम्यातील मुद्दा क्र.१२ मधील ए स्टेप १ ते ३ नुसार रु.९९% रक्कम यापुर्वी अदा केलेली आहे. उर्वरित १% रक्कम ११३४ मिळकतींचे १०००० रु. दराचे १% | ११३४००.०० |
| प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मधील एकुण १०८७६६ मिळकतींचे सन २०२०-२१ चे वार्षीक देखभाल दुरुस्तीची रक्कम रु.९०२७५७८/- मात्र अदा करण्यात आलेली आहे. त्यास महासभा ठराव क्र.६८५ दि.१५/१२/२०२१ अन्वये मान्यता घेतलेली आहे. त्यातील एकुण उर्वरित जि.एस.टी.रक्कम रु.१६,२४,९६४/- मात्र अदा करणेस महासभा ठराव क्र.८३५ दि.३०/०५/२०२२ अन्वये मान्यता घेतलेली आहे, त्यातील उर्वरित रक्कम रु. | १३७७०८८.०० |

| | |
|---|---|
| प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ साठी एकुण मिळकती ११०८०४ साठी सन २०२१-२२ चे देखभाल दुरुस्ती कामी ७५% रक्कम रु.८१,३९,१०८/- मात्र महासभा ठराव क्र.६८५ दि.१५/१२/२०२१ अन्वये मान्यता घेतलेली आहे. उर्वरित २५% रक्कम पैकी १५% रक्कम अदा करण्यासाठी महासभा ठराव क्र.८३५ दि.३०/०५/२०२२ अन्वये मान्यता घेतलेली आहे. सदर २५% रक्कम रु.(उर्वरित १०% रक्कम अदा करणे बाकी आहे) | १३७९५१०.०० |
| प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मधील खुला भुखंड मिळकती एकुण ३६३५६ साठी सन २०२१-२२ चे देखभाल दुरुस्तीसाठी ८०% रक्कम रु.२४,१४,०३८/- पैकी रक्कम रु.१६,६०,०००/- मात्र अदा करण्यात आली आहे, त्यास महासभा ठराव क्र.६८५ दि.१५/१२/२०२१ अन्वये मान्यता घेतलेली आहे. रु.२४,१४,०३८/- मात्र या रक्कमेच्या ९०% रक्कम रु.२१,७२,३६४/- पैकी यापुर्वी अदा रक्कम रु.१६,६०,०००/- मात्र वजा केल्यास उर्वरित शिल्लक रक्कम रु. | ५१२३६४.०० |
| CGST ९% | ३६३६००.०० |
| SGST ९% | ३६३६००.०० |
| एकुण अदा करावयाची रक्कम | ४७६७२०३.०० |

सन २०२२-२३ चे जळगांव शहर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकांत मालमत्ता फेरमुल्यांकन खर्च या लेखा शिर्षाखाली रु.१,४०,००,०००/- मात्रची तरतुद करण्यात आलेली होती. सदर तरतुदीमधुन सन २०२१-२२ मधील प्रलंबीत देयक अदा करण्यात आलेले असुन सदर लेखा शिर्षातर्गत निधी शिल्लक नाही.

अंदाज पत्रकीय तरतुद शिल्लक नसल्याने सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकांत वाढीव तरतुद करणे आवश्यक असल्याने तसेच सन २०२२-२३ साठी प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मधील एकुण १७०००० मिळकतींसाठी रु.८३/- मात्रच्या दराप्रमाणे एकुण रुपये १,६६,४९,८००/- मात्र (जी.एस.टी.सह) खर्चास महासभा ठराव क्र.८३५ दि.३०/०५/२०२२ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यातील बिलांच्या अदायगीसाठी रु.१,६६,४९,८००/- मात्र व उक्त नमुद अदायगीची रक्कम रु.४७,६७,२०३/- असे एकुण रक्कम रु.२,१४,१७,००३/- मात्रची वाढीव तरतुद सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकांत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ३ :-** जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या हद्दितील नव्याने तयार मिळकतींचे मालमत्ताकराचे मुल्यांकन करणेसाठी अंदाजित रक्कम रु.२७,७५,०००/- मात्रचे होणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

मा.उपमहापौर :- माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :- विषय क्र.३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील मिळकतींचे जी.आय.एस. प्रणालीव्दारे मालमत्ता कराचे फेरमुल्यांकन सन २०२१-२२ अखेर पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर काम हे मे.स्थापत्य कन्स्लटंन्टस प्रा.लि.अमरावती या कंपनीच्या सहकार्याने करण्यात आलेले आहे.

सदरचे फेरमुल्यांकनानंतर प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या जवळपास ५००० मिळकती नव्याने तयार झालेल्या आहेत. सदर मिळकतींना मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक आहे. सदर मिळकतींचेही जी.आय.एस. प्रणालीव्दारे आकारणी करणे, तसेच प्रत्यक्ष जागेवर नंबरींग करुन मोजमाप करुन करयोग्यमुल्य निश्चीत झाल्यावर ते आज रोजी कार्यरत महानगरपालिकेच्या संगणकीय प्रणालीत समाविष्ट करणे आवश्यक आहे. महासभा ठराव क्र.८३५ दि.३०/०५/२०२२ च्या मान्यतेने सन २०२२-२३ व सन २०२३-२४ चे वार्षीक देखभाल दुरुस्तीचे काम हे मे.स्थापत्य कन्स्ल्टंन्टस प्रा.लि. अमरावती या कंपनीला दिलेले आहे. त्यामुळे प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या हद्दित नव्याने तयार झालेल्या व मालमत्ताकराची आकारणी नसलेल्या इमारतींना मालमत्ता कराची जी.आय.एस. प्रणालीव्दारे आकारणीचे काम हे मे.स्थापत्य कंन्स्ल्टंन्टस प्रा.लि. अमरावती या कंपनीला त्यांनी यापुर्वी केलेल्या दरांतच देता येईल. सदर एजन्सीने यापुर्वीच्याच दरांत हे काम करणे आवश्यक राहील त्यात कोणतीही वाढ अनुज्ञेय असू नये, सदर काम हे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असल्याने नविन आढळणाऱ्या सर्व मिळकतींच्या आकारणीसाठी येणाऱ्या अंदाजीत खर्च ५०००x५५५= रक्कम रु.२७,७५,०००/- मात्र व त्यावरील नियमानुसार जि.एस.टी. या होणाऱ्या खर्चास तसेच सदर मिळकत संख्येत वाढ झाल्यास त्याअनुषंगाने होणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ४ :-** जळगांव शहरातील दिव्यांग व्यक्तींना रेशनपोटी अर्थसहाय्य रक्कमेत वाढ करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. याच्यात वेगवेगळे दिलेले आहे. वार्षिक रक्कम रु.२०००/- प्रमाणे देण्यात येत आहे. म्हणजे सद्या आपण रु.२०००/- प्रति व्यक्ती देतो आहे का ?

**मा.उपमहापौर :-** सद्या आपण रु.२०००/- देतो आहे. पण उद्दिष्ट पुर्ण नाही होत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि आयुक्त, दिव्यांग कल्याण महाराष्ट्र यांचे म्हणणे आहे की, तो उद्दिष्ट पुर्ण करायला पाहिजे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुख्यलेखाधिकारी :-** म्हणुन आपण वाढीव देतो आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे त्या उद्दिष्टाप्रमाणे बसेल तितका मार्ग काढाल का ?

**मा.उपमहापौर :-** उद्दिष्टाप्रमाणे त्यात वाढ करण्यात येत आहे. माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्र.४ मध्ये प्रशासनाने उद्दिष्टाप्रमाणे त्यामध्ये वाढ करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी यांचा दि.०४/०७/२०२२ च्या अर्जानुसार ५ टक्के मनपा निधितून दरमहा रु.३०००/- प्रमाणे अर्थसहाय्य मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

आयुक्त दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य पूणे यांचे कडून दि.०७/०६/२०२२ रोजी ऑनलाईन बैठक घेण्यात आलेली असून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये केवळ ८.३३ टक्के निधी खर्च झाल्याने नाराजी व्यक्त केलेली आहे. तसेच १०० टक्के दिव्यांग निधी खर्च करणेबाबत सुचीत केले आहेत.

आयुक्त यांचे कडील कार्यालयीन आदेश दि.२२/०६/२०२२ अन्वये १०० टक्के निधी नियमानुसार खर्च करावा असे आदेशात नमुद केलेले आहे.

महासभा ठराव क्र.५४७ दि.१२/०८/२०२१ नुसार दिव्यांग कल्याणासाठी ११ योजनांच्या आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आलेली असून त्यामधील योजना क्र.७ नुसार वार्षिक रक्कम रु.२०००/- प्रमाणे दिव्यांग व्यक्तींना रेशनपोटी अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या प्रमुख वैदयकीय अधिकारी दवाखाना विभाग यांचे कडेस साधारणत: १००० दिव्यांग व्यक्तींची नोंदणी झालेली आहेत. दिव्यांग संघटनेच्या प्रतिनिधींनी रेशनपोटी वाढ करणेबाबत मागणी केलेली रक्कम ही ५ टक्के निधीच्या तरतुदीपेक्षा जास्त आहे. सन २०२२-२३ करीता वार्षिक तरतुद रुपये दोन कोटी करण्यात आलेली असुन प्रती दिव्यांग व्यक्तीला वार्षिक रक्कम रु.२०००/- प्रमाणे देण्यात येत असून त्याप्रमाणे निधीच्या १० टक्के खर्च होईल व वार्षिक रु.४०००/- दिल्यास निधिच्या २० टक्के खर्च होईल व वार्षिक रु.८०००/- दिल्यास मनपा दिव्यांग निधीच्या ४० टक्के खर्च होईल.

जळगांव शहरातील दिव्यांग व्यक्तींना रेशनपोटी दिल्या जाणाऱ्या रक्कम रु.२०००/- मध्ये प्रशासनाने उदिष्टाप्रमाणे वाढ करुन जळगांव शहरातील प्रती दिव्यांग व्यक्तींना रेशनपोटी अर्थसहाय्य देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ५ :-** जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे खुल्या जागा अनामत घेऊन जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. कैलास सोनवणे** :- प्रशासनाचा प्रस्ताव तसाच आहे ना.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा

**श्री. सुनिल महाजन** :- कमी केलेले आहे आपण

**श्री. कैलास सोनवणे** :- हो

**श्री. नितीन लढ्ढा** :- सागर पार्कला आणि

**मा.उपमहापौर**:- सुधारीत प्रस्तावात पुर्वीचे क्रिकेटसाठी रु.२५,०००/- होते. ते आपण ५ हजार केलेले आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आपण आता क्रिकेट किंवा काही तत्सम खेळ असतील ना, तर त्याचे सुध्दा ५ हजार घ्यावे लागतील.

**श्री. कैलास सोनवणे** :- कबड्डी चे आहे कमी आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा कबड्डीची कमी आहे. परंतू आपल क्रिकेटच्याबाबतीत पुर्वी आपले धोरण होते आता आपण ते ५ हजार करतोय. आता या दोघांच्या व्यतिरीक्त तिसरा मुद्दा जो असेल तर तो आपल्याला सगळ्यांना ५००० प्रमाणे सरसकट करावा लागेल.

**श्री. विष्णु भंगाळे** :- सगळ्यांना सरसकट स्पोर्टससाठी करावा लागेल.

**मा.उपमहापौर**:- तुम्ही सरसकट म्हणता आहे ना तर ती कमी आहे. तर आपल्याला स्पोर्टस चा विषय जो आहे कबड्डीसाठी कमी आहे, कुस्तीसाठी कमी आहे.

**श्री. विष्णु भंगाळे** :- ते विषय सोडुन.इतर जे खेळ आहे.

**मा.उपमहापौर**:- हो

**श्री.विशाल त्रिपाठी** :- पुर्वीचे जे खेळ आहे ते सोडुन इतर जे आहेत अस करा.

**मा.महापौर**:- कबड्डी आणि कुस्ती याचे आपण ठरविलेले आहेत दर त्याचप्रमाणे परंतू क्रिकेट आणि जे इतर त्याच्यासाठी ५  हजार रूपये दराप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे मला अस वाटत की महिला बचत गटांसाठी ज्यांची आपल्या महापालिकेकडे नोंद आहे. त्यांच्या मेळाव्यांसाठी काहीतरी कमी करण्यात यावे.

**श्री. कैलास सोनवणे** :- बरोबर आहे.

**मा.महापौर**:- त्याचे धोरण काहीतरी ठरवावे लागेल आपल्याला

**श्री. कैलास सोनवणे** :- कबड्डी स्पर्धाही आहेत आपल्या

**मा.महापौर**:- फक्त महिला बचत मेळावे, ज्यांचा म्हणजे ज्यांचे आपल्या कडे रजिष्ट्रेशन आहे असे बचत गट

**श्री. विशाल त्रिपाठी** :- बरोबर आहे ताई

**श्री. नितीन लढ्ढा** :- म्हणजे काय आहे की कोणीतरी दुसऱ्याच्या नावावर बुकींग करून घेतात, तर त्याच्यात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत.

**श्री. अनंत जोशी** :- महापौरताई गेल्यावेळेस ही चर्चा झालेली होती. हाडाताई बोलले होते, नितीनभाऊ जे म्हणत आहेत तोच विषय आहे की महिला बचत गटांच्या नावावर होत आहे.

**मा.महापौर**:- फक्त आपल्याकडे ज्यांचे रजिष्ट्रेशन आहे आपल्या महापालिकेमध्ये, त्याच बचत गटांसाठी कमी करावे.

**श्री. अनंत जोशी** :- हो ना पण ताई बचत गटांच्या नावावर ते कमर्शियल ॲक्टिव्हिटी करतील असं आमच म्हणण आहे

**मा.महापौर**:- त्याला आपण मान्यता द्यायची.

**श्री. अनंत जोशी** :- महापौरताई माझ अस म्हणण आहे की , आतापर्यंत बचत गटांचे किती कार्यक्रम आपले सागर पार्कला होतात.

**मा.महापौर**:- ठरावाला मान्यता देण्यात यावी.

**श्री. अनंत जोशी** :- म्हणजे आत्ताचा विषय आहे भाडे वाढवुन आपल्याला

**मा.महापौर**:- नाही अशामुळे ते

**श्री. अनंत जोशी** :- ठराव करून अजुन ४ महिनेही झाले नाही. आणि आता त्यांच्या नावावर लोक कमर्शियल ॲक्टिव्हिटी करतील.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो , हो. बरोबर आहे म्हणजे सवलतीचा कोणीही दुरूपयोग घेवु नये म्हणुन आणि त्याला कशा पध्दतीने आळा घालता येईल त्याच्यासंदर्भात, काही इंन्सट्रक्शन द्यायच्या असतील तर त्या द्या आणि त्याची खात्री करून घ्यायची आहे.

**मा.महापौर**:- आपण या बचत गटांना कुठेतरी प्रोत्साहन देण गरजेच आहे. एवढे भाडे सुध्दा त्यांना परवडत नाही.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो बरोबर आहे. ताई आपण जे बोलले ते एकदम योग्य आहे. त्याचा ड्रॉबॅक आपल्याला कशा पध्दतीने प्रोटेक्ट करता येईल. तेवढा फक्त विचार करू. बाकी मान्यता द्यायला हरकत नाही. त्या पध्दतीने धार्मिक जे आहे , भागवत सप्ताह होतात किंवा कथा होतात. त्या कथांच्या संदर्भात आपण काय निर्णय घेणार.

**मा.महापौर**:- धार्मिक आणि सांस्कृतिक

**श्री. नितीन लढ्ढा** :- ठिक आहे , ५००० करा, ठिक आहे.

**मा.महापौर**:- कबड्डी कुस्ती जी आहे ती आपण

**श्री. कैलास सोनवणे** :- कबड्डी कुस्तीला किती आहे ?

मा.महापौर :- १००० रुपये.

श्री.कैलास सोनवणे :- ते १००० रूपये कसे आहे का ?

**मा.महापौर**:- पर डे

**श्री. कैलास सोनवणे** :- एका दुकानाला जास्त होईल.

**मा.महापौर**:- नाही नाही पुर्ण ग्राऊंडच आहे ते

**श्री. विशाल त्रिपाठी** :- नाही नाही ५ हजार बरोबर आहे.

**श्री. विष्णु भंगाळे** :- ठिक आहे ५ हजार बरोबर आहे.

**मा.महापौर**:- ठिक आहे फक्त रजिस्ट्रेशन महापालिकेकडे आवश्यक आहे. त्याचा व्यावसायिक वापर होणार नाही मात्र याची काळजी प्रशासनाने घेणे आवश्यक आहे आणि त्यांच्यासाठी ५ हजार पर डे दर त्यांच्यासाठी निर्धारीत करण्यात यावे. प्रशासनाने या संदर्भात सर्व सुधारणा करून या पध्दतीने हे दर या ठरावापासुन लागु करण्यात यावे.

**श्री. अनंत जोशी** :- महापौरताई एकच मिनीट, एकच मिनीट.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे..

**श्री. अनंत जोशी** :- या विषयाबद्दल बोलतोय, आपल्या सागर पार्क वर जर कुठलेही कार्यक्रम झालेले असेल तर त्या ठिकाणी कोणीही साफसफाई करत नाहीत. माझ्या प्रभागातील सफाई कर्मचारी किंवा सफाई कामगार यांना तेथे काम करावे लागते. मी गेल्या एक दिड वर्षापासुन दोन तीन वेळा आयुक्त साहेबांना ही पत्र दिलेले आहे. तुम्हालाही पत्र दिलेल होतं की, तेथे कायमस्वरुपी कर्मचारी पाहिजे. जो उघडेल बंद करेल, स्वच्छता ठेवेल, देखरेख करेल. आता आपण गेल्या ठरावामध्ये सफाईचे रु.५०००/- लिहलेले आहे. जे कोणी कार्यक्रम घेतील त्यांना आपण रक्कम रु.५०००/- केलेले आहे. महानगरपालिका रु.५०००/- घेईल सफाई चार्जेसचे आणि तेथे साफसफाई नसते. माझ्या प्रभागातील कर्मचारी तेथे सफाई करतात. ही कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांसाठी विनंती आहे आपल्याला.मी पत्र ही दिलेले आहे की, तेथे एक कर्मचारी असायला हवा. रात्री तुम्ही तेथे बघाल ना. लाईट लावले, कंपाऊंड केलेले, बेंचेस आहे, ट्रॅक आहे. आता संध्याकाळी ७.०० नंतर महिला आणि फॅमिली फिरायला येतात तेथे वॉकला येतात. आणि ९.३० नंतर जर गेले तर सगळे तेथे वेगळेच लोकं बसलेले असतात तेथे. माझी आपल्याला विनंती आहे. तेथे कायमस्वरुपी एक कर्मचारी द्यावे ही मी प्रशासनाला मागणी करतो आहे.

**मा.महापौर :-** मला वाटते, दोन कर्मचारी लावायला हरकत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** चार लावा चार. कारण दोन लोकं इतके करु शकत नाही.

**मा.महापौर**:- प्रशासनाने याची नोंद घ्यायची आहे की , मानधन तत्वावर चार कर्मचारी त्या ठिकाणी नियुक्त करावी दोन शिफ्टमध्ये

**श्री.धीरज सोनवणे :-** महापौर महोदया, आता वार्ड क्र.१४ चा विषय आहे. आता जो विषय बंटीभाऊंनी काढला, माझ्या प्रभागातील स्वामी विवेकानंद उद्यान, टागोर नगर उद्यान व गणेशवाडीतील उद्यान, कोरोना काळापासुन त्यांची परिस्थिती अशी आहे की, ते बंदच आहे. तेथे स्वच्छताही होत नाही. वारंवार तक्रारी करुन ही पडलेला कचरा किंवा घान उचलला जात नाही. तेथे वॉचमन नाही. चुकीचे कामे तेथे वाढत आहे. ज्या प्रमाणे आपण खाजगी व्यवसायीकेला दर वर्षे दिड कोटी रुपये आपण इतर उद्यानांसाठी देतो आहे .तर या प्रभागातील या उद्यानांना कायम कर्मचारी किंवा स्वच्छतेचे संदर्भात काही तरी योग्य निर्णय घ्यावा.

**मा.महापौर :-** आपल्या कर्मचाऱ्यातुन आपण देऊ शकत नाही. दुसरे कर्मचारी काढुन तेथे नियुक्त करु शकत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई आपल्या बांधकामाच्या प्रत्येक युनिटला हेच आहे की, आपल्याकडुन काम करुन घेतले जात नाही. आपल्याकडे महिला कर्मचारी आहे प्रत्येक उद्यानाला, प्रत्येक युनिटला आहे. उद्यानाची देखरेख करणे, स्वच्छता करणे हेच त्यांचे काम आहे. पण त्यांच्याकडुन काम करुन घेतले जात नाही.

**मा.महापौर :-** या प्रमाणे ज्या ज्या ठिकाणी महिला कर्मचारी आहे त्यांच्याकडुन आपण बगिचे वेळोवेळी स्वच्छ करुन घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, या विषयावर मला बोलायचे आहे, कालच्या झालेल्या महासभेच्या वेळेस गेंदालाल मिल मधील लोकांचा मोर्चा आलेला होता. तेथील बोलींची ची अत्यंत दयनिय अवस्था आहे. त्या संदर्भात आपले महापालिका कर्मचारी अपुर्ण पडत आहे. असे आपले आरोग्यधिकारी

यांनी सांगितले आहे. अर्ज दिलेला आहे त्यांच्याकडे ही आपल्याकडे ही. त्याच्यामध्ये जर चांगली टिम दिली तर ती व्यवस्था चांगली होईल. अत्यंत वाईट परिस्थिती आहे. त्याचे फोटो वगैरे ही मी सगळयांना पाठविलेले आहे. नितीनभाऊंना ही टाकलेले आहे. तर त्या गेंदालाल मिल परिसरासाठी, त्या बोळीसाठी विशेष उपाययोजना करावी. अशी मी या सभागृहाला विनंती करतो.

**मा.महापौर**:- विषय क्रं. ५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अध्यक्ष श्री.हिरेश कदम, मराठा प्रिमियर लीग तसेच लेवा पाटीदार सोशल ॲन्ड स्पोटर्स फाऊंडेशन यांचे दिनांक ११/११/२०२२ रोजीचे पत्र इकडेस प्राप्त झालेले आहे. सदर पत्रात महानगरपालिकेने सागरपार्क मैदान आरक्षणा बाबत महासभेत ठरविलेले दर हे सर्वसामान्य नागरीकांच्या आवाक्याच्या बाहेरचे असल्याने सदर क्रिडांगणाचे दर पुर्ववत करण्याच्या दृष्टीकोनातून सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा अशी विनंती सर्व क्रिडाप्रेमी संघटनेच्या वतीने आम्ही करीत आहोत. आगामी येणाऱ्या महासभेमध्ये आमच्या विनंती अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन क्रिडांगणाच्या पूर्वी निश्चित केलेल्या दरामध्ये बदल करण्यात यावा जेणेकरुन सर्व साधारण कुटुंबातील युवक/ युवती व क्रिडाप्रेमी संघटनांना सदर क्रिडांगणाचा लाभ घेता येईल अशी विनंती केलेली आहे.

जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे खुल्या जागा अनामत घेऊन तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेबाबत स्थायी समिती सभा ठराव क्रं.२८१ दि.२७/०२/२००६ अन्वये भाडे व अनामत आकारुन कार्यवाही करण्यात येत होती, परंतु सदर ठरावातील दर हे अत्यंत कमी असल्याने त्यात वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे खुल्या जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेकामी नव्याने धोरण ठरविणे आवश्यक असल्याने प्रशासनातर्फे खालील प्रमाणे प्रस्ताव महासभे समोर सादर करण्यात आला होता.

- परिशिष्ट -१

| अ. क्र. | मनपा जागेचा तपशिल | कार्यक्रमाचा प्रकार | सदयाचा भाडेदर प्रति दिवस (रु.) | नविन वाढीव भाडयाचा प्रस्तावीत दर प्रति दिवस (रु.) | सदयाचे अनामत दर (रु.) | नविन वाढीव अनामत प्रस्तावीत दर (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालगंधर्व नाटयगृह | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | २००० | ५००० | ५००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | ३००० | १०००० | ५००० | १०००० |
| | | व्यावसायिक नाटक (तिकीट असलेले) | ३००० | ५००० | ५००० | ५००० |
| | | हौशी नाटय संस्थेचे नाटक (तिकीट नसलेले) | २५० | १००० | ५००० | ५००० |
| २ | सागर पार्क मैदान | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | १०००० | ५००० | ५००० |
| | | लग्न/वाढदिवस/ मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | ५०००० | ७५००० | २५००० | २५००० |
| | | नाटक / सर्कस | ५००० | १०००० | ५००० | १०००० |
| | | क्रिडा स्पर्धा | १००० | १०००० | ५००० | १०००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन / आनंद मेळा | ५००० | १५००० | ५००० | १०००० |
| ३ | महानगरपालिकेचे खुल्या जागा | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | ३००० | १००० | ५००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | १००० | १०००० | १००० | १०००० |
| | | नाटक/सर्कस/ आनंद मेळा | १००० | १०००० | १००० | १०००० |
| | | क्रिडा स्पर्धा | १००० | ७००० | १००० | ५००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन | १००० | १०००० | १००० | १०००० |
| ४ | महानगरपालिकेचे उदयान,बगीचे | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयाने, बगीचे लग्न, वाढदिवस, मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | | | | |

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महासभेने महासभा ठराव क्रं.७६३ दि.२४/०३/२०२२ अन्वये उपरोक्तबाबत सन्मा.सदस्याकडून सूचना, अटी- शर्ती व दरां संबंधी माहीती मागवून सविस्तर परिपुर्ण प्रस्ताव पुढील महासभेत सादर करावा असे निर्देशित केले होते, त्यानुसार सन्मा.सदस्याकडुन सुचवण्यात आलेल्या सूचना, अटी - शर्ती व दरां संबंधी माहीतीच्या आधारे पुढील प्रमाणे प्रस्ताव महासभेसमोर सादर करण्यात आला.

परिशिष्ट -२

| अ. क्र. | मनपा जागेचा तपशिल | कार्यक्रमाचा तपशील | | सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना नुसारचे भाडेदर प्रति दिवस (रु.) | सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना नुसारचे अनामत प्रस्तावीत दर (रु.) | सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना नुसारचे स्वच्छताबाबती चे सेवाशुल्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालगंधर्व नाटयगृह | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | | ५००० | २०००० | २००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | | बालगंधर्व नाटयगृह हे नाटक, सांस्कृतीक कार्यक्रम व धार्मिक कार्यक्रम या व्यतिरीक्त कोणत्याही कार्यक्रमाकरीता देण्यात येऊ नये. | | |
| | | व्यावसायिक नाटक (तिकीट असलेले) | | १०००० | २०००० | १००० |
| | | हौशी नाटय संस्थेचे नाटक (तिकीट नसलेले) | | २००० | ५००० | ५०० |
| २ | सागर पार्क मैदान | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | | १०००० | २०००० | ५००० |
| | | लग्न/वाढदिवस/ मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | | २००००० | १००००० | ५००० |
| | | नाटक / सर्कस | | २५००० | ५०००० | ५००० |
| | | क्रिडा स्पर्धा | क्रिकेट | २५००० | १००००० | ५००० |
| | | | कबड्डी/कुस्ती | ५००० | १०००० | २००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन / आनंद मेळा | | २५००० | ५०००० | ५००० |
| ३ | महानगरपालिके च्या मालकीच्या खुल्या जागा (सागर पार्क व्यतिरिक्त) | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | | ५००० | ५००० | २००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | | २५००० | २५००० | २००० |
| | | नाटक/सर्कस/ | | १०००० | २०००० | २००० |
| | | क्रिडा स्पर्धा | क्रिकेट | १०००० | २०००० | २००० |
| | | | कबड्डी/कुस्ती | ५००० | १०००० | २००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन | | १०००० | २०००० | २००० |
| ४ | महानगरपालिकेचे उदयाने,बगीचे | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस,मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | | | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस,मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमा करीता देता येणार नाही. | |

उपरोक्त प्रमाणेच्या प्रस्तावावर आयुक्त व मा.महापौर यांची कार्योत्तर मान्यता देखील घेण्यात आलेली आहे. परंतु उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या बदलानुसार खालील प्रमाणे तक्त्यात नमूद भाडे, अनामत व सेवाशुल्क आकारणी बाबत महासभा ठराव क्रं.८४५ दि.०७/०७/२०२२ पारीत करण्यात आलेला आहे, त्यानुसार कार्यवाही देखील सुरु आहे.

- परिशिष्ट -३

| अ. क्र. | मनपा जागेचा तपशिल | कार्यक्रमाचा तपशील | भाडेदर प्रति दिवस (रु.) | अनामत प्रस्तावीत दर (रु.) | स्वच्छताबाबती चे सेवाशुल्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बालगंधर्व नाटयगृह | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | ५,००० | २०,००० | २,००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | बालगंधर्व नाटयगृह हे नाटक, सांस्कृतीक कार्यक्रम व धार्मिक कार्यक्रम या व्यतिरीक्त कोणत्याही कार्यक्रमाकरीता देण्यात येऊ नये. | | |
| | | व्यावसायिक नाटक (तिकीट असलेले) | १०,००० | २०,००० | १,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हौशी नाटय संस्थेचे नाटक (तिकीट नसलेले) | | २,००० | ५,००० | ५०० |
| २ | सागर पार्क मैदान | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | | १०,००० | २०,००० | ५,००० |
| | | लग्न/वाढदिवस/ मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम, सभा | | २,००,००० | १,००,००० | ५,००० |
| | | नाटक / सर्कस | | २५,००० | ५०,००० | ५,००० |
| | | क्रिडा स्पर्धा | क्रिकेट | २५,००० | १,००,००० | ५,००० |
| | | | कबड्डी/कुस्ती | ५०० | १०,००० | २,००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन / आनंद मेळा | | २५,००० | ५०,००० | ५,००० |
| | | राजकिय सभा | | २१,००० | ५०,००० | ५,००० |
| ३ | महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागा (सागर पार्क व्यतिरिक्त) | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | | १,००० | ५,००० | २,००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम, सभा | | ५,००० | २५,००० | २,००० |
| | | नाटक/सर्कस / | | १०,००० | २०,००० | २,००० |
| | | क्रिडा स्पर्धा | क्रिकेट | १०,००० | २०,००० | २,००० |
| | | | कबड्डी/कुस्ती | ५०० | १०,००० | २,००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन | | १०,००० | २०,००० | २,००० |
| ४ | महानगरपालिकेचे उदयाने,बगीचे | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस,मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | | | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस,मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | |

मराठा प्रिमियर लीग, लेवा पाटीदार सोशल ॲन्ड स्पोटर्स फाऊंडेशन अशा संघटनांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने महापौर यांच्या दालनात सर्व पक्षीय गटनेते यांच्या उपस्थितीत दि.१८/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत महापौर यांनी महानगरपालिकेचे सागरपार्क मैदान “क्रिकेट” या खेळासाठी तात्पुरते आरक्षण करणेकामी ठरविण्यात आलेल्या प्रति दिवस भाडे दर व अनामत हे कमी करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

परंतु प्रशासनाने जा.क्र./कि.व./२४६६/२०२१-२२ दि.११/०३/२०२२ अन्वये परिशिष्ट-१ मधील तक्त्यात नमूद प्रमाणे महानगरपालिकेचे सागरपार्क मैदान “क्रिडा प्रकारासाठी” प्रतिदिवस भाडे रु.१०,०००/- व अनामत रु.१०,०००/- प्रस्तावीत केले होते. सदर प्रस्तावात महासभेने बदल करुन महानगरपालिकेचे सागरपार्क मैदान “क्रिकेट” या खेळासाठी प्रतिदिवस भाडे रु.२५,०००/- व अनामत रु.१,००,०००/- निश्चित करुन ठराव क्रमांक ८४५ दि.०७/०७/२०२२ पारीत करण्यात आला.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सागरपार्क मैदान येथे “क्रिकेट” या खेळासाठी महासभा ठराव क्र.८४५ दि.०७/०७/२०२२ अन्वये आकारण्यात आलेले प्रति दिवस रुपये- २५,०००/- भाडेदर ऐवजी प्रतिदिवस भाडेदर रक्कम रु.५,०००/- मात्र याप्रमाणे आकारणी करणेस तसेच ज्या महिला बचत गटांकडेस महानगरपालिकेचे रजिष्ट्रेशन असतील त्यांना प्रति दिवस रु.५०००/- भाडे दर आकारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरचे दर हे सदर ठरावाच्या दिनांकापासुन लागु करण्यात येत आहेत.

यासंदर्भात बचत गटांकडेस महानगरपालिकेचे रजिष्ट्रेशन असणे आवश्यक आहे. त्याचा व्यवसायीक वापर होणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी. यासंदर्भात सभागृहात देण्यात आलेल्या सर्व सुचनांचे पालन प्रशासनाने करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ६ :-**

**कैलास सोनवणे :-** तो तहकुब आहे.

**मा.महापौर :-** विषय वाचुन घेऊ द्या.

**नगरसचिव विषय क्रं. ६ :-** मनपा सिटी सर्वे नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) या जागेत वाहनतळावर तात्पुरत्या स्वरूपातील किरकोळ खाद्यपदार्थ विक्रीचे फिरते वाहन करीता परवानगी मिळणेबाबत अर्जदार श्री.किरण शंकर भालोदकर यांना परवानगी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब, तहकुब

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६ सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा सिटी सर्वे नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) या जागेत वाहनतळवर तात्पुरत्या स्वरूपातील किरकोळ खाद्यपदार्थ विक्रीचे फिरते वाहन करीता परवानगी मिळणेबाबत अर्जदार श्री.किरण शंकर भालोदकर यांना परवानगी देणेबाबत महानगरपालिका सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरचा विषय हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकुब**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ७ :-** गटई कामगार यांना जळगांव मनपा क्षेत्रात व्यवसाय करणे कामी जागा देणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावे. परंतु मुख्य रस्त्यांवर गटई कामगारांना, बऱ्याच ठिकाणी आपण बघतो की, मुख्य रस्त्यावर स्टॉल देण्यात येतो. आपण यापुर्वी ही वारंवार सुध्दा आम्ही सुचना देतो की, मुख्य रस्त्यांना लागुन नको, कारण काय त्याच्यामुळे ट्रॉफिकला डिस्ट्रबन्स येतो. जसे विकास दुध केंद्राचे स्टॉल किंवा हे मुख्य रस्त्यांना कदापी देण्यात येऊ नये. हे धोरण मान्य करण्यात यावा, पण मुख्य रस्त्यांवर देण्यात येवु नये. आतील रस्त्यांना परवानगी देण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ, ट्रॉफिकची NOC पण मागवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या ट्रॉफिकची NOC मध्ये आपण नियंत्रक असतो, काही लोकं काय करतात तिकडुन NOC घेऊन येतात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे. मुख्य रस्त्यावर देऊ नये पण याच्या व्यतिरीक्त पण जरी कुठे बसायचे असेल तर ट्रॉफिकची NOC मागवा हे म्हणत आहे मी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ट्रॉफिकची NOC घ्यावी परंतु मुख्य रस्त्यांना देण्यात येऊ नये. हे सुध्दा धोरण ठरविण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि विषय क्र.७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.-२३ दि.१५/०४/२००८ नुसार जळगांव शहरातील गटई चर्मकार बांधवांना उन,वारा,पाऊस याची तमा न बागळता रस्त्याच्या कडेला आपला व्यवसाय करतात त्यांना वाहतुकीस अडथळा येणार नाही अशा रितीने रस्त्याच्या कडेला व्यवसाय करीता ४X५ फुटाची जागा देणेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत शहरातील गटई कामगारांना व्यवसाय करणे कामी

मनपा तर्फे रस्त्याच्या कडेला ११ महिन्या करीता जागा देणेत आली होती. सन २०२०-२१ नंतर चटई चर्मकार व्यावसायीकांचे नुतणीकरण करण्यात आले नसल्याचे दिसुन येत आहे.

उपरोक्त नुसार गटई कामगार यांना जळगांव मनपा क्षेत्रात व्यवसाय करणे कामी जागा देणे बाबत महासभा ठराव क्र.२४६ दि.१६/०६/२००९ व ठराव क्र.४७७ दि.०९/०२/२०१० तसेच ठराव क्र.२३ दि.१५/०४/२०१८ व यापूर्वी पारीत करणेत आलेले ठराव विसंगती निर्माण करणारे व काही ठरावात कालावधीचा बोध होत नसल्यामुळे सर्व ठराव अधिक्रमित करणे योग्य होईल.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय क्रमांक गटई - २०३/प्र.क्र.२०९/मावक-२ दिनांक १३ फेब्रुवारी २००८ शासन निर्णय अन्वये गटई कामगारांना ऊन,वारा,पाऊस यापासुन संरक्षण मिळावे, तसेच त्याची आर्थिक उन्नती व्हावी याकरीता ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात १००% शासकीय अनुदानातुन गटई कामगारांना पत्राचे स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय क्रमांक-विघयो- १०९७/प्र.क्र.१७५/मावक-२ दि.३१/१२/१९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत व क वर्ग नगरपालिका क्षेत्रासह या योजनेची व्याप्ती '१ अ वर्ग' व 'ब वर्ग' नगरपालिका आणि छावणीक्षेत्र (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) व महानगरपालिका क्षेत्रात वाढवून सदर योजना सन २००७-२००८ या वर्षापासून राबविण्यास शासनाने अटी-शर्तीसह मान्यता दिली आहे.

वरील प्रमाणे शासन मान्यतेच्या अनुषंगाने मनपाने गटई कामगारांना खालील प्रमाणे अटी शर्ती पुर्ण करुन व नगररचना विभाग ठरवून देईल त्या भाडेदरा प्रमाणे जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

१) जागा मागणी बाबतचा विहीत नमुन्यातील अर्ज.
२) शहर वाहतुक विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्टॉल देणे बाबत नाहरकत पत्र.
४) जागेचा स्थळ दर्शक नकाशा.
५) ओळखीचा व रहिवास पुरावा.
६) किरकोळ वसुली विभागाचा थकबाकी नसले बाबत नाहरकत

उपरोक्त प्रमाणे जागा मागणी बाबतच्या विहीत नमुन्यातील अर्जा सोबत कागदपत्र पुर्तता करणाऱ्यांनाच जाहिर सुचना (आवाहन करुन) प्रसिध्द करुन गटई कामगारांकडून जागा मागणी अर्ज मागविता येईल किंवा जे अर्ज प्राप्त आहे अशा गटई कामगारांना नगररचना विभाग ठरवून देईल त्या भाडेदरा नुसार उपलब्ध करुन देता येईल. परंतु एका जागेकरीता एकापेक्षा अधिक मागणी अर्ज प्राप्त झाले असल्यास अर्जदारांकडून बंद पाकिटात नगरचना विभागाने ठरवून दिलेल्या भाडेदरा पेक्षा जादा भाडे मागवुन जो अर्जदार ज्यादा भाडे रक्कम देईल त्यास प्राधान्य देता येईल. तसेच अर्जदारांकडून खालील अटी-शर्तीचा ११ महिने कालावधीचा करारनामा करुन जागा देता येईल.

१) ज.श.म.न.पा. ठरवून देईल त्या जागेवर स्टॉल उभारणी करता येईल.
२) ज.श.म.न.पा. हे गटई कामगारांना व्यवसायासाठी स्टॉल लावणे करीता जागेचा परवाना वितरीत करतील सदर परवान्यातील सर्व अटी व शर्ती गटई कामगारांवर बंधनकारक राहील.
३) गटई कामगारांना ४ फुट x ५ फुट मोजमापाची जागा देण्यात येईल त्याप्रमाणे स्टॉलची बांधणी करता येईल त्यापेक्षा आकारमान जास्त आढळून आल्यास स्टॉलचा परवाना रद्द करण्यात येईल.
४) स्टॉलवर ठळकपणे दिसेल अशा अक्षरात जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे सौजन्याने, परवाना क्रमांक बाबतचा मजकुर लिहीणे बंधन कारक राहील.
५) सदर स्टॉल अन्य त्रयस्थ व्यक्तीला पोट भाडयाने देणार नाही.
६) गटई कामगारांना उपलब्ध करुन दिलेल्या जागेवरच स्टॉल लावता येईल अन्य ठिकाणी स्टॉल लावल्याचे निदर्शनास आल्यास देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

७) सदर जागेची मनपास आवश्यकता भासल्यास गटई कामगार हे २४ तासांच्या आत स्वतःहुन स्टॉल काढुन घेतील अथवा महापालिकेमार्फत स्टॉल हटविल्यास त्याचा खर्च गटई कामगारास देणे बंधन कारक राहील.

८) म.न.पा.ने जागे करीता ठरवून दिलेले जागा भाडे रक्कम अगोदर पुर्ण भरणे आवश्यक राहील.

९) उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर स्टॉलमुळे परीसरातील नागरिकांना उपद्रव झाल्यास किंवा स्टॉल उभारलेल्या परिसरातील नागरिकांच्या तक्रारी आल्यास व महापालिकेस तशी खात्री झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

१०) मनपा ने वेळोवेळी जाहिर केलेल्या सुचनांचे पालन करणे, स्टॉलच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे गटई स्टॉल धारकास बंधनकारक राहील.

११) गटई कामगार व्यवसाय, स्टॉल करीता आवश्यक असलेले इतर परवाने समक्ष अधिकाऱ्याकडून घेऊन व्यवसाय सुरु करण्याची जबाबदारी गटई कामगाराची राहील.

१२) करारनामा गटई व्यवसायाकरीता दिलेलया जागा भाडे, परवानगी संदर्भात असुन कराराची मुदत ११ महिने राहील, कराराची मुदत संपण्याअगोदर करारास मुदतवाढीसाठी गटई स्टॉलधारक हे एक महिना अगोदर अर्ज करतील मुदतवाढ देण्याबाबत अंतिम अधिकार आयुक्त यांना राहतील.

१३) महानगरपालिकेने दिलेली परवानगी कुठलीही पुर्व सुचना न देता महापालिकेकडून एकतर्फी रद्द करण्यात येईल त्या मागण्यासाठी गटई कामगार स्टॉल धारक यांना न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१४) गटई कामगार स्टॉल मुळे सार्वजनीक रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही अशा प्रकारे ठेवावा.

१५) गटई कामगारांनी स्टॉलवर फक्त गटई काम करावे व गटई कामाव्यतीरिक्त कोणत्याही प्रकारचे इतर वस्तु विक्रीसाठी ठेवू नये.

१६) भविष्यात सदरच्या स्टॉल मुळे रहदारीस अडथळा निर्माण झाल्यास सदरचे स्टॉल तात्काळ हटविण्यात येईल.

१७) ज्या व्यक्तीस स्टॉल करीता जागेचा परवाना दिलेला आहे त्या ठिकाणी त्याच व्यक्तीने व्यवसाय करावा.

१८) वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सदर परवानगी रद्द करण्यात येईल.

१९) महानगरपालिकेची जागा वापराबाबत योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी,शर्ती व निर्बंध लादण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

२०) कराराची मुदत संपल्यानंतर जागा स्वतःहुन महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील तसेच मुदत वाढ न दिल्यास त्याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा न्यायालयात दाखल करता येणार नाही किंवा सदर जागेवर हक्क सांगता येणार नाही.

वरील शासन निर्णयातील व जळगांव शहर महानगरपालिकेने वरील प्रमाणे नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार गटई स्टॉल लावणे करीता जागेची मागणी करीता व नूतनीकरण करीता आलेल्या व येणाऱ्या अर्जदार यांना स्टॉल लावणे करीता या सुधारीत धोरणा नुसार महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार गटई कामगार यांना व्यवसाय करणे कामी भाडेतत्वावर जागा देणेस तसेच यापूर्वी यासंदर्भात झालेले सर्व ठराव अधिक्रमित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मुख्य रस्त्या लगतच्या स्टॉलला व्यवसायासाठी परवानगी देऊ नये. त्यापुर्वी शहर वाहतुक विभागाची रितसर परवानगी घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ८ :-** महासभा ठराव क्रं.४३९ दि.२६/०२/२०२१ अन्वये तहकूब केलेला अशासकीय प्रस्ताव, प्रभाग क्र.०८ मध्ये प्रेम नगर मधील श्री सप्तश्रृंगी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे लोक वर्गणीतुन प्रेमनगर प्रवेश स्वागत कमान उभारणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** स्वागत कमान उभारणे, मागच्या महासभेमध्ये हा मुद्दा खुप चालला होता. तर आपल्या सगळया सभागृहाला विनंती आहे की, हा एक धार्मिक विषय आहे आणि प्रशासनाने म्हटले आहे की, ट्रॉफिकचा ताण होईल किंवा अतिक्रमण वाढु शकतो. परंतु या सगळया गोष्टींची खात्री करुन अतिक्रमण होणार नाही किंवा ट्रॉफिकची अडचण होणार नाही याची खात्री करुन कमान उभारण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

**मा.महापौर :-** आपण खात्री केलेली आहे का ?

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** हो काही खर्च होत नाही. त्याच्यात लोकवर्गणीतुन होणार आहे ते.

**मा.महापौर :-** विषय क्र.८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालया कडील पत्र जा.क्र./अआका/१४९२/ २०२२-२३ दि.२३/०९/२०२२ अन्वये महासभा ठराव क्र.४३९ दि.२६/०२/२०२१ अन्वये "प्रभाग क्र.०८ मध्ये प्रेम नगर मधील श्री सप्तश्रृंगी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे लोक वर्गीणीतुन प्रेम नगर प्रवेश स्वागत कमान उभारणेस परवानगी मिळणे बाबत सन्मा.सदस्य श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील तसेच अध्यक्ष श्री सप्तश्रृंगी चॅरीटेबल ट्रस्ट व परिसरातील नागरिकांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे " हा प्रस्ताव महासभेने तहकुब ठेवलेला आहे.

संबंधीत संस्थेने स्वखर्चाने कमान उभारणे व त्याची संपूर्ण देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी तसेच यामुळे भविष्यात काही अपघात झाल्यास त्याची जबाबदारीही संबंधीत संस्थेची राहील तसेच प्रवेश स्वागत कमानीमुळे वाहतुकीस व वळण घेण्यास अडथळा होणार नाही या व इतर मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून प्रभाग क्र.०८ मध्ये प्रेम नगर मधील श्री सप्तश्रृंगी चॅरिटेबल ट्रस्ट यांना लोक वर्गणीतुन प्रेम नगर प्रवेश स्वागत कमान उभारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- चंद्रशेखर शिवाजीराव पाटील**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ९ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील अकरा विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्यास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.१८८(११)/न.वि.-१६ दि.१० ऑगस्ट २०२२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजना अंतर्गत रक्कम रु.५.०० कोटी (लेखा शिर्ष - ४२१७०५४१) अन्वये खालील विवरण पत्रानुसार कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
| --- | --- |
| १) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील कानळदा रोड ते डी.पी.पर्यंत उर्मिया सॉ मिल समोरील रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| २) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील कानळदा रोड ते खुबचंद सागर विदयालय पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ३) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील खुपचंद सागर विदयालय पासुन हनुमान सॉमिल पर्यंत काँक्रीटीकरण करणे. |
| ४) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील उर्मिया सोसायटी पासुन ते पटेलवाडी समोरील धनाजी काळे नगर डी.पी.रोड पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ५) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील पटेलवाडी मागील पासुन ते निळे यांच्या घरापर्यंत रोड पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ६) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगर कानळदा रोड ते निळे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| ७) | प्रभाग क्रं.०९ नॅशनल हायवे ५३ प्लॉट नं.२६ ते कार्तिक स्वामी मंदिरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ८) | प्रभाग क्रं.०९ साईबाबा मंदिर परिसर एस एन चौधरी ते विजय वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ९) | प्रभाग क्रं.११ रुक्मिणी नगर गट नं.१४० अ सुधाकर महाजन यांच्या घरापासुन ते योगेश किराणा पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १०) | प्रभाग क्रं.१६ सिंधी कॉलनी अंध शाळेपासुन ते लक्ष्मीनगर चौक रस्ता डांबरीकरण करणे. |
| ११) | प्रभाग क्रं.१६ जोशी कॉलनी चौक ते सक्सेस क्लासेस पर्यंत डांबरी रस्ता करणे. |

सदरहु रस्ते मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.१८८(११)/न.वि.-१६ दि.१० ऑगस्ट २०२२ अन्वये कार्यान्वयन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असल्याने प्रस्तुत विकास कामांचे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्यात येत असुन सदर कामे करण्याकरीता कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे पत्र क्रं.साबांविज/५९७०/२०२२ दि.१८/१०/२०२२ अन्वये सदर कामांना ना-हरकत दाखला मिळण्याची मागणी केलेली आहे.

त्यानुसार वर नमुद कामाची जागा ही मनपा कब्जेवहीवाटीतील असुन अतिक्रमण विरहीत आहे. त्यानुसार पत्र क्रं.जशमनपा/साबा/११८४/ २०२२-२३ दि.०३/११/२०२२ अन्वये उक्त कामे करण्याकरीता ना-हरकत दाखला देण्यात आलेला असल्याने महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत उक्त नमूद केलेली शहरातील विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव यांचे मार्फत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. १० :-** प्रभाग क्र.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील आशाबाबा मंदिर ते अथर्व मेडीकल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी येणारा अंदाजीत खर्च रक्कम रु.४८,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट, याच्यामध्ये हा कोणत्या निधीतुन मंजुर करायचा आहे. हा प्रस्ताव कोणत्या निधी मधुन मंजुर करायचा, डॉकेट मध्ये काहीच नाही.
**श्री.नितीन लढ्ढा :-** मुलभुत सोई सुविधा कडुन आलेला आहे तो.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही तो चंदुभाईचा आहे. हा पुढचा विषय आहे. विषय क्र.१० मध्ये.
**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्ही विषय क्र.१०-११ म्हणत आहे का ?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा विषय क्र.१०-११ मध्ये त्याच्यात काहीही म्हटलेले नाही.

**मा.उपमहापौर :-** महानगरपालिका फंडातुन.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणता वार्ड आहे तो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रभाग क्र.७

**श्री.कैलास सोनवणे :-** एका वार्डात ५०-५० लाख मनपा फंड, बाकीच्यांना भेटणार आहे का ? एका वार्डात ५० लाख मनपा फंड प्रशासन करतो कस काय ? ५० लाख केले कसे काय प्रशासनाने.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाने डॉकेट पाठविलेले आहे. कसे काय पाठविलेले आहे. मनपा फंडाचे बाकीच्यांचे प्रस्ताव येतच नाही.

**मा.उपमहापौर :-** आप्पा साहेब, याच्यामध्ये असे आहे, आपल्याच शहराचे,

**श्री.कैलास सोनवणे :-** मला सगळ माहित आहे कसे आहे ते.

**मा.उपमहापौर :-** ऐका ना ऐका,

**श्री.कैलास सोनवणे :-** बाकीचे हे बसलेले आहे सगळे येथे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा साहेब कसे आहे, जळगांव शहरात विकास कामांची परिस्थिती संपुर्ण जळगांव शहरामध्ये.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे काही लाडाचे आहे का कोणी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझा प्रश्न हा नाही. डॉकेट प्रशासनाच आहे. प्रशासनाने कोणत्याही निधीचा उल्लेख न करता डॉकेट सभागृहापुढे कसे पाठविले.

**श्री.कैलास सोनवणे :-** दिशाभुल करत आहे. तुम्ही लिहा ना मनपा निधी असे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** लिहा ना, प्रशासनाने का लिहीलेले नाही या गोष्टी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे, आता उल्लेख  करुन देऊ की, हे काम मनपा निधीतुन करण्यात येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बाकीच्या नगरसेवकांचे प्रस्ताव प्रशासन का पाठवत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे विषयच येत नाही. तुम्ही तेथे लिहत का नाही की, मनपा निधीतुन आहे असे. गुपचुप चोरुन लपुन कशाला. ओपन सांगा ना, नामंजुरी थोडी होणार आहे काही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाने बाकीचे डॉकेट का पाठविले नाही आता पर्यंत. सुनिलभाऊंना का यादी द्यावी लागते. सदस्यांना का यादी द्यावी लागते.

**श्री.मयुर कापसे :-** दोन दोन तीन तीनदा फाईल गहाळ होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तेव्हा प्रशासन म्हणतो,  लेखापरिक्षण, मनपात निधी नाही किंवा हे नाही, ते नाही. डॉकेटमध्ये प्रशासनाचा उल्लेखच नाही काही.

**मा.महापौर :-** याचे उत्तर स्वत: आयुक्तच देऊ शकता. कारण याच्यात असे म्हटले आहे की, आयुक्त यांनी स्वत: त्यांच्या स्तरावर पाहणी केली आणि त्यानुसार हा प्रस्ताव दिलेला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कोणत्या निधीतुन आहे. प्रशासनाने ते तर म्हणावे ना. तेच सांगतो आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण मनपा निधीतुन करु.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे पण सांगायला  तर पाहिजे ना नितीनभाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे आप्पा,

**श्री.कैलास सोनवणे :-** कसे आहे आता, कोट्यावधी रुपये येत आहे. कोणी २ कोटी आणतो आहे, कोणी ४ कोटी आणतो आहे. त्यामुळे समजत नाही की, कोणते ना कोणते कोटी मध्ये असतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सगळयांनी आपआपली लायबीलिटी सेट करुन ठेवलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** वेगवेगळी सेटींग आहे सगळयांची.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, महापौर महोदया, भाऊ रस्त्यांशी संबंधीत विषय आहे. मी वारंवार ३ ते ४ महासभेमध्ये आपला डि-मार्ट पासुन ते मेहरुण स्मशानभुमी, ऐका ना.

**मा.महापौर :-** हा मंजुर करुन घेऊ द्या. विषय क्र.१० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मंजुर करा. आदित्य चौकापर्यंतचा रस्ता. भाऊंनी मला शब्द दिला होता मागच्या महासभेत.

**श्री.सुनिल महाजन :-** विभागीय आयुक्तांकडे अडकले आहे ते.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ऐका ना, ऐका ना, विभागीय आयुक्ताकडे आहे, ते शासनाच्या निधीत करत आहे का तुम्ही.शासनाच्या निधीत आहे का ते मला सांगा. कश्यात करणार आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** नाही आपल्या मनपा निधीतुन.

**श्री.राजेंद्र पाटील :-** म्हणजे मनपा फंडात करणार आहे. मनपा फंडामध्ये करणार आहे ना.

**श्री.सुनिल महाजन :-** ७५-२५

**श्री.राजेंद्र पाटील :-** मग ऐका ना सगळे बरोबर आहे तुमचे म्हणणे. म्हणजे तो मनपा फंडातुन होणार आहे. त्या रस्त्याला कशाला देता आहे मनपा फंडात जोडुन, ते मनपा फंडातुनच करायचा होता तर निधी सोबत जोडायची गरज नव्हती. कामाची सुरुवात होऊन गेली असती आता पर्यंत डायरेक्ट केले असते तर. जसा तुम्ही हे ५० लाखाचा रस्ता करत आहे मनपा फंडातुन करत आहे. हा निधी सोबत जोडला आहे का तुम्ही कुठे ?

**श्री.सुनिल महाजन :-** नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** स्वतंत्र करत आहे ना. त्या पध्दतीने हा स्वतंत्र होऊ शकला असता ना. आता तो जर मंजुर होईल त्याला किती वेळ जाईल. त्याला किती वेळ जाईल. त्याप्रमाणे हा रस्ता पण स्वातंत्र झाला असता ना. आता तो जर मंजुर होईल त्याला किती वेळ जाईल. तो पर्यंत अर्ध काम लटकलेल राहील.

**श्री.सुनिल महाजन :-** मागणी आहे तर त्या मागणी प्रमाणे त्याला करुन घेतो आहे आपण.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मागणी होती ना परंतु स्वतंत्र करु शकत होते ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यावेळेस काय होत होते. ऐका ना, शासनाकडुन निधी यायचा आणि आपण जास्त कामे व्हावे म्हणुन आपण त्यासोबत मनपा फंड जोडत होते. मनपा फंडातुन तेव्हा कामच होत नव्हते. हे आपण आयडीया काढल्या होत्या. म्हणुन आणि हे यांनी कोणती आयडीया काढुन केलेला आहे तो ५० लाखाचा रस्ता काय माहिती आणि एक तर मंजुर कसा झाला.

**श्री.सचिन पाटील :-** मनपा निधीतुन आहे ते.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना, हे ऐकत पण नाही हे सर. मी तेच म्हणतो आहे. त्यांनी कोणती आयडीया वापरली ते आपल्याला नाही माहिती.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे ऐकत नाही ना, यांनी कोणती आयडीया काढली माहित नाही. ते मंजुर कसा झाला. हो ना मी ते म्हणत आहे. हे ऐकत पण ना.मी तेच म्हणत आहे. ते होत ना होता, यांनी कोणती आयडीया काढली त्यांनाच माहिती.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आप्पा, आप्पा, ठिक आहे ना, २५% मध्ये रस्ते द्यावे लागतात. परंतु जे एकदम निकडीचे आहे. ते ही दिले पाहिजे का.

श्री.सुनिल महाजन :- आपला दिला ना मग.

**श्री.राजेंद्र पाटील :-** निकडीचे जे रस्ते आहे. ज्यांचे तातडीने काम व्हायला पाहिजे. ३ वर्षापासुन तो रस्ता खराब आहे.

**मा.महापौर :-** ८ महिन्यापासुन तो आपण मुलभुत सोईसुविधा मध्ये टाकलेला आहे. पण विभागीय आयुक्तांकडुन त्रुटी आल्यामुळे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई, तो शासकीय निधीमध्ये नाही. शासकीय निधीत राहिला असता तर मी समजु शकलो असतो. मनपा फंडातच जर तो करायचा होता. तर स्वतंत्र करु शकत होते. आता हा स्वतंत्र केला ना. या कामाला वेळ लागणार आहे का ? त्यात किती वेळ लागेल.

**श्री.सुनिल महाजन :-** ७५-२५ मध्ये आहे ते.

**श्री.राजेंद्र पाटील :-** वेळ जाईल. मुदत निघुन जाईल तो, येतो तो येतो. गेला तो रस्ता.

**श्री.सुनिल महाजन :-** तुम्ही निवडणुक लढविण्यापुर्वी तो रस्ता चकाचक राहील. तुम्ही जोरात गाडी घेऊन जा त्याच्यावरुन.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ या रस्त्यासाठी ऐका, मी तुम्हाला सांगतो, प्रभाग क्र.१४ मध्ये एकही महत्वाचा रस्ता, जो मेन रोड आहे मला दाखवुन द्या तुम्ही की, हा केलेला आहे म्हणुन. गणपती नगर असेल, आदर्श नगर असेल, रामेश्वर कॉलनी असेल, गायत्री नगर असेल, एक मेन रस्ता घेतला आहे का मला सांगा आजपर्यंत.

**श्री.सुनिल महाजन :-** आपण डांबरी रस्ते घेतले होते पण ते, ऐका तर खरी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** केला का ? ते मला सांगा एक ही रस्ता केला का आणि जो घेतला होता तो तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी आपल्याला २५ कोटी दिले होते. त्याच्यातले ५ कोटी शिल्लक होते. त्या ५ कोटीतुन ४ वेळेस हा रस्ता मी मंजुरीसाठी प्रस्ताव दिला. त्या वेळेस आपल्याकडे ३ कोटी शिल्लक होते. त्या ३ कोटीत आपण फक्त ४८ लाखाची तरतुद केली. रस्ता कुठुन कुठपर्यंत होता.

**श्री.सुनिल महाजन :-** राजुभाऊ सत्ता तुमची होती, तुम्ही सभापती होते.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना, दिले मी आहे परंतु ऐका ना. तो पर्यंत काही झालेले नव्हते. दिले मी आहे पण तो मंजुर होईपर्यंत आमची सत्ता निघुन गेली ना. ऐका ना मग ऐका.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना, तरतुद आहे की नाही, डी-मार्ट पासुन ते आदित्य चौकापर्यंत तरतुद करायला पाहिजे की, नको.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ भाऊ मी सांगतो.

**श्री.सुनिल महाजन :-** जी परिस्थिती राजुभाऊ तुमची झाली तीच आमची आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाली आहे, झाली आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तुमच्या प्रभागात ८०% काम झालेले आहे अशी पेपराला बातमी आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** कोण म्हणतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ८०% आमच्या प्रभागात ४% पण नाही अशी सुध्दा बातमी आली आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** पेपरवाले काहीही छापतील, त्यावर आश्वासन ठेवायचे नाही.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना गांधळामुळे नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.सुनिल महाजन :-** चुकीची बातमी आहे पेपराची.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आमची बाजु तुम्ही मांडा जरा.

**मा.उपमहापौर :-** राजुभाऊंचे म्हणणे आहे की, त्यांचे वार्डात कामे होत आहे तर त्यांच्याही बातम्या छापा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** हे करण्यासाठी बोलतो आहे मी, छापन्यासाठी नाही. छापण्यासाठी बोललो असतो ना, तर सभा सुरु झाल्या बरोबर बोललो असतो.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही मांडलेला जो रस्ता आहे ना. तुम्ही म्हणत आहे ना की, मनपा फंडात टाकला, जे तुम्ही बोलत आहे ना ते १००% बरोबर आहे. पण त्यावेळेस मुलभुत सुखसुविधांचे पैसे आपल्याकडे उपलब्ध झालेले होते. आपल्याला त्यावेळेला वाटले की, तो रस्ता मनपा फंडातुन करुन तो रस्ता लवकर सुरु करु पण तो रस्ता मुलभुत सोई सुविधेत जोडला होता. त्याची सर्व प्रोसेस होऊन गेलेली आहे. त्याची तांत्रिक मान्यता झालेली आहे प्रशासकीय..ऐका ना ऐका ना, ऐकुन तर घ्या ५ मिनीट,

**श्री.राजेंद्र पाटील :-** तुम्ही जे सांगता आहे ना. ते मला सगळे माहित आहे. मी शहर अभियंतांकडुन पुर्ण माहिती घेतली. ते कुठे जोडला आहे. कधी मंजुर केला, सगळी माहिती घेतली, सभेच्या आठ दिवसापुर्वी माहिती मागितली होती. तर सभेच्या एक दिवस आधी मला माहिती देण्यात आली. जर ते ३ कोटी शिल्लक होते तर ४८ लाखच का टाकले गेले. मला हे म्हणायचे आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** राजुभाऊ, तुमची परिस्थिती कशी झाली. पंगत बसली आणि बुंदी संपली. आता बासुंदी पण संपली.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता बासुंदी ही संपली.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ बुंदी तुम्ही खा, बुंदी तुम्ही खा पण आम्हाला चटणी भाकर तर खाऊ घाला. याचा तुम्ही मला काही तरी शब्द द्या काय होईल तर की करायचे नाही असे ठरविलेले आहे. करायचे नाही असे ठरविले असेल तर मी एक ही शब्द बोलणार नाही. मी विसरुन जाईल. अजुन सांगतो मी तुम्हाला त्याच्या पुढचा विषय, अजिंक्य चौक, चावडीया बंगला ते स्वामी समर्थ चौक, जेव्हा तुम्ही ५० लाखाची कामे मागवली. त्याच्यामध्ये तुम्ही जो प्रस्ताव दिला. परत त्याच्यामध्ये काय खोड केली. मी त्या अधिकाऱ्यांकडुन माहिती घेतली, त्या शहर अभियंत्यांकडुन. २७१,२७०, २६७ या रस्त्यांमधुन तेवढा रस्त्याचा एक तुकडा बनवुन टाकला, आदित्य चौकापासुन स्वामी समर्थ चौकापर्यंत, ऐका भाऊ माझे होऊ द्या. आम्ही रोज रोज बोलत नाही. आणि जर बोलले नाही तर आपले पत्रकार बांधव छापतात.

**श्री.सुनिल महाजन :-** राजु भाऊ बोला लोकांच्या हितासाठी बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तर तो जो रस्ता आहे. म्हणजे प्रत्येक कामामध्ये खोड आणि तो जो मेन रस्ता आहे. वाहतुकीचा रोड आहे. आणि मी असे विचार करत नाही. प्रभाग क्र.१४ अ,ब,क,ड, तो गणपती नगर असेल, आदर्शनगर असेल, तेथील व्यापारी, उद्योजक सर्व एम.आय.डी.सी.ला जातात. त्यांच्या फॅक्टऱ्या आहेत.नंतर कृषी उत्पन्न बाजार समितीला जातात. हायवे वरतुन वाहतुकीला अपघातीचा धोका असतो. म्हणुन ते सर्व बांधव याच रस्त्याने जातात. आणि प्रत्येकाची सुखसुविधा सोई होईल. म्हणुन मी तो रस्ता केला, ते तर अपुर्ण राहिलाच पण त्याच्या पुढचा ही रस्ता अर्धा बनवुन टाकला, आणि मी अधिकाऱ्यांना विचारले की हे कोणत्या निधीतुन केला, तर हे २७०,२६९ हा निधी होता. त्यातला एकही रस्ता बनविला नाही आणि हाच एक तुकडा बनवुन टाकलेला आहे.

**मा.महापौर :-** भाऊ त्यामुळे ५८ कोटीच्या निधीची यादी आपल्याकडेच दिलेली होती. आपल्याला जे रस्ते टाकायचे होते. ते तुम्ही निधीतुन टाकुन घेतले, त्या १५ नंबर कट करुन टाकलेला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई, ऐका, ऐका.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई, दोनच मिनीट बोलु द्या.

**मा.महापौर :-** बोलु द्या त्यांना.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता तुम्ही विषय काढला तर मला बोलु द्या. सुनिल भाऊ तुम्ही काय शब्द दिला होता, ४२ कोटीत आमचे सर्व कामे झालेले आहेत.

(सभागृहाची लाईट गेली आणि एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलायला लागले आणि गांधळ निर्माण झ ाला.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** आमचा आवाज दाबु नका, आमचा आवाज दाबु नका. बिना माईकने सुध्दा मी सर्व सभागृहाला ऐकवु शकतो.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सुनिलभाऊ ऐवढी दहशत की, तुमच्या समोर बोलतांना लाईट गेली.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ४२ कोटीतुन सर्व शिवसेनेचे नगरसेवकांचे कामे घेतले. तेव्हा ५८ कोटी मध्ये सर्व भा.ज.पा.चे नगरसेवकांचे कामे राहतील असे तुम्ही बोलले. आता तुम्ही यादी बघा, यादी मध्ये आम्ही सेनेचे नगरसेवकांचे सुध्दा कामे घेतलेले आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आम्ही पण घेतले होते राजुभाऊ.

**मा.महापौर :-** धन्यवाद भाऊ, धन्यवाद.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तर कमीत कमी माझी सभागृहाला विनंती आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** तो रस्ता होईल भाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** होईल हे मला माहिती आहे. पण कधी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ त्याच इस्टीमेट तयार केलेल आहे.

**मा.महापौर :-** राजुभाऊ आपल्याला सगळयांना मिळुन त्याचा पाठपुरावा करावा लागेल.

(सभागृहाची गेलेली लाईट परत आली.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** आणि हे पण सांगतो त्या रस्त्याला नाव दिले होते मी, डी-मार्ट, स्मशानभुमी, आदित्य चौक,आता त्याचे ही नाव बदलुन टाकले,त्याला महाजन नगर ते दत्त किराणा असे करुन टाकले म्हणजे राजेंद्र पाटीलांने केलेले गेले. ऐका ना, मला अडचण नाही. तुम्ही महाजन नगर नाव दिलेले आहे. आता ते नाव दिलेले आहे तर त्या नगराचे थोडे विचार करा. तुमच्या नावाने आहे ते नगर. तर तो रस्ता तयार करा.

**श्री.सुनिल महाजन :-** गिरीष महाजन आहे म्हणुन त्यांच्या नावामुळे महाजन आहे ते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अहो जळगांव तुमचच आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तर त्या नावानुसार, त्या नावाला न्याय देण्याचा प्रयत्न करा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आजच्या मिटींगला अमृतचे कामे पुढे जे सुरु आहे. डांबरीकरणाचे रस्त्यांचे, ते अपुर्ण पडलेले आहे. मी सांगितले होते की, जर तो निधी परत गेला तर त्याची जबाबदारी कोणाची. तर आज आमचा निधी परत गेलेला आहे. रस्ते अपुर्ण पडलेले आहे. तर याची जबाबदारी, आमचा जो निधी गेला, आम्हाला पालकमंत्र्यांनी त्यावेळेला आपलेच होते, आजही आहेत. त्यांनी निधी दिलेला होता. परंतु आता ते निधी परत गेलेला आहे. आता कोणत्या निधी मध्ये आमचे कामे होणार की नाही होणार. हे आम्हाला प्रशासनाकडुन जबाब पाहिजे.

**मा.महापौर :-** नाही. त्याची वर्कऑर्डर झालेली आहे. कॉन्ट्रॅक्टरांना भिती अशी आहे की, आपल बिल निघेल की नाही. परंतु आपल्याला कलेक्टर ऑफिसकडुन अस्वस्त केलेले आहे की, पुर्ण काम झाले की, बिल सबमिट करा. तुमचे सगळे बिले निघतील. आयुक्त साहेब त्यांची स्पेशल मिटींग घेणार आहे. ते आल्यानंतर सोमवारी त्याची मिटींग लावणार आहे. सगळया कॉन्ट्रॅक्टरांशी ते बोलणार आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जुन मध्ये ते कामे सांगण्यात आलेली होती.

**मा.महापौर :-** हो ना. मी तुम्हाला तेच सांगते आहे. कारण त्याची काळजी सगळयांना आहे. लवकरात लवकर काम होणे गरजेचे आहे. हो ना सुरु होतील. आयुक्तांचे सद्या इतके डिसप्युट सुरु आहे. आयुक्त साहेबांना येऊ द्या ते नागपुरला आहे अधिवेशनाला.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मक्तेदाराचे फक्त माझ्या वार्डातील विषय नाही.

**मा.महापौर :-** नाही सगळया जळगांव शहराची परिस्थिती तशीच आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** लवकरात लवकर मिटींग घ्या आणि रस्ते करायला सांगा. आयुक्तींनी गॅरंटी द्यावी की, जर शासनाने नाही केले, जर शासनाचा निधी गेला तर मला मनपा फंडातुन त्यांचे पैशे द्या.

**मा.महापौर :-** आता आयुक्त साहेब, २०० कोटीची मागणी करणार आहे, लक्षवेधी आहे. आता २०० कोटीची मागणी आयुक्त साहेब स्पेशल त्याच्या वतीने करणार आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** समन्वयाने ते सगळं होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** चला पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर :-** या सर्व गोष्टींची प्रशासनाने नोंद करुन घ्यावी. विषय क्र.१० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्र.११.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील आशाबाबा मंदिर ते अथर्व मेडीकल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर स्थळी अस्तीत्वातील कच्चे स्वरुपातील रस्ता असुन नवीन रस्ता करणे आवश्यक आहे. अस्तीत्वातील कच्चा रस्त्याचे अमृत योजनेमुळे झालेल्या खोदकामामुळे नुकसान झालेले असुन नवीन रस्ता तयार करणे बाबत सन्मा.नगरसेवक श्री.सचिन भिमराव पाटील यांचे पत्र असून आयुक्त यांचे कडील आदेश जावक क्र.जमनपा/आ.का./१३७७ दिनांक १२/०९/२०२२ अनुसार प्रस्तुत कामी ब्लॉक इस्टीमेट तयार करण्यात आलेले असुन रक्कम रुपये ४८,५०,०००/- मात्र अदमासे खर्च अपेक्षीत असल्याने प्रभाग क्र.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील आशाबाबा मंदिर ते अथर्व मेडीकल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी येणारा अंदाजीत खर्च रक्कम रु.४८,५०,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम मनपा फंडातुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ११ :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमधील रस्ता दुभाजक तसेच चौक सुशोभिकरण व देखभाल दुरुस्ती करणे कामी उदयोजक, व्यापारी व खाजगी संस्था इ. मार्फत प्रस्ताव मागविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** यामध्ये मला थोडी सुचना करायची आहे की, हा प्रस्ताव प्रशासनाने चांगला दिलेला आहे. परंतु आपल्या आर्कीटेक्ट कडुन एक जळगांव शहराचा या डिव्हायडर्सचे पुर्ण एकच डिझाईन करण्यात याव. जेणे करुन शहर विचित्र, विद्रुप किंवा असे काही दिसणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण ते दिलेले आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** होना सगळे काही, झाडांचा प्रकार असेल, किंवा झाडांचा पॅटर्न असेल, पुर्ण सुसुत्रतेत आपल्या आर्किटेक्ट कडुन पुर्ण एक प्लॅन करुन घ्यावा.आणि मनपाने त्याच्यावर अंमलबजावणी करण्यात यावी.

**श्री.अंनत जोशी :-** महापौर महोदया, एक विषय आहे. आपल्याकडे शहरात चौकामध्ये सिग्नल असतात. त्याची जी यंत्रणा असते, ते आपणच बसवितो आणि आपणच मेनटेन करतो, ट्रॉफिकवाले फक्त कंट्रोल करतात. आपली सिग्नल यंत्रणा बऱ्याच ठिकाणांची नादुरुस्त आहे. वाईट अवस्थेत आहे किंवा बंद पडलेली आहे. आपण सुप्रीम कडुन दोन टॉयलेटचे काम सुरु केलेले आहे. एक सागरपार्कचा आणि एक एम.जे.कॉलेज जवळ सुरु आहे. नितीनभाऊ लढ्ढा यांचे पुढाकाराने ते काम चालु आहे. सुप्रीमचे जे प्रमुख आहे. त्यांच्याशी माझी या विषयावर चर्चा झाली. आपली जर तयारी असेल तर मी त्यांना कन्वीन्स करु शकतो किंवा रिक्वेस्ट करु शकतो. सिग्नल यंत्रणा अद्यावत करुन किंवा ज्या चौकांमध्ये आज सुरु आहे सिग्नल यंत्रणा आणि त्या ठिकाणी गरज आहे. सुप्रीम कंपनी स्वत:च्या खर्चाचे नविन सिग्नल उभारुन देतील आपल्याला. आणि अत्याधुनिक पध्दतीने करुन देतील. जर या विषयात आपण जायचे ठरविले तर या विषयाबाबत मला एक पत्र सुप्रीमला द्यावा लागेल. आणि त्याचा पाठपुरावा मी करेल.

(सभागृहातील लाईट बंद होऊन परत सुरु झाली.)

**श्री.अंनत जोशी :-** कारण याच्यामध्ये काही बंद अवस्थेत आहे काही ना दुरुस्त आहे. सगळे जुने झालेले आहे. आता नविन पध्दतीने ते करता येईल. याची तयारी जर तुम्हाला वाटली.माझी विनंती अशी राहील की, आपण जर म्हणाल की, आपण यांच्या पुढे गेलो पाहिजे. तर त्यांच्याशी बोलता येईल आपल्याला.

**मा.महापौर :-** सिग्नलचे मला वाटते, त्याचे बिल भरण्यावरुन थोडेशे अडचणी मागच्या वेळेस महापालिकेला निर्माण झाल्या होत्या.

**श्री.अंनत जोशी :-** नाही, हे सिग्नल वर्षानुवर्ष सुरु आहे. मोठे चौकांमध्ये तर आहेच काही ठिकाणी आणि आपल्याला.

**मा.महापौर :-** ते योग्य आहे पण आपण करु शकतो का ? पाटील साहेब. त्यांनी जर आपल्याला एकदा करुन दिले तर त्यानंतर सगळे मेनटेनन्स व्यवस्था आपल्याला बघावी लागेल.

**श्री.अंनत जोशी :-** आता व्यवस्था पण आपणच करतो, मेनटेन पण आपणच करतो, ते केले तर होईल कारण त्यांची मानसिकता तशी दिसली त्यांच्याशी बोलण्यावरुन याच्यात ट्रॉफिकचा काही रुल आहे का ?

**श्री.एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** नाही.

**श्री.अंनत जोशी :-** नाही.

**मा.महापौर :-** ते जर सकारात्मक तयार दर्शवत असतील तर अडचण नाही मला वाटते.

**श्री.अंनत जोशी :-** आणि जे आज आहे. सुरु आहे. त्या व्यतिरिक्त ज्या चौकांमध्ये गरज असेल, तर त्यासाठी ट्रॉफिक वाल्यांशी कॉरडीनेट करुन त्यांची परवानगी घ्यावी लागते की, नविन सिग्नल यंत्रणा उभारायची आहे. जसे ताई म्हणत आहे. काव्यरत्नावली चौक आहे. ज्या ठिकाणी गरज आहे. त्या ठिकाणी करता येईल.

**मा.महापौर :-** ते आपल्याला सर्व सेटअप करुन देतील नंतर.

**श्री.अंनत जोशी :-** मेनटेनन्स आपल्याला करावा लागेल. त्यांच्याशी बोलल्यानंतर त्यांची मानसिकता दिसली तशी की, ते पुर्ण शहरात करुन द्यायला तयार आहे. त्यांच्या बोलण्यावरुन जानवले असे. तुम्ही जर परवानगी दिली तर फॉलोअप घेऊ आपण.

**मा.महापौर :-** विषय क्र.११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये अस्तित्वातील बहुतांश रस्त्यांच्या मध्यभागी दुभाजक बांधण्यात आलेले आहेत. सदर दुभाजकांमध्ये काही ठिकाणी महानगरपालिका तसेच काही ठिकाणी खाजगी संस्थेमार्फत शोभेची लहान रोपे लावण्यात

आलेली आहे. तसेच काही ठिकाणी अद्याप दुभाजकांचे विकसन बाकी आहे. सद्यास्थितीत महानगरपालिकेकडील अपुर्ण मनुष्यबळ पहाता सदर रस्ता दुभाजक व दुभाजकांमध्ये करण्यात आलेल्या सुशोभिकरणाची देखभाल दुरुस्ती सुव्यवस्थितरित्या करता येत नाही. बहुतांश ठिकाणी यापुर्वी खाजगी संस्थेस देखभाल दुरुस्त करीता देण्यात आलेले दुभाजक देखील देखभाल दुरुस्ती अभावी विद्रुप दिसुन येतात. तरी शहरामधील रस्ता दुभाजकाव्दारे शहर सुशोभिकरणात वाढ होत असल्याने दुभाजकांची देखभाल दुरुस्ती आवश्यक असुन शहरामधील विविध उद्योजक, व्यापारी, संस्था इ.मार्फत उपलब्ध सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातुन (सी.एस.आर.फंड) विकसन व देखभाल दुरुस्ती करणे शक्य आहे. तरी शहरामधील विविध उद्योजक, व्यापारी, संस्था इ.मार्फत दुभाजक तसेच चौक सुशोभिकरण व देखभाल दुरुस्ती इ.बाबत प्रस्ताव जाहिर निवेदनाव्दारे मागविणेकामी स्थानिक पातळीवर जाहिर सुचना प्रसिध्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त बाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जळगांव शहरात सुसुत्रता राखण्यासाठी लावण्यात येणाऱ्या जाहिरातींचे सर्व डिझाईन एक सारखेच तयार करण्यात यावेत.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५३

**सूचक** :- **नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक** :- **कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. १२ :-** जळगांव शहर महानगरपालिका, प्रभाग क्रं. ०३ अंतर्गत जुना असोदा रस्त्यावर जळगांव स.नं.१००,१०१ मध्ये आरक्षित जागेवर (आरक्षण क्रं. ४३) येथे जॉगींग ट्रॅक तयार करण्याचे काम मनपा निधीतुन करणेस व त्यास येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रू.३०,६०,२७२/- मात्रला प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, आम्हाला एक इंजिनिअरचा प्रॉब्लम आहे त्याठिकाणी, त्यानी बरोबर काही इस्टीमेट बनविले नाही. तेथे त्याने झाडे लावायचे सोडुन दिलेले आहे. काही बिम सांगितले ते त्यानी घेतलेले नाही. नंतर आम्ही योगेश वाणींना बोलवुन ती सुधारीत स्किम तयार करुन घेतलेले आहे. त्याच्यामध्ये ७,९६,९८२/- हे ॲड करुन त्याला मंजुरी द्यायची आहे. आणि ते पण येणाऱ्या वर्षात नविन लेखाशिर्ष तयार करुन त्यामध्ये आवश्यक तरतुद करण्यात यावी. मात्र सदर प्रस्ताव हा चालु आर्थिक वर्षातील नविन बगिचे या लेखाशिर्षातुन मंजुर करण्यात यावा व त्यासाठी आवश्यकता असल्यास नविन बगिचे या हेड अंतर्गत वाढीव तरतुद करण्यात यावी व त्या हेड अंतर्गत सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी व प्रशासनाने त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. आणि एक नम्र विनंती आहे प्रशासनाला आम्हाला इंजिनिअर बदलुन द्या साहेब, इतके कंटाळले आहे, तेथे रंधे साहेब आहे. आम्ही सगळे जण, आम्हाला त्यांची बदली करुन द्या, कोणी पण द्या आम्हाला, कोणीही द्या.

**श्री.सुनिल महाजन :-** सचिन पाटील सरांचे म्हणणे आहे, प्रकाश पाटील इंजिनिअर द्या तेथे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही, आग मधुन निघीसन फपुटयात पडायचे. नाही. आम्हाला त्या साहेबांची बदली करुन द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे, मान्य करण्यात यावा. म्हणजे आप्पांनी जी सुचना मांडलेली आहे की, त्या विकास कामात ज्या काही चुका घडलेल्या आहे. आप्पांनी जी सुधारीतची रक्कम सांगितलेली आहे. ती रक्कम सुधारीत करण्यात यावी. तसा नवीन लेखा शिर्ष उघडण्यात यावा. आणि त्या लेखाशिर्षात सदरहु तरतुद करुन त्या तरतुदीतुन या कामाला मान्यता देण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.कैलास आप्पा यांनी दिलेल्या सर्व सुचनांची प्रशासनानी नोंद घ्यावी. विषय क्र.१२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. वाढीव रक्कमेसह प्रशासनाने याची नोंद घ्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका, प्रभाग क्र.०३ अंतर्गत जुना आसोदा रस्त्यावर जळगांव स.नं.१००,१०१ मध्ये आरक्षित जागा (आरक्षण क्र.४३) असुन सदर जागेस कंपाऊंड वाल तयार केलेली आहे. सदर जागेत जुना जॉगिंगट्रॅक असुन तो मुरुमाचा आहे. सदरचा जॉगिंगट्रॅक हा सुमारे १४ वर्षे जुना असुन ट्रॅकवरील मुरुम हा ठिकठिकाणी खराब झाला आहे. त्यामुळे तो नव्याने करणे आवश्यक आहे. याबाबत सन्मा.नगरसेविका वार्ड क्र.०३ यांनी वेळोवेळी मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने सदरहु ट्रॅक नव्याने तयार करणेचे कामाकरीता रक्कम रु.३०,६०,२७२/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर अंदाजपत्रकात पेव्हींग ब्लॉक बसविणे, नविन एम.एस.गेट बसविणे तसेच ट्रॅक मजबुतीसाठी टाईबीनची तरतुद करण्यात आलेली असुन सदर अंदाजपत्रकास तांत्रीक मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यापुर्वी सदरची जागा मनपा मालकीची असल्याबाबत व आरक्षण कश्याचे आहे. या बाबत नगररचना विभागाने सदर उक्त कामाची जागा ही प्राथमिक शाळा, हायस्कुल व खेळाचे मैदानाकरीता प्रयोजनार्थ दर्शविलेली आहे. सदरची जागा ही मनपा मालकीची असल्याने उक्त कामाचा खर्च हा मनपा निधीतुन करण्याकरीता कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.३०,६०,२७२/- मात्रला प्रशासकीय मान्यता मिळणेस तसेच उक्त काम करण्याकरीता प्राथमिक शाळा हायस्कुल व खेळाचे मैदानाकरीता जमीनीचा विकास करणेकामी मनपा अंदाजपत्रकीय लेखाशिर्षामध्ये तरतुद करण्यात आलेली नसल्याने त्याकरीता नव्याने अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष तयार करुन त्यात रक्कम रु. ५०.०० लक्ष तरतुद करणे आवश्यक असल्याने सदरची तरतुद करणेस तसेच प्रभाग क्रं. ०३ अंतर्गत जुना असोदा रस्त्यावर जळगांव स.नं.१००,१०१ मध्ये आरक्षित जागेवर (आरक्षण क्रं. ४३) येथे जॉगींग ट्रॅक तयार करण्याचे काम मनपा निधीतुन करणेस व त्यास येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रू.३०,६०,२७२/- मात्रला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सुचनेनुसार येणाऱ्या आर्थिक वर्षात नविन लेखाशिर्ष तयार करुन त्यामध्ये आवश्यक तरतुद करण्यात यावी. मात्र सदर प्रस्ताव हा चालु आर्थिक वर्षातील नविन बगिचे या लेखाशिर्षातुन मंजुर करण्यात यावा व त्यासाठी आवश्यकता असल्यास नविन बगिचे या हेड अंतर्गत सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे व प्रशासनाने त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. सदर कामी वाढीव खर्चाची तरतुद रक्कम रु.७९६९८२/- मात्र करणेस व सदर वाढीव तरतूदीसह एकुण रक्कम रू.३८५७२५४/- मात्रच्या येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. १३ :-** मराठी प्रतिष्ठान यांनी शहरातील कवियित्री बहिणाबाई उद्यानातील जागा दिव्यांग मुलांसाठी मिळणेबाबत तसेच सदरील जागा लोकसहभागातुन दिव्यांगांसाठी विकसीत करणेकामी मागणी केलेली आहे सदर प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, दिव्यांग बांधवांना जागा देणेबाबत आमचे काही दुमत नाही. त्यांना द्यायलाच पाहिजे. परंतु बहिणाबाई उद्यानाची जागा खुप छोटी आहे. सकाळी तेथे मॉर्निंग वॅकसाठी सगळे नागरीक येतात. आणि दिव्यांग बांधवांना सुध्दा डिस्टर्ब होणार नाही. त्यांना स्वतंत्र अशी जागा द्या.जेणे करुन त्यांना पण डिस्टर्ब होणार नाही. जशी आता त्यांनी ही जागा सुचवलेली आहे तशी त्यांनी सुचवावी. ती एक आपण मंजुर करु.

**मा.महापौर :-** आपल्याला काही गाडया वगैरे तेथे लावायचे आहे का ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** खुप छोटी जागा आहे. आणि दिव्यांग बांधवांना सुध्दा त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन त्यांना कोणाचाही त्रास होणार नाही अशी जागा देण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी काय म्हणतो, दिव्यांगांसाठी एक स्वतंत्र जागा देऊन टाका. स्वतंत्रच देऊन टाका, स्वतंत्र ते दिव्यांगांसाठीच करा.

**मा.महापौर :-** लोकसहभागातुन आहे, दिव्यांगांसाठी आपण नविन जागा शोधु, तो पर्यंत ही जागा द्यायला हरकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे हा संपुर्ण लोक सहभागातुन होणारा विषय आहे. महानगरपालिकेचा एक रूपयाही याच्यात खर्च होणार नाही. दुसरी गोष्ट सर्वसामान्यांसाठी खुप काही व्यवस्था शहरामध्ये आहे. भाऊचे उद्यान असेल, गांधी उद्यान असेल. इतर उद्याने असतील.परंतु दिव्यांगांच्या बाबतीत जे आहे ना. आजपर्यंत एक ही उद्यान शहरामध्ये नाही. म्हणजे मुंबईला सुध्दा ७ ते ८ कोटी रूपये खर्च करून दिव्यांगांसाठी एक उद्यान तयार करण्यात आलेले आहे. पुण्यामध्ये आता लेटेस्टमध्ये दिव्यांगांसाठी एक उद्यान तयार केलेले आहे. कारण काय होतो दिव्यांगांना आपले रेग्युलर जे उद्यान आहे. त्या उद्यानांमध्ये तशी व्यवस्था नसते. आणि त्याच्या संदर्भात मी माहिती घेतली. दिव्यांगांसाठी वेगळया पध्दतीचे जी खेळणी तयार केले जातात. ज्याच्यामध्ये त्यांची संपुर्ण सुरक्षतेची जबाबदारी त्या पध्दतीचे खेळणी बनविलेले असतात. अश्या पध्दतीचे मला वाटते, आणि आपण त्यांच्यासाठी दुसरीकडे विचार केला, हा शहराचा मध्यवर्ती भागात असलेला उद्यान आहे. आणि मध्यवर्ती भागातल्या उद्यानातला एक कॉर्नर मध्ये पुर्वी तेथे रेल्वे छोटया मोठया गेमच्या बाजुला एक एरिया लागुनच ठेवलेला होता. तेवढयाच भागात नियोजन करण्याची यांची ईच्छा आहे. मला वाटते विशालजी कुठेतरी एक सामान्य दृष्टया या दिव्यांगांकडे बघितले पाहिजे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** एकलव्यच्या बाजुला जागा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एकलव्य आपली नाही ना.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याच्या बाजुला आपली जागा आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** पी.डब्ल्यु.डी.ची आहे ती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांना खुप काही मोठी जागा नाही पाहिजे ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आम्हाला काही ना. विचार करा, चांगली मोठी जागा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये लोकसहभाग कोण करत आहे. ज्यांच्या घरी दिव्यांग मुले जन्माला आले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला दिव्यांगांचा पुर्ण विषय माहिती आहे. मला सगळं माहिती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विचार करायला पाहिजे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** याच्यापेक्षा मोठी जागा अशील तर मोठी जागा द्या. याच्यापेक्षा मोठी जागा द्या असे माझे म्हणणे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ, टागोरनगरची पण आहे. सेपरेट द्या. स्वतंत्र द्या असे माझे म्हणणे आहे. ते आता धीरज भाऊ बोलले, स्वामी विवेकानंद नगरची जागा आहे. ते खर्च करत आहे ना लोक सहभागातुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तेथे काय आहे. आज संरक्षण भिंत वगैरे तयार आहे. त्यांना ३०-४० लाख रूपये जे खर्च करायचे आहे ते फक्त खेळण्यांवरतीच खर्च करायचे आहे. संपुर्ण उद्यानाचा विकास करायचे तर तेवढी उपलब्धता त्या संस्थेकडे नाही. आणि तितके मोठे काही स्पॅान्सर मिळत नाही. जे आहे त्याच जागेत करा.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये द्यायला अडचण काय ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** आम्ही नाही कुठे म्हणतो आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊ, अश्विनभाऊ याच्यामध्ये करायला काय अडचण आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** टागोरनगरमध्ये आहे त्याला ही सुरक्षा भिंत आहे. टागोरनगर मध्ये जो बगिचा आहे त्याला ही सुरक्षा भिंत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कॉलनी ऐरियातला बगिचा आहे तो, टागोरनगरमधला माझ्याच प्रभागातला बगिचा आहे तो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तुमच्या प्रभागात आहे तर तुम्ही दुसरी जागा सुचवा. दुसरी जागा सुचवा तुम्हाला माहित अशीन तर.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** टागोर नगरचा बगिचा तुम्ही उल्लेख करत आहात याला सोडुन की, ही जागा छोटी आहे म्हणुन तर टागोर नगरचा बगिचा सुध्दा असाच छोटा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा विषय मंजुर करायला पाहिजे. या उपरांत चांगली जागा जर मिळेल ती शोधत राहु तोपर्यंत काही ना काही प्रमाणामध्ये तेथे कार्य सुरु राहील.

**श्री.राजेंद्र पाटील :-** पण त्यांचा खर्च होऊन जाईल ना भाऊ, आपण नविन जागा शोधली तर तेथील साहित्य परत शिफ्ट करावे लागतील ना भाऊ.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना नेमके कोण काय बोलले ते ऐकु आले नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विषय तहकुब ठेवा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय तहकुब ठेवा नविन जागा शोधुन आपण त्याच्यावर विचार करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय चांगला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय चांगलाच आहे ना, विषय चांगला नाही असे कोण म्हणत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग का लांबवता आहे.

**श्री.सचिन पाटील :-** मग कशाला तहकुब करत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता १५ दिवसात महासभा आहे दुसरी, १५ दिवसात महासभा आहे.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया, मागच्या बाजुला कोणतीच ॲक्टव्हीटी होत नाही. बगिचा आहे तो.

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो सुनिलभाऊ, ऐका ऐका , हे जे मराठी प्रतिष्ठान आहे ना, यांना आपल्या महापालिकेतर्फे शाळा दिलेली आहे मला वाटते आपण. जागा दिलेली आहे शाळेला.

**श्री.सुनिल महाजन :-** नाही. नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** विद्या इंग्लिश मेडीयम दिलेली आहे. त्यांची काही जागा शिल्लक आहे महापालिकेची. तेथे करा ना. तेथे नाही होणार का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊ कसे आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** खुपच छोटी जागा आहे, कनजस्टेड होऊन जाईल. लोकं तेथे फिरायला जातात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊ दिव्यांगांना शहरामध्ये आणण्याच्या दृष्टीकोणातुन सोयीस्कर मध्यवर्ती भाग आहे.

**श्री.सचिन पाटील :-** मंजुर करा, अनुमोदन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे. सदरची जागा २१ वर्षासाठी द्यावी असा त्यांचा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- सदर जागा ही महानगरपालिकेचीच राहील आणि ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यातच राहील आणि सदरहु संस्था ही लोकसहभागातुन पैसा उभारून करेल आणि त्याची देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी महानगरपालिका स्विकारत असेल. तर त्यांच म्हणणे सुध्दा देखभाल दुरूस्ती करीता आम्ही महानगरपालिकेला परत हस्तांतरीत करू. म्हणजे संस्था कुठलाच अधिकार दाखवणार नाही.

**श्री. सुनिल महाजन** :- ती महापालिकेची जागा आहे ते थोडीच अधिकार दाखवणार आहे.

**श्री. जितेंद्र मराठे** :- नाही आपण कस

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही अधिकार नाही दाखवणार ना संस्था , संस्था कुठलाच अधिकार दाखवत नाहीये.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. सचिन पाटील** :- मंजुर करावा विषय , पुढचा विषय घ्यावा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- या सगळ्या गोष्टींच अवलोकन केलेल्या संस्था आहेत. साधारण ३ / ४ महिन्यांपासुन सदरहु संस्था या प्रस्तावाचा पाठपुरावा करत आहे. संस्था त्यांच्यावर कुठलाही मालकी हक्क दाखवणार नाहीये. संस्था लोकांकडुन स्पॉन्सरशिप घेवुन, विकसित करून संपुर्ण महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याच्या , म्हणजे तिथे नियंत्रण सुध्दा महापालिकेच राहील. महानगरपालिकेला वाटेल तर सदरहु देखभाल सदर संस्थेलाच करायच आहे. तर ते महानगरपालिका स्वेच्छेने देवु शकेल आणि महानगरपालिका स्वत: करत असेल तर महानगरपालिका स्वत: कडे स्वतंत्र अधिकार ठेवेल. आप्पा ज्याच्या घरात दिव्यांग मुल जन्माला येतात ना , मी सुध्दा एका दिव्यांग संस्थेचा अध्यक्ष आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- माहिती आहे ना भाऊ

**श्री. नितीन लढ्ढा** :- आज आपण बघतो की ज्याच्या घरात दिव्यांग मुलगा म्हणा किंवा मुलगी जन्माला आली. तर आई-वडिलांच अर्ध जिवन जे आहे ते त्याच्यातच संपुन जाते आणि त्यांच्या यातना पाहील्या जात नाहीत आणि त्याच्याकडे पाहीले की आपल्याला अस वाटत की याच्यासाठी काय करायला पाहीजे आणि काय नाही करायला पाहीजे. या परिस्थितीत बघा कोणीच करत नाही. कोणीतरी संस्था या पध्दतीचे कार्य करते आहे. उलटपक्षी आपण या संस्थांना प्रोत्साहन द्यायला पाहीजे. जे सर्व साधारण काम असतात ते सामान्य पणे करतात.

**मा.उपमहापौर** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- आमची मागणी ही आहे की तुर्त तहकुब ठेवावा, त्यांना स्वतंत्र जागा द्यावी. तिथे सर्व दिव्यांगांच हे करण्यात यावे अशी आमची मागणी आहे.

**श्री. सुनिल महाजन** :- भाऊ आपण त्यांच्याकडुन खेळणे लावुन घेवु आणि परत घेवुन घेवु.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- त्यांचा खर्च कशाला वाया घालवता आहे.

**श्री. सुनिल महाजन** :- भाऊ वाया नाही जाणार ना त्यांचा खर्च

**मा.महापौर** :- विशालभाऊ हा जो विषय आहे लोकसहभागातुन खर्च आहे पुर्ण आणि महापालिकेला याचा १ रूपयाही खर्च नाहीये. ज्यावेळेला आपण जागा शोधु व डेव्हलप करू त्यावेळेला ती खेळणी आपण तिथुन उचलुन लावु शकतो.

**श्री.विश्वनाथ खडके** :- महापौरताई , बहिणाबाई उद्यानामध्ये ऑलरेडी भरपुर खेळणे लावले गेलेले आहेत आणि हे खेळणे लावायची गरजच नाहीये त्याठिकाणी.

**मा.महापौर** :- भाऊ दिव्यांगांसाठीचे खेळणे स्पेशल खेळणे असतात ती लावायची आहेत.

**श्री.विश्वनाथ खडके** :- जागा तर पाहीजे तिथे खेळणे लावायला.

**मा.महापौर** :- त्यांची सगळी पाहाणी झाली आहे भाऊ प्रस्तावच तसा आहे त्यांचा

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील** :- महापौर महोदया , तो बगीचा आमच्या प्रभागात येतो. मागच्या बाजुला भरपुर जागा आहे. तर त्याठिकाणी काहीच होत नाहीये.

**मा.महापौर** :- स्पेशल दिव्यांगांसाठी खेळणी आहेत ती लावायची आहेत.

**श्री.सचिन पाटील** :- तरी हा विषय मंजुर करावा.

**श्री.सुनिल महाजन** :- दिव्यांगासाठी आहे आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे** :- भाऊ मी बोलतच नाहीये, मी काही म्हणतच नाही ना काही विषयच नाही आमचा.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मराठी प्रतिष्ठान, जळगांव यांचेकडील पत्र आ.क्र./सा.बा./३५६७ दि.२४/११/२०२२ अन्वये शहरातील कवियित्री बहीणाबाई उद्यानातील जागा दिव्यांग मुलांसाठी मिळणेबाबत तसेच उद्यानातील ही जागा लोकसहभागातुन दिव्यांगांसाठी विकसित करणेबाबत अर्ज दिलेला आहे. या ठिकाणी दिव्यांगांसाठी विविध खेळणे साहित्य बसवुन त्यांना या उद्यानातुन आनंद घेता येईल असे खेळणी बसविण्याचा अर्जदार मराठी प्रतिष्ठान यांचा मानस असल्याचे त्यांचे पत्रात नमुद आहे.

सदरचे ठिकाणी त्यांनी या मुलांसाठी टॉयलेटची व्यवस्थाही त्यांचे मार्फत करण्याचे त्यांनी पत्रात नमुद केले आहे. या उद्यानासाठी सकाळी १० ते ०१ व संध्याकाळी ०५ ते ०८ या वेळेची मागणी केलेली आहे. तसेच मनपाने पिण्याचे पाण्याची तसेच विद्युत पुरवठा व सुरक्षा व्यवस्था रक्षकाची नियुक्ती करावी असे नमुद आहे. सदर बगिच्यातील जागा संस्थेस दिव्यांगांसाठी खालील अटीशर्तीनुसार देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. सदरची जागा किती वर्षासाठी असावी या बाबतचा निर्णय
२. सदरचे उद्यानाची वेळ सकाळी १० ते १२ व संध्याकाळी ०५ ते ०८ असावी.
३. या ठिकाणी सदर संस्थेस दिव्यांगाचे खेळाचे साहित्य शिवाय ईतर कार्यक्रम करता येणार नाही.
४. या ठिकाणी बनविण्यात येणारे टॉयलेटचे outlet ची व्यवस्था या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या Drainage system शी सुसंगत करावे लागेल.
५. या ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था आहे स्वतंत्र व्यवस्था करणेची आवश्यकता नाही.
६. बगिच्यामध्ये विद्युत लाईटची Garden light ची व्यवस्था आहे. खेळासाठी किती क्षमतेचा विद्युत प्रवाह लागेल याचा उल्लेख नाही.
७. या स्वतंत्र उद्यानासाठी सुरक्षा देता येणे शक्य होणार नाही. कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने साहित्याची संरक्षणाची जबाबदारी संस्थेची राहील.
८. सदरचे उद्यानास ब्रुक ब्रॅड कॉलनीतुन गेट ठेवता येणार नाही. कारण बगिच्यासाठी अन्य गेट वाढवण्यास सुरक्षा ठेवणे कठीण होईल. बगिच्याला मेन प्रवेशव्दार आहे. त्याचा उपयोग करावा लागेल.
९. तसेच सदरची जागा संस्थेस इतर कार्यक्रमास भाडयाने /कराराने देता येणार नाही.
१०. दिव्यांगांसाठी उद्यानातील देण्यात येणाऱ्या जागेत संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांचा नकाशा सादर करणे व त्यानुसारच प्रत्यक्ष जागेवर काम करणे आवश्यक राहील व त्यासाठी येणारा खर्च हा संस्थेने करणे आवश्यक राहील.
११. या कामी सदर जागा जास्तीत जास्त ०९ वर्ष राहील व त्यानंतर मुदतवाढ देणे झाल्यास पुनःश्च स्वतंत्र प्रस्ताव सादर करुन मा.महासभेची मान्यता प्राप्त करणे आवश्यक राहील.
१२. मनपास आवश्यकता भासल्यास देण्यात आलेल्या जागेचा आहे त्या स्थितीत ताबा घेण्याचा संपुर्ण अधिकार मनपास राहील व त्या बाबत कोणताही न्यायालयीन वाद उपस्थित करण्याचा संस्थेला अधिकार राहणार नाही व मनपा मार्फत कोणताही मोबदला मिळणार नाही.
१३. या कामी कोणताही वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त सो., यांचा निर्णय अंतीम राहील व तो संस्थेला देखील बंधनकारक राहील.
१४. संस्थेला सदर जागा देण्यात आल्यानंतर मनपाच्या पुर्वपरवानगी प्राप्त करुनच कोणतेही काम करणे आवश्यक राहील.

तरी वरील प्रमाणे सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहुन मराठी प्रतिष्ठान यांना दिव्यांगासाठी जागा देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . १४ :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहरातील जैन इरिगेशन सिस्टीम लि.जळगांव यांना मनपा मालकीच्या महात्मा गांधी उदयान देखभाल व्यवस्था कामी ०३ वर्षाकरीता नव्याने करारनामा नुतनीकरण/ मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. वानखेडेजी हे उद्यान तयार झाल्यापासुन काय याच्यातील विषय की त्याच्या देखभाल दुरूस्तीच्या संदर्भातील जैन उद्योग समुहाला आपण दिलेली आहे.

रितसर निविदा प्रक्रीया राबवुन जे दर ठरवलेले होते. त्या दराने देखभाल दुरूस्तीच काम करत आहेत. साधारणत: तिन वर्ष झालेले आहेत. तिन वर्षात अजुनपर्यंत १ रूपयाचीही त्यांच्या बिलाची अदायगी महानगरपालिकेकडुन करण्यात आलेली नाहीये. मला सांगा की जर त्यांनी जबाबदारी सोडली. तर त्या उद्यानावर केलेला कोट्यावधी रूपयांचा खर्च आणि त्या उद्यानाची काय परिस्थिती होईल. ती आपल्या जळगांव शहरातील इतर उद्याने बघितले तर ते आपल्याला लक्षात येईल. मला कळत नाही की कुणी देखभाल दुरूस्ती करतय. सर्व निविदा प्रक्रीया होवुन काम त्यांना दिलेले आहे. मग त्यांची बिल अदायगी का होत नाही.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- माझ्या मते आधी त्यांच बिल द्यायला पाहीजे मग आपण

**श्री. नितीन लढ्ढा** :- तिन वर्ष झाले साहेब बिल द्यायला तिन वर्षात त्याला एक रूपयाही दिलेला नाहीये. देखभाल आणि दुरूस्तीचे तुम्ही एक बघुन घ्या. गांधी उद्यान जे आहे ते एकमात्र उद्यान अस आहे की हे सुखसोई केलेले आहे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- त्यांच बिल अदा झाल आहे का ?

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त**:- बांधकाम विभागाकडे आहे सर ते

**श्री. नितीन लढ्ढा** :- ते एकमेव उद्यान अस आहे त्याची माहिती घ्या नंतर आणि मंजुर करण्यात यावे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- चालेल.

**ॲड. सौ.शुचिता हाडा** :- महापौरताई आता आपण सगळेच बघतो आहे की, जळगांव शहरातील इतर सगळयाच मनपाच्या उद्यांनाची जी दुरावस्था आहे. तर जर आपण काही उद्यांनाची निविदा प्रक्रीया राबवली तर जी संस्था ईच्छुक होती. त्यांनी कॉम्पीटेंटली गेले ३ वर्ष केलेले आहे. तर हे वादातीत नाही आणि जैन यांनी सांभाळलेले आहे. तस करणारी आज तरी आपल्याकडे दुसरी व्यवस्था उपलब्ध नाही. पण जे आपल्या प्रभागाचे कॉलनी एरिया मध्ये आपल्या मालकीचे आहेत. तिथे सुध्दा या धर्तीवर काही संस्था घ्यायला तयार असतील. मनपाने खर्च करायचा जसा, जरी आपण जैनला पेमेंट अदा केलेल नसले तरी नितीनभाऊंनी सांगीतल्या नंतर सगळ्यांना हे कळलेले आहे. तरी सुध्दा आज ना उद्या ते होणार आहे. तर ते बिल कुठे जाणार नाहीये. तर त्यासाठी कॉम्पींटेंट संस्था त्या त्या प्रभागात असतील तेथील मनपाचे बगीचे सांभाळण्यास , देखभाल करण्यास तयार असतील. तर तसा प्रस्ताव आपण मागवायला काही हरकत नाही आणि त्याच प्रमाणे जी भकास अवस्था आज संपुर्ण जळगांव शहरातील मनपाच्या उद्यानांची झालेली आहे. ती कुठेतरी दुर होवु शकते. तर आजच्या या विषयामध्ये ही सुचना नोंद करून घ्यावी आणि महापौरताई आपण प्रशासनाला तशी सुचना द्यावी की ताबडतोब तसा प्रस्ताव तयार करून महासभेसमोर पाठवावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- ताईंनी जो प्रस्ताव या ठिकाणी प्रस्तावित केला त्यावर प्रशासनाने कोणी संस्था जर तयार असतील. तर त्या संदर्भातील प्रस्ताव महासभेसमोर आणावा. पुढील विषय घेण्यात यावा. विषय क्रं. १४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहरातील मनपा हद्दीतील महात्मा गांधी उद्यान देखभाल व दुरुस्ती करणे बाबतच्या कामाचे जैन इरिगेशन सिस्टिम लि.जळगांव यांना मनपा सार्व.बांधकाम विभाग जा.क्र./०६०/२०१९-२० दि.०५/०८/२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आलेले आहेत. या कार्यादेशाची मुदत ०३ वर्ष होती. सदर मुदत ही दि.०५/०८/२०२२ रोजी संपली आहे. या बाबत सविस्तर अहवाल देण्यात येतो की, मनपा मालकीचे महात्मा गांधी उद्यान हे शहरातील मध्यवर्ती भागातील प्रमुख उद्यान असुन त्याची दुरावस्था झालेली होती त्या वेळी शहरातील प्रमुख उद्योजक कंपनी जैन इरिगेशन सिस्टीम लि.जळगांव यांनी त्यांच्या मार्फत सदर उद्यानाचे सुशोभिकरण करुन दिले असुन त्यावेळे पासुन सदर उद्यानामुळे शहराच्या सौंदर्यात मोलाची भर पडली आहे. सुशोभिकरणाचे काम पुर्ण झाल्यावर या उद्यानाची देखभाल व्यवस्था ठेवणे करीता या कंपनीस दरमहा ०३ ते ३.५० लक्ष खर्च येत असलेने त्यांनी सदर उद्यानाचे सुशोभिकरणानंतर दरमहा मेंन्टेनन्सचा खर्च करणे शक्य होणार नसल्याने दि.०१/०४/२०१८ पासुन उद्यान पुन्हा मनपाचे ताब्यात देण्याबाबत सुचित केले असता तत्कालीन शहर अभियंता यांनी उद्यानाची देखभाल व व्यवस्था कामी

जाहिर निविदा मागवुन दरवर्षाचा देखभाल व व्यवस्था कामी धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव मनपा महासभेपुढे सादर करण्यात आला असता ठराव क्र.८८३ दि.२३/०३/२०१८ अन्वये महासभेने मान्यता प्रदान केली असता विभागाने या कामी निविदा मागवुन कार्यवाही करण्यात आली. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमीचे दर प्राप्त मक्तेदारासोबत वाटाघाटी अंती उद्यान देखभाल व व्यवस्था कामी ०३ वर्षाकरीता रु.१,२५,००,०००/- मात्रचे जैन इरिगेशन सिस्टीम लि.यांचे दरास म.स्थायी समिती ठराव क्र.१०० दि.२६/०६/२०१९ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानुसार मक्तेदारासोबत करारनामा करण्यात येवुन कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत. या कार्यादेशाचा कालावधी हा ०३ वर्षाचा म्हणजेच दि.०५/०८/२०२२ पर्यंत आहे. या कालावधीत सदर मक्तेदार कंपनी मार्फत या उद्यानाची संपुर्ण देखभाल, व्यवस्था, स्वच्छता इत्यादी बाबींची पुर्तता चोखपणे ठेवण्यात आली असुन त्यामुळे शहरातील अनेक नागरीक, अबाल वृध्द यांचा या उद्यानात जाण्याचा कल वाढला आहे. उद्यानाची स्वच्छता लाईट व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, खेळण्यांची व्यवस्था, तसेच नागरीकांना सकाळ - संध्याकाळ जॉगींग ट्रॅकची व्यवस्था देखील अत्यंत चांगल्या प्रकारे ठेवण्यात येत आहे.

सदर कंपनी मार्फत उद्यानाची चोख व्यवस्था ठेवणे कामी आवश्यक सफाई कर्मचारी सुपरव्हायजर, कॉन्ट्रक्ट लेबर, सुरक्षा रक्षक, वायरमन, प्लंबर इ.पुरवण्यात येवुन उद्यानाची चोख व्यवस्था ठेवण्यात आली असुन कंपनी मार्फत वेळोवेळी रंग रंगोटी करणे, खेळणी दुरुस्ती करणे, ट्रॅक व ओटे दुरुस्ती व कलरींग करणे उद्यानातील पाईपलाईन दुरुस्ती तसेच विद्युत व्यवस्था कामी खराब झालेले बल्ब तातडीने नविन बसविणे इ. कामे उत्तम प्रकारे करण्यात आली आहेत. कंपनी मार्फत कार्यादेशाचा कालावधी संपल्यानंतर देखिल उद्यानाची देखभाल व व्यवस्था अविरतपणे सुरु ठेवण्यात आलेली आहे. या कार्यादेशाची मुदत संपलेली असल्याने करारनाम्यात नमुद अट क्र.०२ सदर करारनाम्याची मुदत कार्यादेश दिल्या पासुन ०३ वर्षा इतकी राहील. मुदतीनंतर नुतनीकरण करतांना मुदत वाढवणे अथवा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील. असे नमुद करण्यात आलेले असुन जैन इरिगेशन सिस्टिम लि.जळगांव यांनी करारनाम्याचे पुढील मुदती करीता नुतनीकरण होणे आवश्यक आहे. तरी नुतनीकरणा बाबत त्वरीत पुढील कार्यवाही व्हावी असे लेखीपत्रान्वये कळविले आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता पुढील ०३ वर्षाचा कालावधीसाठी मुदतवाढ देवुन व तसा करारनामा नुतनीकरण करुन घेवुन जैन इरिगेशन सिस्टिम लि.जळगांव या संस्थेला / कंपनीला याच दरात नव्याने कार्यादेश निर्गमित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५३**
**सूचक** **:- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक** **:- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . १५ :-** शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत जळगांव मनपा क्षेत्रात अर्बनहेल्थ ॲण्ड वेलनेस सेंटर बाबत मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. कैलास सोनवणे** :- मंजुर आहे

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.आयुक्त सो.,आरोग्यसेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या कडील पत्र क्र.माव्यक/१५ FC/अनुदान वितरण/ मार्गदर्शक सुचना /८३६८-८६७७/२०२२ दि.१८/०४/२०२२ नुसार जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात एकुण २४

अर्बनहेल्थ ॲण्ड वेलनेस सेंटर मंजुर झालेले असुन त्यासाठी मनुष्यबळ, औषधी व इतर साहित्य शासनाकडुन प्राप्त होणार आहे. या U-HWC साठी लागणारी जागा ही मनपाच्या मालकीच्या (ईमारतीसाठी प्राधान्य) किंवा भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेता येईल भाडयाने घ्यावयाची जागा ५०० स्के.फुट पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. या नुसार दवाखाना विभागाकडुन लेखी अहवाल या विभागास प्राप्त झाला असता मा.आयुक्त सो., यांच्या अधिपत्याखाली या बाबत बैठक होऊन शहरातील कोण कोणत्या भागात मनपा मालकीच्या ईमारती उपलब्ध आहेत व त्यापैकी कोण कोणत्या ठिकाणी U-HWC करणे आवश्यक व शक्य होईल या बाबत चर्चा होऊन मा.आयुक्त सो., यांच्या सोबत सदर जागांचे स्थळ पाहणी करण्यात येवुन एकुण ११ जागा सुनिश्चित करण्यात आलेल्या आहेत व या ईमारतीच्या दुरुस्तीच्या कामांचे अंदाजपत्रक देखील तयार करण्यात आलेले आहेत. तसेच या मनपा मालकीच्या एकुण ११ ठिकाणी U-HWC साठी विद्युत व्यवस्था सुस्थितीत करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे एकंत्रीत अंदाजपत्रक देखील तयार करण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | ठिकाण | दुरुस्तीचे अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| | ऑक्सिजन पार्क, मुक्ताई नगर, जळगांव | ५५९४०२/- |
| | बालवाडी, विजय कॉलनी, गणेश कॉलनी, जळगांव | ४३८१५८/- |
| | मनपा शाळा क्र.१५ गेंदालाल मिल जवळची उस्मानिया पार्क, शिवाजी नगर, जळगांव | ३८०२२१/- |
| | बालवाडी कांचन नगर शनिपेठ, चौघुले प्लॉट परिसर, जळगांव | ४३३४६१/- |
| | मनपा शाळा क्र.२४ खेडी शिवार, जळगांव | ३८८७४८/- |
| | मनपा शाळा क्र.२२ जोशीपेठ, जुनेगांव | २८८६००/- |
| | मनपा शाळा क्र.५० रामेश्वर कॉलनी, जळगांव | ५९९४८३/- |
| | मनपा शाळा क्र.४८ सोमाणी मार्केट जवळ पिंप्राळा, जळगांव | ६३८८१५/- |
| | मनपा बालवाडी क्र.०५ शिव कॉलनी,जळगांव | ५९९१९१/- |
| | मनपा हॉल, पोलीस कॉलनी, सुप्रिम कॉलनी, जळगांव | ५५९४०२/- |
| | मनपा हॉल, राधाकृष्ण, जळगांव | २९६३००/- |
| | अ.नं.०१ ते ११ मधील विद्युत व्यवस्था सुस्थितीत करणे | ५१८४६६/- |
| | एकुण :- | ५७,००,२४७/- |

शहरात एकुण २४ U-HWC करीता मान्यता प्राप्त असली तरी मनपा मालकीच्या एकुण ११ जागा दवाखाने विभाग तसेच मा.आयुक्त सो., व संबंधीत शाखा अभियंता यांनी समक्ष पाहणी करुन निश्चित केलेल्या आहेत या इमारती मनपा मालकीच्या शाळा, बालवाडी तसेच मनपा मालकीचे हॉल अश्या स्वरुपाच्या आहेत व त्या U-HWC दुरुस्तीसाठी स्वतंत्रपणे अंदाजपत्रक तयार करुन सादर केलेले आहे. या कामी विद्युत व्यवस्थेसह एकुण रक्कम रु.५७,००,२४७/- मात्र खर्च येणार असुन सदर खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शासना मार्फत मनपास देण्यात येणार आहे. तरी उपरोक्त नमुद अ.नं.०१ ते ११ U-HWC व अ.नं.१२ मध्ये नमुद विद्युत व्यवस्था करण्यासाठी येणाऱ्या खर्चासह रक्कम रु.५७,००,२४७/- मात्रच्या कामास व प्रत्येक कामाची आवश्यक ती मान्यता प्राप्त करुन स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यास व सदर कामे प्राप्त होणाऱ्या शासन निधीतुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच या व्यतिरिक्त मनपा क्षेत्रामध्ये आवश्यक ठिकाणी U-HWC सुरु करण्यासाठी मनपा मालकीची जागा / इमारत उपलब्ध नसल्याने शहरातील खालील ठिकाणी U-HWC साठी

भाडेतत्वावर भाडयाने घेण्यासाठी जागा / इमारत उपलब्ध आहेत. या नुसार भाडेतत्वावर घेण्यात येणाऱ्या जागांची भाडयाची शासकीय दरानुसार रक्कम शासनाकडुन उपलब्ध होणार आहे. सदर U-HWC ची मुदत २०२५-२६ पर्यंत असुन या बाबत झालेल्या कार्यावाहीची माहिती आयुक्त, आरोग्यसेवा व अभियान संचालक (शासनाकडे) पाठविणे आवश्यक आहे. सदर ठरावाप्रमाणे माहिती पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) खाजगी इमारत, निमखेडी रोड, जळगांव

२) समतानगर परिसर, जळगांव

३) खाजगी इमारत बाजारपट्टा, हरिविठ्ठल नगर, जळगांव

४) खाजगी इमारत, खंडेराव नगर,जळगांव

५) खाजगी इमारत, अयोध्या नगर, जळगांव

६) खाजगी इमारत, तांबापुरा, मेहरुण,जळगांव

वरील ठिकाणी व त्या व्यतिरिक्त आवश्यक त्या ठिकाणी शासनाने ठरवुन दिलेल्या धोरणानुसार जागा / इमारत भाडयाने उपलब्ध असल्यास ती जागा / इमारत भाडयाने घेण्यासाठी भाडे ठरविणे, करार करणे इ. आवश्यक कार्यवाही करण्यासाठी मा.आयुक्त सो., यांना प्राधिकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . १६ :-** सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांचे दि.०५/१२/२०२२ चे पत्रासोबत दिलेल्या ०१ ते १०२ रस्त्यांची कामे मंजुर रक्कम रूपये १०० कोटी पैकी उर्वरित रक्कम रूपये ५८ कोटी रूपये अंतर्गतचे कामांना मान्यता मिळणे व त्याकरीता शासनाकडे निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याकरीता मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- राजेंद्रभाऊंचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री. राजेंद्र पाटील** :- महापौर महोदया,

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री. राजेंद्र पाटील** :- महापौर महोदया, याच्यामध्ये विषय क्रं. १६ मध्ये जी कामांची यादी दिलेली आहे ती .क्रं. ०१ ते १०२ आहे. याच्याच अनुषंगाने मी उपसुचना मांडु ईच्छितो की यामध्ये दुरूस्ती करण्यात यावी. यासोबतच विकास कामांची मी यादी दिलेली आहे शहर अभियंता यांच्याकडे कारण हा त्याचा प्रस्ताव आहे आपला प्रशासनाचा यामध्ये तर यादीतील अ.क्रं. ०१ ते ०९ ही कामे सुध्दा समाविष्ठ करण्यात यावी.

**श्री. नितीन लढ्ढा** :- राजेंद्रभाऊंची काही कामे समाविष्ठ करायची आहेत आणि काही कामं म्हणजे डबल आलेली आहेत. तर ती काम रद्द करायची आहे आणि त्याच्या बदलामध्ये दुसरी यादी प्रतिभाताईंची काही कामं टाकुन बदल करून करेक्शन करायचे आहे.

**श्री. राजेंद्र पाटील** :- आणि यात जर काही निधी कमी पडला तर मनपाचा निधी जोडण्यात यावा.

**श्री. सुरेश सोनवणे** :- महापौरताई

**मा.उपमहापौर** :- महापौर महोदया जस आता राजुभाऊंनी सांगीतल की या प्रस्तावासोबत मी पण जी शहर अभियंत्यांकडे एक यादी दिलेली आहे व १ ते ४ काम पण दिलेले आहे ती काम सुध्दा यासोबत जोडुन घेण्यात यावे तर राजुभाऊंच्या प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरताई मला बोलायच आहे. सोनगिरेसाहेबांचे कामकाज कोण पाहत आहे आपले.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे** :- काहीच्या काही करत आहे वेड्यासारखे या यादीमधील २१ नंबर प्रभाग क्र.४ व ५, शास्त्री टॉवर ते स्टेडीयम चौक रस्ता डांबरीकरण करणे ४२ लाख २० हजार, प्रभाग क्रं. ५ चे नगरसेवक नितीनभाऊ आहेत. नितीनभाऊ आता शास्त्री टॉवर ते स्टेडीयम चौक ४ नंबर मध्ये येतो का ?

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही.

**श्री. कैलास सोनवणे** :- बरोबर, २२ नंबर प्रभाग क्रं. ४ व ५ स्टेडियम चौक ते आकाशवाणी चौक रस्ते डांबरीकरण करणे. ६० लाख रूपये ४ मध्ये येतो का हा रस्ता.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही.

**श्री. कैलास सोनवणे** :- २३ नंबर प्रभाग क्रं. ४ व ५ जिल्हा कोर्ट ते चित्रा चौक चे रस्ते डांबरीकरण करणे. २० लाख आहेत की २ कोटी आहे. २० लाख आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा २ कोटी आहेत.

**श्री. कैलास सोनवणे** :- आता रस्ता पण ४ मध्ये येतो का

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही , नाही.

**श्री. कैलास सोनवणे** :- आता हे यादीतील रस्ते जे आहेत हे ४ नंबर मध्ये आहेत का?

**मा.उपमहापौर**:- नाही

**श्री. कैलास सोनवणे** :- मग हे अस काय होतय ४ नंबरसाठी , मग असा दुजाभाव का ४ नंबरसाठी , जेव्हा १०० कोटी आले होते तेव्हा महापौर नितीनभाऊ होते. तेव्हा वॉर्ड क्रं. २१ चा मी नगरसेवक होतो. त्यावेळेला त्या नितीनभाऊंच्या यादीमध्ये त्या वॉर्डाच १ रूपयांच काम त्या यादीमध्ये नव्हत. नंतर मामांनी यादी बनवली. त्याच्यात पण नव्हत. म्हणजे आमच्या सोबत अस का केल जात यादीत, आमच्या वॉर्डातील लोक टॅक्स भरत नाहीत का ?

**श्री. सुनिल महाजन** :- तुम्ही सक्षम आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही सक्षमचा विषय सोडा. टॅक्स भरत नाही का आमच्या वॉर्डातील लोक.

**श्री. सुनिल महाजन** :- आप्पा यादी कुठे बनवली आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- याद्या कुठे बनता , कुठे बदलता काहीच समजत नाही ईथे , विशाल डोक्यात काही येत नाही का की लोक तुमच्याजवळ येत नाहीत का

**श्री. विशाल त्रिपाठी** :- हो ना

**श्री. कैलास सोनवणे** :- मग बोला ना विरोध करता येत नाही का आपल्याला , जाण नाही आहे का आता मी हे जर थांबवल तर जळगांवचा विकास थांबवला अस होईल ते , ४ नंबरसाठी थांबवल तर , आता यांनी याद्या दिलेल्या आहेत. ८५ लाखांच आहे त्यातले ४० लाख द्या मला

**श्री. ईब्राहीम पटेल** :- आप्पा जे रस्ते आहेत. ते मंजुर रस्ते आहेत.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे** :- ४ नंबर वॉर्डाचे रस्ते घेत आहेत. तर तुम्हाला काहीतरी वाटायला पाहीजे यादी बनवतांना

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे** :- हे योग्य नाहीये अस , तुम्ही जर अस करत असाल तर हे योग्य नाहीये

**श्री. नितीन लढ्ढा** :- कैलासआप्पा साहेब ज्येष्ठ सदस्य आहेत. सौ.भारतीताई माजी महापौर आणि त्यांच्या वॉर्डात जर असे होत असेल तर हे योग्य नाहीये.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही भाऊ आमचा विषय आहे तो.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा नाही ना पण हे योग्य नाहीये.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही भाऊ तुम्ही पण तर होते ना तिथे

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही ना आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरताई तुम्ही बोलल्या की नाही १५ नंबर कुठेच नाहीये मग ४ नंबर पण नाहीये.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर**:- आप्पा तुमच्या वॉर्डात व्हायला नको अस नाहीये.

**श्री. कैलास सोनवणे** :- ताई नाही ना अस

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही ना आप्पा तस नाहीये.

**श्री. कैलास सोनवणे** :- जावु द्या आता मी मनपा फंडातुन घेईन. मनपा फंडातुन घेता येईल ना आम्हाला.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही ना आप्पा तस नाहीये काही बदल करायचे असतील तर तुम्ही सुचवा ना.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही जावु द्या काही बदल करायचे नाहीये आम्हाला आणि काही डिस्टर्ब पण करायचे नाहीये काय करायचे ते करून टाका.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो.

**श्री. कैलास सोनवणे** :- पण काय आहे की हे जे काही रिकामे काम करतात ना त्यांना काहीतरी वाटु द्या थोडफार, दिशाभुल कशी केली आहे की ४ नंबर मध्ये इतके कामं पाहा ना तुम्ही , अरे काय नवाबजादे आहे का , काही पण ४ नंबर का माझा वॉर्ड आहे का ? काहीपण हे चुकीचे आहे , सोनगिरे साहेब आहे का ईथे , आज नाहीये, यांना सांगा तुम्ही रंधे आहेत, अमृतकर आहेत यांना सांगा की ४ नंबर कुठे आहे आणि ५ नंबर कुठे आहे तर ते , ज्यांनी ईस्टिमेट बनवले असेल त्यांना समजायला पाहीजे.

**श्री. सुनिल महाजन** :- नाही , नाही आप्पा यादी आहे ती.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही, नाही यादी नाही ईस्टिमेट बनवले आहे भाऊ , इंजिनियर ठरवतो शिर्षक आणि अमाऊंट जी आहे ना ते इंजिनियर ठरवतो.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर**:- सन्मा. सदस्य श्री.राजुभाऊ घुगे पाटील यांनी प्रस्तावित केलेली ५८ कोटीतील कामे १ ते ४ काम आणि त्यांनतर त्यांनी सुचविलेली १ ते ९ काम , त्यानंतर सन्मा.सदस्या. सौ.प्रतिभाताई देशमुख यांनी सुचविलेली १ ते ३ कामे आणि सन्मा.सदस्य. तथा उपमहापौर यांनी सुचविलेली १ ते ४ कामे ही सर्व कामे या यादीमध्ये समावेश करण्यात यावे आणि प्रशासनाकडुन येणाऱ्या १०० कोटीमधुन या निधीमध्ये या सर्व कामांचा समावेश करण्यात यावा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रतिभाताईंची जी काम आहेत त्यात त्यांनी काही बदल सुचविलेले आहेत.

**मा.महापौर**:- बदल करायचे आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- म्हणजे जी ३ काम जी दिलेली आहेत. तर ती ५८ कोटीमध्ये ती काम आलेली आहेत. तर ती रद्द करून त्यांनी दुसरी काम सुचविलेली आहेत.

**सौ.ज्योति चव्हाण** :- महापौरताई आमच्याही प्रभागातील कामांचा समावेश करून घ्या.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो ज्योतिताईंच्या प्रभागातीलही कामे सांगीतलेली आहेत. ती यादीत येतील म्हणजे ती काम दलितवस्तीमध्ये आलेली आहेत ऑलरेडी.

**मा.उपमहापौर**:- एक्सचेंज करावे लागतील.

**मा.महापौर**:- एक्सचेंज करून घ्यावे लागेल. निधीमध्ये बदल करून ते काम

**श्री. नितीन लढ्ढा** :- परत बदल करता येईल.

**मा.महापौर**:- सर्व दुरूस्ती करण्यात येवुन सदर ठरावास मान्यता देण्यात येत आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर**:- या प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. १६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील (घुगे पाटील) यांचे दि.०५/१२/२०२२ चे पत्र साबा/आ.क्रं.३२९ दि.०५/१२/२०२२ व साबा/आ.क्रं.३३१ दि.०८/१२/२०२२ अन्वये प्राप्त झाले असुन सदर पत्रासोबत रक्कम रु.५८.०० कोटी निधीतुन रस्त्यांची कामे करण्याबाबत अ.क्र.०१ ते १०२ पर्यंतच्या रस्त्यांची नावे व अंदाजित खर्चाची रक्कम रु.६१,९९,०८,१३२/- मात्रचा तपशिलसह यादी सादर केलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामांकरीता सन २०१८ मध्ये शासनाने रक्कम रु.१००.०० कोटीच्या निधीला तत्वत: मान्यता प्रदान केलेली होती. त्यानुसार सादर करण्यात आलेल्या प्रस्तावापैकी रक्कम रु.४२.०० कोटीच्या प्रस्तावापैकी ३८.२८ कोटी

रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असुन या निधीतुन शहरातील एकुण ४९ रस्त्यांची कामे प्रस्तावीत असुन कार्यान्वीय यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग जळगांव आहे.

तत्वत: मान्यता प्राप्त रक्कम रु.१००.०० कोटी निधी पैकी रक्कम रु.३८.२८ कोटी वगळता उर्वरीत रक्कम ६१.७२ कोटी निधीतुन शहरातील प्रमुख रस्त्यांची पुर्नबांधणी करण्याचे कामी सन्मा.सदस्यांनी यादी प्रस्ताव सादर केला असुन तो सोबत जोडण्यात आलेला आहे. जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा व मलनि:स्सारण कामी मोठया प्रमाणात रस्त्यांचे खोदकाम झालेले असल्याने मनपा क्षेत्रातील विविध प्रभागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या यादीत एकुण रक्कम रु.६१,९९,०८,१३२/- मात्रचे यादीतील अ.क्र.१ ते १०२ कामांपैकी सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी पत्राव्दारे सभागृहात यादीतील अ.क्र.३४ चे रक्कम रु.४५०००००० चे काम कमी करणेबाबत विनंती केलेली असुन सभागृहातील चर्चेनुसार यादीतील अ.क्र.३४ मधील काम रद्द करुन यादीतील अ.क्र.१ ते १०१ कामांची होणारी रक्कम रु.६१,५४,०८,१३२/- मात्र शासनामार्फत निधी मागणी करण्याकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच १. सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांनी सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार व मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांना सन्मा.सदस्य यांनी दिलेले पत्र व पत्रासोबतच्या यादीतील अ.क्र.१ ते ९ ची कामे उपरोक्त प्रस्तावात समाविष्ट करणेबाबत मा.पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या निर्देशानुसार रक्कम रु.१४,३०,००००० मात्रचा निधी शासनामार्फत मागणी करण्याकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच २.सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांचे पत्राप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांना सन्मा.सदस्या यांनी दिलेल्या पत्रामधील यादीतील अ.क्र.१ ते ३ ची कामे उपरोक्त प्रस्तावात समाविष्ट करणेबाबत मा.पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या निर्देशानुसार रक्कम रु.४५,००००० चा निधी शासनामार्फत मागणी करण्याकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच ३.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार व मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांना सन्मा.सदस्य यांनी दिलेल्या पत्रामधील यादीतील अ.क्र.१ ते ४ ची कामे उपरोक्त प्रस्तावात समाविष्ट करणेबाबत मा.पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या निर्देशानुसार सदर कामांसाठी शासनाकडुन निधी मागणी करण्याकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सोबतच्या यादीतील कामांच्या रकमेची शासनामार्फत निधीची मागणी करण्याकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- राजेंद्र झिपरु पाटील**

**अनुमोदक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव ५८ कोटी अंतर्गत कामे...**

महासभा क्र.४४ महासभा ठराव क्र.**९६२**

दि.२३/१२/२०२२

| अ. क्र | कामांचे नावे | रक्कम रु. | प्रभाग क्रमांकानुसार रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्र. क्र. १ सिटी कॉलोनी परिसरात डांबरीकरण करणे. | ५०००००० | **५००००००** |
| २. | प्र. क्र. २ पुंडलिक नामदेव मनपा कर्मचारी यांच्या घरापासून ते नाना नन्नवरे मिलिंद सपकाळे यांचे गेहुणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २०००००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | प्र. क्र. २ हरिओम नगर मधील बाजीराव महीपत यांच्या घरापासून ते हनुमान मंदिरा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २०००००० | |
| ४. | प्र. क्र. २ उज्वल चौक गणपती मंदिर ते दुर्गाताई सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००० | |
| ५. | प्र.क्र.२ मध्ये काळे विहीर पासुन ते हनुमान सॉ.मिल क्षत्रिय मराठा समाज मंदीर पर्यंत तसेच बगीचाच्या आजुबाजुस रस्ता डांबरीकरन करणे. ऐवजी प्र.क्र. २ दत्त कॉलोनी सनं. ३४२/६ ब येथे रस्ते डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| ६. | प्र.क्र.२ प्रल्हाद पोळ यांच्या घरापसुन ते नागला किराणा रस्ते डांबरीकरन व आर.सी.सी गटार बांधणे व युनिट ते सावंत यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरन व आर.सी.सी गटार बांधणे | ५३००००० | |
| ७. | प्र.क्र.२ वृंदावन कॉलोनी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | २५००००० | |
| ८. | प्र. क्र. २ सात खोल्या व पवन नगर रेल्वे लाईन जवळील परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे. | ४५००००० | |
| ९. | प्र. क्र. २ सुनंदी नगर प्रजापत नगर व कांचन नगर दुर्गा परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे. | ३५००००० | |
| १०. | प्र. क्र. २ मधील मोहमद्दिया नगर गट नं. ३४५/३,३४४ व ३४५ मधील सर्वे रस्ते खडकीकरण करून डांबरीकरण करणे. | ८४३७६५० | |
| ११. | प्र. क्र. २ मधील उमरकॉलोनी गट नं. ३४४/८/९, ३४४/४ अ. बाबा नगर गट नं. ३४४/७,३४४/१०,३४४/५ येथील सर्वे रस्ते खडकीकरण करून डांबरीकरण करणे. | ९२४९५२० | |
| १२. | प्र. क्र. २ मधील उस्मानिया पार्क गट नं. ४१८ मधील सर्वे रस्ते खडकीकरण करून डांबरीकरण करणे. | २९५२९००० | |
| १३. | प्र. क्र. २ मधील गॅलक्सी पार्क गट नं. ४१७ सित्तीया पार्क गट नं ३४४ मधील सर्वे रस्ते खडकीकरण व डांबरीकरण करणे. | ३९९८००० | |
| १४. | प्र. क्र. २ मधील अकबर कॉलोनी ऐ.बी पार्क गट नं. ४१६ मुबल गट नं. ३४६येथील सर्वे रस्ते खडकीकरण करून डांबरीकरण करणे. | ५२४८५०० | |
| १५. | प्र. क्र. २ मधील के.जी.एन. नगर गट नं. ४१५ येथील सर्वे रस्ते खडकीकरण करून डांबरीकरण करणे. | ४३६०००० | |
| १६. | प्र. क्र. २ मधील मन्नत पार्क मधील येथील सर्वे रस्ते खडकीकरण करून डांबरीकरण करणे. | ४७३७००० | **९१३५९६७०** |
| १७. | प्र.क्र.३ ब मधील मोहन चित्र मंदिर जवळील नवीन असोदा रोड ते जुना असोदा रोड डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| १८. | प्र.क्र.३ अंतर्गत दादा दरबार खेडी गट क्र. २/१ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| १९. | प्र.क्र.३ अंतर्गत जळगाव शिवार गट क्र. ८८ ते दशरथ नगर १०० फुटी रस्त्यापर्यंत डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| २०. | प्र.क्र.३ ब मधील युवराज तुकाराम कोळी यांच्या घरापासून ते असोदा रोड बगीचा जवळील रोड डांबरीकरण करणे. | ५०००००० | **२०००००००** |
| २१. | प्र.क्र.४ व ५ शास्त्री टॉवर ते स्टेडियम चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरन करणे. | ४३२००००० | |
| २२. | प्र.क्र.४ व ५ स्टेडियम चौक ते आकशवाणी चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरन करणे. | ६००००००० | |
| २३. | प्र.क्र.४ व ५ जिल्हा कोर्ट ते चित्रा चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरन करणे. | २००००००० | **१२३२००००० ०** |
| २४. | प्र.क्र.६ मधील बाबा हरदासराम मंगलकाया्रलय ते सरदार पटेल हॉल (लेवा भवन) पर्यंत रस्ता डांबरीकरन करणे. | ५०००००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | प्र.क्र.६ अंतर्गत रामदेव बाबा मंदीर ते श्री. डांबरे आप्पा यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३०००००० | ८०००००० |
| २६. | प्र.क्र.७ शिव कॉलनी मधील मारोती पार्क गट क्र. मधील पुर्व व पश्चिम दिशेतील रस्ते डांबरीकरण करणे | ५०००००० | |
| २७. | प्र.क्र.७ अंतर्गत रिंगरोडवरील हरीश स्विट मार्ट मागील मोहन हेअर आर्ट ते संगम सासायटी, यशवंत कॉलनी पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ४५००००० | |
| २८. | प्र.क्र.७ हनुमान मंदिर ते गीताई बिल्डींग तसेच गणगोपी अर्पाटमेंट व अशोक बेकरी ते बजरंग बोगदा रस्ता डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| २९. | प्र.क्र.७ श्री हरी नगर व गणेश कॉलनी या भागातील संपूर्ण रस्ते डांबरीकरण करणे. | ६०००००० | २०५००००० |
| ३०. | प्र.क्र.८ गट नं. १०३ निमखेडी शिवार धनश्री नगर मधील व गट नं.१०२/२ निमखेडी शिवार जिवराम नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ६५००००० | |
| ३१. | प्र.क्र.८ निमखंडी शिवार देवराम नगर व परिसरात रस्ते डांबरीकरण करणे. | ६०००००० | |
| ३२. | प्र.क्र.८ चंदुअण्णा नगर निमखेडी शिवार गट नं. २६ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ५५००००० | |
| ३३. | प्र.क्र.८ पिंप्राळा रोड ते मोती महाल चौका पर्यंत ते हर्षगिरी अर्पाटमेंट पर्यत व परिसरात रस्ता डांबरीकरण करणे. | ५५००००० | २३५००००० |
| | प्र.क्र.९ टेलिफोन ऑफिस समोरील रस्ता डांबरीकरण करणे.<br>(सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी पत्राव्दारे सभागृहात यादीतील अ.क्र.३४ चे रक्कम रु.४५००००० चे काम कमी करणेबाबत विनंती केलेली असुन सभागृहातील चर्चेनुसार सदरचे काम अ.क्र.३४ मधील काम रद्द केले असे.) | - | |
| ३४. | प्र.क्र.९ दशरथ गवळे ते रातीलाल बोरसे (ऑक्सिजन पार्क चा बाजूचा रस्ता) कॉक्रीटीकरण करणे. | १०००००० | |
| ३५. | प्र.क्र.९ विद्यानगर बालमोहन शाहा, मगन पाटील साहेब ते श्रीराम मंदिर ग्राऊंड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १५००००० | |
| ३६. | प्र.क्र.९ अतुल डेअरी ते डॉ.मिलिंद बारी यांच्या घरापर्यंत ते नाना सोनार घरापर्यंत दांडेकर नगर मधील रस्ता डांबरीकरण करणे. | ४५००००० | |
| ३७. | प्र.क्र.९ इंद्रनील सोसायटी गट नं. ३४३ पिंप्राळा परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे | ५५००००० | |
| ३८. | प्र.क्र.९ प्रभू श्री दत्त मंदीर ट्रक्टर गॅरेज ते स्वट सोहन रस्ता डांबरीकरण करणे. | १५००००० | |
| ३९. | प्र.क्र.९ ऑडिटर कॉलनी ते स्वीट मार्ट पर्यत परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे. | १५००००० | |
| ४०. | प्र.क्र.९ पांढरी लॅट पिंप्राळा भास्कर आबा घरापासून ते डॉ. कैलास पाटील घरापर्यंत ते नगरसेवक विजय पाटील ते नाल्यापर्यंत डॉ. फेगडे यांचे रस्ते डांबरीकरण करणे. | ३०००००० | |
| ४१. | प्र.क्र.९ शंकर आप्पा नगर दाभाडे वकील ते रिगल हेअर कटिंग दुकानापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ९५०००० | |
| ४२. | प्र.क्र.९ गट नं. १३/१/२ प्लॉट नं. ५९ ते ५४ रस्ते डांबरीकरण करणे. | १०६८७५० | |
| ४३. | प्र.क्र.९ गट नं. १३/१/२ प्लॉट नं. ०१ ते १६ रस्ते डांबरीकरण करणे. | ८२५००० | |
| ४४. | प्र.क्र.९ गट नं. १३/१/२ प्लॉट नं. ५३ ते २५ रस्ते डांबरीकरण करणे. | ६७५००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. | प्र.क्र.९ गट नं. १३/१/२ प्लॉट नं. १८ गट नं. १०/२ प्लॉट नं ३३ रस्ते डांबरीकरण करणे. | ६३७५०० | |
| ४६. | प्र.क्र.९ गट नं. १०/२ प्लॉट नं. ३४ ते ४७ रस्ते डांबरीकरण करणे. | १३५०००० | |
| ४७. | प्र.क्र.९ गट नं. १०/२ प्लॉट नं. ०९ ते गट नं. ११/१अ/२अ/२ प्लॉट नं. १५ रस्ते डांबरीकरण करणे. | १६८७५०० | |
| ४८. | प्र.क्र.९ गट नं. १०/२ प्लॉट नं. ६५ ते ५९ रस्ते डांबरीकरण करणे. | ७५०००० | |
| ४९. | प्र.क्र.९ गट नं. १०/२ प्लॉट नं. ५७ ते गट नं. ११/३अ प्लॉट नं. ०४ रस्ते डांबरीकरण करणे. | ३९३७५० | |
| ५०. | प्र.क्र.९ गट नं. १०/२ प्लॉट नं. २२ ते ३४ रस्ते डांबरीकरण करणे. | ३७१२५० | |
| ५१. | प्र.क्र.९ गट नं. ४० द्रोपदी नगर परिसरात रस्ते डांबरीकरण करणे. | ३०००००० | |
| ५२. | प्र.क्र.९ गट नं. ३७/२ नवजीवन सुपर शॉप ते ओम शिव गणेश मंदिर ते महाराणा प्रताप शाळा ते पिंप्राळा मेन रस्त्यापर्यंत रस्ते डांबरीकरण करणे. | ३५००००० | |
| ५३. | प्र.क्र.९ मध्ये पिंप्राळा शिवार गट. नं. ३४८/२ प्लॉट नं. ३८ ते ३० रस्ते डांबरीकरण करणे. | १०५०००० | |
| ५४. | प्र.क्र.९ मध्ये पिंप्राळा शिवार गट. नं. ३४८/२ प्लॉट नं. ३१ ते ४२ रस्ते डांबरीकरण करणे. | १११६९३८ | |
| ५५. | प्र.क्र.९ मध्ये पिंप्राळा शिवार गट. नं. ३४८/२ प्लॉट नं. ०१ ते ०६ रस्ते डांबरीकरण करणे. | ११७९३७५ | |
| ५६. | प्र.क्र.९ मध्ये पिंप्राळा शिवार गट. नं. ३४८/२ प्लॉट नं. १८ ते डी.पी रोड रस्ते डांबरीकरण करणे. | ३४६८७५० | |
| ५७. | प्र.क्र.९ मध्ये पिंप्राळा शिवार गट. नं. ३४७ North - South रस्ते डांबरीकरण करणे. | ६९३७५० | |
| ५८. | प्र.क्र.९ मध्ये पिंप्राळा शिवार आर एल कॉलनी परिसर मंगलसिंग पाटील यांच्या घरापासून ते मधुकर पाटील यांच्या घरापर्यंत रस्ते डांबरीकरण करणे. | ७००००० | |
| ५९. | प्र.क्र.९ मध्ये पिंप्राळा शिवार गट. नं. ०९/२/१ बाजार रोड ते परमार्थ निकेतन व महादेव मंदिराची मागची बाजू इंगळे व पवारांची गल्ली रस्ते डांबरीकरण करणे. | २०००००० | **४८४१७५६३** |
| ६०. | प्र.क्र.१० पाटीलवाडा परिसर आणि भिलवाडा येथे रस्ते डांबरीकरण करणे. | ६३२०६८५ | **६३२०६८५** |
| ६१. | प्र.क्र.११ मधील वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर रेल्वे पुलापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १३६८५७९३ | |
| ६२. | प्र.क्र.११ पिंप्राळा गट १३४ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | १०९८२७३२ | |
| ६३. | प्र.क्र.११ मधील श्याम नगर, धनगर वाडा, तडवी वाडा येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | ६८६०४३७ | |
| ६४. | प्र.क्र.११ पिंप्राळा गट नं. ६१.६२ व ६३ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | १०४०५१७६ | **४१९३४१३८** |
| ६५. | प्र.क्र.१२ मध्ये आरधना कॉलनी पोष्टल कॉलनी गव्हरमेंट पॉलटेक्निकल कंपाऊंड ते रामानंद नगर मुख्य रसत्यापर्यंतचे अप्रोच रस्ते डांबरीकरण करणे. | ९७००००० | |
| ६६. | प्र.क्र.१२ अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ते रामदास कॉलनी बगीचा लगतचा १५ मी रुंद डी.पी रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००००० | |
| ६७. | प्र.क्र.१२ अंतर्गत चर्च ते सुरेश नगर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १०३००००० | |
| ६८. | प्र.क्र.१२ मध्ये श्रद्धा कॉलोनी मधील श्री पंडित प्लॉट नं. १ यांच्या घरापासून ते अत्तरदे चक्की पर्यंतचा ९ मी. रस्ता शिव रोड वरील नाल्या पर्यंत डांबरीकरण करणे. | ३५००००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६९. | प्र.क्र.१२ मध्ये स्नेहल कॉलोनी येथील श्री. पवार साहेब (माजी शिक्षणाधिकारी) यांच्या घरासमोरील रस्ता शिव रोडपर्यंत डांबरीकरण करणे. | ३५०००००० | **३७००००००** |
| ७०. | प्र.क्र.१३ मधील मेहरूण स.नं. ४११ लायन्स हॉल परिसरातील तसेच स.नं. ४१२ नेहरू नगर भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| ७१. | प्र.क्र.१३ मधील स.नं. ४५१.४५२ संभाजी नगर नित्यानंद नगर मधील १२ मी. रुंद डी.पी. रस्ता डांबरीकरण करणे. | ७५००००० | |
| ७२. | प्र.क्र.१३ मधील नेहरू नगर सर्व्हे नं. ४१२ मध्ये मोहाडी रस्ता ते शिरसोली रोड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| ७३. | प्र.क्र.१३ मधील रायसोनी नगर ते मनपा हद्द पर्यंतचा मोहाडी रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००००० | **२७५०००००** |
| ७४. | प्र.क्र.१४ मधील मेहरूण स.नं. ४३६, ४३८ व ४३९ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | १५०००००० | |
| ७५. | प्र.क्र.१४ मधील रा.म.क्रं. ६ ते गणपती मंदिरापर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | ७५००००० | |
| ७६. | प्र.क्र.१४ स्वामी समर्थ चौक ते पाटचारी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | ७५००००० | |
| ७७. | प्र.क्र.१४ अंतर्गत गणपती नगर रोटरी क्लब परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | ७५००००० | |
| ७८. | प्र.क्र.१४ अंतर्गत सर्व्हे नं. २७१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ६२००००० | **४३७०००००** |
| ७९. | प्र.क्र.१६ कासमवाडी परिसरात रस्ते डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| ८०. | प्रभाग क्र. १६ मध्ये नाथवाडा प्रमोद डेअरी समोरील कै.दत्ताबाबा सोनवणे यांची गल्ली डांबरीकरण करणे. | १५००००० | |
| ८१. | प्रभाग क्र. १६ मध्ये देविदास कॉलनी ते टी.एम नगर रस्ता डांबरीकरण करणे. | ९९००००० | |
| ८२. | प्रभाग क्र. १६ मध्ये चोखा मेळा बोर्डिंग ते लाठी शाळापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३०००००० | |
| ८३. | प्र.क्र. १६ सालार नगर येथे रस्ते डांबरीकरण करणे. | १०००००००० | **२९४०००००** |
| ८४. | प्र.क्र. १७ अयोध्या नगर स.न. १४१/क/अ/ड रस्ते डांबरीकरण करणे. | ४९९८५०० | |
| ८५. | प्र.क्र.१७ अंतर्गत सावित्री नगर परिसरातील तसेच बारा ज्योतीलिंग मंदिर समोरील भागातील ९ मीटर रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ५०००००० | |
| ८६. | प्र.क्र.१७ एस. टी. वर्कशाप पासुन से काशिबाई शाळेपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६२७७५७६ | |
| ८७. | प्र.क्र.१७ बुनकर वाडा ते पांझरापोळ चौका पर्यंत व परिसरातील (जुने जळगाव) रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | ६५००००० | |
| ८८. | प्र.क्र.१७ मधील हनुमान मंदिर मधील हनुमान पॅराटॉईज ते गार्गी पार्क पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ४०००००० | |
| ८९. | प्र.क्र.१७ मधील स.नं. ३९/१ मधील बापु सैदाने घरापासुन माकोडे चक्की पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००० | |
| ९०. | प्र.क्र.१७ मधील तृप्ती कॉर्नर पासून ते हनुमान नगरच्या पुला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १५००००० | |
| ९१. | प्र.क्र.१७ मधील कौतिक नगर मधील सर्व्हे नं.४३ मधील रस्ता डांबरीकरण करणे. | १०००००० | |
| ९२. | प्र.क्र.१७ मधील सरस्न वासू अण्णा यांच्या घरापासू पोल फॅकटरी मागील रस्ता डांबरीकरण करणे. | २५००००० | |
| ९३. | प्र.क्र.१७ मधील हनुमान मंदिर (अयोध्या नगर मधील) पासून चौधरी यांच्या घरापर्यंत कासार मंगल कार्यालय पुढील भाग ते अशोक नगर मधील गणपती मंदिरा पर्यंत भाग रस्ता डांबरीकरण करणे. | २०००००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९४. | प्र.क्र.१७ मधील अयोध्या मेडीकल पासून मिठाराम लोखंडे यांच्या घरापर्यंत गट नं. ४० रस्ता डांबरीकरण करणे. | ४०००००० | |
| ९५. | प्र.क्र.१७ सिद्धविनायक शाळेपासुन ते भारूळ साहेबांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ८००००० | |
| ९६. | प्र.क्र.१७ सुर्यकांत लाहोटी यांचे घरापासून ते रेमंड गेट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १५०००००० | **४१०७६०७६** |
| ९७. | प्र.क्र.१८ अंतर्गत आस्का नगर स.नं.१०/१/२ व १९/१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | १२०००००० | |
| ९८. | प्र.क्र.१८ अंतर्गत स.नं.१५ मधील संपूर्ण भागात रस्ते डांबरीकरण करणे. | १५०००००० | **२७००००००** |
| ९९. | प्र.क्र.१९ सुप्रीम कॉलनी अंतर्गत स.नं.१६७/१ व १६७/२ या भागात रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | ८०००००० | |
| १००. | प्र.क्र.१९ सुप्रीम कॉलनी अंतर्गत स.नं.१६६/१ व १६६/२ अ/३ या भागातील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | ९०००००० | |
| १०१. | प्र.क्र.१९ अंतर्गत पोलीस कॉलनी, सुप्रीम कॉलनी परिसर स.नं.१६४ व स.नं.१८८ या भागामध्ये रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | ९०००००० | **२६००००००** |
| | **एकुण :-** | **६१५४०८१३२** | |
| सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांनी सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार व त्यांनी सभागृहात मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांना दिलेले पत्र व मा.पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या निर्देशानुसार यादीतील अ.क्र.१ ते ९ कामे खालील प्रमाणे | | | |
| १०२. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत एल.आय.सी. कॉलनी, गजानन कॉलनी, फॉरेस्ट कॉलनी, गणगोपी अपार्टमेंट, आनंद नगर, स्टेट बँक कॉलनी, नंदनवन कॉलनी, चंद्रप्रभा कॉलनी, मित्र नगर विशाल कॉलनी, रेल्वे कॉलनी, विजय कॉलनी, कृषी कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | ५००००००० | |
| १०३. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत श्री.प्रमोद बसेर यांच्या घरापासुन ते डॉ.किनगे यांच्या हॉस्पिटल पर्यंतचा डि.पी.रोड व शिक्षकवाडी मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे | ८०००००० | |
| १०४. | प्रभाग क्र.०२ मध्ये शिवाजी नगरमधील धनाजी काळे नगर पासुन ते कानळदा रस्त्यापर्यंतचा मुख्यरस्ता (डि.पी.रोड) डांबरीकरण करणे | ७०००००० | |
| १०५. | प्रभाग क्र.०९ मधील गणपती मंदिर शिक्षक कॉलनी परमार्थ निकेतन ते शिंदे नगर आव्हाणे रस्त्यापर्यंत आर.एल.कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे | १००००००० | |
| १०६. | प्रभाग क्र.०९ मधील मानवसेवा शाळेपासुन ते अष्टभुजा गेट शिवरस्ता १२ मिटर रस्ता डांबरीकरण करणे | १००००००० | |
| १०७. | प्रभाग क्र.१७ मधील काशिनाथ लॉज (एम्पेरिया हॉटेल) पासुन ते नॅशनल हायवे वरील टि.व्हि.टॉवर पर्यंत असलेला मनपा हद्दीतील १८ मिटर चा रस्ता तसेच सदर रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणे | ४००००००० | |
| १०८. | प्रभाग क्र.०६ मधील नानीबाई हॉस्पीटल ते रुख्मा टेन्ट हाऊस पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ५०००००० | |
| १०९. | प्रभाग क्र.०६ मधील रोझ गार्डन जवळील रस्ता डांबरीकरण करणे | १००००००० | |
| ११०. | प्रभाग क्र.०६ मधील पोस्ट ऑफिस मागील रस्ता डांबरीकरण करणे | ३०००००० | |
| | **एकुण :-** | **१४३०००००००** | |
| सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांचे पत्राप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या निर्देशानुसार यादीतील अ.क्र. १ ते ३ कामे खालील प्रमाणे | | | |
| १११. | गट नं.२७ निवृत्ती नगर महाजन यांचे घरापासुन ते अजय पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | १५००००० | |
| ११२. | गुरुदत्त गार्डन मुक्ताई नगर ते मयुरेश प्लॉझा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | १५००००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११३. | द्रोपदीनगर दिनानाथ भामरे यांच्या घरापासुन ते प्रा.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरी करणे | १५०००० | |
| | **एकुण :-** | **४५००००** | |
| मा.उपमहापौर श्री.कुलभुषण विरभान पाटील यांचे पत्राप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या निर्देशानुसार यादीतील अ.क्र.१ ते ४ कामे खालील प्रमाणे | | | |
| ११४. | मानराज पार्क हायवे रोड ते रायसोनी शाळेपर्यंत रस्ता | - | |
| ११५. | आझाद नगर सबस्टेशन पासुन ते दुध फेडरेशन नविन घरकुल हुडको पर्यंत रस्ता | - | |
| ११६. | आझाद नगर पासुन ते वाघ नगर रेल्वे पुलापर्यंत रस्ता | - | |
| ११७. | पिंप्राळा सिल्क मिल पासुन ते आशाबाबा रल्वे पुलापर्यंत रस्ता | - | |

**नगरसचिव विषय क्रं . १७ :-** पिंप्राळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक तयार करणे करिता तथा चबुतरा सुशोभिकरण करणे याकरिता अंदाजपत्रक तयार करणेसाठी वास्तुविशारद यांची नियुक्ती करणेस व त्यांना फी पोटी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे. याच्यासोबत मला एक सुचना मांडायची आहे. आपण याठिकाणी वास्तुविशारदाची नेमणुक करत असतांना जे आपल्याला त्याठिकाणी जे चबुतऱ्याच काम करायच आहे. तर त्या चबुतऱ्याच्या कामावर येणारा जो खर्च आहे. त्याला वित्तीय मान्यता मिळावी व याला प्रशासकीय मान्यता मिळावी. म्हणजे जेणेकरून त्या कामाला लवकरात लवकर सुरूवात करता येईल.

**श्री. कैलास सोनवणे** :- मंजुर आहे फक्त राजकारण करू नका.

**मा.उपमहापौर**:- माझ अनुमोदन आहे. मी हे काम सांगतोय आप्पा

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- याला जर तुम्ही विरोध केला , जर का निषेध केला तर वेगळा अर्थ होईल याचा.

**मा.महापौर**:- सन्मा.सदस्य उपमहापौरांनी.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अध्यक्ष महोदय, या विषयाला धरूनच १८ नंबरचा विषय आहे आमचा शिवाजी नगरचा जसा १७ मंजुर होतो आहे तसाच १८ नंबरचा मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर**:- हा विषय १७ तर मंजुर करून घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- ताई जसा हा विषय आहे ना तसाच करून घ्यावा.

**ॲड. सौ.शुचिता हाडा** :- महापौरताई

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर**:- आपण जो चबुतरा बांधणार आहे. तर त्याला

**ॲड. सौ.शुचिता हाडा** :- करून घ्या , करून घ्या काही अडचण नाही.

**मा.उपमहापौर**:- बोला नवनाथभाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- १७ नंबरला ही जी मंजुरात दिली आहे ती १८ नंबरला पण देण्यात यावी.

**श्री.प्रशांत नाईक** :- महापौरताई, याप्रमाणे मेहरूणमध्ये स्व.गोपीनाथजी मुंडे यांचा पुतळयाचे काम करण्याची मागणी आहे. तरी प्रशासनाने पुतळा उभारण्याचा प्रस्ताव येणाऱ्या महासभेमध्ये मी देणार आहे. तरी याबाबत समावेश करण्याचा विचार करावा ही विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- मंजुर होईल ना. मंजुर करू आपण

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- १७ नंबरचा विषयामध्ये जे घेतले आहे त्याप्रमाणे १८ नंबरमध्ये पण आर्कीटेक्ट नेमुन मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- सभेमध्ये सुचना मांडा नवनाथभाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नाही, नाही थोडस नवनाथभाऊंची मांडणी लक्षात येत नाही. म्हणजे त्यांची जी मागणी आहे म्हणजे हा जो विषय आहे त्याप्रमाणे म्हणजे १७ नंबरमध्ये जो विषय आहे की आर्कीटेक्ट नेमण्याचा विषय

आहे. तर त्याचप्रमाणे शिवाजी नगरच्या पुलाजवळचा आर्कीटेक्ट वेगळा नेमावा किंवा त्याचा स्वतंत्र प्रस्ताव आणावा आणि त्याठिकाणी सुध्दा चबुतरा बनविण्यासाठी या शिवाजी नगरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासाठीही आर्कीटेक्ट नेमण्यात यावा. म्हणजे दोघही ईस्टिमेट एकाच वेळी सुरू होतील आणि ते काम सुरू होईल.

**मा.उपमहापौर**:- विशालभाऊ त्या प्रस्तावातच म्हंटलेले आहे की, त्या ३ वर्षाकरीता नेमणुक करतोय आपण

**श्री.विशाल त्रिपाठी** :- हो ना

**मा.उपमहापौर**:- आपल्या शहरामध्ये जे महापुरुषांचे पुतळे असतील ते सर्व यांच्यामार्फत

**श्री.विशाल त्रिपाठी** :- हो ना आता कस आहे शिवाजी नगरचा जो विषय आहे ना तर तो पण होवुन जाईल. अस आमच म्हणण आहे. त्यात फक्त ते टाकण्यात यावे.

**ॲड. सौ.शुचिता हाडा** :- १७ नंबरचा जो विषय आहे तो मुळ आर्कीटेक्ट जो आहे त्याची नियुक्ती आपल्याला करायची आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर**:- दोन मिनिंट शांतता ठेवा शुचिताताई बोलताहेत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- महापौरताई, १७ नंबरचा विषय आपला आर्कीटेक्ट पॅनलची नियुक्ती करण्याचा हा जो विषय आहे तर आर्कीटेक्ट पॅनलची नियुक्ती यासंदर्भात प्रशासन नेमक कस धोरण राबविणार आहे यासंदर्भात जस डॉकेटमध्ये दिलेल आहे. म्हणजे आधीचे जे आपले जे आर्कीटेक्ट पॅनल होते त्याची मुदत संपली आहे. म्हणजे तेच धोरण आहे प्रशासनाच की येरे माझ्या मागल्या, आता मुदत संपते आहे , मुदत संपण्यापुर्वी ही प्रोसिजर करायला पाहीजे ती केलेली नाही. आता या विषयामुळे त्याला चालना मिळाली आणि तो विषय अजेंड्यावर आला , प्रशासनाने फक्त सभेसमोर सांगाव की कसे करणार आहे, कशा पध्दतीने राबविणार आहे आणि काय करणार आहे. याची माहिती फक्त सभागृहाला द्यावी.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- हा जो विषय आहे की ३ वर्षाकरीता वास्तुविशारद पॅनलची नियुक्ती करणार आहोत. तर त्याच्या अनुषंगाने आपण निविदा प्रक्रीया वगैरे करून ज्या काही शासनाचे आदेश, अटी- शर्तीनुसार आपण त्या पॅनलची नियुक्ती करणार आहोत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- याच्या ज्या काही सुचना , अटी आहेत त्या सुचना व अटी या सर्व ठरवाव्या लागतील.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- हो , हो

**मा.उपमहापौर**:- या सदरील प्रस्तावामध्ये मी ज्या सुचना मांडली की याला वित्तीय खर्चाची मान्यता व प्रशासकीय मान्यता मिळावी हे पण ठरावामध्ये नमुद करून घ्यावे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- महापौरताई.

**मा.उपमहापौर**:- ताई हा विषय होवुन जावु द्या. मग आपण चर्चा करू.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- महापौरताई, मला एक सुचना मांडायची आहे १७ नंबरच्या विषयामध्ये कुलभुषणभाऊ की आर्कीटेक्ट पॅनलची नियुक्ती करायची आहे.

**मा.उपमहापौर**:- ताई आपण यासंदर्भात ज्यांची नियुक्ती केलेली आहे. त्याची पण माहिती पाहीजे आहे का आपल्याला

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- त्याची नियुक्ती कुठे केली आपण नियुक्तीची मागणी करतोय ना. त्याची जाहीर सुचना निघाली नाही. निविदा झाल्यानंतरच पॅनल नियुक्त होईल. या पुतळयांच काम करायच आणि परत ३ वर्षासाठी महानगरपालिकेमध्ये जे जे काही विषय समोर येतील. त्या सगळयांच काम ते पॅनल करेल. यासाठी आपण एक स्वतंत्र कोणी आर्कीटेक्ट ठरवुन टाकला आहे का? कारण तसा काही याच्यात उल्लेख होत नाहीये. त्याच्यात उल्लेख असाच आहे की आर्कीटेक्ट पॅनलची आपली मुदत संपलेली आहे आणि म्हणुन आपण नव्याने पॅनल नेमतो आहे. आणि आपण जर पॅनल नेमतो आहे तर आपल्याला जाहीर सुचना प्रसिध्द करावी लागेल आणि निविदा मागवाव्या लागतील. त्या निविदा आल्यानंतर त्याची छाननी , पडताळणी ती स्क्रुटिनी झाल्यानंतर मग हे पुन्हा मंजुरीसाठी सभेसमोर अर्थातच सभेसमोर येईल. हिच प्रोसिजर फॉलो होणार आहे. एवढाच येथे प्रशासनाकडुन खुलासा सभेसमोर मला अपेक्षित आहे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- आता याच्यामध्ये ताईने जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याच्या अनुषंगाने पॅनलची निवड करतांना ज्या प्रोसेस आहेत त्या आपल्याला कराव्या लागतील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- ती प्रोसेस तर करावीच लागणार ना आपल्याला ते फक्त प्रशासनाने सभेसमोर मांडाव की जाहीर सुचना देऊन , निविदा राबविली जाणार , स्क्रुटिनी होणार त्यानंतर मग हे सगळ होणार. तर हे प्रशासनाने सभेसमोर सांगावे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते तसेच मा. महापौर, मा.उपमहापौर, मा.उपायुक्त तथा मुलेअ आपसात चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर**:- सदर विषयामध्ये पिंप्राळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक तयार करणे व चबुतरा करणे व सुशोभिकरण करणेसाठी त्याच अंदाजपत्रक तयार करणे व वास्तुविशारद यांची नेमणुक करणे असा हा विषय होता. तर सदरील विषयामध्ये सर्व सन्मा.सदस्यांच्या चर्चेनुसार असे दिसते की परिपुर्ण प्रशासकीय प्रस्ताव नाहीये. तरी आपल्याला याची नियुक्ती करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने निविदा प्रक्रीया राबवावी लागणार आहे. परंतू आपल्याला लवकरात लवकर सदरील काम हाती घ्यावे लागणार आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- कुलभुषणभाऊ आपण ऑनलाईन राबवणार आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपण पेपरला जाहीर निविदा सुचना प्रसिध्द केलेली आहे.

**मा.उपमहापौर**:- ठिक आहे ना ऑनलाईन पध्दतीने म्हणा किंवा जी काही पध्दत असेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- मी सांगते आहे. प्रशासनाने सांगाव सभेसमोर आणि प्रशासनाचा व्हिव येवु द्या सभेसमोर कारण काय आहे की नियुक्ती होणार आणि काय आहे भाऊ की हा विषय फक्त या पुतळया करीता मर्यादित नाहीये हा आपला आर्कीटेक्ट पॅनल नियुक्तीचा विषय आहे. त्या विषयाला चालना या पुतळयासाठी मिळालेली आहे. पॅनल नियुक्ती फक्त मी या विषयावर बोलते आहे. जी प्रोसिजर जी आहे ती प्रशासनाने सभागृहासमोर सांगावी.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- ताई याच्यामध्ये जे आहे आता आपण जो पुतळा , शिवस्मारक जे उभारणार आहोत. तर त्या कामासाठी व इतर विविध विकास कामे व आरक्षण असतात किंवा आराखडा तयार करण्यासाठी आपण नियुक्ती करणार आहे. म्हणजे ३ वर्षासाठी जी काही कामे असतील त्याच्यासाठी हे आपले हे पॅनल राहील. त्याच्यासाठी जी प्रोसिजर आहे जस आपण सांगीतल्याप्रमाणेच राहील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- नाही ना मग प्रोसिजर सांगा सभागृहासमोर.

**श्री.चंद्रकांत वानखेडे,उपायुक्त तथा मु.ले.अ** :- त्याच्यामध्ये जे आहे नेमाडे साहेब असतील आणि आपले जे हे शिवस्मारक आहे. तर त्याच्यासाठी आपण अंदाजपत्रक तयार करून घेवुन आपण हे लवकर प्रक्रीया करणार आहोत की जेणेकरून हे काम लवकरात लवकर होईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- हो ना आर्किटेक्ट पॅनल नियुक्ती नंतरच हे काम होईल.

**मा.उपमहापौर**:- ताई आपण याच्यामध्ये आर्कीटेक्ट नियुक्तीचा जो विषय आहे, शिवस्मारकाचा जो विषय आहे. आपण आता आपल्या इंजिनियर कडुन किंवा आता आपले जे आहेत महानगरपालिकेचे त्यांच्याकडुन ईस्टिमेट तयार करून घेवु काही अडचण नाहीये ना.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- त्याच्याकडुन ईस्टिमेट तयार करून घ्यायला काहीच विरोध नाहीये माझा, आपल्याला पॅनल आर्कीटेक्ट ची जी नियुक्ती करायची आहे.

**मा.उपमहापौर**:- ताई मी पुढची सुचना मांडतोय की आज रोजी आपल्याकडे वास्तुविशारदांच पॅनल जे असत ते आज अस्तित्वात नाहीये आणि ३ वर्ष मुदत देणार आहोत आणि शिवस्मारकासाठी आपल्याला वेळ लागणार आहे आणि जे काही विविध पध्दती आपली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- नाही तर साधारण किती वेळ लागणार आहे. म्हणजे जाहीर सुचना कधी प्रसिध्द होईल याच्यासाठी.

**मा.उपमहापौर**:- ताई किमान १० दिवस तरी लागतील. एक १० ते १५ दिवस कसेही लागतील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- होवु शकते ना मग काय आहे.

**मा.उपमहापौर**:- हो ना मग आणि जे वास्तुविशारद आपण पॅनल वर नेमणार आहोत. त्यांना आपण अगोदर जे काम आहेत त्यांची सुचना आपण त्यांना देवु परंतू आज आपल्याला जे मेजरमेंट किंवा ईस्टिमेट बनवायचे आहे. तर त्याठिकाणी जे काही काम असेल ते सुरू करण्यासाठी जे काही लागेल तर ते या पॅनलसाठी न थांबता आपण वास्तुविशारद नेमणुकीची प्रोसेस ही चालु ठेवु. पण आपल्या महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या इंजिनियरकडुन त्याचे ईस्टिमेट तयार करून, त्याच्यासाठी तांत्रिक मान्यता आणि ज्या काही प्रोसेस आपल्याला

पुर्ण करायच्या आहेत. त्या व दोन चबुतरे बांधण्यासाठी जो काही खर्च येईल. तर त्याच्यासाठी मान्यता आणि प्रशासकीय मान्यता आपण देण्यात यावी अशी मला सभागृहाला विनंती आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- मला हे प्रशासनाने सांगाव की त्याच्या आधी होत असेल तर ते सभागृहासमोर आणण्याची गरजच नाही कारण प्रशासकीय बाब आहे ही, आता प्रशासनात काम करत असलेले इंजिनियर्स हे सगळ काम करू शकत आहेत. तर प्रशासनाने त्यांच्याकडुन ते करून घ्याव. यासाठी वेगळी सभेची मान्यता घेण्याची पण गरज नाही. आर्कीटेक्ट पॅनलचा आपला हा विषय वेगळा आहे आणि तो वेगळ्या प्रोसिजर ने जावु द्या आणि हे प्रशासनाचे अधिकार आहेत आणि हे प्रशासन करू शकत प्रशासन त्यांचे अधिकार वापरू शकते. त्याअनुषंगाने प्रशासनाने हा विषय मार्गी लावावा.

**मा.उपमहापौर**:- ताई मी सांगतो आता की पॅनलच्या संदर्भातील जो विषय आहे ना तो

**श्री.नितीन लढ्ढा** :- कुलभुषणभाऊ याच्यासंदर्भात काय झालेले आहे की धोरणात्मक निर्णय झालेला आहे मागच्या महासभेला आणि दि.०७/१०/२०२२ च्या महासभेमध्ये तो धोरणात्मक निर्णय झालेला आहे. आता राहीले फक्त प्रशासनाने त्याच्या संदर्भातील येणारा खर्च त्याचे अंदाजपत्रक तयार करावी आणि ते अंदाजपत्रक तयार केल्यानंतर त्याला रितसर प्रशासनाकडुन मान्यता घेवुन पुढील महासभेमध्ये किंवा जेव्हा होईल तेव्हा त्या खर्चाला मान्यता देणेचा प्रस्ताव मांडु आपण सभागृहासमोर

**मा.उपमहापौर**:- भाऊ या सगळयागोष्टी ज्या आहेत तर आपला या सगळया गोष्टींसाठी उद्देश जो आहे की १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती असते आणि ही जयंती असते तर त्या दिवशी आपल्याला त्या दिवशी शिवस्मारकाच हे मुहुर्त व्हायला पाहीजे असा आपला उद्देश होता. त्या उद्देशच्या अनुषगांनेच आपण हे काम करतोय आणि ज्या काही परमिशन्स होत्या त्या आपण मिळविलेल्या आहेत. प्रशासनाच्या काही तांत्रिक अडचणी होत्या. परंतू आपल्याला तांत्रिक अडचण हीच होती की या शिवस्मारकाच्या चबुतऱ्यासाठी त्याला की वास्तुशास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांची अंतिम परवानगी लागते आणि ती परवानगी साठी आपल्याला त्याठिकाणी ज्या काही मेजरमेंट असेल, ईस्टिमेट असेल म्हणजे जे काही आपल्याला त्यांना फिडींग मध्ये जे काही आपल्याला त्यांना द्यायच आहे. तर आपण वास्तुविशारदाची नेमणुक करतोय आणि मग आपण त्याला अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर आपण जिल्हाधिकाऱ्यांकडुन शिवस्मारकाकरीता अंतिम मंजुरी मिळणार आहे. परंतू या सर्व बाबींसाठी जो वेळ जाणार आहे. त्याच्यासाठी आपण हा विषय असा आणलेला होता की याला परमिशन मिळावी परंतू याची तांत्रिक अडचण आहेच. त्याबद्दल वादच नाही. पंरतू ही तांत्रिक अडचण जरी असली तरी आपण जोपर्यंत वास्तुविशारदाची नियुक्ती करत नाही. ताई तोपर्यंत ही आपली प्रोसेस चालु द्यायची आणि या संदर्भातील विषयच नाहीये, वास्तुविशारदा संदर्भातील याचा जो विषय आहे आपण जे ईस्टिमेट बनवणार आहे. ते आपण आपल्या इंजिनियर कडुन बनवणार आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- भाऊ ही प्रशासकीय बाब आहे. ते सभेसमोर का आणत नाहीयेत सभेसमोर त्यांनी आत्ताच नितीनभाऊ बोलले होते की धोरणात्मक निर्णयाच्या नावाखाली प्रशासकीय जबाबदाऱ्या आमच्याकडुन का करून घेतात.

**मा.उपमहापौर**:- बरोबर आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- प्रशासकीय बाब आहे ती आणि प्रशासन हे करू शकतय ना, मग प्रशासनाने कराव ना.

**मा.उपमहापौर**:- आता कस आहे ताई, प्रशासकीय प्रस्ताव असेल किंवा इतर कोणतेही प्रस्ताव असतील. तर आपण का हे करतोय की हे प्रस्ताव का मान्य करत नाहीयेत. प्रॉब्लेम काय आहे. मला समजत नाही. काय आहे की तुमच्याकडे पुरेस ज्ञान नाहीये की पुरेसे मनुष्यबळ नाहीये की त्याविषयाचा पुरेसा अभ्यास नाहीये म्हणजे हे वारंवार तेचतेच होतय.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई याच्यामध्ये काय आहे माहिती आहे का की, कम्युनिकेशन गॅप झालेला दिसतो, तुमचा विचार काय होता आणि प्रशासनाने काय आणलेले आहे.

**मा.उपमहापौर**:- नाही भाऊ हा जो विषय आहे ना हा पुर्णपणे वेगळा आहे. वास्तुविशारद पॅनल नेमणे हा विषय वेगळा आहे पण त्यांनी यासोबत ते जोडुन टाकला. वास्तुविशारद आणि याचा संबंध नव्हता. तुम्ही वास्तुविशारद नेमायच्या संदर्भातच विषय आधी आणला पाहीजे होता. छत्रपती शिवस्मारकाचा विषय जोडण्याची गरजच नव्हती.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- नाही यामध्ये काय होत आहे की विनाकारण तेच होतय की विनाकारण कोणी तरी टिका करतो आणि लोकप्रतिनिधींमध्ये क्लॅशेस निर्माण होतात. आत्ताच नितीनभाऊंनी सांगीतल की, दि.०७/१०/२०२२ ला आपण या शिवस्मारकाला मंजुरी दिलेली आहे आणि काय आहे बोलायला नको तो विषय तरी बोलतेय मी , भाऊ कालच शिवसेनेच आंदोलन काय होत की शिवस्मारकाचा विरोध करणाऱ्या भारती जनता पार्टीचा निषेध, अरे ज्या भारतीय जनता पार्टीने याला मंजुरी दिली हा विषय सर्वानुमते मंजुर झ ाला. मुळात त्यावेळेला आमचेच सन्मा.सदस्य. विशालभाऊ त्रिपाठींनी मुद्दा मांडला होता. नितीनभाऊ की, आपल्याकडे नविन पुतळे हेडच नाहीये. देखभाल दुरुस्ती हे पुतळे देखभाल दुरूस्ती हे हेड आहे. नविन पुतळे हे हेड नाही. विशालभाऊंनी सभेत विषय मांडला की, हे हेड निर्माण करा आणि या हेडखाली २ कोटी टाका.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- तर याच्यात भारतीय जनता पार्टीचा विरोध आला कुठे शिवस्मारकाला , अरे आपले आराध्य दैवत आहे महाराष्ट्राच , कोण विरोध करणार आहे त्याला, मग ही जी तेड निर्माण होते आहे ही का निर्माण होते आहे. तर ती अशा गलथान कारभारामुळेच निर्माण होते आहे. दि.०७/१०/२०२२ ला आपण ऑलरेडी मंजुरी दिलेली आहे पुतळयाला कुलभुषणभाऊ आणि आता हा विषय जो आहे वास्तुविशारद पॅनलचा हा प्रशासकीय विषय आहे. तर तो प्रशासनाकडुन होवु द्या.

**मा.उपमहापौर**:- ताई तुम्हाला सांगतो. हे वास्तुविशारद नेमण्याच्या संदर्भातील जो विषय आहे. तो शिवस्मारकाच्या संदर्भातील नाही आणि चबुतरा बनविण्यासाठी आणि तो विषय वेगळा होता.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- दोन मिनिंट कुलभुषणभाऊ हे जे काम आहे ते पॅनलवर सोपवुन देणे पण माझा काही विरोध नाहीये. मला काहीच विरोध करायचा नाहीये.

**मा.उपमहापौर**:- नाही ताई

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- आर्कीटेक्ट पॅनलची नियुक्ती करायची आहे.

**मा.उपमहापौर**:- नाही ताई मी तुम्हाला हेच सांगतोय की आपल्याला याच्यासाठी हे करायची गरज नाहीये आपण याच्यासाठी आपले इंजिनियरमार्फत पण करू शकतो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- मी तेच सांगते आहे की आर्कीटेक्टची गरज नाहीये. आपण प्रशासनाकडुन करू शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ताई आपण जो मुद्दा मांडला आता की हा विषय प्रशासनाच्या माध्यमातुन करण्याला कायदेशीर रित्या काहीच कुठे अडचण नाहीये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- मी तेच म्हणतेय ना.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ताई आपण वास्तुविशारदाची नेमणुक करण्याच्या संदर्भात हा निर्णय घेतोय. संबंधित आर्कीटेक्ट पॅनल आपल्याकडे कायदेशीर रित्या नियुक्त नाही झाल किंवा त्यांना गठीत करण्याच्या संदर्भात विलंब होईल. तर तो फक्त आपल्या प्रशासनाच्या अधिकाराच्या माध्यमातुन त्याच्या ड्राईंगसाठी त्याच्या ज्या ज्या काही फॉर्मेलिटी असतील त्या करू शकतात आणि ते कंम्पलीट झाले की मग तो विषय महासभेसमोर आणु शकतो आपण

**मा.उपमहापौर**:- तेच म्हणत होतो भाऊ.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- काय आहे नितीनभाऊ की आपल्याला अनुभव आहे. याच्यात जे काही शासनाचे निर्देश आहेत आणि याच्यात जी क्लिष्ट आहे की पुतळा ऊभारून होवुन जातो आणि त्यामध्ये काही जर अडचण असली तर तो पुन्हा झाकुन द्यावा लागतो.

**श्री. नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा** :- तरी अशी वेळ येवु नये त्याकरीता कृपाकरून जे नियमानुसार आहे तशास पध्दतीने होवु द्या आणि अशाच पध्दतीने महापुरूषांचा अवमानच होतो.

**मा.उपमहापौर**:- नाही नाही तस होणार नाही. ठिक आहे प्रशासनाकडुन याची दखल घेतली जाईल.

**श्रीमती.सरीता नेरकर** :- दरवेळी त्यांच्या पुण्यतिथी साठी लेटर द्यावे लागते की स्वच्छता करा महापालिकेला तरी स्वच्छता होत नाही. नवीन पुतळे जे आहेत त्यांचे तर काहीच होत नाही. पण जुने जे पुतळे आहेत तिथे परिस्थिती अतिशय गलिच्छ झालेली आहे. अक्ष:रशा मी गेल्या महासभेत बोलली होती तर ते का होत नाहीये. याच्यामध्ये का भेदभाव होतो. आता फुले मार्केट मध्ये महात्मा फुले यांचा पुतळा आहे. नेहमीच तिथे स्वच्छता

सुध्दा दिसत नाही बाकी काही नाहीच आहे. नविन नविन आल्यावर आपण म्हणतो की येथे हे झाल पाहीजे पण जे झाल नाही तिथला काय विचार आहे. याच उत्तर द्याव मला.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर**:- याच्या संदर्भात ज्या वेळेला आपण पुतळयांच्या सुशोभिकरणाचे पत्र सुध्दा दिलेले आहे आणि मला वाटत की त्याच्यावर प्रोसिजर सुध्दा सुरू आहे आणि आता सोनगिरे साहेब नाहीत नाहीतर त्यांनी आपल्याला येथे सर्व डिटेल सांगीतले असते आपण ज्या टाईल्स जर तुटलेल्या असतील तर टाईल्स किंवा जो काही भाग खराब झालेला असेल तर तो पुर्ण दुरूस्ती साठी निर्देश दिलेले आहे. आज पुन्हा प्रशासनाला सांगते की याबाबत आपण कुठपर्यंत आलेलो आहोत हे आपण बघाव. रंगरंगोटी आणि बाकी जो नादुरूस्त भाग असेल तो दुरूस्त करावा आणि दर तिन महिन्याने जळगांव शहरातील सर्व पुतळयांची साफसफाई करायची जबाबदारी त्या विभागावर सोपवावी.

**श्रीमती.सरीता नेरकर** :- महापौरताई मी प्रत्येक महासभेत बोलते फुले मार्केटच्या आतील जो अतिक्रमण आहे त्याच्यावर काहीच इलाज झाले नाही. पुर्णपणे झाकला गेलेला आहे पुतळा मी गेल्या आठ दिवसात यापुर्वी म्हणजे तिथ अतिक्रमण इतके झाले आहे की दिसतच नाही तो पुतळा , त्याच्यावर काहीच होत नाहीये.

**श्री.सुरेश सोनवणे** :- महापौरताई, असाच एक विषय आहे.

**श्रीमती.सरीता नेरकर** :- सुरेशभाऊ मला याच उत्तर हव आहे आधी

**श्री.सुरेश सोनवणे** :- बर

**श्रीमती.सरीता नेरकर** :- मला उत्तर मिळु द्या आधी मग बोला दोन मिनिंट मला उत्तर मिळु द्या पुर्ण , काय आहे हे त्यांनी सांगाव. येथे का भेदभाव होतो.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. इब्राहीम पटेल** :- महापौर महोदया मागे पण मी लक्ष वेधल होत अतिक्रमण साठी किती अतिक्रमण आहे तिथे फुले मार्केटला आजही तुम्ही या, तिथे फुले मार्केट नगरपालिका, जळगांव. म्हणजे यांना २० वर्षात आता सुध्दा जाग आलेली नाहीये आणि तिथ नगरपालिकाच आहे. शहर पोलिस स्टेशनच्या समोर ॲटलिस्ट समोर बोर्ड आहे कोठा तिथे २० वर्ष झाले म्हणजे नगरपालिका आहे असे दिसते आहे. तर तिथे पण ते काढुन जळगांव महानगरपालिका कराव. २० वर्ष झाले आपली महानगरपालिका व्हायला आणि मी १२ वर्षापुर्वी ही तक्रार केलेली होती.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- जो तक्रार करतो त्याच्यावर गोळीबार करतात.

**श्री. इब्राहीम पटेल** :- तर आताही तिथे नगरपालिकाच आहे

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- आणि हे सांगता की कोणी तक्रार केली हे बघा, गोळीबार झाला आहे त्या विषयावर अतिक्रमणच्या विषयावर.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मा.उपआयुक्त तथा मुलेअ** :- ताईंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे फुले मार्केट मधील जे अतिक्रमण आहे. पुतळ्यासमोरील जे अतिक्रमण आहे. ते काढण्यासाठी सुध्दा पोलिस बंदोबस्त मागितलेला होता आपण तर त्या वेळात पोलिस बंदोबस्त उपलब्ध झालेला नाहीये. परंतू आता निरोप आलेला आहे की आपल्याला पोलिस बंदोबस्त उपलब्ध होणार आहे तर सोमवारी किंवा मंगळवारी पोलिस बंदोबस्त आल्यानंतर त्याठिकाणी कार्यवाही आपण करणार आहे.

**श्रीमती.सरीता नेरकर** :- त्याठिकाणी त्या पुतळ्याला दोऱ्यांनी बांधलेले असते आणि त्या पुतळ्याला पुर्णपणे झाकलेले होते.

**मा.आयुक्त , (मुलेअ)** :- अतिक्रमण विभागाने तिथे दररोज भेट देवुन आणि ताईंनी जी तक्रार उपस्थित केलेली आहे असे होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

**श्रीमती.सरीता नेरकर** :- आणि तिथले सुशोभिकरण झाले पाहिजे.

**मा.महापौर**:- हो ताई सांगीतलेले आहे तिथल्या अतिक्रमणाच आणि सगळ्या महापुरूषांच्या पुतळ्यांना आपण कलर करतो आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- ते नाही झाले तर काय कारवाई करणार तुम्ही ते सांगा.

**सौ.दिपमाला काळे**:- महापौरताई मला बोलायच आहे. ताई मी वारंवार अतिक्रमणाबाबत माझ्या प्रभागातील गणेश कॉलनी पासुन ते कोर्ट चौकापर्यंतच्या अतिक्रमणाचा विषय मी प्रत्येक महासभेमध्ये आतापर्यंत मांडत आली आहे त्यावर बिलकुल कारवाई करत नाहीये. तुम्ही किती वेळा सांगतात , आयुक्त मॅडम सांगतात की

आपल्याकडे माणस कमी आहे. तर हे माणस का लावले जात नाही. मला रोज संध्याकाळी कॉल करावा लागतो अक्ष:रशा आणि कर्मचारी गाडीवाल्यांच्या शेजारी उभे असतात त्याचे व्हिडीओ माझ्याकडे आहेत. फोटो आहे माझ्याकडे तो तिथे उभे आहे गाडीवाल्याजवळ उभे आहे मग का नाही कारवाई करत आहे हे , नागरीकांनी माझ्याकडे फोटोज पाठविलेले आहे. त्यांना उठवले जात नाही नागरीक आम्हाला बोलतात म्हणुन आम्ही सुध्दा बाहेर येवुन बसतो. तरी सुध्दा आपण त्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे. तरी ही यांच काम करत नाहीत.

**मा.महापौर**:- ताई मी हेच सांगते की जागा उपलब्ध आहे. त्यांना जागा द्या तिथे बसायला लावा.

**सौ.दिपमाला काळे**:- ताई मी काय म्हणतेय की किती फॉलोअप घ्यायचा आम्ही, किती फॉलोअप घ्यावा. तुम्ही सांगा हे लोक काहीच ऐकत नाही. हे महापालिकेत नोकरी करतात ते काय कामाचे आहे.

**श्री.सचिन पाटील** :- महापौर महोदया, ते अतिक्रमण विभागाचे लोक नगरसेवकांचे नांव सांगता आहे त्यांना की ही कंम्लेन्ट आली आहे त्याच्यामुळे करतोय. म्हणजे वाईट आम्ही होतो त्याठिकाणी.

**मा.उपमहापौर**:- विषयावर या , ताई पुढचा विषय घ्या.

**सौ.दिपमाला काळे**:- ताई त्यांना सक्त ताकीद देण्यात यावी.

**मा.महापौर**:- ताई आपण आयुक्त साहेब आले की, बोलवु आणि या विषयावर त्यांच्याशी बोलुन सविस्तर काय आहे.

**सौ.दिपमाला काळे**:- ताई कितीवेळा बोलुन झाल आहे किती वेळा बोलायच. तुम्ही येवुन बघा त्या रोडवर संध्याकाळी काय आहे

**मा.महापौर**:- ताई आमच्याकडेही बऱ्याच तक्रारी आलेल्या असतात.

**सौ.दिपमाला काळे**:- ताई तरीही ते कार्यवाही करत नाहीत आणि केली की ते पुन्हा इतकी गर्दी होते की त्यांच्यात काहीच फरक नाहीये. त्यांना विचारा रोजचा बाजार आहे.

**श्री.उमाकांत नष्टे , अतिक्रमण विभाग** :- ताई रोज आपण कारवाई करत असतो.

**सौ.दिपमाला काळे**:- ते पुन्हा का बसतात कारण की तुम्ही कारवाई करत नाही व्यवस्थित त्यांच्यावर मग ते रोज का बसतात पण मग तुमची दहशत काय आहे तिथे

**श्री.उमाकांत नष्टे , अतिक्रमण विभाग** :- आपण कारवाई करत असतो.

**सौ.दिपमाला काळे**:- पण मग ते घाबरत का नाही कारण की तुम्ही कारवाई करत नाही

**मा.महापौर**:- ताई आपण याच्यावर जितकी चर्चा केली तरी ती अपुर्णच आहे.

**सौ.दिपमाला काळे**:- ताई मी तेच म्हणते आहे की मला दर महासभेला तेच बोलावे लागत आहे.

**श्री.सुरेश सोनवणे** :- महापौर ताई, आपला असाच एक विषय आहे २१ वर्षापुर्वीचा विषय आहे. आपल्या पिंप्राळयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीदिक्षा भुमि संदर्भात भुमिपुजन झालेले आहे. तर त्याच म्हणजे मागे १२५ वी जयंती असतांना मागे नितीनभाऊ यांनी १.२५ कोटी रूपयांचा ठराव पण केला होता. त्यानंतर स्थायी समितीचे सभापती, जितुभाऊ मराठे यांनी तरतूद केली होती २ कोटींची तर त्यांचा ५ कोटी रूपयांचा ठराव झालेला आहे बांधकामासाठी , तर आज २१ वर्षापासुन हा ठराव आणि आज मी १० वर्षापासुन येतोय. तर अजुनपर्यंत काही मार्गी लागलेला नाहीये तर याची अंमलबजावणी का होत नाहीये. प्रती दिक्षाभुमिची जागा दिलेली आहे महानगरपालिकेने १० वर्ष झाले ताई मी १० वर्ष झाले मी हा विषय घेवुन येतोय. हे विषय आहेत तरीपण या विषयाला होत नाहीये.

**मा.महापौर**:- भाऊ आपल्याकडे अस आहे की स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही तर आपल्याला स्वत:ला पाठपुरावा करावा लागतो. मान्यता मिळवाव्या लागतात त्यानंतर ते होते. तर आपण पाठपुरावा करूनच

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सुरेश सोनवणे** :- नाही ताई साहेब होते आणि पाटील साहेब आहेत मी १ वर्षापासुन त्यांच्या मागे लागलोय. तिथे जागा दाखवुन दिली सगळ दाखवुन दिलय.

**मा.महापौर**:- ठिक आहे. त्याच आपण काही जे असेल तर बघु.

**श्री.सुरेश सोनवणे** :- महापौरताई कस आहे की पुढच्या महासभेत आंदोलन करणे नाहीतर मग मोर्चे काढणे पडतील मग

**श्री.राजेंद्र पाटील** :- महापौर महोदया,

**मा.महापौर**:- हो बोला भाऊ

**सौ.पार्वताबाई भिल** :- महापौरताई , स्मारकाच सुशोभिकरण करणे आहे तर त्याच्या पण विषय घ्या आता थोडाफार.

**मा.महापौर**:- ताई आपण तरतूद केलेलीच आहे तर आपण आता ज्याप्रमाणे करता येईल त्याप्रमाणे आपण करून देवु.

**सौ.पार्वताबाई भिल** :- चालेल , आणि एक विषय असा आहे ताई की वॉर्डातील नागरीक आणि काही प्रतिनिधी आहे. तर ते आपल्याला काम सांगायला येतात. तर आपल्या महापालिकेमध्ये अतिक्रमण विभागामध्ये हे पत्र फिरलेले आहे. तर आपले संजय ठाकुर साहेब आहे ना त्यांनी पत्र दिले पण त्यांनी मला समजावुन सांगीतले नाही की हे मंजुर होणार नाही की हे होईल की नाही याचा खुलासा करावा.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- महापौरताई , मा.राजुमामा आपल्या शहराचे लाडके आमदार यांनी १०० कोटी रूपये निधी मंजुर केलेला आहे आणि २७ कोटी वर्ग सुध्दा झालेले आहे अशी बातमी या ठिकाणी येतेय. मी या बातमीच्या आधारावरून सांगतोय. तर आपण आपले मुख्यमंत्री जे आहेत. मा.श्री.एकनाथ शिंदे साहेब आणि मा.देवेंद्र फडणवीससाहेब उपमुख्यमंत्री साहेब आपले जिल्हयाचे दोघे मंत्री गिरीषभाऊ महाजन आणि गुलाबभाऊ पाटील आणि आपल्या शहराचे आमदार राजुमामा भोळे यांच आपण याठिकाणी अभिनंदन कराव बाकं वाजवुन याठिकाणी टाळ्या वाजवुन.

**श्री.ईब्राहीम पटेल** :- विशालभाऊंनी जी बातमी दिली मी अभिनंदनीय आहे १०० कोटींची तर आपण शहराचे गुलाबभाऊ आणि राजुमामांचेही अभिनंदन कराव परंतू मागच्या ४ वर्षापुर्वी १०० कोटी आपल्याला भेटलेले आहे पण त्याच्यापैकी आज आपण हे करतोय.

**श्री.जितेंद्र मराठे** :- ईबाभाऊ तुम्ही काय बोलत आहेत

**श्री.ईब्राहीम पटेल** :- भाऊ दोन मिनिंट मध्ये बोलयच नाही. मी काय बोलतोय अभिनंदनीय आहे बिलकुल शहराचे आपण काम करतोय १०० कोटी आणतोय परंतू खर्च करायची तरतूद लवकरात लवकर करावी. नाहीतर आपली ही जी आहे.

**श्री.जितेंद्र मराठे** :- ईबाभाऊ

**श्री.ईब्राहीम पटेल** :- भाऊ दोन मिनिंट काय होत की खर्च नाही झाला तर आपल्यात भांडण होतात.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.ईब्राहीम पटेल** :- भाऊ निधी आणला आहे आपण त्यांचा भव्य सत्कार करू.

**मा.उपमहापौर** :- नागरी सत्कार करू.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो ईबा भाई,

**श्री.ईब्राहीम पटेल** :- हो नागरी सत्कार करू. परंतू ४ वर्ष झाले १०० कोटीला आणि आजच्या महासभेत त्या कोटींचा प्रस्ताव देतोय असे व्हायला नको. नाहीतर पुढच्या याच्यात या सभागृहात तुम्ही पण राहणार नाही आणि आम्ही पण राहणार नाही.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- एक मिनिट

**श्री.राजेंद्र पाटील** :- महापौर महोदया, महापुरूषांच्या अनुषंगाने विषय आहे. मेहरूण परिसरामध्ये आपले शिवाजी उद्यान आहे. तिथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आहे. त्याचे सुशोभिकरणासाठी आपण तरतूद करावी अशी मी आपल्याला व सभागृहाला विनंती करतो.

**सौ.पार्वताबाई भिल** :- ताई काम चालु आहे आणि ते गैरसोय होतेय तर ते काम तुम्ही लवकरात लवकर करायला लावा सगळयाकडे काम चालु आहे थोडे-थोडे तर मी आता संतापली मी पण तो संताप करून काहीच उपयोग नाही. एवढे खड्डे आहेत की गाडी सुध्दा चालवता येत नाही त्या रोडावर

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई काहीतरी स्कुटीनी येवुन गेलेल्या आहेत.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.पार्वताबाई भिल** :- दादा लोक पडत आहेत त्याठिकाणी

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई मी काय म्हणतोय.

**मा.महापौर** :- मी काय म्हणतेय भाऊ त्यांच्या प्रभागात सुध्दा रोडांची परिस्थिती खुपच खराब झालेली आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्रीमती.सरिता नेरकर** :- विशेष म्हणजे ताई मामांचे अभिनंदन केलेच पाहिजे. ताई मला माझे प्रत्येक समाज बांधव म्हणतात की, तु खावुन गेली.

**मा.महापौर** :- ताई मी तुम्हाला सांगते की, त्याठिकाणी खुपच खड्डे आहे भाऊ.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्रीमती.सरिता नेरकर** :- ताई हे माझ मला माहिती आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- एक मिनिट विशालभाऊ ताईंच्या समस्यांचे निराकरण करा ना. ऐकुन घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- मी सुरूवातीलाच सांगीतले की, माझ्या व्हॉटसअॅप ला बातमी आलेली आहे.

**मा.उपमहापौर** :- विशालभाऊ एक मिनिट ताईंच म्हणण ऐकुन घ्या त्या ताई काय म्हणत आहेत ते त्यांच्या समस्याचे निराकरण करा.

**श्री.**विशाल त्रिपाठी :- मी सुरुवातीलाच सांगितले.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- कारण मागच्या वेळेस जेव्हा मामा आले होते. तेव्हा माझे भरपुर बरेच समाजबांधव तिथे जमा झालेले होते. तेव्हा मामांनी अस सांगीतल की मी माझ्या स्वत:च्या निधीमधुन निधी देतो १० लाख रुपये आणि ते काम करून घ्या. पण ते काम अजुन झाल नाही. समाज बांधव माझ्याकडे येवुन भांडतात आहेत की तुम्ही विरोध केला आहे, मामा तुमच ऐकणार नाहीये का , तुम्ही जे आहे ते बंद करून टाकल आणि , म्हणुन मामांना विनंती आहे.

**मा.उपमहापौर** :- आपण सर्वांच्या वतीने मामांकडे जावुन त्याचा पाठपुरावा करू आणि मामांना सांगुन लवकरात लवकर हा ताईंचा विषय मार्गी लावावा.

**श्री.कैलास सोनवणे** :- या विषयासाठी मामा जर नटुन गेले तर तुमच्या २० मधुन १० कट करून टाकीन.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा आता विषयांतर नका करू.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- नाही, नाही आप्पा

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा आपण विशालजींना विनंती करू की मामांना सांगा की सर्वात जास्त मत मामांना देवु.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- आप्पा , हे अस काय आहे. हे जे तुम्ही बोलतात ना हे

**श्री.कैलास सोनवणे** :- काय बोललो मी

**श्रीमती.सरिता नेरकर** :- की कोणत्या २० मधुन खर्च करून टाका.

**श्री.कैलास सोनवणे** :- काय आहे याच्यात

**श्रीमती.सरिता नेरकर** :- तुम्ही कोणत्या पध्दतीने बोलताहेत हे चुकीच आहे आप्पा तुमच

**श्री.कैलास सोनवणे** :- काय काही चुकीच नाहीये माझ बोलण, मी जे बोलतोय ना बरोबर आहे.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- चुकीच आहे आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे** :- काही चुकीच नाहीये.

**मा.उपमहापौर** :- ऐका ना विषयावरती या, विषयावरती या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- २० घेतलेले आहे.तिवारी साहेबांनी लेख दिलेला आहे, त्यांनी सरेआम लिहलेले आहे. ते मी वाचलेले आहे. आम्ही कोणत्याच गोष्टीला विरोध केला नाहीये.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- आप्पा मला पुरावा द्या.

**श्री.कैलास सोनवणे** :- ताई , तस नाही नाही.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- मला पुरावा द्या.

**श्री.कैलास सोनवणे** :- देईन ना पुरावा देईन ना.

**श्री.सुनिल महाजन** :- आप्पा थांबा ना, शांत व्हा.

**मा.उपमहापौर** :- एका ना सभागृहात गोंधळ करू नका, एक मिनिंट

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्रीमती.सरिता नेरकर** :- का म्हणुन बोलताहेत तुम्ही

**श्री.कैलास सोनवणे** :- अहो ताई ,

**मा.महापौर** :- आप्पासाहेब , ऐका ना थांबुन घ्या.

**मा.उपमहापौर** :- सभागृहात शांतता ठेवा. आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे** :- त्यांना थांबवा.

**मा.उपमहापौर** :- आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे** :- तुम्ही जे बोलले ना , मी काय म्हणतो पुरावा आहे ना माझ्याकडे

**श्रीमती.सरिता नेरकर** :- आप्पा द्या.

**श्री.कैलास सोनवणे** :- पुरावा आहे ना माझ्याकडे

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- एक मिनिंट ऐका ताई, ऐका एक मिनिंट

**श्रीमती.सरिता नेरकर** :- काय विषय आला येथे

**श्री.कैलास सोनवणे** :- एक मिनिंट ऐका ताई पुरावा पाहीजे ना तुम्हाला पुरावा देतो. तुम्हाला पुरावा पाहीजे आहे ना मी पुरावा देतो.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- काय आहे आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे** :- बसा तुम्ही मी पुरावा देतो तुम्हाला.

**मा.उपमहापौर** :- अहो आप्पा विषयाच विषयांतर होत आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- मी काय बोललो त्याच चुकीच.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- हो मग काय

**श्री.नितीन लढ्ढा** :- आप्पा काय आहे की

**श्री.कैलास सोनवणे** :- एक मिनीट ऐका पहिले, मी काय बोललो पहिले समजुन घ्या ताई , मी काय बोललो मी तुम्हाला जो निधी पाहीजे आहे राजुमामा कधी नडले तर तुम्हाला जे २० लाख आलेले आहे त्याच्यातुन करुन घ्या. मी बोललो का येथे तुमच्या २० लाखाबद्दल बोलेलो आहे मी.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- नाही, नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- ऐका ना एक मिनिट, ऐकुन घ्या. एक मिनीट ऐका पहिले, मी काय बोललो, याच्यात मी काहीच चुकीच बोललेलो नाहीये मी.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- नाही नाही मामांनी मंजुर केलेला आहे तो.

**मा.उपमहापौर** :- जावु द्या विषयावर या.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- नाही दादागिरी कोणी करू नये.

**श्री.कैलास सोनवणे** :- ऐका कोणीही बाई होण्याचा फायदा घेवु नये.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- नाही दादागिरी कोणी करू नये.

**श्री.कैलास सोनवणे** :- ऐका कोणीही बाई होण्याचा फायदा घेवु नये.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- बाई होण्याचा फायदा घेवु नये आणि आम्ही काय दादागिरी करत आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- ताई आणि आप्पा शांतता ठेवा. सभागृहात

**श्रीमती.सरिता नेरकर** :- नाही, मी काही अशीच निवडुन आली नाहीये कोणाच्यामुळे किंवा माझ्या नवऱ्याच्यामुळे निवडुन आली नाहीये. माझ्या स्वत:च्या याच्यावर निवडुन आली आहे. मला अधिकार आहे , अधिकार आहे मला तुम्ही बाई माणुस आहे असा विषय करू नका.

**श्री.कैलास सोनवणे** :- ताई तुम्ही बोलता काय आहे.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- मी माझ्या याच्यावर निवडुन आली आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- हो ना

**श्रीमती.सरिता नेरकर** :- मी बाई आहे म्हणुन नाही.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- ताई मी काय म्हणतोय.

**श्रीमती.सरिता नेरकर** :- मी माझ्या स्वत:च्या हिमतीवर निवडुन आली आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्रीमती.सरिता नेरकर** :- ही पध्दत नाहीये बोलायची.

**श्री.कैलास सोनवणे** :- लायकी आहे का तुमची मला सांगत आहेत. तर

**मा.उपमहापौर** :- आप्पा तुम्हीही शांतता ठेवा, आप्पा तुम्ही शांतता ठेवा ना थोडी

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे** :- काही चुकीच बोलतोय का मी.

**मा.उपमहापौर** :- आप्पा शब्दामुळे शब्द वाढत जातात.

**श्री.कैलास सोनवणे** :- हो समजेल ना आता पुढे समजेल

**मा.उपमहापौर** :- एक एक शब्द वाढवु नका जावु द्या .

**श्री.कैलास सोनवणे** :- मी काही दुसरा शब्द बोललेलो नाहीये त्यांना

**मा.उपमहापौर** :- हो ना माझे काही म्हणतच नाहीये त्याबद्दल, चला विषयपत्रिकेवरील विषयावर या आता

**श्री.नितीन लढ्ढा** :- या विषयाचा आलेला नंबर १७ चा प्रस्ताव, ॲक्चुली विषय जो आहे तर कामाची अर्जन्सी पाहता हा विषय आलेला होता. परंतू या विषयामुळे वेगळा एक संभ्रम निर्माण झालेला आहे की वास्तुविशारदची नेमणुक करणे. आता याच्यामध्ये दोन पार्ट आहे की याच्यामध्ये वास्तुविशारदाची नेमणुक करणे त्याच्या संदर्भातील मान्यता द्यायची आहे आणि त्याची जी काही रितसर जी प्रक्रिया होईल. त्याच्या अनुषंगाने वास्तुविशारदाची नेमणुक होईल. परंतू कामाच्या अर्जन्सीच्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेच्या इंजिनिअर्सच्या माध्यमातुन याच्यासंदर्भात जे काही अंदाजपत्रक तयार करायचे आहेत. तर ते अंदाजपत्रक तयार करण्याच्या, त्या अंदाजपत्रकाला येणाऱ्या पर्यायी खर्चाला सुध्दा मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने तातडीने त्याचे अंदाजपत्रक तयार करून , त्याच्या खर्चास सुध्दा आर्थिक मान्यता देतोय.जेणेकरून या कामाला विलंब होता कामा नये. वास्तुविशारद यांच्या नेमणुकी संदर्भातील मुद्दा जो आहे. त्याच सुध्दा धोरण प्रशासनाने जाहीरात देवुन वास्तुविशारदाची नेमणुक करणे संदर्भातील भुमिका ती त्या पध्दतीने राबवावी.

**मा.उपमहापौर**:- म्हणजे आपण आता पुतळा तयार करणेसाठी आपल्या इंजिनियर सोबत घेवुन त्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. तसेच म्हणजे त्याचे अंदाजपत्रक तयार करून त्याला येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता घेवुन ती निविदा प्रक्रीया राबवावी. .

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे कामाची प्रक्रीया थांबणार नाही किंवा त्याला विलंब होणार नाही. म्हणजे काय आहे की महिनाभर जर ही निविदा निघणार नाही तर हि प्रक्रीया थांबणार नाही.

**मा.उपमहापौर**:- आणि या सर्व बाबींचा ठरावामध्ये विस्तृत उल्लेख करून , म्हणजे विस्तृतपणे या ठरावामध्ये नमुद करावे. आपल्याला पुतळ्यांच्या येणाऱ्या खर्चाला पुन्हा मान्यता घेण्यासाठी महासभेसमोर आणावे लागणार नाही आणि पुन्हा निविदा प्रक्रीया राबवावी लागणार नाही. सदर विषयाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ आणि उपमहापौर कुलभुषणभाऊ यांनी दिलेल्या सर्व सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि या पध्दतीने ठराव मंजुर करून घ्यावा. विषय क्रं. १७ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६३ पारित करण्यात आला.**

प्रभाग क्र.१० मधील पिंप्राळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक तयार करणे करिता महासभा ठराव क्र.९०२ दि.०७/१०/२०२२ अन्वये ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आलेला असुन सदर शिवस्मारक करिता पुतळा बसविणे तथा चबुतरा सुशोभिकरणे करणे याकरिता अंदाजपत्रक तयार करणे करीता वास्तुविशारद यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत नियुक्त पॅनलच्या करारनाम्याची मुदत संपल्यामुळे सदर कामासाठी आर्कीटेक्ट नियुक्त करण्याची कार्यवाही करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच आर्कीटेक्ट नियुक्ती नंतर त्यांना नियमाप्रमाणे फी अदा करण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी महासभेपुढे प्रशासनाने सादर केलेला आहे.

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पिंप्राळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक तयार करणे करीता तथा चबुतरा सुशोभिकरण करणेचे काम तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे सदर कामास विलंब होऊ नये म्हणुन शिवस्मारक करीता पुतळा बसविणे तथा चबुतरा सुशोभिकरण करणे या करीता अंदाजपत्रक तयार करणेसाठी प्रशासनाने तातडीने महानगरपालिकेच्या इंजिनिअरांच्या माध्यमातुन अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे. व त्यासाठी पर्यायी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

तसेच प्रशासनाने जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत नियुक्त केलेल्या आर्किटेक्ट पॅनलची मुदत संपलेली असल्याने नविन आर्किटेक्ट (वास्तुविशारद) यांची नियुक्ती करणे संदर्भात जाहिरात देऊन प्रशासकीय पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . १८ :-** शिवाजी नगर मधील मनपा मालकीच्या शाळेच्या जागेवर असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा नविन उड्डानपुलामुळे खाली गेलेला असल्याने त्याठिकाणी नविन चबुतरा बांधुन त्यावर अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारणेस व रक्कम रुपये- १.७५ कोटी मात्र मनपा निधीतुन खर्च करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आपण यापुर्वी यासंबंधी दि २४/०३/२०२२ ला झालेल्या महासभेने ठराव केलेला होता. तर आतापर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. म्हणजे काय प्रोग्रेस केलेली आहे आतापर्यंत ती मला थोडक्यात माहिती मिळावी. सर्व पार्श्वभुमि पाहुन हा ठराव आलेला आहे महासभेसमोर तर त्या अनुषंगानेच विचारतो की विषय क्रं. १७ मध्ये ज्या बाबी नमुद केलेल्या आहेत त्या सर्व बाबी या ठराव क्रं. म्हणजे विषय क्रं. १८ ला त्या लागु करण्यात याव्यात. याच्या खाली आयुक्तांचा अभिप्राय काय आहे की जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली असलेल्या समितीच्या मान्यतेच्या अधिन राहुन करण्यात यावे. म्हणजे त्या समितीची मिटींग केव्हा होईल. त्या समितीची मिटींग होईल त्यानंतर कार्यवाही होईल का , तर १७ नंबरच्या अनुषंगाने ती कार्यवाही होणार नाही का याचा खुलासा करावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटत की ते त्या समिती पुढेच जाईल .

**मा.उपमहापौर**:- हो म्हणजे यांनी, आता साहेबांना माहिती नाहीये हा विषय की शहर अभियंत्यांशी जी माझी चर्चा झालेली आहे ती मी सांगतो, आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जो बसविणार आहे. तुम्ही बसुन घ्या पोकळे साहेब , तर तो जो शिवाजी नगरचा जो पुतळा आहे ना तो अर्धाकृती आहे. तो आपण जो पिंप्राळा परिसरात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसविण्याचा जो आपण त्या दिवशी ठराव केला आणि सन्मा.सदस्य नवनाथभाऊंनी सुचविल्याप्रमाणे तो पण छत्रपती शिवाजी नगरमध्ये पुलाजवळ बसविण्याचा ठराव केला. परंतू जी पुतळ्याची समिती असते आणि जे शासन निर्देश आहेत. त्याच्या मध्ये असे म्हंटलेले आहे की तुम्हाला नविन पुतळा उभारण्याचा असल्यास त्याला शासनस्तरावरून जो काही जि.आर झालेला आहे किंवा जे काही निर्देश झालेले आहेत. त्या सर्वांच अनुपालन करण बंधनकारक आहे. मग त्यास समितीची मान्यता असेल, वास्तुविशारदची मान्यता असेल, त्याची समिती नेमण्याच्या संदर्भातला विषय असेल, ट्रॅफिक विभागाची मान्यता घेण्याचा विषय असेल किंवा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी संबंधीत पोलिस स्टेशनची आवश्यकता असेल. या सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतर आणि मग महानगरपालिका प्रशासन प्रस्ताव तयार करतील आणि तो प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवतील आणि मग जिल्हाधिकारी यांच्या मार्फत .एस.पी ऑफीस ला जाईल , ट्रॅफीक ऑफीसला जाईल आणि मग जे जे पोलिस स्टेशन असेल किंवा आपल्या ज्या काही आवश्यक असेल त्याठिकाणी ते पाठविले जाईल. परंतू या सबंधित बाबतीमध्ये आपली चर्चा झ ाल्यानुसार , पहिले जी चर्चा झाली होती ती चर्चा अशी झाली होती आणि आपण त्याठिकाणी शिवाजी महाराजांचा पुतळा उंच करण्यासंदर्भातील ठराव केलेला होता. परंतू त्यावेळी दुसरी चर्चामध्ये हे आले की त्या ठिकाणी पुतळा जो आहे तो अर्धाकृती होता तर तो पुर्णाकृती करावा आणि त्याठिकाणी जो पुल तयार झालेला आहे तर सदरील पुतळ्याची विटंबना होणार नाही यासाठी तो उंच करण्यात यावा अशी त्या दिवशी चर्चा झाली

होती. त्या अनुषंगाने व त्यामुळे प्रशासनाने हा पुढच्या महासभेमध्ये हा ठराव दुरूस्त करून घेतला आणि दुरूस्त केल्यानंतर इतर परमिशन घेण्यासंदर्भातील बाकी म्हणजे ज्या काही प्राधिकरणाच्या परवानग्या घ्यायच्या असेल किंवा जे काही बदल करायचे असेल तर ते हे सर्व महानगरपालिका प्रशासनाच्या स्तरावर तयारी चाललेली आहे. परंतू आज काय आहे की कोणत्याही प्राधिकरणाची परमिशन मिळालेली नाहीये. ती का मिळालेली नाहीये हे प्रशासन सांगेल ते मला माहिती नाहीये. परंतू आता आम्ही शहर अभियंता आणि मी आम्ही जो पाठपुरावा करतोय दोघी या स्मारकाच्या संदर्भातील तर मला मिळालेल्या माहिती ही ईथपर्यंत आहे. परंतु या संदर्भातील जो काही सविस्तर खुलासा आहे तो शहर अभियंताच देवु शकतात आणि ते याठिकाणी उपस्थित नाहीत.

**श्री.दिलीप पोकळे :-** याच्या संदर्भातील जी काही कार्यवाही असेल ती तात्काळ कशी मिटींग करता येईल. कार्यवाही करण्याच्या संदर्भात त्यांना निर्देश देण्यात यावे.

**मा.उपमहापौर**:- हो ठिक आहे. त्यानंतर आपले रस्त्यांच्या बाबतीत त्याठिकाणी आपली जी महानगरपालिका आहे. त्याठिकाणी आयुक्तांना आणि शहर अभियंत्यांना उपस्थित राहणे गरजेचे होते. त्यामुळे आणि ती माहिती देणे गरजेची होती.

**मा.महापौर**:- विषय क्रं. १८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिवाजीनगर मधील रेल्वे उड्डाणपुलाचे नव्याने बांधकाम पुर्ण झाले असुन त्या पुलालगत मनपा मालकीच्या शाळेच्या आवारातील जागेत पुर्वीपासुन असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा हा नविन पुलाच्या उंचीपेक्षा अतिशय खाली आलेला आहे. त्यामुळे सदर अर्धाकृती पुतळा काढुन त्याच ठिकाणी नव्याने चबुतरा बांधुन त्यावर पुर्णाकृती **अश्वारुढ** पुतळा उभारण्याची मागणी त्या भागातील सन्मा.नगरसेवक श्री.नवनाथ दारकुंडे व नागरिकांनी केलेली होती. त्यास अनुसरुन मनपा महासभा ठराव क्र.७८८ दि.२४/०३/२०२२ अन्वये त्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच नविन पुतळे बसवणे कामी अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद नसल्याने मनपा महासभा ठराव क्र.९०२ दि.०७/१०/२०२२ अन्वये याकामी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात नविन पुतळे बसवणे कामी रक्कम रु.२.०० कोटी व शहरातील महापुरुषांच्या पुतळयांसाठी पुतळे व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षात रक्कम रु.२.०० कोटीची अर्थसंकल्पात तरतुद करणेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

पिंप्राळा येथील चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा **अश्वारुढ** पुर्णाकृती पुतळा उभारण्याच्या कामासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया राबवुन या कामी शिल्पकार यांच्या मार्फत मागवण्यात आलेल्या क्ले मॉडेल मधुन एक क्ले मॉडेल अंतीम करुन कार्यवाही करण्यात येत आहे. त्यावेळी प्राप्त एकुण ०६ क्ले मॉडेल पैकी एक मॉडेल निश्चित करुन शिवाजीनगर येथे बसवण्याचे काम करण्यात यावे अशी सन्मा.नगरसेवकांची मागणी आाहे. तरी त्यानुसार शिवाजीनगर मधील मनपा मालकीच्या शाळेच्या आवारातील पुर्वीपासुन असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा हा तेथे नव्याने बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या खाली व कमी उंची असल्याने तो काढुन टाकण्यास व त्याच जागेवर मागील बाजुस नव्याने चबुतरा बांधुन त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा **अश्वारुढ** पुर्णाकृती पुतळा बसविण्यास मान्यता मिळणेस तसेच पिंप्राळयातील चौकात नविन पुतळा बसवण्यासाठी मागवण्यात आलेल्या क्ले मॉडेल पैकीच एक मॉडेल निश्चित करुन त्यानुसार पुर्णाकृती पुतळा तयार करुन बसवण्यास याकामी पिंप्राळा येथील शिवस्मारकाच्या धर्तीवर शिवाजी नगर मधील पुतळयासाठी येणारा संपुर्ण खर्च अंदाजे रक्कम रु.१.७५ कोटी हा मनपा निधीतुन करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . १९ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील शासकीय कंत्राटांना वस्तु व सेवा कर (GST) १२% ऐवजी १८% अदा करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. १९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,केंद्र शासनाने वस्तु व सेवा कर अधिनियम-२०१७ ची अंमलबजावणी दि.१ जुलै २०१७ पासुन सुरु केली आहे. सदर अधिनियम जळगांव महानगरपालिकेस दि.१ जुलै २०१७ पासुन लागु झाला आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक जी.एस.टी.-२०१७/प्र.क्र.८१/ कराधान दि.१९ ऑगस्ट, २०१७ व महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक : जीएसटी-२०१७/प्र.क्र.१५५/कराधान- १ मंत्रालय मुंबई दि.११ सप्टेंबर २०१७ अन्वये वस्तु व सेवा करांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदांना व स्थानिक स्वराज्य संस्थाना सूचित करण्यात आलेले होते.

त्यानुसार जळगांव महानगरपालिकेने वस्तू व सेवा कर अधिनियमानुसार कामकाज १ जुलै २०१७ पासून सुरु केलेले आहे. सदर कामकाजासाठी कर सल्लागार (सनदी लेखापाल) यांची नियुक्ती करण्यात आली होती. व सनदी लेखापालांनी वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार जळगांव महानगरपालिकेच्या शासकीय कंत्राटांच्या निविदा अटी-शर्तीमध्ये आयुक्त यांचे मंजूरीने बदल करुन तत्कालीन लागु झालेला वस्तू व सेवा कर १२% मक्तेदारांच्या कंत्राटाच्या एकूण मुल्यावर अदा करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात आली.

तथापि सन २०२२ केंद्र शासनाने वस्तू व सेवा करा संबंधात केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडील अधिसुचना (Government of India, Ministry of Finance Notification no.०३/२०२२, दि.१३/०७/२०२२) सन २०१७ मध्ये लागु केलेला शासकीय कंत्राटांना वस्तू व सेवा कर १२% ऐवजी १८% करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्य शासनाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शास.नि. दि.२७/०९/२०२२ अन्वये शासकीय कंत्राटांना पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १८ जुलै २०२२ पासून वस्तू व सेवा कर १२% ऐवजी १८% अदा करण्याचा निर्णय घेऊन वाढीव वस्तू व सेवाकराची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदांना व स्थानिक स्वराज्य संस्थांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपरोक्त झालेला बदल विचारात घेवून शासनामार्फत खालील प्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**अ) नवीन कामांची अंदाजपत्रके :-** दि.१९/०९/२०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये नवीन अंदाजपत्रके तयार करताना प्रचलित वस्तू व सेवा कराच्या दरानुसार अंदाजपत्रके तयार करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन आता नवीन अंदाजपत्रके तयार करतांना वस्तू व सेवा कर १८% घेण्यात यावा.

ब) **चालु कामांची देयके :-** सदयस्थितीत चालु असलेल्या ज्या कामांच्या निविदा वस्तू व सेवा कर वगळून मागविण्यात आलेल्या आहेत, अशा कामांची देयके १२% वस्तू व सेवा कर परिगणित

करुन अदा करण्यात येतात. आता अशा चालु कामांची देयके निविदा अटी व शर्तीच्या अधिन राहून बदललेल्या १८% वस्तू व सेवा करांनुसार देयके पारित करावीत.

ज्या चालु कामांच्या निविदा वस्तू व सेवाकरासह मागविण्यात आलेल्या आहेत. अशा कामांसाठी देयके पारित करतांना १८% वस्तू व सेवा कर विचारात घेऊन निविदा अटी व शर्तीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

दिनांक २७/०९/२०२२ च्या शासन परिपत्रकानुसार जळगांव महानगरपालिकेतील ज्या कामांची प्राकलनांची कामे वस्तु व सेवा कर वगळून आहे अशा कामासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदयस्थितीत चालु असलेल्या अथवा दिनांक १८ जुलै २०२२ रोजी पासून वास्तविक कामकाजावर अदायगी झालेल्या ज्या कामांच्या निविदा वस्तु व सेवा कर वगळून मागविण्यात आलेल्या आहेत, अशा कामांची देयके १२% वस्तु व सेवाकर परिगणीत करुन अदा करण्यात आलेले आहेत अथवा येतील. अशा सर्व चालु व अदा झालेल्या कामांच्या प्राकलनांना निविदा अटी शर्तीच्या अधिन राहून बदललेल्या १८% वस्तु व सेवा करानुसार वाढीव प्राकलनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जळगांव महानगरपालिकेतील ज्या कामांच्या प्राकलनांना वस्तु व सेवा करासह मान्यता दिलेली आहे. अशा कामासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे..

१) **पुर्ण झालेली कामे**

ज्या Work Contract ची कामे दिनांक १८ जुलै २०२२ रोजी पासून पुर्णत्वास आली आहे व त्याची अदायगी झाली आहे, अशा सर्व विभागांच्या सर्व मोजमाप पुस्तिका संबंधित विभागाने निविदा अटी शर्तीनुसार व्यवस्थित तपासून दि.१८ जुलै २०२२ रोजी पासून वास्तविक कामकाजावर १८% वस्तु व सेवाकर (६% वस्तू व सेवा कराचा फरक) अदा करण्याची कार्यवाही करिता, सदर कामांच्या वाढीव ६% वस्तु सेवा करास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

२) चालु असलेली कामे

तसेच ज्या चालु कामांच्या दि.१८ जुलै २०२२ रोजी पासून वास्तविक कामकाजावर १८% वस्तू व सेवाकर समाविष्ट करावा लागणार आहे अशा सर्व विभागांच्या सर्व कामांच्या प्राकलन रक्कमेवर निविदा अटी व शर्तीनुसार, दि.१८ जुलै २०२२ रोजी पासून वास्तविक कामकाजाच्या प्राकलन रक्कमेत ६% वस्तु व सेवाकराची वाढ करणेस प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

३) चालु करावयाची कामे

तसेच सदयस्थितीत दि.१८ जुलै २०२२ रोजी पासून ज्या कामांची केवळ प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेण्यात आलेली आहे. कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही प्रस्तावित/दिली आहे. अशी कामे प्रत्यक्षात सुरु झाली नाही व ज्या कामांच्या प्राकलनात १२% वस्तु व सेवाकर गृहीत धरण्यात आला होता त्या सर्व विभागांच्या सर्व कामांच्या प्राकलन रक्कमेत निविदा अटी व शर्तीनुसार ६% वस्तू व सेवाकराची वाढ करणेस प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

४) शासन अनुदानातील कामे

तसेच शासन अनुदानातून जी कामे सुरु आहेत अथवा सुरु होणार आहेत, ज्या कामांना शासनाची प्रशासकीय मंजूरी आहे. त्या कामांच्या दि.१८ जुलै २०२२ रोजी पासून वास्तविक कामकाजाच्या प्राकलन रक्कमेत ६% वस्तू व सेवाकराची वाढ करणेस शासनास/ प्रशासकीय मंजूरी देण्यास मंजूरी देणाऱ्या प्राधिकारणास प्रस्ताव पाठविण्यात यावा. अशा कामांच्या वाढीव मनपा हिश्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सर्व कार्यकारी विभागांनी सर्व कामांची लेखाशीर्ष निहाय कामांची यादी करुन त्यात १२% वस्तु व सेवा कर ऐवजी१८% वस्तु व सेवा करामुळे वाढणाऱ्या ६% कामनिहाय दायित्वाची रक्कम निश्चीत करुन, एकत्रितपणे त्यास आयुक्तांची मंजूरी घेण्यात यावी जेणेकरुन कामांच्या नस्तीवर स्वतंत्रपणे मंजूरी घेण्याची आवश्यकता नाही.

तसेच यापुढे वस्तु व सेवा करामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलामुळे कामांच्या प्रशासकीय मंजूरीत नियमानुसार वाढ करण्याचे / वाढिव प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार कायमस्वरुपी आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांना देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सदरचा वाढीव प्राकलनांचा खर्च अदा झालेल्या अथवा अदा करावयाच्या अशा सर्व कामांच्या संबंधित लेखाशिर्षातून करणेकरीता वरील प्रमाणे सर्व विभागांच्या सर्व कामांच्या कामनिहाय वाढणाऱ्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २० :-** जळगांव शहर महानगरपालिका निधीमधून शहरी बेघर निवारा केंद्र (SUH) करिता देखभाल व व्यवस्थापन कामी संस्थाना निधी अदायगी करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१६,२४,६०२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- भाऊ याच्यामध्ये एक सुचना मला मांडायची आहे महापौर महोदया, या पुर्वी देखील बेघर निवाऱ्या संदर्भात या सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांनी वेळोवेळी चर्चा केलेली आहे . परंतू ते अस्तित्वातच येत नाहीये भाऊ , आपला मागे जागेसाठी हा विषय आलेला होता. त्याच्यानंतर आपल्याला मागे जागा मिळाली नाही म्हणुन आपल्याला निधी आला होता. त्यानंतर तो निधी स्थिर झाला होता. पंरतू असे जे विषय आहेत ते प्रशासनातर्फे आपल्यापुढे जे येत आहेत. किंवा शासनाचे जे निर्देश आहेत त्याप्रमाणे होत नाहीये तर माझी प्रशासनाला याठिकाणी माझी सुचना आहे की आपल्याला जे काही शासन जिआर/निर्णय , निर्देश प्राप्त होतात तर त्याची अंमलबजावणी त्वरीत केली गेली पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल जे नाईट शेल्टर आहे ना १६ नंबरचा जो विषय आहे ना ताई

**मा.महापौर**:- आपल्या बस स्टँडजवळचा

**मा.उपमहापौर**:- नविन बस स्टँडजवळचा हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर त्याच्या संदर्भात

**मा.उपमहापौर**:- आता जर प्रशासनाला विचारल तर त्यांच हेच उत्तर आहे की त्यांच्याकडुन एकच हे आहे की माहिती नाहीये की बेघर निवारा कुठे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सगळे नगरसेवक बेघर झालेले आहेत. या अशा कामांपासुन

**मा.उपमहापौर**:- नितीनभाऊ योग्य पध्दतीने ठराव मांडा .

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो , मंजुर करायला काही हरकत नाहीये.

**मा.महापौर**:- मी वारंवार जात असते तिथे कार्यक्रम वगैरे काही असले तर त्याठिकाणी भरपुर संख्या आहे तिथे, आणि आपण त्यांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी सुध्दा प्रयत्न करत आहोत. त्यांचा तपास लागला की आपण त्यांना पाठवतो.

**सौ.गायत्री पाटील,NULM विभाग**:- आपल शहरी बेघर निवारा केंद्र हे गेल्या ५ वर्षांपासुन सुरू आहे आणि या ५ वर्षांपासुन आजरोजी पावतो आपले ३० ते ३५ लाभार्थी लाभ घेत आहे.

**मा.महापौर**:- कमी जास्त संख्या होत असते.

**सौ.गायत्री पाटील,NULM विभाग**:- कमी जास्त संख्या होत असते. आपले काही प्रतिनिधी त्यांना सोडायला जात असतात. काहीवेळेस ते रेल्वेने जातात. काही निघुन जातात त्यामुळे ती संख्या दिवसाला कमी जास्त होत असते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यावर नियंत्रण कोणाचे आहे.

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- NULM विभागाच याच्यावर नियंत्रण आहे आणि सेंट्रल गव्हर्नमेंटकडुन आपल्याला हे मिळते तर NULM विभागामार्फतच सर्व काम पाहील जात.

**मा.उपमहापौर**:- नितीनभाऊ ही जी बेघर निवारा केंद्र आहे ना याच्यावर शासनाची वेगळी यंत्रणाना असते आणि त्या यंत्रणेनुसार शहरी बेघर निवारा हा आपल्या महानगरपालिकेला करावा लागतो. त्यांना सर्व सोई सुविधा पुरवणे आणि अस सगळ वेगळ असत त्यांचा क्रायटेरिया असतो.

**मा.महापौर**:- आपल्याला फक्त जागा द्यायची आहे आणि हे सुरू करायच आहे. आता हे नेमकं आहे आपले

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- हे जे सुरू होत ना गाईडलाईननुसार ५ वर्षापासुन शासन निधीमधुन सुरू केल आहे. तर गेल्या ५ वर्षापासुन पुर्ण शासन निधी मिळतोय. आणि ५ वर्षांनंतर त्यांच्या गाईडलाईन्स मध्ये नमुद आहे की ५ वर्षांनंतर त्याची जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील आणि २ डिसेंबरला त्यांच पत्र आल की याची जबाबदारी तुमची राहील त्याअनुषंगाने हि जबाबदारी आता स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. त्यामुळे आपण बजेट मध्ये तरतूद केलेली आहे आणि त्याची देखभाल यापुढे स्थानिक स्वराज्य संस्थेला करायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय काय फॅसिलीटीज प्रोव्हाईड करतो.

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- आपण बेघर लोकांच सर्वेक्षण करून त्या केंद्रामध्ये आणतो तिथ त्यांच आपण जेवण , नास्ता सर्व सुखसोई सुविधा त्यांना आपण देतो आणि त्यांच पुर्नवसनाचे काम आपण करतो आणि ते कायम स्वरूपी केंद्रात राहीले नाही पाहीजे त्यासाठी त्यांच पुर्नवसन झाल पाहीजे त्यासाठी आपण काम करतो आणि इतर योजनांच लाभ त्यांना उपलब्ध करून देत असतो.

**मा.उपमहापौर**:- नितीनभाऊ याची जबाबदारी मनपाची असते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संस्थेच्या माध्यमातुन काय करतो.

**मा.उपमहापौर**:- आपल्या ज्या हेल्थ पोस्ट आहेत ना त्यांच जस अनुदान आहे. तोच सेम हा आहे. आपल्याला ते ३ वर्षापर्यंत किंवा ५ वर्षांपर्यंत ते आपल्याला प्रोग्राम देतात. तो सेम प्रोग्राम हा आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- पुर्नवसनासाठी नेमके काय काय प्रयत्न करतो आपण

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- पुर्नवसनासाठी आपण म्हणजे जे लोक तिथ येतात आपण त्यांच्याकडुन त्यांची माहिती घेण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो जेणेकरून त्यांच्या कुटुंबीयाचे जे काही वाद असतील किंवा काही रागामध्ये सोडुन गेलेले असतात. काही रस्ते चुकलेले असतात. तर आपण त्यांना त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करतो. या गेल्या ५ वर्षात आपण ६७ लोकांच पुर्नवसन केलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ५ वर्षामध्ये फक्त ६७ लोकांच पुर्नवसन केले आहे आपण

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- हो टोटल १८९ लोकांच सर्वेक्षण केले होते थर्ड पार्टीद्वारे तर आपली ७७ ची क्षमता आहे. तर आता तिथे आपण आतापर्यंत ६७ लाभार्थ्यांच पुर्नवसन केलेले आहे. आताच्या परिस्थितीमध्ये ३०/३२ लाभार्थी लाभ घेत आहेत.

**सौ.ज्योती चव्हाण** :- आपण बेघर म्हणत आहेत तर आपण त्यांना ठेवुन घेतो का तिथे.

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- आपण त्यांना कायम स्वरूपी ठेवु शकत नाही. म्हणुन आपण

**मा.उपमहापौर**:- ताई ज्यांना घर नसेल त्यांना आपण काही दिवस ठेवतो.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- त्यामध्ये काही जे आहेत त्यांना आपण केंद्रात आणु शकत नाही आणि काही लाभार्थींचे घर असतात पण ते रोडावर राहतात. त्यांना आपण आणतो.

**सौ.ज्योती चव्हाण** :- आपण लेडीज आणि जेन्टस यांना एकत्र ठेवतो का

**सौ.गायत्री पाटील, NULM विभाग**:- लेडीज जेन्टस यांना आपण एकत्र ठेवतो. आपण त्यांच्या कुटुंबीयांसोबत वाद असतील , भांडण असतील तो मिटवुन आपण त्यांना परत पाठवुन पुर्नवसन करतो. थँक्स.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. २० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढचे तिघ विषय जे आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.अं.यो.-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शहरी बेघर निवारा केंद्र हे आदित्य ढवळे पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परभणी यांना ०१ एप्रिल २०२१ ते ३० एप्रिल २०२२ पर्यंत व ०१ मे २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत जय सदगुरु वस्तीस्तर संघ (ALF) जळगांव यांना देखभाल व व्यवस्थापन करणेकामी देण्यात आले आहे.

दि.अं.ओ.राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शहरी बेघर निवारा केंद्र देखभाल व व्यवस्थापन मधील DAY-NULM/SUH/D10/२०२१-२२ दि.०२ डिसेंबर २०२१ च्या सूचना नुसार बेघर निवाऱ्यातील एकूण क्षमतेच्या १०% लाभार्थीना मोफत अन्न पुरवठा करणे बाबत सूचित करण्यात आलेले आहे.

बेघर निवारा केंद्राची क्षमता ७७ ची असून उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांचा दि.०२/०६/२०२२ रोजीच्या निवारा देखभाल व व्यवस्थापन प्रस्तावा नुसार ३० सप्टेंबर २०२२ नंतर शहरी बेघर निवारा केंद्राची देखभाल व व्यवस्थापनेची संपूर्ण जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेची असलेबाबत नमूद करण्यात आले आहे.

एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ करिता १४,४०,०००/- व एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ करिता २१,६०,०००/- अशी एकंदरीत ३६ लक्ष रुपयेची मागणी एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ च्या बजेट मध्ये तरतूद करणे करिता मागणी करण्यात आलेली होती. सदर बेघर निवारा देखभाल व्यवस्थापन करणेकामी २५ लक्ष रुपये ची तरतूद २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात संकीर्ण या शीर्षकात करण्यात आलेली आहे.

त्यानुसार माहे डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत देखभाल व व्यवस्थापन कामी २,८३,२००/- व एप्रिल २०२२ ते सप्टेंबर २०२२ पर्यंत ४,५४,४६६/- असा एकंदरीत रक्कम रु.७,३७,६६६/- प्रत्यक्ष खर्च झालेला आहे तर ऑक्टोंबर २०२२ ते मार्च २०२३ पर्यंत रक्कम रु.८,८६,९३६/- अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

| अं.क्र. | देखभाल व्यवस्थापन संस्था | कालावधी | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | आदित्य ढवळे पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परभणी | माहे डिसेंबर-२०२१ ते मार्च २०२२ | २,८३,२००/- |
| ०२ | आदित्य ढवळे पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परभणी | माहे एप्रिल २०२२ | ८२,०५०/- |
| ०३ | जय सद्गुरु वस्तीस्तर संघ (ALF),जळगांव | मे २०२२ ते सप्टेंबर २०२२ | ३,७२,४१६/- |
| ०४ | जय सद्गुरु वस्तीस्तर संघ (ALF),जळगांव | ऑक्टोबर २०२२ ते मार्च २०२३ | ८,८६,९३६/- |
| | | एकूण - | १६,२४,६०२/- |

दि.अं.यो.-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शहरी बेघर निवारा केंद्राकरिता संकीर्ण शीर्षकातील २५ लक्ष मंजूर तरतूदी मधून बेघर निवारा देखभाल व्यवस्थेसाठी येणाऱ्या एकूण खर्च रक्कम रुपये १६,२४,६०२/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २१ :-** जळगांव महानगरपालिकेतील लिपीक श्री.संजय गुलाब लोंढे यांची मारेगांव नगरपंचायत /आर्णी नगरपरिषद जि.यवतमाळ आस्थापनेवर लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणुक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. २१ , २२ आणि २३ याच्या संदर्भात काय आहे की,

**श्री.कैलास सोनवणे :-** सारखेच विषय आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जो पर्यंत आपला आकृतीबंध मंजुर होत नाही किंवा आपल्याकडे पर्यायी व्यवस्था होत नाही. म्हणजे यांची विनंती जी आहे ती मान्य करण्यात यावी. परंतू यांना रिलीज केव्हा करायच जोपर्यंत आपल्याकडे पर्यायी व्यवस्था होत नाही तोपर्यंत.

**मा.महापौर**:- यांचा विषय कसा होतो की आपण जर यांना मान्यता देवुन टाकली तर याचा परिणाम कामावर होतो आणि त्याच्यामुळे काम वेळेवर होत नाहीत. मला अस वाटत की आकृतीबंध आपला ज्यावेळेला मंजुर होईल. त्याची प्रक्रीया पुर्ण होईल. त्यानंतर आपण हा प्रस्ताव लागलीच मान्य करू तोपर्यंत हा रद्द करण्यात यावा. आधीच आपल्याकडे कर्मचाऱ्यांची संख्या खुप कमी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना ताई

**मा.महापौर**:- काम करायला खुप अडचण येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आपल्याला रिलीज करायच नाहीये यांना

**ॲड. सौ.शुचिता हाडा** :- रिलीज करायच

**मा.महापौर**:- नाही नाही त्याचा कामावर परिणाम होतो भाऊ, जर त्यांना दोन वर्षांनी जायच आहे तर ते काम करतांना म्हणजे जेवढ्या पोटतिडकीने काम करायला पाहीजे तर ते तेवढ्या पोटतिडकीने काम करत नाहीत हा अनुभव आहे भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना ताई की जर त्यांची कामामध्ये काही शिथिलता आली तर हे केव्हाही रद्द करता येईल.

**ॲड. सौ.शुचिता हाडा** :- महापौरताई , नितीनभाऊ जस म्हणताहेत की कामामध्ये कसुर आल नाही, कामामध्ये जर शिथिलता आली आहे. तर त्याच्यात अट टाकुन घेण्यात यावी की त्यांनी केलेला अर्ज केव्हाही रद्द करण्याची आणि ही मान्यता देतांना एक वाक्य त्याच्यामध्ये आल पाहीजे. नगरसचिव साहेब सरळसेवेने किंवा अनुकंपा तत्वावर किंवा मनपा कर्मचारी नियुक्त झाल्यास किंवा शासनाकडुन बदली आदेश काढल्यास त्याला म्हणजे यांना नाहरकत देण्यात येत आहे. अशा पध्दतीचा उल्लेख या ठरावामध्ये करून घेण्यात यावा.

**मा.श्री.चंद्रकात वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ**:- अध्यक्ष महोदय, आपण आहे ना या ठरावामध्ये त्यांना रिलीव करायचा मुद्दा मांडत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा**:- बरोबर आहे.

**मा.श्री.चंद्रकात वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ** :- पहिला मुद्दा हा आहे त्यांच्या परवानगी साठी प्रस्ताव पाठवत आहोत. तर ही परवानगी प्राप्त झाल्यानंतर त्यांना सोडायच की नाही सोडायच. आता आपला हा सभागृहाचा निर्णय आहे. आता आपण पहिले हे शासनाकडे मान्यतेला पाठवत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा**:- बर , म्हणजे तांत्रिक हे पुर्ण करून घेतो त्यांची.

**श्री.कैलास सोनवणे** :- NOC घेवुन घेतोय.

**मा.महापौर**:- ते काय आहे शासनाकडुन दोघीकडुन मंजुर करून आणतात भाऊ, हे आतापर्यंतचे अनुभव आहे. पण ठिक आहे आता आकृतीबंध मंजुर झाल्याशिवाय त्यांना रिलीज करू नये एवढी नोंद घेण्यात यावी. ते ठरावामध्ये नमुद कराव.

**श्री.नितीन लढ्ढा**:- बरोबर आहे.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. २१ , २२, २३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर**:- नाही , नाही, प्रशासनाचा प्रस्ताव काय आहे.

**मा.महापौर**:- तिकडे पाठविण्याच्या संदर्भातील आहे. शासनाकडे पाठविण्यात संदर्भातील प्रस्ताव आहे.

**मा.उपमहापौर**:- बर , बर ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.संजय गुलाब लोंढे यांचा दि.०५/११/२०२०, दि.२९/१२/२०२०, दि.१२/१०/२०२१ व दि.११/११/२०२२ चे अर्ज यासोबत आहे. श्री.संजय गुलाब लोंढे यांनी मारेगाव नगरपंचायत / आर्णी नगरपरिषद जि.यवतमाळ यांचेकडेस असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणुक देणेबाबत, ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्री.संजय गुलाब लोंढे यांचे सेवापुस्तक पाहता त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित नाही व त्यांचेकडेस कोणतेही घेणे बाकी नाही तसेच लेखा परिक्षणाबाबत कोणताही आक्षेप नाही. श्री.संजय गुलाब लोंढे यांची जा.क्र./आस्था/१९४७ दि.०९/११/२०१२ अन्वये मागासवर्गीय सरळसेवा अनशेष भरती अंतर्गत दि.०९/११/२०१२ रोजी लिपीक (धनगर,भ.ज.क.) प्रवर्गातुन लिपीक या पदावर वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००/- मध्ये आस्थापना सुचिवरील पदावर नियुक्ती झालेली आहे व ते सध्या लिपीक म्हणुन सामान्य प्रशासन विभागात कार्यरत आहेत.

श्री.संजय लोंढे यांच्या संदर्भिय १ च्या अर्जाच्या अनुषंगाने आंतर जिल्हा बदलीसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक ते दस्तऐवज सादर करणे बाबत संदर्भ क्र.४ अन्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने श्री.लोंढे यांनी संदर्भ क्र.५ मध्ये नमुद केलेनुसार आंतर जिल्हा बदलीने पदस्थापना होणेसाठी विशेषबाब म्हणुन दि.११/११/२०२२ अन्वये अर्ज सादर केलेला आहे. त्यात नमुद केलेनुसार श्री.संजय गुलाब लोंढे यांचे वयोवृध्द आईवडील (वय वर्षे ७० व ७५) हे मुळ जिल्हा यवतमाळ येथे असुन त्यांचे वार्धक्यामुळे ते वारंवार आजारी असतात. जळगांव शहरापासुन ४८० ते ५०० कि.मी. अंतरावर दुर्गम भागात त्यांचे वास्तव्य असल्याने गावी जातांना अत्यंत खडतर प्रवास करावा लागतो. त्यामुळे वारंवार जाणेयेणे शक्य होत नाही. परिणामी आई वडीलांच्या वृध्दपकाळामुळे त्यांच्या आजारपणाकडे लक्ष देणे शक्य होत नाही. सदरच्या धावपळीमध्ये तसेच मुलांच्या शिक्षणाची देखील हेळसांड होत आहे. परिणामी स्थिती अत्यंत हलाकीची झालेली आहे. त्यामुळे श्री.संजय गुलाब लोंढे यांनी मारेगाव नगर पंचायत /आर्णी नगरपरिषद जि.यवतमाळ असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणुक देणेबाबत विशेष बाब म्हणुन प्रशासनाकडुन ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेच्या निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्री.लोंढे यांनी संदर्भ क्र.४ अन्वये कळविले असता त्यांनी संदर्भीय शासन निर्णयातील (२) मधील परिशिष्ठ एक मधील ३ मध्ये नमुद केलेल्या विनंती अर्जासोबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांचा पुराव्या दाखलसादर करावयाच्या जसे-संबंधित गंभिर आजाराबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक /वैद्यकीय मंडळ यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि आंतर रुग्ण आणि / किंवा बाहय रुग्ण म्हणुन औषधोपचाराची कागदपत्रे सादर केलेले नाही तथापि त्यांनी संदर्भ क्र.५ च्या अर्जानुसार विशेष बाब म्हणुन आंतरजिल्हा बदली करीता प्रशासनाकडुन कार्यवाही होणेची मागणी केलेली आहे.

श्री.संजय गुलाब लोंढे यांचा म.न.पा.सेवेचा कार्यकाळ सुमारे १० वर्षाचा झाला आहे. उक्त बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करता संदर्भ क्र.५ च्या अर्जानुसार विशेष बाब म्हणुन केलेली विंनती अर्जास मा.आयुक्त सो., यांनी मान्यता दिलेली आहे. शासनाने आंतरजिल्हा बदलीस विशेषबाब म्हणुन मान्यता दिली तरी सद्यास्थितीत जळगांव महानगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी असुन आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आकृतीबंध मान्यतेनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया झालेवर, अनुकंपातत्वावर किंवा मनपाला शासनाकडुन बदली कर्मचारी उपलब्ध झालेनंतरच प्रशासनाने श्री.संजय गुलाब लोंढे यांना जळगांव मनपा येथून बदलीच्या जागी हजर होणेकामी कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २२ :-** जळगांव महानगरपालिकेतील लिपीक श्री.गणेश गंभीर आडे यांची मारेगांव नगरपंचायत / आर्णी नगरपरिषद जि.यवतमाळ आस्थापनेवर लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणुक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा**:- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. २२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.गणेश गंभीर आडे, यांचा दि.०५/११/२०२०, दि.२९/१२/२०२० व दि.११/११/२०२२ चे अर्ज यासोबत आहे. श्री.गणेश गंभीर आडे यांनी मारेगाव नगरपंचायत / आार्णी नगरपरिषद जि.यवतमाळ यांचेकडेस असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणुक देणेबाबत, ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्री.गणेश गंभीर आडे यांचे सेवापुस्तक पाहता त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित नाही व त्यांचेकडेस कोणतेही घेणे बाकी नाही तसेच लेखा परिक्षणाबाबत कोणताही आक्षेप नाही. श्री.गणेश गंभीर आडे यांची जा.क्र./आस्था/१९४० दि.०९/११/२०१२ अन्वये मागासवर्गीय सरळसेवा अनुशेष भरती अंतर्गत दि.०९/११/२०१२ रोजी लिपीक (लिपीक,वि.जा.अ.) या प्रवर्गातुन लिपीक या पदावर वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००/- मध्ये आस्थापना सुचिवरील पदावर नियुक्ती झालेली आहे व ते सध्या लिपीक म्हणुन पाणी पुरवठा विभागात कार्यरत आहेत.

श्री.गणेश गंभीर आडे यांच्या संदर्भिय १ च्या अर्जाच्या अनुषंगाने आंतर जिल्हा बदलीसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक ते दस्तऐवज सादर करणे बाबत संदर्भ क्र.४ नुसार कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने श्री.गणेश गंभीर आडे यांनी संदर्भ क्र.५ नुसार आंतर जिल्हा बदलीने पदस्थापना होणेसाठी विशेषबाब म्हणुन दि.११/११/२०२२ अन्वये अर्ज सादर केलेला आहे. त्यात नमुद केलेनुसार श्री.गणेश गंभीर आडे यांचे वयोवृध्द आईवडील (वय वर्षे ६८ व ६५) हे मुळ जिल्हा यवतमाळ येथे असुन त्यांचे वार्धक्यामुळे ते वारंवार आजारी असतात. जळगांव शहरापासुन ४५० ते ४८० कि.मी. अंतरावर दुर्गम भागात त्यांचे वास्तव्य असल्याने गावी जातांना अत्यंत खडतर प्रवास करावा लागतो. त्यामुळे वारंवार जाणेयेणे शक्य होत नाही. परिणामी आई वडीलांच्या वृध्दपकाळामुळे त्यांच्या आजारपणाकडे लक्ष देणे शक्य होत नाही. सदरच्या धावपळीमध्ये तसेच मुलांच्या शिक्षणाची देखील हेळसांड होत आहे. परिणामी स्थिती अत्यंत हलाकीची झालेली आहे. त्यामुळे श्री.गणेश गंभीर आडे यांनी मारेगाव नगर पंचायत /आर्णी नगरपरिषद जि.यवतमाळ असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणुक देणेबाबत विशेष बाब म्हणुन प्रशासनाकडुन ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेच्या निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्री.गणेश गंभीर आडे यांनी संदर्भ क्र.४ अन्वये कळविले असता त्यांनी संदर्भीय शासन निर्णयातील (२) मधील परिशिष्ठ एक मधील ३ मध्ये नमुद केलेल्या विनंती अर्जासोबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांचा पुराव्या दाखलसादर करावयाच्या जसे-संबंधित गंभिर आजाराबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक /वैद्यकीय मंडळ यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि आंतर रुग्ण आणि / किंवा बाहय रुग्ण म्हणुन औषधोपचाराची कागदपत्रे सादर केलेली नाही तथापि त्यांनी आंतर जिल्हा बदली म्हणुन मागणी केलेली आहे.

श्री.गणेश गंभीर आडे यांचा म.न.पा.सेवेचा कार्यकाळ सुमारे १० वर्षाचा झाला आहे. उक्त बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करता विशेष बाब म्हणुन केलेली विंनतीस मा.आयुक्त सो., यांनी मान्यता दिलेली असुन शासनाने श्री.आडे यांच्या आंतरजिल्हा बदलीस विशेषबाब म्हणुन मान्यता दिली तरी सद्यास्थितीत जळगांव महानगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी असुन आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आकृतीबंध मान्यतेनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया झालेवर,अनुकंपातत्वावर किंवा मनपाला शासनाकडुन बदली कर्मचारी उपलब्ध झालेनंतरच प्रशासनाने

श्री.गणेश गंभीर आडे यांना जळगांव मनपा येथून बदलीच्या जागी हजर होणेकामी कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २३ :-** जळगांव महानगरपालिकेतील लिपीक श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांची यवतमाळ नगरपरिषद आस्थापनेवर लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणुक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा**:- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे

**मा.महापौर**:- विषय क्रं. २३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांचा दि.०६/०१/२०२० व दि.१७/११/२०२२ चे अर्ज यासोबत आहे. श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांनी यवतमाळ नगरपरिषद यांचेकडेस असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणुक देणेबाबत ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांचे सेवापुस्तक पाहता त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित नाही व त्यांचेकडेस कोणतेही घेणे बाकी नाही तसेच लेखा परिक्षणाबाबत कोणताही आक्षेप नाही. श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांची जा.क्र./आस्था/१९३५ दि.०९/११/२०१२ अन्वये मागासवर्गीय सरळसेवा अनुशेष भरती अंतर्गत दि.०९/११/२०१२ रोजी लिपीक (परधान) अनु.जमाती या प्रवर्गातुन लिपीक या पदावर वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००/- मध्ये आस्थापना सुचिवरील पदावर नियुक्ती झालेली आहे व ते सध्या लिपीक म्हणुन आरोग्य विभागात कार्यरत आहेत.

श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांच्या संदर्भिय १ च्या अर्जाच्या अनुषंगाने आंतर जिल्हा बदलीसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक ते दस्तऐवज सादर करणे बाबत संदर्भ क्र.४ नुसार कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांनी संदर्भ क्र.५ नुसार आंतर जिल्हा बदलीने पदस्थापना होणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. त्यात नमुद केलेनुसार श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांचे वयोवृध्द आईवडील, पत्नी व मुलगीहे मुळ गांव यवतमाळ येथे असुन त्यांचे आईवर मधुमेह, उच्च रक्तदाब इ. विकाराचे वैद्यकीय उपचार सुरु असुन जळगांव शहरापासुन ३५४ कि.मी. अंतरावर त्यांचे वास्तव्य आहे. त्यामुळे त्यांचे पालनपोषण योग्यरित्या करता येणे शक्य होत नाही. त्यामुळे श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांनी यवतमाळ नगरपरिषदेत असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणुक देणेबाबत ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेच्या निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

मात्र श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांनी संदर्भ क्र.४ अन्वये कळविले असता त्यांनी संदर्भीय शासन निर्णयातील (२) मधील परिशिष्ठ एक मधील ३ मध्ये नमुद केलेल्या विनंती अर्जासोबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांचा पुराव्या दाखल सादर करावयाच्या जसे-संबंधित गंभिर आजाराबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक /वैद्यकीय मंडळ यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि आंतर रुग्ण आणि / किंवा बाहय रुग्ण म्हणुन औषधोपचाराची कागदपत्रे सादर केलेली नाही तथापि त्यांनी आंतर जिल्हा बदली म्हणुन मागणी केलेली आहे.

श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांचा म.न.पा.सेवेचा कार्यकाळ सुमारे १० वर्षाचा झाला आहे. उक्त बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करता विशेष बाब म्हणुन केलेली विंनतीस मा.आयुक्त सो., यांनी मान्यता दिलेली असुन शासनाने श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांच्या आंतरजिल्हा बदलीस विशेषबाब म्हणुन मान्यता दिली तरी सद्यास्थितीत जळगांव महानगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी असुन आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आकृतीबंध मान्यतेनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया झालेवर, अनुकंपातत्वावर किंवा मनपाला शासनाकडुन बदली कर्मचारी उपलब्ध झालेनंतरच प्रशासनाने

श्री.आनंद जनार्दन चांदेकर यांना जळगांव मनपा येथून बदलीच्या जागी हजर होणेकामी कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २४ :-** म.न.पा.चौबे कन्या माध्यमिक विदयालयातील शिक्षकांना एकाच पदावर सलग २४ वर्षे सेवा झालेली असल्याने त्यांना निवडश्रेणी लागू करणेबाबत प्रशासन अधिकारी,(शिक्षण मंडळ) जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांचेकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- निवड श्रेणी आणि वेतन श्रेणी लागु करतांना शासनाकडुन जे काही ट्रेनिंग परमिशन घ्याव लागत ते त्यांना घेण गरजेच आहे. त्याचे सर्टीफिकेट असल्याशिवाय त्यांना मान्यता देण्यात येवु नये. याची ठरावामध्ये नोंद करण्यात यावी आणि विषय क्रं. २४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहर महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील सलग २४ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या पात्र उपशिक्षकांना “निवडश्रेणी” लागू करणेकामी विहीत नमुन्यात प्रस्ताव लेखाधिकारी शिक्षण विभाग जळगांव यांचेकडेस सादर करणेबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे.

जळगांव शहर महानगरपालिका संचलित मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा १००% अनुदानित असून सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे दरमहा १००% वेतन जिल्हा परिषद मार्फत अदा केले जाते. शासन निर्णयानुसार उपशिक्षकांना निवड श्रेणी लागू करणेसाठी त्यांची (१) एकाच पदावर सलग सेवा २४ वर्ष पुर्ण झालेली असावी. (२) मागील दोन वर्षांचे गोपनीय अहवाल समाधानकारक असावे (३) उपशिक्षकांची शैक्षणिक अर्हता अथवा व्यावसाईक अर्हता ही पदव्युत्तर असावी (४) सदर शिक्षकांनी शासनातर्फे आयोजित निवडश्रेणी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता जळगांव शहर महानगरपालिका संचलीत रामलालजी चौबे कन्या माध्यमिक विदयालयामधील उपशिक्षक १) श्री.विवेक काशिनाथ आळवणी(B.C0M.M.P.Ed) (२) सौ.सुनिता सुनिल पवार (B.A.M.A.B.Ed) (३) श्रीमती छाया सिताराम खैरनार (B.A.M.A.B.Ed) या तीनही उपशिक्षकांनी एकाच पदावर सेवेची सलग २४ वर्षे सेवा पूर्ण केलेली आहे. तीनही शिक्षकांचे मागील दोन वर्षाचे गोपनीय अहवाल समाधानकारक असून त्यांनी शासनातर्फे निवडश्रेणी करिता आवश्यक प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेले आहे.

म.न.पा.संचलित माध्यमिक विदयालयातील शिक्षकांना निवडश्रेणी लागू करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**१) श्री.विवेक काशिनाथ आळवणी :- (उपशिक्षक)**

१) पदवीत्तर पदवी (एम.पी.एड.) उत्तीर्ण प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडलेली आहे.

२) दोन वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायांकित प्रती प्रस्तावासोबत जोडलेल्या आहेत.

३) दि.१३/०६/२००३ पासुन वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असणेबाबत सेवापुस्तकातील नोंदीची छायांकित प्रत जोडलेली आहे.

४) मुख्याध्यापक श्री.एम.एम.खान, श्रीमती एम.डी.लोखंडे व सौ.प्रेमा वाणी यांना त्यांनी १२ वर्षे मुख्याध्यापक वेतनश्रेणीत कार्य केल्यानंतर त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी नियमानुसार लावण्यात आली होती. त्यानंतर निवडश्रेणीसाठी आवश्यक असलेली २४ वर्षे सेवेची पात्रता श्री.एम.एम.खान, श्रीमती एम.डी.लोखंडे यांनी पूर्ण केली नव्हती. तत्पुर्वीच ते सेवानिवृत्त झालेले आहे. तसेच सौ.प्रेमा वाणी

यांनी निवडश्रेणीसाठी आवश्यक, प्रशिक्षण पूर्ण केलेले नाही. त्यामुळे सौ.प्रेमा वाणी यांना निवडश्रेणी लागू होत नाही.

**२) सौ.सुनिता सुनिल पवार (उपशिक्षिका)**

१) पदवीत्तर पदवी प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडलेली आहे.

२) दोन वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायांकित प्रती प्रस्तावासोबत जोडलेल्या आहेत.

३) दि.०१/०७/२००५ पासुन वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असणेबाबत सेवापुस्तकातील नोंदीची छायांकित प्रत जोडलेली आहे.

४) सन २०१७-१८ सेवाजेष्ठता सुची जोडण्यात आली नाही कारण सदरच्या कालावधीत श्रीमती छाया खैरनार यांचा सेवाजेष्ठताबाबत अर्ज खारीज करण्यात आला.

सौ.सुनिता पवार यांचे अगोदर असलेल्या १ ते १२ शिक्षकांपैकी श्री.विवेक आळवणी व श्रीमती छाया खैरनार वगळता अन्य शिक्षकांची शैक्षणिक किंवा व्यावसायिक अर्हता पदव्युत्तर नाही त्यामुळे ते शिक्षक निवडश्रेणीसाठी पात्र नाहीत.

५) सौ.सुनिता सुनिल पवार यांची नियुक्ती ओ.बी.सी. प्रवर्गातून झालेली नाही. सुरुवातीला शाळा नवीन असल्यायमुळे व विनाअनुदानित तत्वावर असल्याने विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून तत्कालिन नगरपालिकेने सर्व शिक्षकांच्या नियुक्त्या निकड लक्षात घेता केलेल्या होत्या. त्यामुळे प्रवर्गानुसार कोणाचीही नियुक्ती झालेली नाही.

६) निवडश्रेणीसाठी आवश्यक प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

**३) श्रीमती छाया सिताराम खैरनार (उपशिक्षिका)**

१) पदवीत्तर पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडलेली आहे.

२) दोन वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

३) दि.०३/०४/२००२ पासुन वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असणेबाबत सेवापुस्तकातील नोंदीची छायांकित प्रत जोडलेली आहे.

४) सन २०१७-१८ जेष्ठता यादी तयार करण्यात आलेली नव्हती. कारण श्रीमती छाया खैरनार यांनी सेवाजेष्ठतेबाबत आक्षेप घेतलेला होता. त्याचा निकाल २०२० मध्ये लागला. श्रीमती छाया सिताराम खैरनार यांचे अगोदर जेष्ठ असलेले १ ते १४ शिक्षक यांना पात्रतेनुसार वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. मात्र श्री.विवेक आळवणी,उपशिक्षक व सौ.सुनिता पवार,उपशिक्षिका वगळता अन्य शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पदव्युत्तर नाही त्यामुळे ते शिक्षक निवडश्रेणीसाठी पात्र नाही.

५) श्रीमती छाया सिताराम खैरनार यांची नियुक्ती ओ.बी.सी. प्रवर्गातून झालेली नाही. सर्व शिक्षकांच्या नियुक्त्या निकड लक्षात घेता केलेल्या होत्या. त्यामुळे प्रवर्गानुसार कोणाचीही नियुक्ती झालेली नाही.

६) निवडश्रेणीसाठी आवश्यक प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

७) श्रीमती छाया सिताराम खैरनार यांचा २५ जुन १९९३ ते १७ एप्रिल १९९४ या कालावधीत सेवेत खंड आहे. सदरचा खंड हा सक्षम प्राधिकारी यांनी क्षमापित केलेला नाही. श्रीमती छाया खैरनार यांची दिनांक १६/०६/१९८९ ते दिनांक २५/०६/१९९३ ही सेवा तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर होती. मुख्याधिकारी यांच्याकडील आदेशान्वये सदर सेवा समाप्त झालेली होती. दिनांक १८/०४/१९९४ पासून नव्याने नियुक्ती देण्यात आली होती.

८) श्रीमती छाया सिताराम खैरनार यांना दिनांक २५/०६/१९९३ ते दिनांक १७/०४/१९९४ या कालावधीत सेवा खंड असून याच कालावधीची शिक्षण विभागाची वैयक्तीक मान्यता (Approval) नाही. त्यामुळे सदर कालावधीतील सेवाखंड लक्षात घेता वरिष्ठ वेतनश्रेणीची फेरपडताळणी लेखाधिकारी शिक्षण विभाग जळगांव यांचेकडून करण्यात येईल. तसेच अतिप्रदान रक्कम त्यांचेकडून वसुल करण्यात येईल. त्यांचेकडून वसुल रक्कम शासनाकडे भरणा करणेत येईल व त्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात येईल.

निवडश्रेणीसाठी अर्ज केलेल्या उपशिक्षकांपैकी श्रीमती छाया खैरनार यांच्या सुधारित वेतन पडताळणी करुन अतिप्रदान रक्कम भरणे याबाबतची पूर्तता करणेस विलंब लागणार असल्याने त्यांचा प्रस्ताव स्वतंत्र्यरित्या सादर केला जाईल. असे विभागाने नमुद केलेले आहे.

श्री.विवेक काशिनाथ आळवणी,उपशिक्षक यांचे सेवाजेष्ठतेमधील अ.क्र.०४ वर नांव आहे. तत्पूर्वी श्री.एम.एम.खान (मुख्याध्यापक) यांचे नांव अ.क्रं.०२ वर नमुद आहे. त्यांना वैयक्तिक मान्यता दिनांक एप्रिल १९९६ रोजी मिळाली. त्या अनुषंगाने श्री.एम.एम.खान यांना सन २००८ रोजी वरिष्ठ श्रेणी लागू करण्यात आली. तसेच श्री.खान यांना पुढील २४ वर्षानंतर निवड श्रेणी सन २०२० रोजी पात्र झाली असती. मात्र ते सन २०१८ रोजी विहीत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे श्री.एम.एम.खान मुख्याध्यापक यांना निवडश्रेणी लागू होत नाही.

श्रीमती मिना लोखंडे (मुख्याध्यापिका) यांचे नाव सेवाजेष्ठते मधील अ.क्र.०३ वर नमुद आहे. श्रीमती लोखंडे यांना वैयक्तिक मान्यता जुन १९९६ रोजी मिळाली त्या अनुषंगाने श्रीमती मिना लोखंडे यांना (सन) जुन २००८ रोजी वरिष्ठ श्रेणी लागु करण्यात आली. तसेच श्रीमती मिना लोखंडे यांना २४ वर्षानंतर निवडश्रेणी सन २०२० रोजी पात्र झाली असती. मात्र त्या सन - २०१९ रोजी विहीत वयोमानुसार सेवानिवृत्त झाल्या. त्यामुळे श्रीमती मिना लोखंडे (मुख्याध्यापिका) यांना निवडश्रेणी लागू होत नाही. श्रीमती सुनिता पवार (उपशिक्षिका) यांचे सेवाजेष्ठतेमधील अ.क्र.१३ वर नांव आहे. श्रीमती सुनिता पवार यांचे अगोदर असलेल्या सेवाजेष्ठतेमधील अ.क्र.१ ते ४ शिक्षक सोडून अन्य शिक्षकांनी आवश्यक असलेली पदव्युत्तर शैक्षणिक किंवा व्यावयासिक अर्हता प्राप्त केलेली नाही. त्यामुळे ते शिक्षक निवडश्रेणीस पात्र नाही.

त्यामुळे म.न.पा.चौबे कन्या माध्यमिक विदयालयातील श्री.विवेक काशिनाथ आळवणी, उपशिक्षक व सौ.सुनिता पवार,उपशिक्षीका यांना एकाच पदावर सलग २४ वर्षे सेवा झालेली असल्याने त्यांना निवडश्रेणी लागू करणेबाबत प्रशासन अधिकारी,(शिक्षण मंडळ) जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांचेकडुन आलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार निवडश्रेणी लागु करतांना अधिकृत शासनाचे ट्रेनिंग सर्टीफिकेट असल्याबाबतची खात्री करुन प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २५ :-** जळगांव शहर मनपा प्र.क्र.१७ अंतर्गत ०१ ते ०४ विविध कामे शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी किंवा महानगरपालिका निधी (मनपा फंड) अंतर्गत करणेस व सदर कामी येणाऱ्या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा. त्याच्यामध्ये प्रस्तावामधील अ.क्र.३ व ४ मधील कामे ऑलरेडी सुरु असल्याने ती काम यामधुन रद्द करण्यात यावे आणि म्हणजे प्रभाग क्रं. ९ मधील जी काम आहेत.

**श्री.मयुर कापसे :-** भाऊ त्याची शहानिशा करून पुढच्या सभेला ठेवण्यात यावी. म्हणजे ती काम कमी करण्यात येवुन जी काम आहेत ती अॅड करावी अस शहर अभियंता यांना बोलण्यात याव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, अॅड करून घ्यायचे का ?

**श्री.मयुर कापसे :-** हो ३ आणि ४

**श्री.नितीन लढ्ढा :-** बर ३ आणि ४

**मा.महापौर**:- याच्यात

**मा.उपमहापौर**:- भाऊ , ताई याच्यामध्ये मी सांगतो तुम्हाला , मयुरभाऊ मला याच्यामध्ये प्राब्लेम नाहीये. पण याच्यामध्ये या संदर्भामध्ये त्याठिकाणच्या लोकांचे ६/६ महिन्यांपुर्वी दोनदा निवेदन आलेले आहे आणि दोनदा स्मरणपत्र आलेला आहे. त्या अनुषंगाने महापौरताईंनी निर्णय घेतला प्रभाग क्रं. ९ मधील आहेत. तर

**श्री.मयुर कापसे :-** एक मिनिट

**मा.उपमहापौर**:- भाऊ मला बोलुन घेवु द्या. आपण मग बोला.

**श्री.मयुर कापसे :-** बर, बर

**मा.उपमहापौर**:- या ठिकाणची जर आपण त्या ठिकाणची परिस्थिती पाहीली तर त्याठिकाणी नाला जो झाला आणि त्या नाल्याच पाणी अक्षरश: त्याठिकाणी ओसांडंत होते तर त्याठिकाणचे नागरीक पावसाळयामध्ये वारंवार आपल्याकडे निवेदन घेवुन आले आहेत. सन्मा.सदस्यांना जे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही त्याचा विषय नाहीये. यातील काही काम जी आहेत आता ती सुरू आहे किंवा प्रस्तावीत आहे दुसऱ्या निधीमध्ये.

**मा.उपमहापौर**:- जे नाही आहे ते मंजुर करण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, हो.

**मा.उपमहापौर**:- ठिक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणुन त्या कामांना

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ माझी एक विनंती आहे की, महापौरांनी पत्र दिलेले आहे त्याच्याबद्दल मला काही हे करायच नाहीये पण संबंधित नगरसेवकांच पत्र किंवा संबंधित नगरसेवकांना एकदा विचारून घेतलं पाहीजे.

**मा.उपमहापौर**:- ठिक आहे, ठिक आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** की या इतक्या निधीच काय काम झाले आहे आणि इतके काम आपले प्रोसेस मध्ये आहेत. शासकीय निधीतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भाऊ मलाही ते म्हणायच आहे.

**श्री.मयुर कापसे :-** भाऊ मी तुम्हाला ईथे एक सांगतो की, हा जो ३ नंबरचा विषय आहे ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**श्री.मयुर कापसे :-** प्रभाग क्रं. २ मधील श्री.मनोज पाटील यांचे घरापासुन ते श्री. हेमंत पाटील यांचे घरातपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**श्री.मयुर कापसे :-** हा ६ मिटरचा रस्ता नाहीये भाऊ हा ९ मिटरचा रस्ता आहे आणि हा टेक्निकल रिजन आहे आणि याच्यामध्ये माझ्याकडुन जी मी केलेले आहे ती एक शहानिशा झाली पाहीजे हा एक प्रॅब्लेम आहे आणि या रस्त्याला लागुन अजुन एक रस्ता आहे. तर हा रस्ता जर आपण करताय आणि त्याठिकाणचे नागरीक ॲलिगेशन्स करतील. तर त्यामुळे आपण अभियंत्यांकडुन त्याची शहानिशा करू इंजिनियर मार्फत तर आपण तोपर्यंत हा विषय तहकुब ठेवु आणि त्यामध्ये आपला जो हा नाला आहे ना आपल्या अष्टभुजाच जे गेट आहे ना तो तिकडुन आपल्याला हा नाला प्रस्तावित करायचा आहे. कारण की हे पाणी आपल्याला गेटपर्यंत प्रस्तावीत करायच आहे त्याला इतकी अमाऊंट जी आहे ती सफीशन्ट आहे. त्यामुळे ही सगळी टेक्नीकल अडचण शहानिशा करून

**श्री.नितीन लढ्ढा :-** अस करायच आहे.

**मा.उपमहापौर**:- हा विषय तहकुब करायचा आहे का.

**श्री.मयुर कापसे :-** नाही, भाऊ तहकुब ठेवु आपण, फक्त याच्यात अस करू आपण ६ मिटरचा आहे की ९ मिटरचा आहे हे दुरूस्ती करून आपल्या इंजिनियरकडुन

**मा.उपमहापौर**:- व्हेरिफिकेशन करून करायचा आहे.

**श्री.मयुर कापसे :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे या प्रस्तावातील अ.क्रं. १ आणि २ हे मंजुर करण्यात यावे आणि ३ व ४ हा तहकुब करण्यात यावा.

**श्री.मयुर कापसे :-** नाही ना भाऊ तहकुब नाही दुरूस्त करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बर

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ वाढीव खर्चासह मंजुर करून घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** चालतय का तस

**श्री.मयुर कापसे :-** नाही ना आप्पासाहेब रस्त्याचा विषय आहे ना

**मा.उपमहापौर**:- बरोबर आहे ६ मिटरचा असेल तर याठिकाणी

**मा.महापौर**:- भाऊ आता तुम्ही सांगा की ६ मिटरचा असेल तर काय दुरूस्ती करायची असेल तर काय करावे लागेल.

**श्री.मयुर कापसे :-** नाही ताई मी काय म्हणतोय. हा जो रस्ता आहे आणि बाकीचे जे विस्तृत रस्ते आहेत. पाईप गेलेले तो विषय आहे.

**मा.महापौर**:- ठिक आहे काही अडचण नाही. दुरूस्ती करून हे तहकुब ठेवु , फक्त

**मा.उपमहापौर**:- तहकुब ठेवा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ताई

**मा.महापौर**:- भाऊ एक मिनिंट , माझ्या कडे ज्यावेळी १०० /१०० हे

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.महापौर**:- ताई एक मिनिंट फक्त मला फक्त भाऊंच्या प्रश्नाच उत्तर देवु द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ताई मान्य आहे. फक्त याच्यात

**मा.महापौर**:- भाऊ एक मिनिंट , १०० /१०० नागरीक रस्त्यांचे विषय घेऊन माझ्याकडे येतात. तर ते तेव्हा मागणी करतात आणि हे माझ कर्तव्य आहे आणि

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ताई

**मा.महापौर**:- भाऊ आणि ज्या रस्त्यांची मागणी माझ्याकडे केलेली असते आणि मी त्याची शहानिशा करते आणि की हा रस्ता कोणत्या याच्यात टाकलेला आहे आणि त्याच्यानंतरच मी हे अस अंदाजित घेत नाही.

**श्री.मयुर कापसे :-** महापौरताई हा जो रस्त्याचा विषय आहे ना त्याच्यामध्ये ६ मिटर आहे की ९ मिटर आहे हा विषय आहे.

**मा.महापौर**:- भाऊ डबल होणार नाही म्हणुन.

**श्री.मयुर कापसे :-** महापौरताई हो ना मग

**मा.महापौर**:- भाऊ आताही आणि याच्यापुढे सुध्दा सन्मा. सदस्यांची जी सुचना आहे म्हणुन त्याची शहानिशा करून आपल्याला ते काम करता येईल.

**श्री.मयुर कापसे :-** हो

**मा.महापौर**:- ठिक आहे.

**सौ.दिपमाला काळे**:- ताई मी काय म्हणतेय की आता आम्ही वॉशरूमला जायच होते तर आम्ही ॲन्टी चेंबरला गेलो तर तिथे २५ एक मुलं बसलेले होते.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ॲन्टी चेंबरच्या बाहेर होते.

**सौ.दिपमाला काळे**:- तिथे २५ एक मुलं बसलेले होते आणि फक्त वॉचमन ला बोलली की ह्या ठिकाणी जेव्हा महासभा चालु असते. तेव्हा या मुलांना बसु देतो कसा. तर

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** वॉचमनला सांगीतले की, कोण बसले आहे येथे, दादा यांना बाहेर यायला सांगा किमान २५ मुले तिथे बसलेले होते.

**सौ.दिपमाला काळे**:- त्यांना आम्ही सांगीतले की येथे कसे बसलेले आहे तर त्यांच उत्तर काय होते की हि नगरपालिका आहे म्हणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोण होते

**सौ.दिपमाला काळे**:- कोणीही बसु शकतो का तिथे म्हणजे आम्ही लेडीजने जावुच नये का ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ती जी मुल बसलेली आहेत ती अत्यंत टारगट मुले आहेत.

**सौ.दिपमाला काळे**:- इतके घाणेरडे मुल बसलेले होते तिथे

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोण होते

**सौ.दिपमाला काळे**:- गेले ते सगळे

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.दिपमाला काळे**:- ते उलट उत्तर देतात ते म्हणजे त्यांच ऐकायला आम्ही येथे येतोय का ? आणि का म्हणुन त्यांच ऐकाव

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कोणाचे कार्यकर्ते आहे ते तपास करा याचा आणि कोणाच्या परवानगीने बसलेले आहे तिथे, ॲन्टी चेंबरमध्ये आम्हाला सुध्दा परवानगी घेवुन जाव लागत.

**सौ.दिपमाला काळे**:- वरून आम्हाला ऐकाव लागत की नगरपालिका आहे म्हणे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.दिपमाला काळे**:- दादा गेले तो विषय नाहीये, आम्ही गेले ना तर त्यांना मॅनर्स हव की बाईशी कस बोलाव , एकतर आम्ही येथे ११ वाजेपासुन बसलेलो आहेत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बर आम्ही त्यांच्याशी काहीच संवाद साधत नाहीये आणि आम्ही आपल्या कर्मचाऱ्याला बोलावले आणि त्यांना सांगीतले की तिथे लोक बसलेले आहेत.

**सौ.दिपमाला काळे**:- त्याठिकाणी लॉक लावलेल असत आम्ही जेव्हा जातो तेव्हाच ते लॉक उघडल जात.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ज्यावेळी गायकवाड मॅडम होत्या तेव्हा मी स्वत: गायकवाड मॅडम सोबत बोलले होते की आम्हा लेडीजला महासभेच्या दिवशी लागले तर फक्त वॉचमनजवळ याची चाबी ठेवा आणि आम्ही जर कधी तिथे गेलो तर आम्हाला ते उघडुन द्या. तर

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.दिपमाला काळे**:- म्हणजे त्यांच ऐकण्यासाठी आम्ही येथे यायच का?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आज कसे काय ते दार उघडे आहेत. म्हणजे आम्हाला मागे चाबी मागुन ते उघडाव लागले होते.

**सौ.दिपमाला काळे**:- आणि १ /२ नाही तर २० ते २५ मुल बसलेले आहे तिथे

**श्री.विशाल त्रिपाठी** :- हा विषय गांभीर्याने घेतला पाहीजे.

**सौ.दिपमाला काळे**:- भाऊ उलट ते बोलता ना

**मा.महापौर** :- नाही नाही, तिथे कोणालाही थांबु देण्यात येवु नये.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- हा विषय गांभीर्याने घेण्यात आला पाहीजे एकदम

**मा.उपमहापौर** :- ताई कार्यकर्ते कोणाचे आहेत ते नाही आणि ते जर अशा पध्दतीने गैरवर्तन करत असतील तर मग त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** किमान २५ मुल बसलेले होते आता त्या ॲन्टी चेंबरला

**सौ.दिपमाला काळे**:- आणि आम्ही कोणाशी बोललो नाही ना आम्ही फक्त वॉचमनशी बोललो ना आणि तो मुलगा उलट उत्तर देतोय आम्हाला

**श्री.सचिन पाटील** :- वॉचमनला तर बोलवा पहिले आणि मुलांना पण बोलवुन घ्या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** अहो वॉचमनला काय अडचणीत आणणार का, वॉचमनला विचारणार का तुम्ही की कोणाचे कार्यकर्ते आहेत. तो गरीब माणुस आहे. तो काय नांव सांगणार आहे की कोणाचे कार्यकर्ते आहेत. हे सगळयांना माहिती आहे की कोणाचे कार्यकर्ते आहेत तर ते

**सौ.दिपमाला काळे**:- सगळयांना माहिती आहे की कोणाचे कार्यकर्ते आहेत

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माहिती आहे की कोणाचे कार्यकर्ते असु शकतात.

**सौ.दिपमाला काळे**:- पण कार्यकर्तांची काय गरज आहे महासभा असतांना येथे यायची. आम्ही सुध्दा ॲन्टी चेंबरला जात नाहीत कधीच

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.दिपमाला काळे**:- तो तिथ येवुन बसतो आणि उलट उत्तर मला देतो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बर त्यांच्याशी आम्ही काही बोलतही नाहीये.

**सौ.दिपमाला काळे**:- एक शब्द पण बोललो नाही आम्ही, त्यांच्याशी बोलण्याच आमच काहीच नव्हत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** त्यांच्याशी काय बोलायच आता आणि येथे सांगाताही येत नाही की काय कॅटेगिरीची मुल आहेत तर ती.

**सौ.दिपमाला काळे**:- आणि इतका वेळ झाला आहे तर प्रत्येकाला वॉशरूमला जाव लागतच ना.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना बरोबर

**सौ.दिपमाला काळे**:- तितक तर मॅनर्स हव ना की कोणाला बसवाव आणि कोणाला बसु नाही द्याव.

**श्री.राजेंद्र पाटील** :- CCTV लावलेले आहे का

**मा.उपमहापौर** :- नाही , नाही नगरसचिव काय आहे ते पाहतील.

**मा.महापौर** :- पुढच्या महासभेपासुन आपण ते उघडे ठेवणारच नाही.

**सौ.दिपमाला काळे**:- हा विषय आज कंम्पलीट झाला पाहीजे आणि प्रशासनाने यांच्यावर कारवाई केली पाहीजे. (सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रत्येक महासभेला होईल नाहीतर

**सौ.दिपमाला काळे**:- आज माहिती पडले की काय आहे तर आम्ही गेल्या म्हणुन माहित पडले दुसरे कोणी गेल्या असत्या तर त्या बोलल्यापण नसत्या ज्येष्ठ महिला पण आहेत. प्रत्येकाला जाव लागत.

**मा.महापौर** :- ताई आता या पुढच्या महासभेला कुठल्याही प्रकारच गैरवर्तन होईल किंवा

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नाही ताई बाहेर पोलिस बसलेले आहेत. तरी त्यांची अशी ही हिंमत आहे. इतका त्यांचा धाक आहे का

**मा.महापौर** :- नगरसेवकांच्या व्यतिरीक्त कोणीही तिथ राहणार नाही. अतिक्रमण विभागाचे अधिकारी

**मा.उपमहापौर** :- सभेत सुध्दा थांबु द्यायच नाही ज्याच्याकडे पास असेल असेच थांबतील.

**सौ.दिपमाला काळे**:- तिथे कोणीही येत-जात

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.ईब्राहीम पटेल** :- प्रशासनाला सुचना द्या की ज्याच्याकडे पास आहे त्यालाच तुम्ही एन्ट्री द्या. जे अधिकारी असतील आणि ज्यांची येथे आवश्यकता असेल असेच येथे येतील. मागे आपण बघितल आहे काय घडलेले आहे ते तर.

**मा.महापौर** :- नाही इतर जे कार्यकर्ते आहेत आणि आपल्या अधिकाऱ्यांच्या व्यतिरीक्त नगरसेवकांच्या व्यतिरीक्त , इतर कोणीही महासभेमध्ये बसु देवु नये व त्यांना बाहेर काढण्यात यावे. गेले का

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर** :- घ्या पुढचा विषय घ्या, गोराणेसाहेब, विषय क्रं. २५ मध्ये खालचे दोन विषय तहकुब ठेवायचे आहे का , की सुधारीत अंदाजपत्रकासह सादर करायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सुधारीत अंदाजपत्रकासह सादर करायचे आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- पुढील महासभेमध्ये सुधारीत अंदाजपत्रकासह सादर करण्यात यावे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- महापौरताई त्याच्यामध्ये कस आहे की विषय मान्य करण्यात यावा. त्याच्यात ३ आणि ४ हा सुधारीत करून पुढच्या महासभेमध्ये पाठविण्यात यावा.

**मा.महापौर** :- ३ आणि ४ सुधारीत अंदाजपत्रकासह पुढील महासभेमध्ये सादर करण्यात यावा आणि याच्यामधील विषय क्रं. १ आणि २ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर मनपा प्र.क्र.१७ अंतर्गत नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविणे कामी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालील नमूद कामे करुन घेणे अत्यावश्यक असून सदर कामे लवकरात लवकर हाती घेणे बाबत या परिसरातील नागरीकांकडून सतत मागणी होत असल्याने जळगांव शहर मनपा प्र.क्र.१७ अंतर्गत खालील नमूद अ.नं. ०१ व ०२ चे कामे शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी किंवा महानगरपालिका निधी (मनपा फंड) अंतर्गत करणेस व सदर कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु. १७,४८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मौजे जळगांव शिवार गट क्र.१५८/२/१ येथे रस्ते खडीकरण करणे. | ७,५०,०००/- |
| २ | मौजे जळगांव शिवार गट क्र.१५८ येथे जुना नशिराबाद रोड झिपरु अण्णा नगरमध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | ९,९८,०००/- |
| | **एकूण -** | **१७,४८,०००/-** |

तथापी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावातील अ.नं. ०३ व ०४ कामांची प्रशासनाने शहानिशा करुन पुढील महासभेत सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सुधारीत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ३ | प्र.क्र.९ अंतर्गत श्री.मनोज पाटील ते श्री.हेमंत पाटील यांचे घरासमोरील ६ मिटर व श्री.भारंबे ते श्री.किरण पाटील यांचे घरापर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. | ३०,०००००/- |
| ४ | प्र.क्र.९ कृष्णा क्लास ते नाल्यापर्यंत आरसीसी गटार बांधणे. | ५०,००,०००/- |
| | **एकूण -** | **८०,००,०००/-** |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २६ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करुन मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ३७ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेबाबत मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अध्यक्ष महोदय मला याच्यामध्ये बोलयचे आहे. विषय क्रं. २६ आणि २७ याच्यामध्ये डबल-डबल काम आलेले आहे. म्हणजे ९ नंबर विषयामध्ये पण तिच काम आहेत.

**श्री.कैलास सोनवणे** :- म्हणजे काय

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- काय आप्पा डबल आलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- अ. क्रं. काय आहेत ते सांगा.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- हो. विषय क्रं. ९ मध्ये पण तिच काम आणि विषय क्रं. २६ मध्ये अ.क्रं. १८ ते २१ मध्ये तेच काम आणि राजुभाऊंनी जे काम दिलेले आहेत. ते तिच काम आहेत. म्हणुन प्रशासनाने लक्ष देवुन हे काम टाकावे. म्हणजे तिघे ठिकाणी एकच काम येत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आता याच्या संदर्भात काय आहे महापौरताई की प्रशासनाने ही काम वेगवेगळया विषयांमध्ये आलेले नसतील याची खात्री करावी. म्हणजे विषय मान्य करण्यात यावा. पंरतू त्याची अंमलबजावणी करण्यापुर्वी प्रत्येक कामाची चौकशी करून म्हणजे प्रत्येक काम जे आहेत प्रत्येक याच्यात प्रस्तावित केले गेलेले असतील किंवा अनेक हेड मध्ये प्रस्तावित केले गेलेले आहेत. याची तपासणी करून त्या पध्दतीने निर्णय घ्यावा.

**मा.महापौर** :- अशासकीय प्रस्ताव जे आपले सर्व सन्मा.सदस्यांकडुन आलेले आहेत. त्यांची शहानिशा करून घेण्यात यावी आणि मान्य करण्यात यावे. कारण काय आहे की नाराजी ओढवली जाते. ॲक्च्युअली ते सर्व चेक करूनच सदस्यांनी ते द्यायला हवे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- हो ३/३ ठिकाणी तेच तेच काम येत आहेत.

**मा.महापौर** :- हो ना मग

**श्री.मयुर कापसे** :- ताई आता सदस्यांना जर विचारल की कोणते काम आहेत तर त्यांना कस काय माहिती असेल.

**मा.महापौर** :- नाही ना भाऊ मी पण तेच सांगतेय ना

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- ९ नंबरचा विषय प्रशासनाकडुन आलेला आहे. २६ नंबरचा विषय तुमच्याकडुन आलेला आहे. २७ चा विषय राजुभाऊंच्या याच्यात आलेला आहे. म्हणजे हे जे काम आहेत हे तिन ठिकाणी आलेले आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- याची अंमलबजावणी करण्यापुर्वी प्रशासनाने

**मा.महापौर** :- याच्यामध्ये काही जी काम डबल आलेले असतील तर ते वगळण्यात यावे आणि त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे सदर विषयाला

**मा.महापौर** :- विषय क्रं. २६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे.सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना,शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधी, जळगांव मनपा निधीतुन कामे सुचविलेली असुन त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी या सोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते ३७ या विकास कामांच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन्मा.सदस्यांनी विविध प्रभागातील कामांची यादी सादर करतांना एकच काम वेगवेगळया लेखाशिर्षाखाली येणार नाही अथवा डबल कामे होणार नाहीत याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५३
**सूचक** :- **नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक** :- **कुलभुषण विरभान पाटील**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.**

**महासभा क्र.४४** **महासभा ठराव क्र. ९७२ दि.२३/१२/२०२२**

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | सरीता नेरकर | 1 | प्र.क्र.1 अंतर्गत महाविर नगर, राधाकृष्ण नगर, भारत नगर, त्रिभुवन कॉलनी, जनाई नगर, केसर बाग या भागातील रस्ते कॉक्रीटचे करणे | 1,00,00,000 |
| | 1,00,00,000 | | | |
| 2 | ॲड दिलीप पोकळे | 1 | नारायणी पार्क येथे रस्ता डांबरीकरण करणे | 45,00,000 |
| 3 | 7,75,00,000 | | राजमालती नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे व आरसीसी गटार कल्व्हंट टाकणे | 1,00,00,000 |
| 4 | | | गट नं. 329/1 ज्ञानगंगा शाळा जवळील ठिकठिकाणी व आजुबाजुचा परिसर रस्ते डांबरीकरण करणे व दोन्ही बाजु आरसीसी गटार व कल्व्हंट टाकणे | 1,00,00,000 |
| 5 | | | गजानन कॉलनी येथे रस्ते डांबरीकरण करणे व ठिकठिकाणी आरसीसी गटार व कल्व्हंट टाकणे | 1,00,00,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | | | धनाजी काळे नगर मध्ये ठिकठिकाणी कॉक्रीट रस्ता व आरसीसी गटार व कल्व्हेट टाकणे | 80,00,000 |
| 7 | | | पुष्पांजली कॉलनीमध्ये ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व आरसीसी गटार व कल्व्हेट टाकणे | 90,00,000 |
| 8 | | | एस. के. ऑर्ठल मिल जवळ सपकाळे यांच्या घरापासून ते दुध फेडरेशन मेनरोड पर्यत रस्ता डांबरीकरण करणे व आरसीसी गटार बांधणे | 80,00,000 |
| 9 | | | खडके चाळ मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे व आरसीसी गटार व कल्व्हेट टाकणे | 70,00,000 |
| 10 | | | पिवळी चाळ मधील रस्ते डांबरीकरण व आरसीसी गटार व कल्व्हेट टाकणे | 50,00,000 |
| 11 | | | श्री.छत्रपती शिवाजी नगर उड्डाण पुलापासून ते दुध फेडरेशन गेट पर्यत साईबाबा मंदीर एक बाजुची आरसीसी गटार व कल्व्हेट टाकणे | 60,00,000 |
| 12 | श्री. नवनाथ दारकुंडे | 2 | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील कानळदा रोड ते डि.पी.रोड पर्यंत उर्मिया सॉ मिल समोरील दोन्ही साईडला आर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट टाकणे. | 1,20,00,000 |
| 13 | 8,30,00,000 | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील कानळदा रोड ते खुबचंद शाळा विद्यालया पर्यंत दोन्ही साईडला आर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट टाकणे. | 1,00,00,000 |
| 14 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील खुबचंद शाळा विद्यालया पासुन हनुमान सॉ मिल पर्यंत दोन्ही साईडला आर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट टाकणे. | 20,00,000 |
| 15 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील उमिया सोसा. पासुन ते पटेल वाडी समोरील धनाजी काळे नगर डि.पी.रोड पर्यंत दोन्ही साईडला आर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट टाकणे. | 1,30,00,000 |
| 16 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील पटेल वाडी मागील गल्लीपासुन ते निळे यांचे घरापर्यंत दोन्ही साईडला आर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट टाकणे. | 20,00,000 |
| 17 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील कानळदा रोड ते निळे यांचे घरापर्यंत दोन्ही साईडला आर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट टाकणे. | 70,00,000 |
| 18 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील कानळदा रोड ते डि.पी.रोड पर्यंत उर्मिया सॉ मिल समोरील रस्ता कॉक्रीटींग करणे | 1,20,00,000 |
| 19 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील कानळदा रोड ते खुबचंद शाळा विद्यालया पर्यंत रस्ता कॉक्रीटींग करणे | 80,00,000 |
| 20 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील खुबचंद शाळा विद्यालया पासुन हनुमान सॉ मिल पर्यंत रस्ता कॉक्रीटींग करणे | 10,00,000 |
| 21 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील उमिया सोसा. पासुन ते पटेल वाडी समोरील धनाजी काळे नगर डि.पी.रोड पर्यंत रस्ता कॉक्रीटींग करणे | 1,00,00,000 |
| 22 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील पटेल वाडी मागील गल्लीपासुन ते निळे यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटींग करणे | 10,00,000 |
| 23 | | | प्रभाग क्रं. 02 शिवाजी नगर मधील कानळदा रोड ते निळे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 50,00,000 |
| 24 | श्री.कुलभूषण पाटील | 10 | अष्टभुजा माता मंदीरासमोरील मंदीरच्या गेट पासुन श्री. शिवा कुंभार यांच्या घरापर्यंत पुर्ण रस्ता डांबरी करण करणे. | 200000 |
| 25 | 3,27,00,000 | | अष्टभुजा माता मंदीर परिसरातील उर्वरीत संरक्षण भिंत पुर्ण | 2500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. | |
| 26 | | | दांडेकर नगर मधील रस्ते डांबरी करणे | 4000000 |
| 27 | | | पांढरी प्लॉट मधील रस्ते डांबरी करणे करणे | 4000000 |
| 28 | | | पांढरी प्लॉट मधील कॉक्रीटच्या गटारी बांधणे | 2500000 |
| 29 | | | ओमशांती नगर, शंकर अप्पा नगर मधील रस्ते डांबरी करण करणे | 6000000 |
| 30 | | | शिंदे नगर मध्ये गणपती मंदीरासमोरील रस्ते डांबरी करण करणे | 3000000 |
| 31 | | | शालीनी नगर मध्ये कॉक्रीट गटारी बांधणे | 1000000 |
| 32 | | | शालीनी नगर मध्ये रस्ते डांबरी करण करणे | 2500000 |
| 33 | | | जिल्हा बँक कॉलनीतील रस्ते डांबरी करण करणे | 4000000 |
| 34 | | | जिल्हा बँक कॉलनीत कॉक्रीटच्या गटारी बांधणे | 3000000 |
| 35 | सौ.रेश्मा काळे | 16 | प्र.क्र. 16 अंतर्गत नानीबाई हॉस्पीटल ते हेमूकलानी बगिचा रस्ता डांबरीकरण करणे | 1,69,70,651 |
| 36 | 3,93,75,822 | | प्र.क्र. 16 अंतर्गत देविदास कॉलनी ते टि.एम.नगर पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 99,05,171 |
| 37 | | | प्र.क्र.16 मध्ये संपुर्ण सालार नगर मध्ये ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 1,25,00,000 |
| | 24,25,75,822 | | | 24,25,75,822 |

**नगरसचिव :-** विषय क्रं. २७ जो आहे आणि ९ नंबर जो आहे तो प्रशासनाकडुन आलेला आहे आणि हा २७ नंबर जो आहे तो मा.महापौर महोदया यांच्याकडुन सन्मा.सदस्य. राजुभाऊ पाटील यांनी पाठविलेला आहे. एकच प्रस्ताव आहे दोघेही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- एकच प्रस्ताव आहेत.

**नगरसचिव विषय क्रं . २७ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांनी मा.आमदार श्री.चंदुलाल पटेल यांच्या माध्यमातुन महाराष्ट्र शासनाकडील मंजुर विकास निधी रक्कम रुपये ५ कोटी मधुन यादीतील १ ते ११ कामे करणेबाबत आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे

**मा.महापौर** :- विषय क्रं. २७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.१८८(११)/न.वि.-१६ दि.१० ऑगस्ट २०२२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजना अंतर्गत रक्कम रु.५.०० कोटी (लेखा शिर्ष - ४२१७०५४१) अन्वये खालील विवरण पत्रानुसार कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील कानळदा रोड ते डी.पी.पर्यंत उमिया सॉमिल समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| २) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील कानळदा रोड ते खुबचंद सागर विदयालय पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ३) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील खुपचंद सागर विदयालय पासुन हनुमान सॉमिल पर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. |
| ४) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील उमिया सोसायटी पासुन ते पटेलवाडी समोरील धनाजी काळे नगर डी.पी.रोड पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ५) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगरमधील पटेलवाडी मागील पासुन ते निळे यांच्या घरापर्यंत रोड पर्यंत |

| | |
|---|---|
| | रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ६) | प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगर कानळदा रोड ते निळे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| ७) | प्रभाग क्रं.०९ नॅशनल हायवे ५३ प्लॉट नं.२६ ते कार्तिक स्वामी मंदिरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ८) | प्रभाग क्रं.०९ साईबाबा मंदिर परिसर एस एन चौधरी ते विजय वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ९) | प्रभाग क्रं.११ रुक्मिणी नगर गट नं.१४० अ सुधाकर महाजन यांच्या घरापासुन ते योगेश किराणा पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| १०) | प्रभाग क्रं.१६ सिंधी कॉलनी अंध शाळेपासुन ते लक्ष्मीनगर चौक रस्ता डांबरीकरण करणे. |
| ११) | प्रभाग क्रं.१६ जोशी कॉलनी चौक ते सक्सेस क्लासेस पर्यंत डांबरीकरण करणे. |

सदरहु रस्ते मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.१८८(११)/न.वि.-१६ दि.१० ऑगस्ट २०२२ अन्वये कार्यान्वयन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असल्याने प्रस्तुत विकास कामांचे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्यात येत असुन सदर कामे करण्याकरीता कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे पत्र क्रं.साबांविज/५९७०/२०२२ दि.१८/१०/२०२२ अन्वये सदर कामांना ना-हरकत दाखला मिळण्याची मागणी केलेली आहे.

त्यानुसार वर नमुद कामांचे संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सदरचे कामाची जागा ही मनपा कब्जेवहीवाटीतील असुन अतिक्रमण विरहीत आहे. त्यानुसार पत्र क्रं.जशमनपा/साबा/११८४/ २०२२-२३ दि.०३/११/२०२२ अन्वये उक्त कामे करण्याकरीता ना-हरकत दाखला देण्यात आलेला असल्याने महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत उक्त नमूद केलेली शहरातील विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव यांचे मार्फत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २८ :-** जळगांव शहर मनपा प्र.क्र.१७ अंतर्गत ०१ ते ०८ विविध कामे शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी किंवा महानगरपालिका निधी (मनपा फंड) अंतर्गत करणेस व सदर कामी येणाऱ्या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. २८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१७ अंतर्गत नागरीकांना मुलभुत सुविधा पुरविणे कामी खालील नमुद कामे करुन घेणे अत्यावश्यक असुन सदर कामे लवकरात लवकर हाती घेणेबाबत या परिसरातील नागरीकांकडुन सतत मागणी होत आहे.

करीता मनपा प्रभाग क्र.१७ अंतर्गत खालील कामे शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या विविध निधी किंवा महानगरपालिका निधी (मनपा फंड) अंतर्गत करणेस व सदर कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.७६,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | मौजे जळगांव शिवार एस.टी.वर्क्स शॉप समोर लक्ष्मीभाऊ नगर ते बाबा मोटर्स व श्री.रविधनगर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटींग करणे. | ९९९०००..०० |

| | | |
|---|---|---|
| २. | मौजे जळगांव शिवार जुना नशिराबाद रोड झिपरु अण्णा नगर श्री.अजय नेमाडे यांच्या गिरणी पासुन ते श्री.अशोक सिताराम काळे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी.गटारी बांधणे | ९९८०००.०० |
| ३. | वार्ड नं.१७ गोपाळपुरा जुने जळगांव (पाण्याच्या हौदाजवळ) नविन ३५००० लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे, कुपनलिका करुन त्यावर विद्युत पंप बसविणे | १००००००.०० |
| ४. | जुने जळगांव हद्दीतील गोपाळपुरा पाण्याच्या हौदाजवळील हनुमान मंदीर जवळील श्री.अमोल पाटील यांचे घराजवळील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व आर.सी.सी.गटार बांधणे | ७०००००.०० |
| ५. | जुने जळगांव परिसरातील बुनकरवाडा ते श्रीराम मित्र मंडळ गल्ली ते श्री.कमलाकर अत्तरदे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ९९९०००.०० |
| ६. | जुने नशिराबाद रोड परिसरातील का.ऊ.कोल्हे विद्यालयासमोर श्री.अनिल चौधरी यांच्या घरापासुन ते श्री.मनोज खडके यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ९९९०००.०० |
| ७. | जुने जळगांव परिसरातील श्री.लक्ष्मण जावळे यांच्या घरापासुन ते श्री.दत्त मंदीरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ९९००००.०० |
| ८. | वा.नं.१७ मध्ये जुने जळगांव श्रीकृष्ण नगर (गोपाळपुरा) येथिल नागरीकांसाठी जिम्नेशियम हॉल बांधकाम करणे. | ९९००००.०० |
| | एकुण :- | ७६,७५,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . २९ :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत पिंप्राळा येथील मुख्य चौकात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा **अश्वारुढ** पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी शिल्पकार सरमद क्रिएशन, धुळे यांचे सर्वात कमीचे आलेले रक्कम रुपये-८१,३०,०००/- चे दरास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर**:- विषय क्रं. २९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत पिंप्राळा येथील मुख्य चौकात महाराष्ट्राचे आरध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी महासभा ठराव क्र.७८८ दि.२४/०३/२०२२ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ मंत्रालय, मुंबई दि.०२ मे २०१७ अन्वये सदर कामाचा पुतळयाचे क्ले मॉडेल तयार करुन कलासंचालनालय ,मुंबई यांचे कडुन मान्यता होणे अपेक्षीत असल्याने प्रथम पुतळा उभारण्याचे ई निविदा प्रसिध्द करुन दर मागविणे आवश्यक असल्याने यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिर निविदा सुचीनुसार निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने ई निविदा प्रि या राबविण्यास मा.आयुक्त सो., यांनी दि.१४/१०/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निविदा अटीशर्ती तपासुन दि.२१/१०/२०२२ रोजी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई निविदा सुचना क्र.१७० प्रसिध्द करण्यात आली त्याची माहिती दैनिक पुण्यनगरी या राज्यस्तरीय वृत्तपत्रात दि.२२/१०/२०२२ रोजी प्रसिध्द

करण्यात आली. त्यानुसार निविदा फॉर्म विक्रीची दि.२१/१०/२०२२ ते दि.०४/११/२०२२ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. तसेच पुतळयाचे क्ले मॉडेल व संकल्पचित्र बाबतचे समक्ष सादरीकरणाची दि.०७/११/२०२२ रोजी पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. त्यानुसार खाली नमुद एकुण ०६ शिल्पकार यांनी क्ले मॉडेल सादर केलेले आहे.

१. रिशी आर्ट, पुणे
२. गारनेट इंटेरीअल प्रा.लि.मुंबई
३. शिल्पज आर्ट, अमरावती
४. सरमद क्रिएशन, धुळे
५. अजिंक्य चौलकर, मुंबई
६. नहुष सरमद पाटील, धुळे

सदरचे क्ले मॉडेलची मा.आयुक्त सो., यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन निविदा सादर करण्याकरीता निवड करणे आवश्यक असल्याने मा.आयुक्त सो., यांचे पुढे क्ले मॉडेल दि.०७/११/२०२२ रोजी सादर करण्यात आले त्यावेळेस मा.आयुक्त सो., यांनी पदाधिकारी, सर्व पक्षीय गटनेते, प्रशासनातर्फे, शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक यांची समिती नियुक्ती करण्यासंदर्भात दि.०७/११/२०२२ आदेशीत केले. त्यानुसार सदर समितीची बैठक दि.११/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत केली असता सदरची बैठक ही काही तांत्रिक कारणामुळे होवु शकली नाही. त्यामुळे उक्त समितीची बैठक मा.आयुक्त सो., यांचे दि.११/११/२०२२ च्या मान्यतेनुसार दि.१४/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली तसेच उक्त कामाच्या निविदा प्रक्रियेस दि.१६/११/२०२२ पर्यंत निविदा स्विकृतीची मुदतवाढ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली व तशी संक्षिप्त सुचना दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रात दि.१३/११/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

दि.१४/११/२०२२ रोजी पुतळयाचे क्ले मॉडेल सुयोग्य निश्चितीकरीता वर नमुद समितीच्या उपस्थितीत वरील ०६ शिल्पकार यांनी सादर केलेल्या क्ले मॉडेल पैकी १. सरमद क्रिएशन, धुळे २.नहुष सरमद पाटील, धुळे ३.अजिंक्य चौलकर, मुंबई यांचे ०३ क्ले मॉडेल समिती मार्फत सुनिश्चित करण्यात आले. सदर बैठकीचे इतिवृत्तात बैठकीत ठरल्याप्रमाणे व निविदा अटीशर्तीनुसार क्ले मॉडेल सुनिश्चित केलेले शिल्पकार यांना निविदा सादर करण्यापुर्वी मा.आयुक्त सो., यांच्या दि.१५/११/२०२२ च्या मान्यतेनुसार अनुक्रमे (१) पत्र क्र.जशमनपा/साबा/१२८६ दि.१५/११/२०२२, (२) पत्र क्र.जशमनपा/साबा/१२८७ दि.१५/११/२०२२ (३) पत्र क्र.जशमनपा/साबा/१२८८ दि.१५/११/२०२२ अन्वये पत्र देण्यात आलेले आहे.

त्यानुसार सदर निविदा प्रक्रियेस दिलेल्या मुदतीत दि.१६/११/२०२२ सां.५.०० वाजे पावेतो एकुण ०६ शिल्पकार यांनी ई निविदा सादर केलेली आहे. परंतु निविदा अट क्र.१२ नुसार सादर केलेले क्ले मॉडेलला मा.आयुक्त सो., जळगांव शहर महानगरपालिका यांनी मान्यता दिल्यानंतरच निविदा प्रक्रियेत सहभाग घेता येईल. संकल्पनेस मान्यता न घेता निविदेत सहभाग घेतल्यास त्या निविदेचा विचार केला जाणार नाही असे नमुद असतांना उर्वरित ०३ शिल्पकार यांनी ई निविदेत सहभाग घेतलेला आहे. सदर क्ले मॉडेल यांना मान्यता न मिळालेल्या ०३ शिल्पकार यांचे निविदेतील व मान्यता मिळालेल्या ०३ शिल्पकार यांचे प्राप्त झालेले ई निविदाचे तांत्रिक लिफाफा क्र.०१ (कागदपत्रे) शहर अभियंता यांच्या समक्ष उघडले असता कागदपत्रांची छाननी प्रथम सार्व.बांधकाम विभाग निविदा तपासणी समिती यांच्या मार्फत छाननी केली असता सोबत दिलेल्या तक्त्यात निविदेतील आवश्यक कागदपत्र निविदाधारक यांनी सादर केलेली आहे. परंतु निविदेत नमुद केलेले शिल्पकार यांचे शासन मान्यता प्रमाणपत्र व EPF नोंदणी प्रमाणपत्र सर्व शिल्पकार यांनी सादर केलेले नाही. प्राप्त निविदाधारक यांच्यापैकी खाली नमुद तक्त्यातील अ.क्र.०२, ०४ यांना क्ले मॉडेल निवडी संदर्भात आयुक्त यांनी पत्र दिलेले नसल्याने त्यांनी सादर केलेली ई निविदा अपात्र ठरविण्यात आलेली आहे व ०६ चे निविदाकार यांनी दिलेल्या मुदतीत क्ले मॉडेल सादर केलेले नाही त्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. उर्वरित निविदाधारक अ.क्र.०१, ०३ व ०५ यांना मा.आयुक्त सो., यांनी क्ले मॉडेल पसंती संदर्भात दि.१५/११/२०२२ रोजी पत्र दिलेले आहे.

त्यामुळे निविदा अटीशर्तीनुसार पात्र ठरत असुन त्यांनी शासन मान्यता प्रमाणपत्र व EPF नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याने त्यांना दि.२८/११/२०२२ रोजी निविदा धारक अ.क्र.०१,०३ व ०५ यांना उक्त प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात पत्राव्दारे कळविण्यात आले त्यानुसार तिन्ही निविदाधारक यांनी दि.३०/११/२०२२ रोजी मुदतीत कागदपत्र सादर केलेले आहे. परंतु तिन्ही मक्तेदार यांनी त्यांनी शिक्षण घेतलेल्या विद्यापिठाचे प्रमाणपत्र सादर केलेले असुन त्यासोबत दिलेल्या पत्रात त्यांनी शिल्पकार यांचे शासन मान्यता नोंदणी कोणत्याही प्राधिकरणात अथवा कोणत्याही यादी मध्ये नोंद घेण्यात येत नसल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे त्यांनी आम्ही सादर केलेले विद्यापिठाचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यासंदर्भात विनंती केली आहे. तसेच त्यांनी EPF प्रमाणेपत्र सादर केलेले आहे. त्याचा गोषवारा खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | छाननी अहवालाचा अभिप्राय | पात्र / अपात्र बाबतचा शेरा |
|---|---|---|---|
| १. | अजिंक्य चौलकर, मुंबई | सोबत छाननी अहवाल जोडल्यानुसार | पात्र |
| २. | गारनेट इंटेरिअल प्रा.लि.मुंबई | | अपात्र |
| ३. | सरमद क्रिएशन, धुळे | | पात्र |
| ४. | शिल्पज आर्ट, अमरावती | | अपात्र |
| ५. | नहुष सरमद पाटील, धुळे | | पात्र |
| ६. | मे कमल कंस्ट्रक्शन कंपनी, नाशिक | | अपात्र |

वर नमुद तक्त्यातील निविदा धारक अ.क्र.०१,०३, व ०५ यांनी वर नमुद प्रमाणे दिलेले कागदपत्र त्यांच्या मागणीनुसार ग्राहय धरणे संदर्भात निविदा समितीचा निर्णय होण्याकरीता निविदा समिती पुढे प्रस्ताव सादर केला असता त्यात झालेल्या चर्चेनुसार शिल्पकार यांचे नोंदणी करणे संदर्भात मा.कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना मनपा पत्र क्र.जशमनपा/साबा/१४४९/२०२२/-२३ दि.०८/१२/२०२२ नुसार आपल्या कार्यालयाकडे शिल्पकार यांची स्वतंत्रपणे नोंदणी (शिल्पकारचे रजिस्ट्रेशन) करण्यात येते किंवा कसे याबाबत विचारणा केली असता त्यांच्या कडील पत्र क्र.डिओअे-२०२२/दोन/२२६९ दि.०९/१२/२०२२ नुसार सदर कार्यालयाकडुन शिल्पकारांची स्वतंत्रपणे नोंदणी (शिल्पकाराचे रजिष्ट्रेशन) या संचालनालयाकडे करण्यात ओलेले नाही. असे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदा समितीने याबाबत निर्णय घेवुन ई निविदा दराबाबतचे फोल्डर क्र.०२ उघडण्यास मा.निविदा समितीने दि.१३/१२/२०२२ रोजी मान्यता दिल्यानुसार वर नमुद अ.क्र.०१,०३ व ०५ यांचे ई निविदा दराबाबत फोल्डर नं.२ दि.१३/१२/२०२२रोजी उघडण्यात आले असुन उक्त शिल्पकार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्त्याची संगणकावर प्रिंट काढुन घेण्यात आली असुन उक्त तुलनात्मक तक्त्यांची प्रत मुळ प्रकरणास जोडलेली असुन त्या नुसार ई निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | अंदाजीत रक्कम रु.८५,००,०००/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | अजिंक्य चौलकर,मुंबई | रक्कम रु.८४,३०,०००/- | रु.८४,३०,०००/- |
| २ | सरमद क्रिएशन, धुळे | रक्कम रु.८१,३०,०००/- | रु.८१,३०,०००/- |
| ३ | नहुष सरमद पाटील, धुळे | रक्कम रु.८२,४५,०००/- | रु.८२,४५,०००/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता शिल्पकार सरमद क्रिएशन, धुळे यांचे दर इतर शिल्पकारांपेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा रक्कम रु.८१,३०,०००/- मात्रचे दर सर्व करासहीत, पुतळा मनपा साईटपर्यंत वाहतुक करणे, चबुतऱ्यावर बसविणे तसेच कामगार खर्च समाविष्ठ करुन सर्वात कमी आलेले आहे.

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.८१,३०,०००/- मात्र आहे. सदरचे आलेले दर हे अंदाजीत रक्कमेपेक्षा कमी आहे. सदरचा खर्च रक्कम रु.८१,३०,०००/- मात्र मनपा नविन पुतळे या लेखाशिर्षातुन सन २०२२-२३ मधुन

खर्च करावा लागणार आहे. उक्त कामा करीता शिल्पकार सरमद क्रिएशन, धुळे यांचे सर्वात कमी आलेले दर रक्कम रु.८१,३०,०००/- मात्र स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . ३० :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेसाठी येणारा रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- भाऊ याच्यामध्ये एक विषय आहे, महापौरताई मला बोलायचे आहे. भाऊ याच्यामध्ये एक विषय असा आहे की आपण हे डिझेल खरेदी करतोय. परंतू हे जाते कसे, वापरले जाते कसे, कोठे जाते याची कुठेच त्याची आपल्याकडे नोंद पाहीजे त्या पध्दतीने अपेक्षित नाहीये. जर आपण त्याच पुस्तक तपासल याच तर म्हणजे आवक जावक , वाहतुक तर आपण याच्यामध्ये पाहीजे ते दस्ताऐवज कुठेच आढळुन येत नाहीत. तर आपण याच्यामध्ये साहेब एक आपण एक शासकीय वाहनाच्या कामांसाठी वाहन वापरतो त्याच्यासाठीच आपण हे डिझल वापरतो. तर आपण आता गेल्या महासभेत २४ हजार लिटर डिझेलचे २ टँकर विकत घेतले. भाऊ तर आपल्याकडे अशी कोणती यंत्रणा आहे की २४ हजार लिटर डिझल २४/२४ हजार लिटर, २५/२५ हजार लिटर डिझल जे आहे ते दोन / दोन महिन्यात संपत आहे. पण आपल्याकडील वाहन बंद आहेत. आपल्याकडे जे वाहन होते, ट्रॅक्टर आहेत, घंटागाड्या ज्या होत्या त्या आपण ठेकेदाराला दिलेल्या आहेत. अजुन बरेच वाहन जी आहेत ती दिलेली आहेत. तर आपल्या कडे डिझल २४/२४ हजार लिटर, २५/२५ हजार लिटर डिझेल जे आहे. तर ते आपण दर दोन तिन महिन्याला खरेदी करतोय. तर याच जे लॉगबुक आहे ना ते एकदा चौकशी करून तपासल गेल पाहीजे आणि हे खाली करतांना आपले कोण अधिकारी उपस्थित असतात किंवा आपली जी काही यंत्रणा आहे किंवा संबंधित जे लोक आहेत त्याठिकाणी ते व्यवस्थीत रित्या पुर्ण खाली होत की नाही त्याच आपण आणि ज्या वाहनामध्ये देतोय तर त्या ठिकाणी किंवा ती वाहन आपल्याच मालकीचे आहेत का ? या सर्व बाबींची त्याठिकाणी चौकशी झाली पाहीजे. कारण की काय आहे की त्याठिकाणी आपण २५ हजार लिटर डिझेल खरेदी करतोय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भाऊ ते वाहन विभागाकडुन नोंदी घेण्यात येतात.

**मा.उपमहापौर**:- भाऊ बरोबर आहे पण ते प्रॉपर मेन्टेन नाहीये ना.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर**:- प्रॉपर मेन्टेन नाहीये हा विषय मला याच्यात आरोप नाही करायचे आहे. पण शंका इतकीच आहे की आपण आपली जी सर्व वाहन आहेत ती सर्वच्या सर्व त्याच्यातील समजा काही वाहन आपण तर मक्तेदाराला देवुन टाकलेली आहेत. जी आपली आरोग्यात जी कार्यरत वाहन आहेत ती , मग आपल्याकडे अशी कोणती वाहन आहेत की आपल्याला २५/ २५ हजार लिटर डिझेल लागतय. गेल्या महासभेत मंजुर केले ना भाऊ २४ हजार लिटर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हिशोब ठेवायलाच पाहीजे याचा.

**मा.उपमहापौर**:- आता याच्यामध्ये आणि भाऊ ते मॅन्युअली आहे आणि तुम्ही त्याच्यामध्ये पाहाल तर तुम्ही जर ते मागवल तर ते हाताने लिहुन लगेच देतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते हातानेच लिहीलेले असते.

**मा.उपमहापौर**:- हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते हाताने लिहीणे हे चुकीचे आहे. तर आपण जर ते वाहन बरोबर चालत होत की नाही हा पण विषय होतो.

**मा.उपमहापौर**:- कुठल्याही सदस्याने त्याठिकाणी अचानक जावुन चौकशी केली आणि लॉगबुक पाहील तर त्याठिकाणी मेन्टेन नाही भेटणार, रकाने खाली भेटतील त्याठिकाणी कारण की ते मॅन्युअली आहेत आणि ते

रकाने खाली नाही ठेवले पाहीजे आणि ते प्रॉपर मेन्टेन झाले पाहीजे. तर या सुचना महापौरताई तुम्ही कठोर कार्यवाहीचे सुचना दिल्या पाहिजे. त्या प्रॉपर मेन्टेन करण्याबाबतच्या सुचना दिल्या पाहीजे.

**मा.महापौर**:- प्रशासनाने या संदर्भात जे काही म्हणजे जे बिल येतात. तशा पध्दतीने याच कस खर्च याचा संपुर्ण तपशीलवार डिटेल्स पुढील महासभेत तपशिलवार हिशोब देण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. ३० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.१०/११/२०२२ रोजी चे अखेर डिझेल साठा शिल्लक १४७२ लिटर असुन सदर साठा २ ते ३ दिवसांसाठी होईल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.१०/११/२०२२ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| | प्रती लिटर दर रु.१२०.३८३७१/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१४,४४,६०४.५२/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.३,१५,२८४.५२/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.३,१५,२८४.५२/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.३,१५,२८४.५२/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी | | प्रति लिटर दर रु.९४.११/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | ११,२९,३२०/- |
| | एकूण रक्कम रुपये - | | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणी नुसार दि.१०/११/२०२२ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी जाहिर निविदा मागविली असता मुदतीत ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| १ | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव |
| २ | मे.अमल ऑटो जळगांव |
| ३ | मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो, चिंचोली,जळगांव |

वर नमुद तीन्ही निविदाधारकांपैकी अनुक्रमांक १, २ यांनी पुर्ण दस्ताऐवज सादर केलेले असल्यामुळे अ.क्र.१ व २ हे निविदाधारक पात्र आहे. परंतु अनुक्रमांक ३ निविदाधारकाचे दस्ताऐवज अपुर्ण असल्यामुळे अ.क्र.३ हे निविदाधारक अपात्र आहेत. त्यामुळे सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/१३ दि.१०/११/२०२२ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने वेळोवेळी होणाऱ्या डिझेल खर्चाबाबत दस्ताऐवज तपासुन खात्री करणेची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . ३१ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेसाठी येणारा रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दोघेही विषय क्रं. ३० व ३१ सारखेच आहेत तरी ते मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. ३१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांची मागणी क्र.११६७५ दि.०८/१२/२०२२ रोजी दिलेली असुन तसेच रिपोर्ट क्र.१९७६८

दि.०८/१२/२०२२ नुसार अखेर डिझेल साठा शिल्लक २१७० लिटर शिल्लक साठा असुन सदर साठा २ ते ३ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.०९/१२/२०२२ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर** | **सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर** |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.११०.८४७७३५/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१३,३०,१७२.८३/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.२,००,८५२.८३/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.२,००,८५२.८३/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.२,००,८५२.८३/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, मा.स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, मा.स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) मा.स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| | **एकूण रक्कम रुपये -** | | ११,२९,३२०/- |

मा.महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२)(२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली

आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणी नुसार दि.०९/१२/२०२२ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी जाहिर निविदा मागविली असता मुदतीत ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| १ | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव |
| २ | मे.अमल ऑटो जळगांव |
| ३ | मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो, चिंचोली,जळगांव |

वर नमुद तीन्ही निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ दस्ताऐवज उघडण्यास आले असुन ०३ निविदाकारापैकी अ.क्र.१,२ यांनी पुर्ण दस्ताऐवज सादर केलेले असल्यामुळे अ.क्र.१ व २ हे निविदाधारक पात्र आहे. परंतु अनुक्रमांक ३ निविदाधारकाचे दस्ताऐवज अपुर्ण असल्यामुळे अ.क्र.३ हे निविदाधारक अपात्र आहेत. त्यामुळे सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/१५ दि.०९/१२/२०२२ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मान्यतेस्तव तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२)(२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने वेळोवेळी होणाऱ्या डिझेल खर्चाबाबत दस्ताऐवज तपासुन खात्री करणेची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं. ३२ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' प्रकरण २ महानगरपालिका, स्थायीसमिती, खालील कामकाज या नियमा व्यतिरिक्त जळगांव शहर महानगरपालिकेच्या व समित्यांच्या सभांचे कार्यसंचालन विषयीचे जादा नियम तयार करणे संबंधीचे काम ॲड.श्री.एम.ए.पठाण, मानद संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद यांना देणेस व त्यासाठी अपेक्षित येणाऱ्या रक्कम रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याच्यात एक समिती गठीत करावी लागेल भाऊ , दोन सदस्य तुमचे , दोन सदस्य आमचे

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो , हो

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक MIM चा

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** या समितीमध्ये पुढील प्रमाणे नांव देत आहोत. समिती अध्यक्ष महापौरताई सौ. जयश्रीताई सुनिल महाजन, श्री. देविदासजी पवार, आयुक्त , श्री. कुलभुषण विरभान पाटील. मा.उपमहापौर,

श्री.सुनिलभाऊ सुपडु महाजन. विरोधीपक्ष नेता, श्री.ललितभाऊ विजयराव कोल्हे. सभागृह नेता, ॲड.सौ. शुचिताताई अतुलसिंह हाडा. सन्मा.सदस्या, श्री.राजेंद्र झिपरू पाटील. सन्मा.सदस्य, श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा. सन्मा.सदस्य आणि ॲड . श्री. दिलीप बबनरावजी पोकळे,सन्मा.सदस्य, श्री.रियाज अहमद अब्दुल करीम बागवान. गटनेता MIM , नगरसचिव श्री. सुनिल जगन्नाथ गोराणे अशा ११ लोकांची समिती त्याच्यामध्ये गठीत करण्यात यावी.

**श्री.प्रशांत नाईक :-** पवार साहेबांच नांव कमी होईल तर त्यांच्याऐवजी आयुक्त राहतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो , हो

**नगरसचिव :-** समितीचे अध्यक्ष कोण राहतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** समितीचे अध्यक्ष महापौरच राहतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ याच्यात काय राहील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पोटनियम तयार करायचे आहेत. म्हणजे एक दुसऱ्यांशी चर्चा करायची त्याबाबतीतमध्ये आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ लांबुन ते येत आहेत ती का काही मसुदा समिती आहे किंवा ती काही आपल्याला घटना बनवायची आहे का ? आपण फक्त ३ जण ठेवा जे बिचारे प्रामाणिक पणे काम करतील.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ नाही फक्त महापौर आणि विरोधी पक्ष नेते हे दोनच ठेवा बस.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही आणि माझी सुचना ही राहील की त्यामध्ये तुम्ही हक्कभंगाची ती तुम्ही त्याच्यामध्ये घ्या. आपल्याला टाकता येईल हक्कभंगाचे, शासनाकडुन मंजुर करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही आप्पा कस आहे की चर्चा करतांना ज्या ज्या काही प्रॅक्टीकल मध्ये अडचणी येतात ना आपल्याला म्हणजे सभा कामकाज करतांना.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर त्या मध्ये कोणत्या गोष्टींचा समावेश करायचा.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना , तर मला त्याच्यामध्ये अस वाटत की,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर आहेत, उपमहापौर आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना मग आणि एक राजुभाऊंना घ्या. शुचिताताई आहेत म्हणजे ज्यांना नॉलेज आहे असे घ्या. म्हणजे रिकामा वेळ वाया जाईल त्याच्यामध्ये ते आपल्याला केव्हा कामात येईल पुढच्या टर्म मध्ये कामात येईल आपल्याला

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा कस आहे. याच्यामध्ये सदस्य जे आहेत ते ४ ही असले तर ते निर्णय घेतील.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक त्याच्यामध्ये मुख्यविधी सल्लागार यांचा ही समावेश करून घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आनंद मुजुमदार , ठिक आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो म्हणजे कस आहे कायदेशीर सल्ला पण भेटेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे आनंदजी मुजुमदार यांचाही समावेश करावा.

**मा.महापौर**:- याच्यामध्ये विशालभाऊंनाही ॲड करून घ्यावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ताई नको.

**मा.महापौर**:- नाही हे प्रामाणिक मत आहे भाऊ माझ , विरोधीपक्ष नेत्यांना कट करून टाकु आपण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ताई नको नको , त्यांच्या पदाच्या हिशोबाने पाहीजेच नांव त्यांच.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अजुन कोणाचे नांव सुचविण्याची ईच्छा असेल तर त्यांनीही नांव सुचवल तरी काही अडचण नाही आपण ही जी नांव आहेत ही मान्य करतोय. या उपरांत समितीमध्ये काम करण्याच्या संदर्भातील ज्यांची मानसिक ईच्छा असेल त्यांची आणि तयारी असेल त्यांची नांव समितीमध्ये ॲड करून घ्यावीत.

**मा.महापौर**:- भाऊ पुर्ण सांगा म्हणजे

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर**:- भाऊ समितीमध्ये अध्यक्ष महापौर असतील का? सचिव आणि अध्यक्ष , म्हणजे नगरसचिव

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही तस काही नाही कारण की आहे की शासकीय हे नसल्याने पदाधिकाऱ्यांनी अध्यक्ष महापौरांना करता येईल समितीच्या

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. ३२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, ॲड.श्री.एम.ए.पठाण, मानद संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था,औरंगाबाद यांचे दिनांक १०/१०/२०२२ चे पत्रानूसार जळगांव शहर महानगरपालिकेत सभा कामकाजा संबंधी जादा नियम तयार करणेबाबत चे पत्र प्राप्त झालेले असून सदर पत्रात नमूद केलेनूसार महानगरपालिकांच्या विविध सभांचे कार्यान्वयन योग्य प्रकारे होण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' प्रकरण २ इत्यादिंचे कामकाज या नियमा व्यतिरिक्त जादा नियमांची आवश्यकता भासते व महानगरपालिकेच्या व समित्यांच्या सभांचे कार्यसंचालन योग्य रीतीने व्हावे या साठी जादा नियमांची आवश्यकता आहे. महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियमाचे कलम ४५४, व ४५७ (२) (अ) ते (ज) खालील तरतुदी प्रमाणे जादा नियम करण्याची तरतूद आहे. ज्यात प्रामुख्याने महानगरपालिकांचे व समित्यांचे कामकाज चालविण्याची रीत याचा उल्लेख केलेला आहे.

ॲड.एम.ए.पठाण, मानद संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद यांनी औरंगाबाद महानगर पालिकेत सुमारे १८ वर्षे नगर सचिव वर्ग १ पदावर काम केलेले असून सेवानिवृत्ती नंतर सध्या वकिली व्यवसायासह अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा मानद संचालक असून संस्थेतर्फे पालिका अधिकारी, कर्मचारी आणि लोक प्रतिनिधी यांना प्रशिक्षण देण्याचे काम देखील करीत आहे. आपल्या महानगरपालीकेत देखील सभा कामकाज नियम संदर्भात स.पालिकां सदस्याना प्रशिक्षण दिलेले असून त्यांनी महानगरपालिका कामकाज व सभा कामकाज पध्दती या विषयावर पुस्तक लिहलेले आहे. व त्यांना महानगरपालीकाचे जादा नियम तयार करण्याचा देखील अनुभव आहे. आपल्या महानगरपालिकेसाठी देखील जादा नियम तयार करण्याची त्यांनी तयारी दर्शविलेली आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या व समित्यांच्या सभांचे कार्यसंचालन विषयीचे जादा नियम तयार करणे साठी मा.महापौर यांचे अध्यक्षते खाली सभेत एक उप समिती गठीत करुन उपसमितीने वेळोवेळी बैठका घेवून मंजुरी दिल्या नंतर प्रारुप नियमांना महासभेपुढे मंजुरी साठी ठेवणे, सूचना व हरकती मागवणे, आलेल्या सूचना व हरकती वर निर्णयानंतर शासनास मंजुरी साठी पाठवावे लागेल. उप समितीत मा.महापौर, (अध्यक्ष) उपमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, अभ्यासू पालिका सदस्य, मा.आयुक्त, तसेच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे निमंत्रित सदस्य म्हणून ॲड.एम.ए.पठाण यांची तसेच या उप समितीचे सदस्य सचिव म्हणून नगरसचिव यांची याप्रमाणे उप समिती गठीत करावी लागेल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' प्रकरण २ इत्यादिंचे कामकाज या नियमा व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या व समित्यांच्या सभांचे कार्यसंचालन बाबत जादा नियमांचे प्रारुप श्री.पठाण हे तयार करुन देणार असून उपसमितीच्या सभेत यावर सविस्तर चर्चा विनिमय करुन, सर्वांचे सूचना, दुरुस्त्यांचा विचार करुन प्रारुप जादा नियमांना अंतिम स्वरुप द्यावे लागेल. तसेच त्याचे इंग्रजीत देखील भाषांतर करावे लागणार आहे.

उप समित्यांचे सर्व सभांना श्री.पठाण यांना स्वत:च्या वाहनाने हजर राहावे लागेल, या नियमावली साठी त्यांनी प्रवास खर्च, निर्वाह भत्ता, प्रारुप नियम तयार करणे, प्रस्तावित दुरुस्त्या, प्रस्तावाचे लिखाण, शासनास पाठवावयाचे प्रस्ताव तयार करुन देणे, सभेपुढे ठेवावयाचा प्रस्ताव, शासनास पाठवावयाचे अंतिम नियम, सर्व नियमांचे इंग्रजीत भाषांतर, मानधन इत्यादी सर्व कामे रु.१,२५,०००/- तसेच प्रारुप नियमाना उप समितीची मंजुरी मिळाल्या नंतर महासभेत ठेवण्यासाठी १०० छापील प्रति उपलब्ध करुन देणे साठी येणारा खर्च रुपये २५,०००/- मात्र असे एकूण १,५०,०००/ मात्रचा खर्च याकामी अपेक्षित येईल असे त्यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेले आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेने यापूर्वी शासनाकडे सभा कामकाज नियम मंजूरीसाठी सन - २००३ मध्ये प्रस्ताव तयार करुन पाठविलेला होता परंतू सदर प्रस्तावास शासनाकडुन मंजूरी मिळालेली नाही. सभा कामकाज नियमांअभावी जळगांव शहर महागनरपालिकेतील सदस्यांना महासभेत महत्वाच्या कायदेशिर बाबींवर निर्णय घेण्यासाठी वारंवार कायदेशिर अडचणी येतात त्यामुळे जादा सभा कामकाज नियमाबाबत मंजूरी मिळणेसाठी सन्मा.सदस्यांची वारंवार सभागृहात मागणी होत आहे. करीता जळगांव

शहर महानगरपालिकेत जादा सभा कामकाज नियम तयार करणे कामी श्री.ॲड.एम.ए.पठाण, मानद संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद यांच्या औरंगाबाद महानगरपालिकेतील अनुभव व त्यांनी इतर महानगरपालिकेत तयार केलेले सभा कामकाज नियम व त्याचा अनुभव लक्षात घेता त्यांचे पत्राप्रमाणे सभा कामकाज नियम तयार करणेसाठी श्री.ॲड.एम.ए.पठाण यांची नेमणूक करणेस व यासाठी एक उपसमिती गठित करणेस व श्री.ॲड.एम.ए.पठाण यांना सभा कामकाज नियम तयार करण्यासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रुपये १,५०,०००/- मात्रचे अदा करावयाच्या रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण - ५ मधिल नियम - ५ (२) (२) मधिल तरतूदीनूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभा कामकाज नियम तयार करणेसाठी खालील उपसमिती तयार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सौ.जयश्री सुनिल महाजन | महापौर - उपसमिती अध्यक्ष |
| २) | श्री.देविदास पवार | आयुक्त |
| ३) | श्री.कुलभुषण विरभान पाटील | उपमहापौर |
| ४) | श्री.सुनिल सुपडु महाजन | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्री.ललित विजय कोल्हे | सभागृहनेता |
| ६) | ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा | सन्मा.सदस्या |
| ७) | श्री.राजेंद्र झिपरु पाटील | सन्मा.सदस्य |
| ८) | श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा | सन्मा.सदस्य |
| ९) | ॲड.श्री.दिलीप बबनराव पोकळे | सन्मा.सदस्य |
| १०) | श्री.रियाज अहमद अब्दुल करीम बागवान | गटनेता,एम.आय.एम. |
| ११) | श्री.विशाल राधेश्याम त्रिपाठी | सन्मा.सदस्य |
| १२) | श्री.सुनिल जगन्नाथ गोराणे | नगरसचिव - उपसमिती सचिव |
| १३) | श्री.आनंद मुजुमदार | मुख्य विधी सल्लागार |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . ३३ :-** आरसीएच फेज २ अंतर्गत कार्यरत चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारिका यांना दिनांक ०३/०१/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधी करीता पुन:र्नियुक्ती देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. ३३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव अंतर्गत चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारिका कंत्राटी स्वरुपात कार्यरत आहेत. त्यांचा सदरच्या कालावधिचा करार दिनांक ३१/१२/२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने वर नमुद कर्मचारी यांनी त्यांची पुढील पुन:र्नियुक्ती मिळणे बाबत इकडील कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

वर नमुद कार्यरत असलेल्या वैदयकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे खालील प्रमाणे :-

| अ.क्र | वैदयकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | कार्यरत असलेल्या हेल्थपोस्ट व दवाखान्याचे नांव |
|---|---|---|
| १ | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे, वैदयकीय अधिकारी | शाहिर अमर शेख दवाखाना, सुभाष चौक हेल्थपोस्ट |
| २ | डॉ.पल्लवी किसनराव पाटील, वैदयकीय अधिकारी | म.मो.मुलतानी दवाखाना, मेहरुण गावठाण हेल्थपोस्ट |
| ३ | डॉ.सोनल गिरीष जोशी, वैदयकीय अधिकारी | नानीबाई अग्रवाल दवाखाना, इंडिया गॅरेज हेल्थपोस्ट |
| ४ | डॉ.सायली चंद्रकांत पवार, वैदयकीय अधिकारी | शिवाजी नगर हेल्थपोस्ट |
| ५ | योगिता बबन बाविस्कर, परिचारीका | पिंप्राळा हुडको दवाखाना, पिंप्राळा हेल्थपोस्ट |

वर नमुद तक्त्यातील १ ते ५ कर्मचारी हे त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या ठिकाणी कार्यरत असून, त्या ठिकाणी (OPD) गरोदर माता (ANC), यांची दैनंदिन तपासणी तसेच वेळोवेळी राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येत असतात. उदा.नियमित लसिकरण, वार्षिक लसिकरण मोहिम, जननी सुरक्षा योजना, प्रधान मंत्री मातृत्व वंदना योजना, मिशन इंद्र धनुष्य यांसारख्या कार्यक्रमांसाठी सदर वैदयकीय अधिकारी व कर्मचारी हे आपली नित्य सेवा देत असतात. तसेच जागतिक महामारी कोव्हिड-१९ हया साथ रोगाचा जळगांव शहरात जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झालेला असता त्या काळातही त्यांनी अहोरात्र आपली सेवा देवून कर्तव्य बजावलेले आहे. तसेच यापूर्वी ही वैदयकीय अधिकारी यांची मनुष्यबळ कमी असल्याने वरील चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांना ५% वेतनवाढ देवून पुर्ननियुक्ती देण्यात आलेली आहे.

तथापि, सदर चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांनी कामाचा वाढता व्याप व वाढती महागाई लक्षात घेता ५% वेतनवाढ अत्यंत अल्प असल्याने १०% वेतनवाढ लागू करुन पुन:र्नियुक्ती मिळणे बाबत विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने आयुक्त यांनी सदर बाब धोरणात्मक निर्णयास्तव स्थायी समितीच्या मंजुरी साठी पाठविणेस दि.११/११/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | सदयस्थितीत असलेले मानधन | प्रस्तावीत १०% नुसार वाढीव मानधन | पुर्ननियुक्तीचा कालावधी व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे | वैदयकीय अधिकारी | ३४७२२ | ३८१९४ | दि.०३/०१/२०२३ ते दि.३१/१२/२०२३ |
| २ | डॉ.पल्लवी किसनराव पाटील | वैदयकीय अधिकारी | ३४७२२ | ३८१९४ | |
| ३ | डॉ.सोनल गिरीष जोशी | वैदयकीय अधिकारी | ३४७२२ | ३८१९४ | |
| ४ | डॉ.सायली चंद्रकांत पवार | वैदयकीय अधिकारी | ३४७२२ | ३८१९४ | |
| ५ | योगिता बबन बाविस्कर | परिचारीका | १०६०९ | ११६७० | |

उपरोक्त कंत्राटी स्वरुपात कार्यरत चार वैदयकीय अधिकारी व परिचारिका यांना दिनांक ०२/०१/२०२२ या एक दिवसाचा खंड देऊन एकूण मानधनावर १०% वेतनवाढ लागू करुन दिनांक ०३/०१/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीसाठी पुन:र्नियुक्ती देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . ३४ :-** सन २०२२-२३ या आर्थीक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडी मधील शिक्षिका व मदतनिस यांना दि.०३/१२/२०२२ ते दि.१५/०४/२०२३ पावेतो नविन मानधनावर नियुक्ती आदेश देणेबाबत तसेच सदर कालावधीतील अंदाजित मानधन रक्कम रु.१३ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर**:- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. ३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सेमी इंग्रजी माध्यमाच्या बालवाडीतील शिक्षिका २० व मदतनिस १० तसेच मराठी माध्यमातील बालवाडी शिक्षिका ९ व मदतनिस ९ असुन यांना मानधन तत्वावरील नविन नियुक्ती आदेश दि.०३/१२/२०२२ ते दि.१५/०४/२०२३ पावेतो देणेस तसेच सदर कालावधीतील अंदाजित मानधन एकूण रक्कम रु.१३/- लक्ष मात्रचा खर्च महिला व बालकल्याण निधीतून करणेस महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- कुलभुषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्रं . ३५ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संविदांची माहिती घेतली.

**मा.उपमहापौर**:- माझं अनुमोदन आहे.

**मा.महापौर**:- विषय क्रं. ३५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. सर्व संविदा मंजुर करण्यात येत आहे. राष्ट्रगीताला सुरूवात करण्यात यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया माझ्या वॉर्डाचा विषय आहे. कालच्या दिवशी लहानमुलाचे लचके तोडले कुत्र्याने उस्मानिया पार्कमध्ये त्याच्यावर उपाययोजना काय करताय आपण

**मा.महापौर**:- आपण त्या संस्थेवाल्यांना बोलवतो आहे ज्यांना आपण ते काम दिलेले आहे. त्यांच्याशी बोलुन ती सविस्तर चर्चा करावी लागेल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८१ पारित करण्यात आला.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./८४ दि.१४/१०/२०२२ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय शुध्दहवा या निधी अंतर्गत प्रभाग क्रं.०५ बळीराम पेठ मधील राहुल गारमेंट ते सुवर्ण प्लाझा व जुने नगरपालिके पाठीमागील रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार एन एम आर कंन्स्ट्रोटेक प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.८,१३,६८०/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./८५ दि.१४/१०/२०२२ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय शुध्दहवा या निधी अंतर्गत प्रभाग क्रं.०५ बळीराम पेठ मधील धर्माधिकारी ते वैभव कापड दुकान व गोपाळ स्टेशनरी ते मनोहर साडीया पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार एन एम आर कंन्स्ट्रोटेक प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.९,९३,०९९/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./८६ दि.१४/१०/२०२२ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय शुध्दहवा या निधी अंतर्गत प्रभाग क्रं.०५ बळीराम पेठ मधील रणजीत इलेक्ट्रीकल ते ग.स.सोसायटी व डॉ.दिक्षीत ते बालाजी शॉपी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार एन एम आर कंन्स्ट्रोटेक प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.९,९२,७६६/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/२५ दि.२७/१०/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत प्रभाग क्रं.१६, सर्वोत्तम नगर, मृत्युंजय महादेव मंदिर, कलाभवन समोर १ हायमास्ट बसविणे व इतर ७ कामे करणे कामी मक्तेदार इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.६,१४,०९०/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/२६ दि.०१/११/२०२२ अन्वये विदयुत विभाग यु.क्रं.१ व ४ चे कार्यक्षेत्रात येत असलेल्या प्रभागांमध्ये मा.आमदार यांचे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव शहरात ठिक ठिकाणी उभारणेत आलेल्या पोलवरील तसेच मनपामार्फत उभारलेल्या पोलवरील व शौचालय ठिकाणी बंद असलेले एलईडी पथदिवे दुरुस्त करणे (मार्च २०२३ अखेर पर्यंत) कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.५,७९,०००/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०० दि.०७/११/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ अंतर्गत जळगांव शिवार येथील सी.सर्वे नं.७९७८ रेल्वे कॉलनी मधील म.न.पा. ओपन स्पेस मध्ये ओपन जिम साहित्य व लहान मुलांची खेळणी पुरविणे कामी

मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कन्सट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.४,५७,३६९/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०१ दि.०७/११/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०५ अंतर्गत दिक्षितवाडी बगिचा व परिसरात आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री.अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.९,४९,९६५/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०२ दि.०७/११/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ अंतर्गत गंधर्व कॉलनी गट नं.५० पिंप्राळा शिवार येथील ओपनस्पेस विकसीत करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कन्सट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.९,१०,४६६/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०३ दि.०७/११/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ अंतर्गत भगीरथ कॉलनी येथील म.न.पा. ओपनस्पेस विकसीत करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कन्सट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.९,१४,७३६/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१०. प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/२६ दि.१६/११/२०२२ अन्वये विदयुत विभाग यु.क्रं.२ व ३ चे कार्यक्षेत्रात येत असलेल्या प्रभागांमध्ये मा.आमदार यांचे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव शहरात ठिक ठिकाणी उभारणेत आलेल्या पोलवरील तसेच मनपामार्फत उभारलेल्या पोलवरील व शौचालय ठिकाणी बंद असलेले एलईडी पथदिवे दुरुस्त करणे (मार्च २०२३ अखेर पर्यंत) कामी मक्तेदार न्यु.आर.के.इलेक्ट्रीकल्स, जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर रक्कम रु.५,८२,८७५/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./११८ दि.२२/११/२०२२ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव करीता संकेतस्थळाच्या Hosting Service शुल्क, ई-मेल सुविधा शुल्क नोंदणीचे व संकेत स्थळाची माहिती सुरक्षीत ठेवणे कामी मक्तेदार Tech ९ Services Chinchwad, Pune यांचे प्रती वर्ष रक्कम रु.५५,०००/- मात्र असे ०३ वर्षाकरीता एकूण रक्कम रु.१,६५,०००/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५३**
**सूचक** **:- नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक** **:- कुलभुषण विरभान पाटील**

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**